विदर्भ साहित्य संघ प्रकाशन

# आनंद गीत

[ भाग चौथा ]

१९६९
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १५५२

कवि :
आनंदराव कृष्णाजी टेकाडे

एकमेव विक्रेते
प्रकाशन, उत्तर अंबाझरी मार्ग,
धरमपेठ, नागपूर

REFBK-0011975

★

मूल्य आठ रुपये

३२९६८
काव्य
८/२/६२
९५४२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३२९६८ वि: काव्य
क्रमांक ९५४२ नों दि: ८/२/६२

32968
काव्य
४१५६२
9542

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32968 वि: काव्य
क्रमांक 9542 नों. दि. ४१५६२

विदर्भ साहित्य संघ प्रकाशन

# आनंद गीत

[ भाग चौथा ]

REFBK-0011975

११९८५

कवि :

आनंदराव कृष्णाजी टेकाडे

एकमेव विक्रेते

जयश्री प्रकाशन, उत्तर अंबाझरी मार्ग,

धरमपेठ, नागपूर

मूल्य आठ रुपये

प्रकाशक :

**श्री. गो. काशीकर**

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ

उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर

आनंद गीत– भाग ४ था

पहिली आवृत्ति– आक्टोबर १९६१

प्रति ११००

१ ल्या आवृत्तीचे

प्रकाशक व विक्रेते–

**जयश्री प्रकाशन, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर**

मुद्रक :

**मुरलीधर गंधे**

प्रदीप मुद्रणालय,

धरमपेठ, नागपूर

माझी आई
तीर्थरूप काशी
हिच्या पावन चरणी
भक्तिपूर्वक अर्पण.

# पुरस्कार

महाराष्ट्राचे एक जेष्ठ व श्रेष्ठ कवि श्री. आनंदराव टेकाडे यांच्या 'आनंद गीत' या काव्यसंग्रहाचा चवथा भाग विदर्भ साहित्य संघातर्फे प्रकाशित होत आहे. एका प्रतिभासंपन्न थोर कवीचा मौलिक काव्यसंग्रह रसिक वृन्दांना सादर करताना आम्हाला विशेष अभिमान वाटत आहे.

स्वातंत्र्यापूर्वी, कवि आनंदराव टेकाडे यांच्या प्रसिद्ध झालेल्या 'आनंद गीता'च्या तीन खंडांनी संपूर्ण मराठी मुलुखात संचार करून, आपल्या काव्यदीप्तीने मराठी मने तेजोवर्धित केली होती – सुप्त भावनांना जागृत करून आशावादाने ती फुलविली होती; आणि आपला उच्च व उदात्त दर्जा प्रस्थापित केला होता. तरी सुद्धा, कवीला आपल्या जीवनात काही कमी आहे, काही अपुरे आहे असे वाटून त्यांनी प्रस्तुत चवथा खंड निर्माण केला. तो आजच्या स्वातंत्र्याच्या काळात आपल्या असीम गुणसंपदेने कवीला पूर्णत्व प्राप्त करून देण्यास पूर्णत: समर्थ ठरेल, यात संदेह नाही.

आज कवीने आपल्या वयाचे सत्तरावे घर ओलांडले आहे ते शरीराने आता बरेच थकले आहेत पण त्यांचे मन आणि हृदय मात्र तरुण आहे; ते इतके की गेल्या साठ वर्षांच्या महान तपस्येच्या आत्मिक बळावर कवि प्रखर तेजाने आपले 'आनंद-गीत' अखंड गात आहेत. 'आनंद गीता'च्या या चवथ्या खंडात कल्पनावैभवाचे, भावसौंदर्याचे आणि रूप, रस, गंध, नाद व सौरभ आदि गुणविलासांचे जसे मनोज्ञ दर्शन घडते तसेच

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 32966 (3) दि: 4/02/
क्रमांक 9554(2) नों. दि. 7/4/62

राष्ट्रभक्ति, स्वातंत्र्यसंवर्धनाची तळमळ, जीवननिष्ठा, वात्सल्य व प्रेम, ध्येयपूर्तीस्तव झेप घेणारी शक्ति, सामाजिक जीवनाशयाचे विविध तेजस्वी पैलु आदींचे सम्यक् दर्शनहि घडून, द्रष्टया कवीच्या काव्यास्मितेने मन प्रसन्न होते.

प्रस्तुत चवथ्या काव्यखंडात आनंदाचे जे वैशिष्टचपूर्ण आत्मकथन आहे ते कवीच्या कवित्वाची व अंतरंगाची थोरवी सहज सिद्ध करील इतके प्रभावी आहे; आणि म्हणून कवि व त्याचे काव्य यासंबंधी विस्ताराने अधिक काही लिहिण्याची आवश्यकता नाही.

कवि श्री. आनंदराव टेकाडे यांनी आपल्या 'आनंद-गीता'चा हा चवथा भाग विदर्भ साहित्य संघाला सर्व हक्कासह उदार अंत:करणाने प्रदान करून उपकृत केले आहे. त्यांच्या या अमोल देणगीबद्दल वि. सा. संघ त्यांचा ऋणी आहे.

कवि आनंदाचे हे अमर आनंद गीत आहे. त्याचे सहर्ष स्वागत करून मराठी रसिक जनता त्याचे सदैव आनंदाने यशोगान करीत राहील, असा विश्वास वाटतो.

केन्द्रीय कार्यालय, नागपूर,
दिनांक १० ऑक्टोबर १९६१
घटस्थापना : १८ माहे सौर आश्विन १८८३

ना. रा. शेंडे
अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ

# —: अनुक्रमणिका :—


| कविता | पृष्ठ | कविता | पृष्ठ |
|---|---|---|---|
| आनंदाचे आत्मकथन | ९ | आईचे गाणे | २४९ |
| प्रस्तावना | ५० | आश्चर्य | १११ |
| तेजस्विनी | १७ | आजचे गाणे | ८९ |
| श्रीगणेशायनमः | ३९६ | आज पहा | २३१ |
| श्रीरघुराजवंदन | ३८७ | आनंद चिरायु होवो | ३७४ |
| श्रीपूजन | ३८१ | आनंदाचे भरतवाक्य | ३७३ |
| अरुणोदय | ३६४ | आमुची स्वतंत्रता | ३५८ |
| अखंड पथिक | ३२२ | आता कुणास मोही | ३१४ |
| अखिल भारतास | ३५६ | आमुचा दादा— | ३४८ |
| अग्रणी | २१९ | आम्ही | २४ |
| अच्युत | २०६ | आम्ही मथुरेच्या | ६३ |
| अजब जीव | ३६२ | आवडीचे गाणे | २०३ |
| अतिथि | ३० | उत्कंठ | ५२ |
| अद्भुत | १६२ | उमेदीचा बाळ | २०५ |
| अद्भुत रणसंग्राम | ८१ | ऋतुराज | ४५ |
| अधीर राधा | १८६ | एक रीत | २४८ |
| अनुरागाचा प्रभाव | ६१ | ओळख | ७३ |
| अर्पण | ३९८ | अंधार | २२२ |
| अभियोग | २१० | कट्यार मानेवरी | ३०२ |
| अभिवादन | ३३८ | कर्मयोगी लोकनायक | ३४१ |
| अमर नजर | २१३ | कलगी—तुरे | ३७६ |
| अमर शुक | ३३७ | कवि कोकिळास | ३११ |
| अविनाशी तेज | १५८ | कविता | १९६ |
| आईचे कौतुक | ४७ | काजवा | २४० |

| कविता | पृष्ठ |
|---|---|
| काल–वसा | २२८ |
| कालाय तस्मै नमः | ६० |
| का हसतेस | ४० |
| काळोख | ३४६ |
| कुणी दोन जीव– | ३९२ |
| कुर्यात् सदा मंगलम् | ३४६ |
| खरी कविता | १२९ |
| खुळेपणा | १६३ |
| गर्जू सदा 'जय' भारता ! | ३६७ |
| गायकीस– | ३५२ |
| गा रे | ३०० |
| गीत ग्रहण | २३२ |
| गुढी पाडवा | ३२५ |
| गुणी मैत्री | २०७ |
| गुलाब | ३३१ |
| गुलामाची गर्जना | १७३ |
| गोप–बाला | ९८ |
| गंगावतरण | १३० |
| घातकी | ३६३ |
| घोडा आणि स्वार | २८५ |
| चकित चित्त | १२६ |
| चमत्कार | २१७ |
| चराचराची माता–चैतन्य | ३५३ |
| चित्तरीति | १७८ |
| चित्रदर्शन | २५० |
| चिमण्या | १६४ |
| चिरंजीव | १५१ |
| चंदुलालचे अजब धाडस | ३४३ |
| चांदण्या आणि फुले | २५९ |
| चांदण्यांचे नवल | ३७ |
| चांदीचा चेंडू | २५३ |
| छोटा तात्या म्हणतो– | ३९५ |
| 'जगदीश' | १४१ |
| जमीन अस्मान | २३३ |
| जय भारत | ११७ |
| जाणीव | ६९ |
| जिवाचा ठेवा | ७१ |
| जीव जागृति | १४३ |
| जीवन | २४६ |
| जीवनसंगीत | २३९ |
| ज्योति | २६७ |
| झोपडी आणि प्रासाद | २५८ |
| टोपी आणि मोटार | ३०६ |
| तरवार | ३८ |
| तरुण भारतास | ४४ |
| तरंग | ११२ |
| तिळगूळ | ३८९ |
| तुजविणा | ३९७ |
| तुझी पुष्पमाला– | ३९१ |
| तुला काय वाटते | २९७ |
| तेजोनिधि | ३३९ |
| ते विसर | ८७ |
| तो तुझा आहे | ११५ |
| तो सह्याद्रि– | २५५ |

| कविता | पृष्ठ |
|---|---|
| तृणाची प्रार्थना | १०५ |
| थांब रे | २०२ |
| दिन–रजनी | २२७ |
| दिवाळी आणि लढाई | ३३३ |
| दिवाळीचा सण-मुलांचा आनंद | ३४५ |
| दिवाळीचे गाणे | २७२ |
| दिव्य चैतन्य | ३२९ |
| दीप आणि पतंग | २४७ |
| दीप–निर्वाण | ३३ |
| दीप-माला | १५९ |
| दुष्काळ आणि दिवाळी | ३३४ |
| देवपणा | ६५ |
| धन्य कुबेर | १८८ |
| धनुर्धारीस | ३०४ |
| ध्रुवास | २६० |
| नच मनिषा तरि– | २७८ |
| नंदकुमार | ३९४ |
| नरकेसरी | २५६ |
| नरकेसरीच्या पुतळ्यास पाहून | ३२१ |
| नवतरंग | ३०९ |
| नवा हिन्द | १३८ |
| निजलेल्या मुलास | १९३ |
| निर्झराचे तीरावर | २१६ |
| निर्झरास | १८० |
| निबंध | १६५ |
| निशा | १७७ |
| निशास्वामिनीस | २७६ |
| निशिगंध | २२१ |
| नुसता माधव | १३३ |
| पतंग | १६८ |
| पत्रक | ३५१ |
| परत ये वीर– | ३४९ |
| पराक्रमी महाराष्ट्र | ३२८ |
| परीक्षेचा कागद | १०० |
| पाखरास | ९६ |
| पानिपत का घडले | १८३ |
| पिका ! ये | १५६ |
| पुरुषोत्तम | ३६९ |
| पुढचे पाऊल | १३५ |
| पुन्हा एकदा | ४२ |
| पिंपळाचे पान | ३१६ |
| प्रतिक्षा | २८ |
| प्रभाती | ९३ |
| प्रवीण | ७० |
| प्रेमकला | १२४ |
| प्रेम–कुंज | ५८ |
| प्रेमगीत | १७४ |
| फुलमाळीण | ६७ |
| फुलाचा खेळ | ११३ |
| फुला, हास रे | १०८ |
| फूल | ३५ |
| ‘ फूल फुले ’ | ११९ |
| बटूस | २६२ |
| बरसात | २६३ |

| कविता | पृष्ठ |
|---|---|
| बाल–गीत | ३६० |
| बालपण | ९२ |
| बालसन्मित्र | ३८४ |
| बाहुली | १२८ |
| बाळकृष्ण | २९२ |
| भाऊबीज | २७१ |
| भाऊबीजेची देणगी | ३१९ |
| भारत–स्वातंत्र्याचा –वाढदिवस– | ३८२ |
| भारत–प्रशस्ति | ३८९ |
| भुका चिलु | ३६४ |
| भ्रमर–गीत | ८० |
| मग तोड | ९५ |
| मधुर कंठ लाभला– | ३९३ |
| मधुर स्नेह | १२५ |
| मनाची हाव | ८८ |
| मनुजाचे भूषण | २०९ |
| मनोदर्शन | १९८ |
| महाराष्ट्रा ! तुझी सत्य कथा | २८९ |
| माझा घोडा | २८७ |
| माझा वसंत | २४३ |
| माझे जीवन | २६५ |
| मायेचा पूत | ३६५ |
| मामा आणि भाचा | २९९ |
| ‘ मी नाहि जा ’ | ३८५ |
| मुक्तगीत | २९५ |
| मुलाची तक्रार | ३०८ |

| कविता | पृष्ठ |
|---|---|
| मुलाचे प्रश्न (१) | २८० |
| मुलाचे प्रश्न (२) | २८१ |
| मुलाचे प्रश्न | ३६१ |
| मुलाचे सांगणे | ३९७ |
| मुलांची फसवणूक | ३१५ |
| मेघराज | १७१ |
| मंगल घडी | १३२ |
| मंगलम् | ५४ |
| योगी | १४६ |
| रामा | १८२ |
| रांया ! ऐक | ३३२ |
| रिता रांजण | २७९ |
| रोहिणीचंद्र | २३४ |
| ललिता | २२४ |
| लक्ष्मीपूजन | १०७ |
| लीळा | २२ |
| लोकनायकास वंदन | १४७ |
| वन्दु धन्य गांधीला | ३७९ |
| वर्षा | १४० |
| वसंत | २२९ |
| वसंताची गोडी | २८३ |
| वसंताचे नृत्य | ३२५ |
| विपंख | २९४ |
| विमानी जाऊ | २३५ |
| विशाल भारत | १८४ |
| विहार | २३० |
| विज्ञान | २७५ |

| कविता | पृष्ठ |
|---|---|
| वेडा मुलगा | ५१ |
| वेडी राधा | ६६ |
| वेळवाची काठी | २०१ |
| व्रजबासरी | २५१ |
| शाळा | ५७ |
| शारदे ! तुझी कला | २८८ |
| शिपाई | २८४ |
| शिपाई रणावरुनि आला | ३३६ |
| शिपायाचे चित्र | ३१८ |
| शिवबा | १९१ |
| शूर सरदार ! | १४९ |
| सत्कर्म ऐसे करी | ३८८ |
| समर जगतातला– | ३५४ |
| समर झुंझार | १२२ |
| सर्वात्मना | २४५ |
| साधी कविता | १७५ |
| साधुबोवा | ५५ |
| सुकलेले फूल | २४२ |
| सुखलाभ | १६९ |
| संकेत | १५४ |
| संजीवनी | २३८ |
| संधिकाल | २६२ |
| संयोगिता | १०३ |
| संशोधक | २७३ |
| स्व-रूपदर्शन | १४२ |
| स्वतंत्र ऐसे व्हावे | १०२ |
| स्वातंत्र्य गीत | २१ |
| स्वातंत्र्य–सूर्य | ७९ |
| स्वातंत्र्याचे निशाण– | ७७ |
| स्फूर्ति | २७ |
| स्नेहमीलन | १२० |
| हा घे चांदोबा | ७५ |
| हा भक्तियोग साचा, जयकार भारताचा | ३७५ |
| हिन्द–माता | २१२ |
| हिमनंदिनी | ११८ |

आनंद गीत
भाग चवथा

# आनंदाचे आत्मकथन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा... स्वीकृत.
...२२६८ ... दि: ३/०१
...११८७५

# आनंदाचे आत्मकथन

निंदो वंदो कुणीही, क्षिति न तुज मुळी, माझिया वैखरीला
जैसी वाणी तशी ही कृति मम निपजे शारदेच्या स्तवाला;
तैसा हर्षा, विषादा धरुनि निज मना कासया गुंतवू मी ?
जे जे येईल ते ते सुखभरित मने गातसे लोकधामी.

माझ्या कवितेसंबंधी आणि माझ्या स्वतःसंबंधी पुष्कळजण निरनिराळ्या प्रकारची माहिती मला नेहमी विचारीत असतात. त्याविषयीच्या काही गोष्टी, काही अनुभव आणि काही आठवणी याबद्दल या स्थली काही सांगितल्यास वावगे होणार नाही, शिवाय हा एकंदर आढावा घेण्यामध्ये दुसराहि माझा एक आंतरिक हेतु आहे. सन १९१३-१४ मध्ये 'आनंद-गीत' पुस्तकरूपाने छापण्यासबंधी आम्हा मित्रमंडळीच्या गोष्टी चालू असता एके दिवशी माझा एक निकटचा स्नेही कै. रामभाऊ बेहेरे ( माझे परम स्नेही प्रो. ना. के. बेहेरे यांचा धाकटा भाऊ ) हा मला म्हणाला, "आनंदराव, 'आनंद-गीता'चे चार भाग निघाले पाहिजेत !"

रामभाऊच्या तोंडून ते सहज निघालेले उद्गार ईश्वरकृपेने आज खरे झालेले पाहून मला तर आनंद होणे स्वाभाविकच आहे; परंतु रामभाऊचा आत्मा या क्षणास कोठेहि असला, तरी त्याच्या मनीषेप्रमाणे 'आनंद-गीता'चे चार भाग प्रसिद्ध झाल्याचे अवलोकन करून त्याच्या सुहृद्प्रेमी आत्म्यास परम हर्ष झाला असेल यात शंका नाही. ही माझी श्रद्धा आहे. आणि म्हणूनच या चवथ्या भागात, 'आनंद-गीता'संबंधाची आजवरची माहिती, संक्षिप्त रीतीने का होईना, देण्याचे ठरविले आणि ती पुढीलप्रमाणे देत आहे.

माझे मूळ गाव मोहपा ( जि. नागपूर, मध्यप्रदेश ). माझा जन्म धापेवाडा (जि. नागपूर) येथे मातुलगृही झाला. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षी वडील निवर्तल्यावर माझी आई, ज्येष्ठ बंधु, मी स्वतः आणि धाकटी बहीण यांचे सर्वतोपरी लालनपालन आणि संवर्धन अगदी पोटच्या मुला-

प्रमाणे किंबहुना त्यापेक्षाहि शतपटींनें अधिक अतुलनीय असे माझ्या मातुलांनी केले. इंग्रजी सहावी इयत्ता पास झाल्यावर पुढे विषमज्वराच्या आजारात कानांनी ऐकू येईनासे झाल्यामुळे, सर्व प्रकारची अनुकूलता असून देखील माझे पुढील शिक्षण अजिबात बंद पडले. अभ्यासू वृत्तीचा मूलतःच अभाव. त्यामुळे शाळा सुटल्यानंतर आजतागायत कोणत्याहि विषयाचा अगर भाषेचा अभ्यास नाही. त्या कारणाने मराठी, संस्कृत, इंग्रजी, बंगाली वगैरे कोणतीहि भाषा मला येत नाही. आणि परिचय देखील नाही. अर्थात त्यातले अभ्यासी विषय तर दूरच. या गोष्टीवर माझी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष माहिती नसलेल्या लोकांचा विश्वास बसत नाही. पण माझ्याशी ज्यांचा ज्यांचा आजवर निकट सहवास वा स्नेहसंबंध घडला त्यांना त्यांना ही गोष्ट पूर्णपणे अनुभवास आली आहे. आता 'आनंद–गीता'मध्ये जे जे पौराणिक आणि ऐतिहासिक दाखले आले आहेत, ते म्हणजे कथाकीर्तने, पुराणे आणि व्याख्याने ऐकण्याचा परिणाम होय. आनंद–गीताच्या दुसऱ्या भागाच्या शेवटी जे आत्मकथन आहे ते अगदी यथार्थ आणि सत्य आहे.

**नाही गीर्वाण भाषा, प्रचलित तशि**
**ती राजभाषाहि नाही,**
**भिन्ना देशीय भाषा तशि मज न कळे,**
**अन्य भाषाहि काही;**
**सद्ग्रंथा बाळगीतो, परिशिलन नसे,**
**आळसी काळ जाई,**
**ध्यानी काही न राही, वचन परिशिले**
**वाचिले ग्रंथि तेही.**

कविता लिहिण्याकडे माझी केव्हा आणि कशी प्रवृत्ति झाली ते सांगता येत नाही. स्फूर्ति म्हणजे काय हे अद्याप मला माहीत नाही. उठल्या सुठल्या लिहीत बसत नाही आणि लिहिता येत नाही. कित्येक दिवस, कित्येक महिने एक ओळसुद्धा लिहिल्याविना जातात. कविता लिहावयाची म्हणून कागद पेन्सिल घेऊन कधीहि मी बसलो नाही, बसत नाही. तसे मला लिहिताच येत नाही. माझी कविता नादात तयार होते.

स्वत:शीच काही तरी गुणगुणता गुणगुणता ध्रुवपद तयार झाले, आवड-णाऱ्या चालीत किंवा स्वरांत ते असले आणि मनाला पसंत पडले, म्हणजे मग पुढील एक एक कडव्याची रचना मनातल्या मनात तयार होते. कविता संपूर्ण तयार झाल्यावर मग ती कच्च्या वहीवर उतरून घेतो. कविता उतरवीत असता तिच्यातला एखादा दुसरा शब्द गहाळ झाला किंवा पसार झाला म्हणजे तो शब्द पुन: त्या ठिकाणी परत येण्याला फार त्रास पडतो. कठिण जाते. लवकर आठवत नाही. कित्येकदा तर दुसराच भरती करावा लागतो. पण तो शब्द मनाला तितकासा रुचत नाही. नंतर उतरून घेतलेल्या पूर्ण कवितेमध्ये काही कमीजास्त करणे झाल्यास तितके करून मग पक्क्या वहीवर ती कविता लिहिण्यात येते. कविता तयार होत असता जर काही कारणाने पूर्ण न होता मध्येच अडून बसली तर मात्र डोक्यात तयार झालेली तेवढीच अर्धवट कविता कच्च्या वहीवर लिहून ठेवतो. आणि मग ती कविता केव्हा पूर्ण होईल त्याचा नेम सांगता येत नाही. काही कविता लवकर पूर्ण झाल्या. काहींनी काही महिन्या नंतर शेवट गाठला आणि काही तर कित्येक वर्षानंतर पूर्णावस्थेत पोहोचल्या.

पण अशा एकंदर कविता चारहि भाग मिळून पंचवीस, तिसाच्या वर नसाव्यात. पहिल्या भागातील ‘ मुरली ’ पाच सात कडवी झाल्यावर दोन तीन महिन्यांनी पूर्ण झाली. तिसऱ्या भागामधील ‘ चमेली ’ या कवितेतल्या कल्पनेवर कविता लिहिण्याची इच्छा झाल्यावर सुमारे एक तपानंतर तिने मूर्त स्वरूप धारण केले. तोपर्यंत नुसती कल्पनाच डोक्यात घोळत होती. तसेच त्याच भागातले ‘ भावगीत ’, श्री ज्ञानोबारायाची पालखी पुण्यधाम पंढरपुरास जाण्याकरिता आळंदीहून निघून ती पुण्यास आली. त्यावेळी मी पुण्यास होतो. तो पालखीचा हृदयरम्य सोहळा पाहतान ध्रुवपदाचे पहिले कडवे तावडतोब तिथल्या तिथे गुणगुणलो. परंतु ती कविता आठ नऊ वर्षांनी संपूर्ण तयार झाली. त्याच भागातल्या ‘ ललीत संगम ’ कवितेच्या पहिल्या चार ओळी झाल्यावर चार पाच वर्षांनी, पूर्ण झाली. आणि या चवथ्या भागामधील ‘ राया ! ऐक ’ ही कविता पहिल्या दोन ओळीनंतर तीन चार वर्षांनी तिने पूर्ण रूप धारण केले. ही चार ठळक

प्रमाणे किंवहुना त्यापेक्षाहि शतपटीने अधिक अतुलनीय असे माझ्या मातुलांनी केले. इंग्रजी सहावी इयत्ता पास झाल्यावर पुढे विषमज्वराच्या आजारात कानांनी ऐकू येईनासे झाल्यामुळे, सर्व प्रकारची अनुकूलता असून देखील माझे पुढील शिक्षण अजिबात बंद पडले. अभ्यासू वृत्तीचा मूलतःच अभाव. त्यामुळे शाळा सुटल्यानंतर आजतागायत कोणत्याहि विषयाचा अगर भाषेचा अभ्यास नाही. त्या कारणाने मराठी, संस्कृत, इंग्रजी, बंगाली वगैरे कोणतीहि भाषा मला येत नाही. आणि परिचय देखील नाही. अर्थात त्यातले अभ्यासी विषय तर दूरच. या गोष्टीवर माझी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष माहिती नसलेल्या लोकांचा विश्वास बसत नाही. पण माझ्याशी ज्यांचा ज्यांचा आजवर निकट सहवास वा स्नेहसंबंध घडला त्यांना त्यांना ही गोष्ट पूर्णपणे अनुभवास आली आहे. आता ' आनंद–गीता 'मध्ये जे जे पौराणिक आणि ऐतिहासिक दाखले आले आहेत, ते म्हणजे कथाकीर्तने, पुराणे आणि व्याख्याने ऐकण्याचा परिणाम होय. आनंद–गीताच्या दुसऱ्या भागाच्या शेवटी जे आत्मकथन आहे ते अगदी यथार्थ आणि सत्य आहे.

**नाही गीर्वाण भाषा, प्रचलित तशि**
**ती राजभाषाहि नाही,**
**भिन्ना देशीय भाषा तशि मज न कळे,**
**अन्य भाषाहि काही;**
**सद्ग्रंथा बाळगीतो, परिशिलन नसे,**
**आळसी काळ जाई,**
**ध्यानी काही न राही, वचन परिशिले**
**वाचिले ग्रंथि तेही.**

कविता लिहिण्याकडे माझी केव्हा आणि कशी प्रवृत्ति झाली ते सांगता येत नाही. स्फूर्ति म्हणजे काय हे अद्याप मला माहीत नाही. उठल्या सुठल्या लिहीत बसत नाही आणि लिहिता येत नाही. कित्येक दिवस, कित्येक महिने एक ओळसुद्धा लिहिल्याविना जातात. कविता लिहावयाची म्हणून कागद पेन्सिल घेऊन कधीहि मी बसलो नाही, बसत नाही. तसे मला लिहिताच येत नाही. माझी कविता नादात तयार होते.

स्वत:शीच काही तरी गुणगुणता गुणगुणता ध्रुवपद तयार झाले, आवडणाऱ्या चालीत किंवा स्वरांत ते असले आणि मनाला पसंत पडले, म्हणजे मग पुढील एक एक कडव्याची रचना मनातल्या मनात तयार होते. कविता संपूर्ण तयार झाल्यावर मग ती कच्च्या वहीवर उतरून घेतो. कविता उतरवीत असता तिच्यातला एखादा दुसरा शब्द गहाळ झाला किंवा पसार झाला म्हणजे तो शब्द पुन: त्या ठिकाणी परत येण्याला फार त्रास पडतो. कठिण जाते. लवकर आठवत नाही. कित्येकदा तर दुसराच भरती करावा लागतो. पण तो शब्द मनाला तितकासा रुचत नाही. नंतर उतरून घेतलेल्या पूर्ण कवितेमध्ये काही कमीजास्त करणे झाल्यास तितके करून मग पक्क्या वहीवर ती कविता लिहिण्यात येते. कविता तयार होत असता जर काही कारणाने पूर्ण न होता मध्येच अडून बसली तर मात्र डोक्यात तयार झालेली तेवढीच अर्धवट कविता कच्च्या वहीवर लिहून ठेवतो. आणि मग ती कविता केव्हा पूर्ण होईल त्याचा नेम सांगता येत नाही. काही कविता लवकर पूर्ण झाल्या. काहींनी काही महिन्या नंतर शेवट गाठला आणि काही तर कित्येक वर्षानंतर पूर्णावस्थेत पोहोचल्या.

पण अशा एकंदर कविता चारहि भाग मिळून पंचवीस, तिसाच्या वर नसाव्यात. पहिल्या भागातील 'मुरली' पाच सात कडवी झाल्यावर दोन तीन महिन्यांनी पूर्ण झाली. तिसऱ्या भागामधील 'चमेली' या कवितेतल्या कल्पनेवर कविता लिहिण्याची इच्छा झाल्यावर सुमारे एक तपानंतर तिने मूर्त स्वरूप धारण केले. तोपर्यंत नुसती कल्पनाच डोक्यात घोळत होती. तसेच त्याच भागातले 'भावगीत', श्री ज्ञानोबारायाची पालखी पुण्यधाम पंढरपुरास जाण्याकरिता आळंदीहून निघून ती पुण्यास आली. त्यावेळी मी पुण्यास होतो. तो पालखीचा हृदयरम्य सोहळा पाहताच ध्रुवपदाचे पहिले कडवे तावडतोब तिथल्या तिथे गुणगुणलो. परंतु ती कविता आठ नऊ वर्षांनी संपूर्ण तयार झाली. त्याच भागातल्या 'ललीत संगम' कवितेच्या पहिल्या चार ओळी झाल्यावर चार पाच वर्षांनी, पूर्ण झाली. आणि या चवथ्या भागामधील 'राया! ऐक' ही कविता पहिल्या दोन ओळीनंतर तीन चार वर्षांनी तिने पूर्ण रूप धारण केले. ही चार ठळक

उदाहरणे आहेत. ह्या कविता पूर्ण झाल्या त्या मात्र एका लहरीत. मग वेळ लागला नाही. ज्याप्रमाणे नुसते ध्रुवपद तयार होऊन पुढील कविता तयार व्हावयास कमी अधिक कालावधि लागला त्याचप्रमाणे अशीहि काही उदाहरणे आहेत की, सबंध कविता तयार होऊन कित्येक दिवस, महिने तिच्या ध्रुवपदाचाच पत्ता नाही !

कवि भा. रा. तांबे यांची 'तुझ्या गळा। माझ्या गळा' ही कविता कै वासुदेवरावजी आपटे, पुणे, यांच्या 'आनंद' मासिकात बऱ्याच वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाली. त्या वेळेपासून या चालीवर कविता लिहिली पाहिजे असे सतत वाटता वाटता त्या चालीवर कविता 'मी नाही जा'–ही ता. २० सप्टेंबर १९५० रोजी लिहिली गेली.

माझ्या कल्पवृक्षास–मातुलांस ( कै. रामचंद्र नारायण उर्फ तात्याजी गडकरी ) त्यांच्या खेडेगावी तेथील मालगुजाराकडे दहा पंधरा रुपयावर कोर्टकचेरीचे कामावर असताना त्यांच्या हुशारी आणि कर्तबगारीवर खूष होऊन ज्या उदारधी आणि थोर हृदयाच्या राजाने माझ्या मातुलांस हत्तीच्या अंबारीवर बसविले आणि कीर्तिमान् केले त्या प्रसिद्ध भोसले कुलातील वंशज थोरल्या पातीचे श्रीमंत राजे बहादूर रघूजीराव साहेब भोसले यांच्यावर एक कविता लिहून व्हावी ही मनीषा १९१३–१४ सालापासून माझ्या ठिकाणी घर करून होती. शेवटी, राजेसाहेबांच्या हीरक महोत्सवाचे निमित्ताने 'श्रीरघुराज वंदन' ही कविता ता. १३ मे १९५१ रोजी माझ्याकडून लिहिली जाऊन परमेश्वराने माझी ही अंतरीची मनीषा पूर्ण केली !

कोणीहि सांगितलेल्या विचारावर, सुचविलेल्या कल्पनेवर, दिलेल्या विषयावर आणि हजरजबाबी तडकाफडकी कविता माझ्याकडून सहसा निर्माण होत नाही, झाली नाही. इतकेच नव्हे, तर ते ते विषय, ते ते विचार आणि त्या त्या कल्पना अधिकच दूर दूर पळतात आणि पुढे स्मरणातहि कधी येत नाहीत. याला काही अपवाद घडले आहेत, नाही असे नाही. पण ते अगदीच थोडे आहेत आणि त्यास कारणेहि सबळ आहेत.

'चित्रमयजगत' चे मालक आणि संपादक श्री. वासुकाका जोशी आणि देवगिरीकर या दोघांनी सुचविल्यावरून चीन वरील 'प्रबोधन' ( भाग तिसरा ) ही कविता लिहून झाली. सांगण्याप्रमाणे मजकडून कविता न लिहून झाल्यामुळे पुष्कळशा लहान मोठ्या लोकांचा आणि स्नेह्यांचा मजवर रोष झाला आहे त्याचप्रमाणे कोणाची नक्कल किंवा अनुकरणहि मला करता येत नाही. कित्येक वेळा, कविता संपूर्ण लिहून झाल्यावर, त्या कवितेचा अर्थ माझा मलाच कळत नाही. भावार्थ देखील नीटसा ध्यानात येत नाही. तो मला दुसऱ्यांनी सांगावा लागतो. आणि मग मनाला त्या कवितेचा खरा खरा उमज पडतो. पण लिहिलेले लिखाण वायफळ नाही ही जाणीव मात्र निश्चित असते. श्रीगणेशोत्सवाच्या मेळ्यासाठी गाणी लिहून देण्याविषयी मेळ्यांच्या चालकांनी कित्येकदा थोरामोठ्यांना मध्यस्थी टाकून अति आग्रह केला. परंतु ती गाणी काही मजकडून लिहून झाली नाहीत. उन्हाळ्यामध्ये सहसा कविता लिहून होत नाही. प्रवासात क्वचित् लिहिण्यात येते. आगगाडीत असता कविता निर्माण होतात, काही लिहिल्या आहेत. गाण्याच्या सुंदर सुंदर चाली करिताहि काही कविता लिहून झाल्या. उदाहरणार्थ 'चित्तरंजन' (भाग दुसरा).

मला आवडलेल्या काही चित्रांवरही कविता लिहिल्या गेल्या. १९१८ साली दिल्लीस भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या खास अधिवेशनाकरिता गेलो असता तेथून चार पाच बंगाली चित्रे आणली. त्यापैकी दोन चित्रांवर कविता लिहून झाल्या. एक 'बैरागी कृष्ण' आणि दुसरी 'चित्तरंजन'. घरी विणलेल्या टिकल्यांच्या मोरावर 'मोरा नाच रे'. ह्या तिन्ही कविता दुसऱ्या भागात आल्या आहेत. आणखीहि काही आहेत. तसेच लिहिलेल्या कवितेप्रमाणे बाजारात आढळलेली चित्रेहि विकत आणली आहेत. त्या दिल्लीच्या प्रवासात पाहिलेल्या काही ऐतिहासिक स्थलांवर पाच कविता लिहिण्याचा मानस होता. दिल्लीच्या किल्ल्यांतील दिवाण-इ-खास मधील छोट्याशा ऐतिहासिक प्रदर्शनांतील 'तरवार, 'इंद्रप्रस्थ', 'कुतुबमिनार', 'ताज महाल' आणि हरिद्वारचा 'लक्ष्मण झूला.' त्यांपैकी तरवारीवर 'बंदिवान तरवार' ( भाग पहिला ) ही एकच कविता पण ताबडतोब

लिहून झाली. बाकीच्या अजूनपर्यंत लिहून झाल्या नाहीत आणि आता होणार नाहीत हे निश्चित. 'दिल्ली' शब्द वाचल्याबरोबर किंवा ऐकताच ह्या कवितांची आठवण होते आणि वाईट वाटते ! ह्या चारहि कविता मजकडून तेव्हाच अवश्य लिहून व्हावयास पाहिजे होत्या. पण वृत्तीची तार लागली नाही त्याला काय करणार ! 'बंदिवान तरवार' या कवितेचा शेवट, लिहून झाला त्या वेळी, उचित असा नव्हता आणि त्याबद्दल नेहमी मला खेद होत असे. तो, १९३९ साली डॉ. मुंजे यांच्या नाशिकच्या 'भोसला मिलीटरी स्कूल'मध्ये असताना, अकस्मात सुचून दुरुस्त केला गेला.

कविता लिहावयास सुरुवात करताना माझ्यासमोर कोणताहि हेतु नव्हता. दुसरे लिहितात. आपण लिहावे, एवढेच त्याला कारण. पुढे काही काळाने हेतु निर्माण झाला. त्याला अनुसरून पुढील कविता निर्माण होऊ लागल्या. नामदार गोखले यांच्या मृत्यूनंतर पहिली राष्ट्रीय कविता मी लिहिली. आणि तेव्हापासून या घडीपावेतो वाढत्या प्रमाणात राष्ट्रीय कविता लिहीत आहे. 'राधा-कृष्ण-मुरली' हा विषय माझ्या स्वतःचा मनोविनोदनाचा आणि गोड आनंदाचा आहे. माझी पहिली स्वतंत्र कविता 'शुकबोध' (भाग पहिला) ही आहे. ती मी अनेकदा दुरुस्त केली आहे, आणि अद्यापि तिचा पिच्छा मी सोडला नाही.

माझी कविता (शारदा-देवी भाग पहिला) प्रथम कै. वा. वासुदेव-रावजी आपटे यांच्या 'आनंद' मासिकात 'मुलांचे लेख' या सदराखाली (वर्ष ५ वे, अंक ५७ वा–१५ एप्रिल १९११) प्रसिद्ध झाली. त्यानंतर कै. वा. बा. रा. पालवणकरांचा 'खेळगडी', 'लोकमित्र' आणि 'चित्रमयजगत' या मासिकांमध्ये आणि कै. वा. हरिभाऊ आपटे यांच्या 'करमणूक' पत्रात सारख्या येऊ लागल्या. या ठिकाणी कविता प्रसिद्ध होत असतानाच महा-राष्ट्रामध्ये त्या काळी नावाजलेल्या आणि भरभराटलेल्या एका सुप्रसिद्ध मासिकाकडे मी कविता पाठवू लागलो. पण कविता त्या मासिकाच्या कचेरीत पोहोचताच उलट टपाली, Returned with thanks असे तिच्यावर लिहून ती मजकडे परत येत असे. कित्येक वेळा भ्रम असा होई की कविता वाचतात केव्हा आणि तिचा निकाल लावतात केव्हा ? किंवा

टपालवाल्याने कवितेचा लिफाफा हाती दिल्यावर तो फोडून न वाचताच तिच्यावर Returned with thanks (साभार परत) लिहून दुसऱ्या लिफाप्यात बंद करून कवितेसोबतचे पोस्टाचे तिकिट त्याच्यावर लावून त्याच टपालवाल्याजवळ पोस्टात टाकण्याकरिता परत देतात? कारण उलट टपाली ज्या वेळी मला पत्र मिळणे शक्य होते, बरोबर त्याच वेळी परत आलेली कविता माझ्या हाती पडे! पाठविलेली कविता तास दोन तास तरी संपादकीय टेबलावर राहत असेल की नाही संशयच आहे! परंतु मी हट्टच धरला होता की, या मासिकात आपली एक तरी कविता प्रसिद्ध झालीच पाहिज आणि त्याप्रमाणे सतत कविता पाठविता पाठविता अखेरीस एक कविता त्या प्रसिद्ध मासिकात छापली गेली! त्यानंतर पाठविलेल्या तीन चार कविता पसंत पडून 'सवडीने प्रसिद्ध करतो' असे संपादकांचे मला पत्र आले. पण तीन चार महिन्यांनी पसंतीस उतरलेल्या त्या सर्व कविता एक दिवस पहातो तो मजकडे परत आलेल्या! बरे, गंमत ही की, माझ्या परत केलेल्या कवितांहून किती तरी कमी दर्जाच्या कविता त्या सुप्रसिद्ध मासिकाच्या दर अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सहा सात कवितांमध्ये निदान दोन तीन तरी खास असत!

उलट टपालाने Returned with thanks म्हणून ताबडतोब परत आलेल्या कवितांपैकी 'चंद्रसेना' (भाग पहिला) ही कविता परत आल्याबरोबर ती कै. वा. हरिभाऊ आपटे यांजकडे मी पाठविली. त्या सुमारास 'करमणूक' पत्राचे व्यवस्थापक मुंबईच्या मेसर्स बाबाजी सखाराम आणि कंपनीचे चालक निवर्तल्यामुळे 'करमणूक' पत्राची सारी व्यवस्था हरिभाऊंनी आपल्या स्वतःकडेच घेतली होती. ती कविता हरिभाऊंना मिळाल्यावर त्यांचे मला पत्र आले. ते समग्र खाली दिले आहे:—

श्री

१९ बुधवार पेठ, पुणे सिटी, २ सप्टेंबर १९१३

सा. न. वि. वि. आपली 'चंद्रसेना' ही कविता व सोबतचे पत्र पावले. मला आपली कविता फार आवडली. भाषा सुबोध व भाव सहजगम्य आहे.

ही ता. ६ सप्टेंबरच्या करमणुकीत प्रसिद्ध होईल व त्या अंकाची एक प्रत आपणाकडे पाठविण्यात येईल. ध्रुवपदाच्यानंतर पहिल्याच कडव्यात

**जे तुला जिवाहुनि थोर ।**
**रमेहुनि प्यार ।**

असे चरण आहे. यांतील 'प्यार' शब्द मात्र मला बरा वाटला नाही-एकंदर भाषेशी विसंवादि वाटलो. कळावे लोभ असावा ही विनंति.

ह. ना. आपटे

'श्रुतिबोध' मासिकाचे संपादक कै. दे. भ. अच्युतरावजी कोल्हटकर यांनी काढलेल्या 'संक्रांतीचा तिळगूळ' या सुप्रसिद्ध खास अंकात प्रसिद्ध झालेल्या ज्या माझ्या कवितेने माझी आणि माझ्या एकंदर कवितेची सगळ्या महाराष्ट्रभर प्रसिद्धी केली, ती 'प्रभुकृति' (भाग पहिला) ही कविता त्यांच नावाजलेल्या मासिकाकडून Returned with thanks म्हणून उलट टपालाने माझ्याकडे परत आली होती !

एका ज्येष्ठ आणि श्रेष्ठ मासिकाकडे एक कविता मी पाठविली होती. कविता पाठवून तीन चार महिने झाले तरी प्रसिद्ध होईना आणि पसंती नापसंतीचेहि संपादकाकडून काही कळेना. तेव्हा त्या संपादकाकडे पत्राने विचारणा केली. संपादकाकडून तावडतोव उत्तर आले, 'आपण ती कविता दुसरीकडे छापण्यास द्यावी.' आणि ते पत्रोत्तर येऊन बारा पंधरा दिवस होतांत न होतात तोच त्या मासिकाचा ताजा नवीन अंक हाती आला आणि चाळून पाहतो तो त्यातील काव्यकलापात माझी कविता !

माझ्या कविता सतत छापणाऱ्या एका भारदस्त आणि उच्च दर्जाच्या प्रसिद्ध मासिकाकडे नेहमीप्रमाणे एक कविता पाठविली. कविता पसंत असून लवकरच छापतो, असे त्या मासिकाच्या कचेरीतून मला पत्र आले. पण कविता पाठवून सुमारे दोन अडीच वर्षे झाली तरी ती प्रसिद्ध होण्याचे लक्षण दिसेना ! मी पुष्कळ पत्रे लिहिली, पण दाद ना फिर्याद ! लवकरच

छापतो असे मधून मधून मला कळविले मात्र जाई. परंतु प्रसिद्ध काही होत नसे. त्यानंतर प्रवासाच्या निमित्ताने मी त्या शहरी गेलो असता त्या मासिकाच्या कचेरीत जाऊन कवितेबद्दल तपास केला आणि संपादकाजवळ तक्रार केली. त्यांनी कारकुनाकडून, छापण्यास आलेल्या कविता, लेख वगैरेंची नोंद असलेली वही मजला दाखविली, त्या वहीत माझ्या कवितेची केलेली नोंद सापडली. तिच्याच पुढे कचेरीत केव्हा कविता आली याची तारीख लिहिली होती आणि तारखेपुढे 'पसंत' असा संपादकीय शेरा असलेलाहि दृष्टीस पडला. नंतर कविता कोठे आहे म्हणून त्या कारकुनास संपादकांनी विचारले. तो एक मोठा थोरला कवितांचा गठ्ठा आणून त्यात माझी कविता शोधू लागला. तो सबंध गठ्ठा बिचाऱ्याने आलटून पालटून चांगला दक्षतेने दोन तीन वेळा तपासून पाहिला. पण ती कविता काही त्यामध्ये सापडली नाही. शेवटी डोके खाजवून आठवता आठवता हळूच संपादकास त्याने सांगितले, "यांची ती कविता काव्यपरीक्षकांकडून अद्याप कचेरीत परत आली नाही !"

ज्या कार्यालयात काव्यपरीक्षक स्वत: कवि असतो त्याचाहि अनुभव माझ्या गाठी आहे. रा. माडखोलकर, ना. रा. मोरे (मा. मनोरंजन) या सारखे संपादक कवि विरळा !

या सर्व लिहिण्यामध्ये कोणाची व्यर्थ निंदा, हेवादेवा, दुष्ट हेतु वा सूडबुद्धि अणुमात्र नसून त्या वेळीहि नवीन कवितालेखकास कसकशा अडचणींतून जावे लागले आणि कसा व किती त्रास सहन करावा लागला. ते आजच्या नवीन कवितालेखकांच्या ध्यानी यावे, याच एका सद्हेतूने 'अनुभविक इतिहासाचे संक्षिप्त चित्र' किंचित् खुलासेवार येथे ग्रथित करण्याचा यत्न केला आहे. या संपादक-चालकांपैकी बरेचसे संपादक-चालक किंबहुना सर्वच निधन पावले आहेत. त्या बहुतेकांशी पुढे पुढे माझा चांगला व निकटचा स्नेहसंबंध जडला होता. फक्त हरिभाऊंशी तेवढी तोंडओळख होती. शिवाय इहलोक सोडून गेलेल्या व्यक्तींबद्दल चुकूनसुद्धा गैरशब्द लिहिला जाणे निदान माझ्याकडून तरी सुतराम् शक्य नाही ही वाचकांची मी खातरजमा करतो.

पहिले पहिले, पाठविलेली कविता ताबडतोब कोणी छापली नाही किंवा नाकारली गेली तर त्याबद्दल मला अतिशय वाईट वाटे आणि त्या संपादकाचा फार संताप येई. परंतु पुढे काही वर्षानंतर कविता लवकर प्रसिद्ध झाली नाही किंवा परत आली, तर त्याचे माझ्या मनाला काडीइतके देखील काही वाटले नाही–वाटत नाही. या काळात माझी अशी ठाम समजूत झाली की, जशी आपणास स्वतःची आवडनिवड आहे तशीच संपादकांनाहि त्यांच्या मासिकाचे ध्येय, धोरण, आवडनिवड आहेच. मग उगीच वाईट वाटून घेण्यात अगर संपादकावर रागावण्यात अर्थ काय ? आणि आपले कोणतेहि लिखाण सगळचांस सारखेच आवडले पाहिजे ही जुलूम–जबरदस्ती का ? आणि म्हणूनच ज्या ज्या संपादक–चालकांशी माझा प्रत्यक्ष परिचय घडून आला, त्यांच्याशी तो अबाधित राहिला आणि पुढे सहवासाने त्या परिचयाचे रूपांतर स्नेहात होऊन तो वृद्धि पावला आहे. तीच गोष्ट टीकाकारांसंबंधाची. माझ्यासंबंधी व्यक्तिविषयक आणि माझ्या कवितेवर भली बुरी टीका आजवर पुष्कळांनी लिहिली आहे. त्यापैकी एकालाहि उत्तर मजकडून दिले गेले नाही. जो तो टीकाकार स्वतःच्या मनोधर्माप्रमाणे समोर असलेल्या वस्तूचे वा गोष्टीचे परीक्षण, निरीक्षण आणि समीक्षण करीत असतो. त्यात हर्ष–विषाद मानण्याचे कारण काय ? एक टीकाकार ज्या कवितेला कुचकामी म्हणतो, तर त्याच कवितेला दुसरा टीकालेखक उत्कृष्ट म्हणून नावाजतो. तेव्हा सगळचा टीकांची गोळावेरीज केली तर सर्वच कविता चांगल्या ठरतात. प्रत्येकाची रुचि भिन्न आहे. कोणाच्या रागलोभाची पर्वा न करता स्वतःला वाटते ते लिहावे. ते मग कोणास आवडो वा न आवडो ! ‘ पाचहि बोटे सारखी नसतात ’ ही माझ्या ठिकाणी पूर्ण जाणीव आहे. लिखाणात काही तथ्य असेल तर आज नाही उद्या ते आवडलेच पाहिजे. नसल्यास प्रश्नच नाही ! आज लिहिलेल्या कवितेस ज्यांनी नाके मुरडली त्यांनीच उद्याला तिला डोक्यावर घेतलेले मी प्रत्यक्ष अनुभविले आहे. शिवाय नावडतीचे मीठ अळणी हाहि अनुभव मला भरपूर आहेच. कविताविषयक चर्चा कोणाशीच कधी मी करीत नाही–आजवर केली नाही. भेटीस आलेल्या आणि येणाऱ्या

मंडळीशी अथवा स्नेहीवर्गाशी अवांतर गोष्टीच मी नेहमी बोलत असतो.

बहुधा १९१३ किंवा १९१४ साली प्रथम, माझ्या कुलग्रामी ( मोहपा, जि. नागपूर ) येथील दे. भ. आप्पासाहेब हळदे, भार्गवराम देशमुख हेड मास्तर, कै. वा. आबाजी पाटील, कै. वा. चंपतराव देशमुख वगैरे पुढारी आणि थोर लोकांनी तेथील मराठी शाळेत माझ्या अभिनंदनार्थ भरविलेल्या सभेत काही कविता म्हणून दाखविल्या. तेथेच यवतमाळचे उदारधी दे. भ. गणपतरावजी माळवी यांचा परिचय घडून आला. त्यांनी लवकरच येणाऱ्या श्रीगणेशोत्सवानिमित्त यवतमाळचे मला निमंत्रण दिले. त्या राष्ट्रीय उत्सवात अनोळखी, अपरिचित अशा थोर थोर लोकांच्या समोर मी माझ्या स्वतःच्या कविता म्हणून दाखविल्या. ठिकाण नवखे, पण कविता म्हणावयाचे वेळी आणि म्हणताना मनाला भीति मात्र वाटली नाही. घराच्याबाहेर अलोट गर्दीसमोर जाहीर रीत्या स्वतःच्या कविता म्हणून दाखविण्याची माझी ही पहिली वेळ.

खुद्द नागपूरलाच विजयादशमीनिमित्त सीमोल्लंघनाचे जागी,–राजाबाक्षाचे श्रीमारुतिरायाच्या मंदिराचे अफाट प्रांगणात,–राष्ट्रीय उत्सव मंडळाच्या विद्यमाने भरलेल्या जाहीर सभेत मंडळाचे चालक आणि माझे स्नेही कै. दे. भ. अण्णा खोत ( संस्थापक, नागपूर व्यायामशाळा ) यांच्या आग्रहाने एक राष्ट्रीय कविता म्हटली. आणि तेव्हापासून या घटकेपर्यंत सभा, परिषदा, संमेलने, राष्ट्रीय उत्सव-महोत्सव वगैरे वगैरे मध्ये स्वतःच्या कविता जाहीरपणे जनता–जनार्दनासमोर मी म्हणून दाखवीत आहे. लोकमान्य टिळक विलायतच्या मोहिमेवरून परत आल्यावर त्यांच्या स्वागतार्थ मुंबईस शांतारामाच्या चाळीत सुमारे पंधरा हजार प्रेक्षकांनी भरलेल्या जाहीर सभेत कविता म्हटली. १९२० साली नागपुरास झालेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात तीनही दिवस तीस हजार जनसमुदायासमोर कविता म्हटल्या. त्याच वेळी नागपुरास कै. लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या 'सर्व भारत विद्यार्थि परिषदे'त विद्यार्थ्यांच्या प्रचंड मेळाव्यासमोर 'स्वातंत्र्य-गीत' ही कविता म्हटली. लोकमान्यांच्या

पुतळयाचा पुण्यास कै. पंडित मोतीलाल नेहरू यांच्या हस्ते अनावरण समारंभ झाला त्या प्रसंगी अलोट जनवृंदासमोर कविता म्हणून दाखविली, पुण्याच्या शिवाजी मंदिरात भरलेल्या सभेत सुमारे दहा बारा हजार प्रेक्षकांसमोर कै. डॉ, मुंजे यांच्या व्याख्यानाचे वेळी कविता म्हटली. बडोद्याच्या जुम्मादादा व्यायामशाळेत अफाट समुदायासमोर झालेला कवितांचा कार्यक्रम, ग्वाल्हेर सरकारच्या दरबाराकडून अवर्णनीय समारंभाने साजरा झालेल्या श्री छत्रपति शिवाजी महाराजांच्या त्रिशत सांवत्सरिक महोत्सवाचे प्रसंगी प्रचंड लोकसमूहासामोर म्हटलेल्या कविता, १९३२ साली दे. भ. कृष्णाजीपंत ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांच्या अध्यक्षतेखाली नागपुरास भरलेल्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे प्रारंभी आठ दहा हजार समाजासमोर म्हटलेली कविता, १९३८ साली कै. दे. भ. मोरोपंत अभ्यंकर बॅरिस्टर यांचा पुतळा पूज्य लोकनायक बापूजी अणे ( बिहारचे राज्यपाल ) यांचे हस्ते उघडला गेला त्या समारंभांत सुमारे वीस हजार लोकसमुदायासमोर म्हटलेली कविता, नागपूर येथे ८ सप्टेंबर १९४० रविवार रोजी झालेल्या लोकनायक बापूजी अणे यांच्या षष्ठ्यब्दि महोत्सवाच्या अखिल भारतीय मध्यवर्ति समारंभाच्या प्रसंगी सुमारे बारा पंधरा हजार जनसमाजासमोर कविता म्हणण्यात आल्या. याशिवाय मुंबई, अमरावती, यवतमाळ, जबलपूर आणि नागपूर येथील काही श्रीगणेशोत्सवामधील कवितांचे कार्यक्रम अमाप गर्दीत झाले. प्रचंड जनसंमर्दासमोर कविता म्हटल्याची इतकी अगदी ठळक ठळक उदाहरणे आहेत. नागपूरला नाट्याचार्य दे. भ. कृष्णाजीपंत खाडिलकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाच्या आरंभी अफाट जनसमुदायासमोर 'तेजस्विनी' ही कविता म्हणावयास व्यासपीठावर उभा राहिलो, त्या वेळी माझ्या मनाला खरोखरच धन्यता वाटत होती.

'हा हिन्द देश माझा' ही कविता लिहून झाल्यावर ती प्रथम 'महाराष्ट्र'-कचेरीत श्रीमत् शंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी) यांच्या पाद्यपूजेच्या प्रसंगी म्हणण्यात आली. सर्व कवितांमध्ये 'फकीर' ( भाग दुसरा ) ही कविता कोणास उद्देशून लिहिली याबद्दल जास्त विचारले गेले आणि

म्हटली की अद्याप विचारीत असतात. तिच्या खालोखाल 'चंद्रास' (भाग पहिला), 'सूर्यास्त' (भाग तिसरा) आणि 'कविता' ( भाग चवथा ) ह्या तीन कविता कोणावर लिहिल्या आहेत म्हणून त्या म्हटल्यावर आणि प्रसिद्ध झाल्यावर माझ्यापासून काढून घेण्याचा फार प्रयत्न झाला आणि होत असतो. त्याचप्रमाणे १९३८ साली नागपूर विश्वविद्यालयाने आणि १९४९ साली अलाहाबाद विश्वविद्यालयाने 'आनंद–गीत', भाग तिसरा, हे पुस्तक इंटरमिजियेटला लावले त्या त्या वेळी त्या पुस्तकातली अगदी पहिली कविता 'हा कोण' ही कोणाला उद्देशून लिहिली, तिची पार्श्वभूमि काय, याची विचारणा काही अध्यापक आणि विद्यार्थी–विद्यार्थिनी यांनी फार केली. परंतु त्यांच्याजवळ त्या बाबतीत मी खुलासा केला नाही आणि इथेही आज करणे शक्य नाही. १९२३–२४ सालामधील भारतातील राजकीय वातावरण ज्यांच्या ध्यानात असेल आणि जे कोणी त्यामध्ये वावरले असतील, त्यांना मात्र प्रस्तुत कवितेतला भाव सांगावयास नको आणि कविता लिहिली त्या वेळचा तसा माझा अनुभवही आहे. 'आनंद–गीता'च्या चारही भागामध्ये अशा आणखी काही कविता आहेत की, त्यांच्या खुलाशाबाबत टीपा देणे अत्यंत आवश्यक. त्याशिवाय त्यांचा उलगडा व यथार्थता पूर्णपणे समजून येणे दुरापास्त. पण, त्या कविता तशाच मुग्ध रहाव्या अशी माझी स्वतःची इच्छा असल्याने, त्यासंबंधाने खाजगी आणि जाहीर रीत्या अनेक टीका झाल्या आणि होत असतात, तरी त्या बाबतीत स्तब्ध राहणे हेच चांगले, असे मी मनाशी निश्चित ठरविले आहे. ज्याने त्याने आपापल्या स्वतःच्या आवडीप्रमाणे आणि मनोधर्मा-प्रमाणे त्यांचा अर्थ लावावा,–माझी कोणत्याही प्रकारची हरकत नाही आणि तसा तो लावला जातो हे माझ्या पाहण्यातही आहे.

'आनंदगीता'च्या पहिल्या भागाच्या शेवटी जे 'भरतवाक्य' छापले आहे आणि जे मी माझ्या कार्यक्रमाच्या अखेरीस भारत स्वतंत्र होण्याचे आधी म्हणत असे, ते माझ्या एका नाटकासाठी म्हणून प्रथम लिहिण्यात आले. भारत स्वतंत्र होताच, नागपूरच्या दैनिक 'महाराष्ट्रा'चे संपादक आणि माझे स्नेही रा. बाळासाहेब ढवळे यांच्या सूचनेवरून माझ्या या

जुन्या ‘भरतवाक्या’त उचित बदल करून ‘आनंदाचे भरत–वाक्य’ या नव्या नावाने ‘महाराष्ट्रा’च्या ता १५ ऑगस्ट १९४७ च्या पहिल्या स्वातंत्र्य–दिनाच्या अंकात ते प्रसिद्ध झाले.

गाण्याच्या बाबतीत मी गवई किंवा तज्ञ नाही. मला माझी कविता तेवढी माझ्या मनीषेप्रमाणे म्हणता येते. गाणे कशाशी खातात ते मजला समजत देखील नाही. कविता म्हणत असता कित्येक वेळा बेसूर होतो. परंतु ‘आनंद–गीता’च्या चारही भागात पुष्कळशा कविता अशा आहेत की, त्या अगदी नवीन चालीवर व नवीन सुरावटीवर बसविलेल्या आहेत आणि त्यांचे जनकत्व माझ्याच कडे आहे. मीच एकटा ती गाणी कवितेतील अर्थाप्रमाणे व्यवस्थित म्हणू शकतो. हे येथे सांगणे म्हणजे अहंपणा नव्हे, मोकळ्या मनाने वस्तुस्थितीचे निवेदन होय, हे प्रेमी वाचकांनी अवश्य लक्ष्यात घ्यावे.

करुणरस तुमच्या कवितेत नसतो, असे पुष्कळ जणांनी मला आजवर म्हटले आहे आणि नेहमी म्हणत असतात. आणि ही गोष्ट सर्वथैव खरी आहे. चुकून माकून आड वाटेने अगर न कळत कवितेमध्ये करुण रसाची झाक झळकली तर झळकली. जागतेपणी येणे मात्र दुरापास्त ! उत्कट कारुण्य तर नाहीच नाही ! कारण माझ्या वृत्तीतच कारुण्य नाही. अतिशय उत्कट करुण प्रसंगी देखील माझ्या मनोवृत्तीवर कारुण्य आपला पगडा बसवू शकत नाही. बरे, बसतोसा दिसलाच, तर लगेच त्या कारुण्याच्या पगड्यास दूर झुगारून देऊन त्याच क्षणी वृत्ति अन्य वातावरणात प्रवेश करते, हा माझा नित्याचा अनुभव आहे. शिवाय पारतंत्र्याच्या जीवनात अथपासून इतिपर्यंत सारखा करुणरसच ओतप्रोत भरलेला असल्याने दुसऱ्या तिसऱ्या रसाला तेथे जागाच राहिलेली नसते. अशा स्थितीत करुण कविता लिहून कारुण्याच्या जीवनाने आधीच त्रस्त होऊन भर तारुण्यातच वाकलेल्या जीविताच्या डोक्यावर आणखी आपल्या करुण गीतांचा भार कशाला, हा विचारहि माझ्यासमोर नित्य उभा असतो !

‘आनंद–गीता’ मधील काही कवितांचे हिंदी भाषेत भाषांतर–

रूपांतर झाले असून चिंचवड (जि. पुणे) येथील श्री. गोविंदराव पुरंदरे या हौशी पंडितांनी काही कवितांचे संस्कृतमध्येहि रूपांतर केले आहे.

कविता मासिक पुस्तकात प्रसिद्ध झाल्यानंतर एक दोन वर्षांनी दोन तीन किरकोळ शब्दांचे फेरफार करून, कित्येकांनी तर तीहि तसदी न घेता, काही कविता खुशाल स्वतःच्या नांवावर काही लेखकांनी पुन्हा नियतकालिकात छापल्या आहेत. आणि विशेष हे की, काही कविता त्याच मासिकामध्येहि प्रसिद्धी पावल्या आहेत !

सन १९१८ मध्ये दिल्लीच्या काँग्रेस अधिवेशनास गेलो होतो. तिकडून परत नागपूरला येत असता वाटेत ग्वाल्हेरला एका स्नेह्याच्या इथे गाडीने रात्री आलो. आल्यावर त्याच रात्री दोन तीन तासांनी 'आनंदगीता'च्या वह्यासह माझी प्रवासी ट्रंक चोरांनी लांबविली ! ट्रंकेतील सर्व सामानाबरोवर 'आनंदगीता'च्या पहिल्या भागाचे हस्तलिखित, पहिली वही सोडून बाकीच्या सगळ्या वह्यांही त्यांनी पळविल्या ! त्या वेळी कविता म्हणण्याचे नेहमीच प्रसंग येत असल्यामुळे जवळ जवळ सर्वच कविता मला मुखपाठ होत्या. तेव्हा नागपूरला येताच प्रथम चोरीस गेलेल्या सर्व कविता काही प्रसिद्ध झालेल्या मासिकांमधून आणि काही स्मरणातून पुन्हा लिहून काढल्या. आणि वर लिहिल्याप्रमाणे चोरीस गेलेल्या वह्यांतील कवितांचा कोणी दुरुपयोग करू नये म्हणून लिहिणे संपल्याबरोवर मुंबईस जाऊन, जरी लढाईमुळे कागद, छपाई वगैरे अत्यंत महाग होतीं तरी सबंध कविता ताबडतोब छापून, श्रीशिवजयंति, वैशाख शुद्ध द्वितीया, शके १८४२ या शुभ दिवशी, 'आनंद–गीत' या नांवाने पुस्तक प्रसिद्ध केले. ( एप्रिल १९२० ). पुन्हा लिहून काढण्यामध्ये काही कवितांचा मूळचा अनुक्रम मात्र वदलला गेला आहे. बाकी एकंदर कवितामध्ये कानामात्रेचा सुद्धा फरक नाही.

त्याचप्रमाणे १९३५ सालच्या मे महिन्यात या चवथ्या भागाच्याहि दोन हस्तलिखित वह्या प्रवासातच चोरीस गेल्या आहेत. दोन वह्या मिळून एकंदर साठ कविता होत्या. बरे झाले, त्या कवितांची छापण्यासाठी म्हणून

एक सुवाच्य प्रत अगोदरच लिहून ठेविली होती ! त्या कविता मला चांगल्याशा पाठ नसल्याने माझ्या दृष्टीने ती एक मोठी आपत्तीच मजवर निर्माण झाली होती. ही चोरी पुढे वर्तमानपत्रामधून जाहीर झाली, तेव्हा 'आनंदरावांनी प्रसिद्धीकरिता ही एक खोटीच हूल उठविली असावी' असा काही सज्जनांनी त्यावर आक्षेप घेतलेला मला माहीत आहे.

कवितेच्या कार्यक्रमाबद्दल आजवर कोणापासूनही मी पैसा मागितला नाही, मागत नाही. कोणी दिला तर नाकारीत नाही. त्या पैशाची मी पुस्तके खरेदी करतो. किंवा पुस्तकांच्याच कामी लावतो. खाजगीकडे सहसा खर्च करीत नाही. जाण्यायेण्याचा खर्च अवश्य मागतो आणि घेतो. मी स्वत: मिळविता असतो, तर तो खर्च आपण होऊन मागितला नसता. पण दिला असता तर टाकला नसता. शाळामध्ये चालू होणाऱ्या क्रमिक पुस्तकात घालण्याकरिता माझ्या कवितांची जर त्याच्या संपादकांनी अगर प्रकाशकांनी मागणी केली आणि परवानगी मागितली, तर मोबदला घेतल्याविना देत नाही; आणि असे पैसे मोबदल्यादाखल मला मिळाले आहेत. 'आनंद-गीता'च्या तिन्ही भागास काही सार्वजनिक संस्थांकडून, सरकारी अ‍ॅकॅडेमीकडून आणि बडोदा-इंदूर या संस्थानातील शिक्षण खात्यांकडून देणग्या मिळाल्या आहेत.

पुष्कळांच्या मते 'आनंद-गीता'च्या तिन्ही भागावर मला खूप पैसा मिळाला आहे. कित्येकजण प्रत्यक्ष मला तसे बोलून दाखवितात आणि म्हणतात सुद्धा. पण 'आनंद-गीता'च्या तिन्ही भागांच्या मिळून आठ हजार प्रती छापून देखील मला फार थोडे पैसे मिळाले आहेत. पहिला भाग १९१९ सालच्या दिसेंबरात छापावयास दिला त्या वेळी युरोपातील युद्ध संपले असताहि कागद, छपाई वगैरेचे दर अतिशय भारी होते. कागद तर दुर्मिळच होता. त्या वेळी दोन हजार प्रतींच्या छपाईकरिता मुंबईच्या माझ्या अति साध्या राहणीच्या खर्चासुद्धा ४०० पानांच्या पुस्तकास सुमारे २१०० रुपये खर्च आला. राहणे आणि भोजन मित्राच्या इथे. शिवाय बुकसेलर्सचे थोडकेच का होईना पण कमिशन, जाहिरातीचा खर्च, भेट, फुकट आणि

अभिप्रायार्थ आणि सरकारी शाळाखात्यांकडे मंजुरीकरिता दिल्या गेलेल्या प्रती आणि काही व्ही. पी. पुस्तके परत आली त्यांचा बुडीत पोस्ट खर्च हा इतका एकंदर खर्च त्या २१०० रुपयात मिळविला म्हणजे त्यामधून मला स्वत:ला काय मिळाले असेल, ते कोणासहि सहज समजून येईल. पुस्तकाची बांधणी जाड पुठ्ठ्याची, तीन चित्रे, त्यात एक रंगीत आणि किंमत सव्वा रुपया. तशीच पहिल्या भागाची दुसरी आवृत्ति ( प्रती दोन हजार ). दुसरा भाग (सन १९२४–प्रती दोन हजार) आणि तिसरा भाग (सन १९२८–प्रती दोन हजार) दोन्ही भागांची बांधणी पूर्ण कापडी. या सर्व पुस्तकांची बांधणी, कागद आणि छपाई उत्कृष्ट असून, प्रत्येक सचित्र पुस्तकाची किंमत सव्वा रुपयाच. काही खाजगी मंडळींनी पुस्तके विकून-सुद्धा त्यांचे पैसे मला दिले नाहीत; कित्येकांकडून काही पुस्तके विकून शिल्लक राहिलेल्या प्रती निष्काळजीपणामुळे काहीही उपयोग न होण्या-इतकी त्यांची खराबी झाली; काही जणांनी पुस्तके विकलीहि नाहीत आणि परतहि केली नाहीत, हा अनुभव तीनही भागांच्या वेळी माझ्या वाट्यास आला आहे !

मात्र ही सर्व पुस्तके शक्य तितक्या लवकर खपली जाऊन आज बरीच वर्षे झाली. तिन्ही भागांची पुस्तके दुर्मिळ झाली आहेत. पुनर्मुद्रण करावे तर बेसुमार खर्च येऊ पहातो. पुस्तकाचे बहिरंग शक्य तितके आकर्षक, चांगले आणि सुंदर करून कमीत कमी किंमत ठेवावयाची हा माझा हेतु असतो. आवड असलेल्या गरिबासहि ‘आनंद–गीत’ पदरमोड करून विकत घेता यावे, विकत घेताना किंमतीबद्दल त्याच्या मनाला पीळ पडू नये, नांवाखाली–लोकप्रियतेखाली पुस्तकाच्या किंमतीबद्दल गरीबीमुळे अंत:करणाच्या खोल गाभ्यातून उद्वेगाचे उद्गार त्या गरीबाच्या तोंडून निघू नयेत, ही माझी इच्छा आहे. तशात ‘आनंद–गीत’ हा माझ्या आयुष्याचा षौक आहे. म्हणून पुस्तक शक्य तितके बाह्यांग–मनोहर करण्याचा मी प्रयत्न करतो. त्याकरिता प्रमाणापेक्षा पैसा जास्त खर्च होतो. पण त्याचा भूर्दंड वाचकांना का ? हा विचार माझ्या मनामध्ये सतत जागा असतो. ‘आनंदगीता’चे प्रकाशन हा माझा व्यापार किंवा धंदा नव्हे.

एक सुवाच्य प्रत अगोदरच लिहून ठेविली होती ! त्या कविता मला चांगल्याशा पाठ नसल्याने माझ्या दृष्टीने ती एक मोठी आपत्तीच मजवर निर्माण झाली होती. ही चोरी पुढे वर्तमानपत्रामधून जाहीर झाली, तेव्हा 'आनंदरावांनी प्रसिद्धीकरिता ही एक खोटीच हूल उठविली असावी' असा काही सज्जनांनी त्यावर आक्षेप घेतलेला मला माहीत आहे.

कवितेच्या कार्यक्रमाबद्दल आजवर कोणापासूनही मी पैसा मागितला नाही, मागत नाही. कोणी दिला तर नाकारीत नाही. त्या पैशाची मी पुस्तके खरेदी करतो. किंवा पुस्तकांच्याच कामी लावतो. खाजगीकडे सहसा खर्च करीत नाही. जाण्यायेण्याचा खर्च अवश्य मागतो आणि घेतो. मी स्वत: मिळविता असतो, तर तो खर्च आपण होऊन मागितला नसता. पण दिला असता तर टाकला नसता. शाळामध्ये चालू होणाऱ्या क्रमिक पुस्तकात घालण्याकरिता माझ्या कवितांची जर त्याच्या संपादकांनी अगर प्रकाशकांनी मागणी केली आणि परवानगी मागितली, तर मोबदला घेतल्याविना देत नाही; आणि असे पैसे मोबदल्यादाखल मला मिळाले आहेत. 'आनंद–गीता'च्या तिन्ही भागास काही सार्वजनिक संस्थांकडून, सरकारी अॅकॅडेमीकडून आणि बडोदा–इंदूर या संस्थानातील शिक्षण खात्यांकडून देणग्या मिळाल्या आहेत.

पुष्कळांच्या मते 'आनंद–गीता'च्या तिन्ही भागावर मला खूप पैसा मिळाला आहे. कित्येकजण प्रत्यक्ष मला तसे बोलून दाखवितात आणि म्हणतात सुद्धा. पण 'आनंद–गीता'च्या तिन्ही भागांच्या मिळून आठ हजार प्रती छापून देखील मला फार थोडे पैसे मिळाले आहेत. पहिला भाग १९१९ सालच्या दिसेंबरात छापावयास दिला त्या वेळी युरोपातील युद्ध संपले असताहि कागद, छपाई वगैरेचे दर अतिशय भारी होते. कागद तर दुर्मिळच होता. त्या वेळी दोन हजार प्रतींच्या छपाईकरिता मुंबईच्या माझ्या अति साध्या राहणीच्या खर्चासुद्धा ४०० पानांच्या पुस्तकास सुमारे २१०० रुपये खर्च आला. राहणे आणि भोजन मित्राच्या इथे. शिवाय बुकसेलर्सचे थोडकेच का होईना पण कमिशन, जाहिरातीचा खर्च, भेट, फुकट आणि

अभिप्रायार्थ आणि सरकारी शाळाखात्यांकडे मंजुरीकरिता दिल्या गेलेल्या प्रती आणि काही व्ही. पी. पुस्तके परत आली त्यांचा बुडीत पोस्ट खर्च हा इतका एकंदर खर्च त्या २१०० रुपयात मिळविला म्हणजे त्यामधून मला स्वतःला काय मिळाले असेल, ते कोणासहि सहज समजून येईल. पुस्तकाची बांधणी जाड पुठ्ठयाची, तीन चित्रे, त्यात एक रंगीत आणि किमत सव्वा रुपया. तशीच पहिल्या भागाची दुसरी आवृत्ति ( प्रती दोन हजार ). दुसरा भाग (सन १९२४–प्रती दोन हजार) आणि तिसरा भाग (सन १९२८–प्रती दोन हजार) दोन्ही भागांची बांधणी पूर्ण कापडी. या सर्व पुस्तकांची बांधणी, कागद आणि छपाई उत्कृष्ट असून, प्रत्येक सचित्र पुस्तकाची किंमत सव्वा रुपयाच. काही खाजगी मंडळींनी पुस्तके विकूनसुद्धा त्यांचे पैसे मला दिले नाहीत; कित्येकांकडून काही पुस्तके विकून शिल्लक राहिलेल्या प्रती निष्काळजीपणामुळे काहीही उपयोग न होण्याइतकी त्यांची खराबी झाली; काही जणांनी पुस्तके विकलीहि नाहीत आणि परतहि केली नाहीत, हा अनुभव तीनही भागांच्या वेळी माझ्या वाटयास आला आहे !

मात्र ही सर्व पुस्तके शक्य तितक्या लवकर खपली जाऊन आज बरीच वर्षे झाली. तिन्ही भागाची पुस्तके दुर्मिळ झाली आहेत. पुनर्मुद्रण करावे तर बेसुमार खर्च येऊ पहातो. पुस्तकाचे बहिरंग शक्य तितके आकर्षक, चांगले आणि सुंदर करून कमीत कमी किमत ठेवावयाची हा माझा हेतु असतो. आवड असलेल्या गरिबासहि 'आनंद–गीत' पदरमोड करून विकत घेता यावे, विकत घेताना किमतीबद्दल त्याच्या मनाला पीळ पडू नये, नांवाखाली–लोकप्रियतेखाली पुस्तकाच्या किमतीबद्दल गरीबीमुळे अंतःकरणाच्या खोल गाभ्यातून उद्वेगाचे उद्गार त्या गरीबाच्या तोंडून निघू नयेत, ही माझी इच्छा आहे. तशात 'आनंद–गीत' हा माझ्या आयुष्याचा षौक आहे. म्हणून पुस्तक शक्य तितके बाह्यांग–मनोहर करण्याचा मी प्रयत्न करतो. त्याकरिता प्रमाणापेक्षा पैसा जास्त खर्च होतो. पण त्याचा भूर्दंड वाचकांना का ? हा विचार माझ्या मनामध्ये सतत जागा असतो. 'आनंदगीता'चे प्रकाशन हा माझा व्यापार किंवा धंदा नव्हे.

'आनंद–गीता'चा पहिला भाग पहिले महायुद्ध संपल्यावर निघाला, तरी लढाईतील महागाईची जशी त्याला झळ लागली, तसाच प्रकार या चवथ्या भागाच्याहि बाबतीत झाला आहे. हा चवथा भाग दुसरे महायुद्ध संपल्यानंतर आणि भारत स्वतंत्र झाल्यावर प्रसिद्ध होत आहे. भारत स्वतंत्र झाला असला तरी झटपट रंगाऱ्यासारखी तावडतोब सुबत्ता थोडीच दृष्टीस पडणार ? उलट स्वातंत्र्य लाभताच नानाविध अडचणींनी आणि आपत्तींनी भारत त्रस्त आणि ग्रस्त झाल्याने महायुद्धातली महागाई कमी न होता अनेक पटींनी सारखी वाढतच आहे. त्यामुळे कागद, छपाई वगैरे वगैरेचे दर भरमसाट वाढले असल्यास नवल नाही. शिवाय पैसे देऊनसुद्धा उघडच्या बाजारात मनाप्रमाणे माल मिळू शकत नाही तो नाहीच. या धंद्यात असणाऱ्या प्रत्येकास हा अनुभव आहेच. त्या कारणाने या चवथ्या भागाच्या प्रती पूर्वीच्या इतक्या चांगल्या करण्याचा यत्न केला आहे आणि किंमत नाइलाज म्हणून जास्त ठेवावी लागली आहे. 'आनंद–गीत' म्हणजे माझी दुकानदारी–व्यापार नव्हे. जर 'आनंद–गीता'ची दुकानदारी करून मी आपला खिसा भरला, तर न जाणो ज्या दयामय परमेश्वराने आपल्या प्रसन्न चित्ताने माझ्या सारख्या अशिक्षिताच्या ठिकाणी हा जो गुण निर्माण केला, त्याचा त्याला पश्चात्ताप होऊन आपण या गुणाची पेरणी अनाठायी केली, असे त्या जगच्चालक कृपाघनाच्या मनाला खात्रीने वाटण्याचा संभव आहे.

'हा हिंद देश माझा' हे गाणे राष्ट्र–गीत म्हणून मजकडून लिहून झाले नाही. त्या सुमारास, नागपूरला एक राष्ट्रीय भजन मंडळ निघाले. त्या मंडळास त्यांच्या चालीवर काही राष्ट्रीय गाणी नवीन लिहून पाहिजे होती. त्याप्रमाणे त्या मंडळाच्या विशेष परिचयाचे असे प्रसिद्ध राष्ट्रीय कीर्तनकार, वक्ते हरिभक्तिपरायण देशभक्त दाजीशास्त्री चांदेकर यांना कांही चाली देऊन गाणीं लिहून मागितली. त्याच संधीस कै. कवि जयकृष्णपंत उपाध्ये (रामानुज) आणि मी नेहमी प्रमाणे गप्पा मारण्यास त्यांच्याकडे गेलो. गोष्टी बोलता बोलता दाजीशास्त्री यांनी राष्ट्रीय भजन मंडळीने दिलेल्या चालींची यादी काढून अर्ध्या चाली उपाध्ये यांना व अर्ध्या मला

देऊन सांगितले, "हल्ली कविता लिहिण्याचा माझा व्यासंग सुटला असून माझ्याच्याने ही गाणीं लवकर तयार होणार नाहीत तरी तुम्ही दोघे मिळून तयार करून द्या." त्यावर त्यांना मी म्हणालो, "तुम्हांस माहीत आहे, मला असली गाणी लिहिता येत नाहीत. माझ्याच्याने हे काम होणार नाही." पण त्यांनी आपल्या आग्रही स्वभावानुसार माझे काही एक न ऐकता ते माझ्या माथी मारलेच. आणि मीहि झाली तर करून देईन असे म्हणून ती वेळ निभावली. पुढे दररोज मामुली प्रमाणे गाठ पडली की, दाजीशास्त्रींनी मला विचारावे, 'झाली का गाणी ?' आणि मी 'नाही' म्हणताच त्यांनी कठोर शब्दांनी ताडन करावे. असा नन्नाचा पाढा व त्यावर बोचक शब्दांचा भडिमार हा क्रम सतत आठ दहा दिवस चालू होता. शेवटी कंटाळून एक दिवस शास्त्रीबोवास मी म्हटले, "तुम्ही दिलेल्या चालीवर गाणी न लिहिता मला आवडणाऱ्या चालीवर लिहिली तर काही हरकत आहे का ?" तेव्हा, कोणत्याही चालीवर असली तरी चालतील, अशी सवलत त्यांनी मला दिली.

त्यानंतर पुढे पाच सात दिवसांनी माझ्या येथे कसला तरी एक शुभ प्रसंग होता. त्या निमित्त त्या दिवशी संध्याकाळी भोजनसमारंभ होता. बाहेरून घरी परत येण्यास किंचित् उशिर झाला. मंडळींनी जेवावयास नुकतीच सुरुवात केलेली दिसली. पानही शिल्लक नव्हते. तेव्हा, मी मागाहून जेवीन असे सांगून माडीवर गेलो. ऐन संध्येची वेळ असल्याने सारी दिवा-वत्ती पंक्तीमध्ये विराजमान झाली होती. तसाच अंधारात तक्क्याला टेकून खोलीत बसलो. वर दिवा येत नाही ही खात्री झाल्यावर थोडा स्थिर होऊन मनाशी काही तरी गुणगुणू लागलो. गुणगुणता गुणगुणता दाजीशास्त्री यांच्या गाण्यांची आठवण झाली. आणि त्या अनुरोधाने, पुरत्या सहा महिन्यांची–अक्षरशः सहा महिन्यांची, माझे मित्र कै. श्रीमंत नानाजी कावरे यांची तालीम घेऊन देखील अर्धवटच कंठगत झालेल्या चालीवर देशभक्ति-पर भजनगीत हळूहळू गुणगुणू लागलो. आणि एकदा जी गुणगुणायला सुरुवात झाली ती मग सबंध गाणे तयार झाल्यावरच आपोआप बंद पडली. आणि गुणगुणणे बंद होताच कंदिल खोलीत आला व त्याच्या पाठोपाठ जेवणासाठी पुकारा झाला. जेवून आल्यावर ते गाणे कागदावर लिहून

काढले आणि दुसरे दिवशी सकाळी ह. भ. प. दाजीशास्त्री यांच्या स्वाधीन केले. आणखी दुसरे भजन-गीत माझ्याकडून तयार झाले नाही. आणि दाजीशास्त्रींनीहि त्याबद्दल पुन्हा मला म्हटले नाही.

राष्ट्रीय भजन मंडळाने ते गाणे भजनात म्हटले की नाही हे मला माहीत नाही. मी त्याची चौकशी केली नाही की त्याबद्दल शास्त्रीबोवांस विचारले नाही. नंतर एक दोन दिवसांनी, सायंकाळी नेहमीप्रमाणे (जून्या) 'महाराष्ट्र'-कचेरीत वसलो असता, त्या वेळी तिथे नेहमी संध्याकाळी येणाऱ्या मंडळीपेकी कोणीतरी 'का आनंदराव नवीन काय लिहिले ?' हा नेहमीचा प्रश्न केला. तेव्हा हेच नवीन लिहिलेले 'भजन-गीत' त्या मंडळीना मी म्हणून दाखविले. गाणे संपल्यावर त्या मंडळीतील कै. दे. भ. नारायणराव वैद्य, कै. दे. भ. नारायणराव अळेकर, कै. दे. भ. गोपाळराव ओगले वगैरे मंडळींनी, 'आनंदराव, हे गाणे जाहीर सभेत म्हटल्याबरोबर वाऱ्यासारखे जिकडे तिकडे पसरेल !' असे उद्‌गार एकदम काढले. आणि तसेच झाले. पुढे थोड्याच दिवसांनी 'महाराष्ट्र'-कचेरीत श्रीमत् शंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी ) यांची पाद्यपूजा झाली. दीड दोनशे मंडळी हजर होती. त्या प्रसंगी कै. गोपाळराव ओगले यांनी मला हे गाणे म्हणावयास सांगितले. मी म्हटले. श्रींनी त्या गाण्याचे कौतुक केले. आणि त्यानंतरचा ह्या 'हा हिंद देश माझा' गीताचा इतिहास सर्वत्रास ज्ञात आहेच. ज्या दिवशी रात्री हे गीत लिहून झाले, तो दिवस ता. २६ ऑगस्ट १९२१ हा होय.

या ठिकाणी एक गुपित उघड करावेसे वाटते. अगदी प्रथम 'आनंद-गीत' ( भाग पहिला ) १९१५ साली छापण्याचे ठरविले. पुढे काही अडचणीमुळे पुस्तक १९२० साली प्रसिद्ध झाले ती गोष्ट निराळी. परंतु त्या वेळी त्याच्या तयारीबद्दल मी आणि माझे एक स्नेही यवतमाळचे श्री. वामनराव धर्माधिकारी असे दोघेच बोलत बसलो असता वामनराव एकदम म्हणाले, "आनंदराव, बापूजींनी (पूज्य लोकनायक अणे, माजी राज्यपाल, बिहार) प्रस्तावना लिहिण्याचे कबूल केलेच आहे. पण आपल्या पुस्तकास लोकमान्य टिळक जर दोन शब्द लिहितील तर मोठी बहार होईल !" ही

सूचना त्या वेळी जर आणखी दुसऱ्या कोणास सांगितली असती, तर त्याने आम्हा दोघांसही खचित वेड्यात ढकलले असते आणि आमचा शहाणपणा चव्हाट्यावर मांडला असता; आणि आजही हा मजकूर वाचून तसाच कोणी कोणी अभिप्राय देतील व टर उडवितील, यातही शंका नाही. पण या क्षणापर्यंत आम्ही दोघांनीहि या गोष्टीबद्दल कोणाजवळ एक चकार शब्दही काढला नाही. मला ती सूचना तात्काळ पटली व आवडली. लगेच दोघांच्या विचाराने लोकमान्यांस मी आपल्या सहीने पत्र लिहिले. त्या पत्राचे पंधरा वीस दिवस झाले तरी उत्तर येता दिसेना. तेव्हा आठवणीदाखल दुसरे पत्र लिहिले. त्याचे मात्र लोकमान्य टिळकांकडून स्वदस्तूरचे तावडतोब उत्तर आले. ते येणेप्रमाणेः–

॥ श्री ॥

पुणें, ता. २८ आगस्ट १९१५

सा. वि. वि. आपली पत्रे पोचली. आपल्या म्हणण्याप्रमाणे सवड नाही याची माफी असावी. कारण हल्लीच्या प्रकृतीच्या मानाप्रमाणे माझे कामच मला पुरे करिता येत नाही अशी स्थिति आहे. उत्तर पाठविण्यास विलंब लागला याची क्षमा असावी. कळावे, लो. क. हे वि.

**बाळ गंगाधर टिळक**

लोकमान्यांकडून नकार येईल हे निश्चित होते; आणि त्याची उघड उघड दिसणारी कारणेही आम्ही दोघांनी आगाऊच हेरून ठेवली होती. लागला नेम तर पहावा, याच केवळ सदिच्छेने–हेतूने तशी विनंति केली होती. त्यामुळे प्रत्यक्ष नकार आलेला असताही फारसे वाईट वाटले नाही. माझ्यासारख्या लहान माणसाला लोकवंद्य लोकमान्यांकडून पत्रोत्तर येणे ही गोष्टच त्या वेळी यापेक्षा जास्त अभिमानास्पद आणि हर्षकारी वाटली; आणि आजही हे लिहित असतांना तशीच धन्यता वाटत आहे. म्हणूनच लिहित असलेल्या वृत्तांताचा या हकीगतीशी फारसा संबंध नसताही ही गोष्ट नमूद करून ठेवण्यास मला मोठा आनंद होत आहे.

माझ्या कवितेच्या आयुष्यात कितीतरी मजेदार आणि उद्बोधक प्रसंग घडले आहेत. त्यांपैकी ताजे वाटणारे काही प्रसंग येथे दाखल करतो.

मुंबईस १९१५ साली, मिरज संस्थानचे अधिपति कै. श्रीमंत बाळासाहेब यांच्या अध्यक्षतेखाली, मे महिन्यात भरलेल्या महाराष्ट्र साहित्य-संमेलनास मी हजर होतो. त्या वेळी एके दिवशी रात्री नऊ दहाच्या सुमारास कै. दे. भ. संदेशकार अच्युतरावजी कोल्हटकर यांच्याकडे आम्ही काही मंडळी संमेलनासंबंधी गप्पा गोष्टी करीत होतो. स्वत: अच्युतराव साहित्यसंमेलनाच्या प्रतिनिधीस भेटण्यास त्यांच्या निवासस्थानी जाण्याच्या तयारीत होते. तेथे असलेल्या चार पाच जणांपैकी कोणी तरी मला म्हटले, "आनंदराव, एखादी कविता म्हणून दाखवा." अच्युतराव आणि त्यांच्या 'संदेश'चे त्या वेळचे व्यवस्थापक रा. महाजनि हे दोघे जाण्याकरिता त्या खोलीचे बाहेर पाऊल टाकणार इतक्यात माझ्या तोंडून

**'उदयगिरीवर कुणी उडविला चेंडु सुवर्णाचा'**

(वसंतकालीन बालभानु–'आनंद–गीत' भाग पहिला.)

ही ओळ बाहेर पडली. ओळ ऐकताच अच्युतराव तेथल्या तेथे थबकले. त्यांचे ते विलक्षण रीतीचे थबकणे पाहून सारेच जण कुतूहल दृष्टीने त्यांजकडे पाहू लागले. लगेच मागे वळून ते सबंध चौदा ओळींचे कडवे माझ्याकडून दोन वेळा त्यांनी म्हणवून घेतले आणि "लवकरच निघणाऱ्या आमच्या 'उषा' मासिकाच्या पहिल्या अंकासाठी ही कविता द्या" असे म्हणाले.

बहुधा १९१७ किंवा १९१८ साल असेल. मी आणि माझे स्नेही रा. नाना बेहरे (सुप्रसिद्ध कवि आणि लेखक प्रो. नारायण केशव बेहरे) व इतर एक दोन मित्रमंडळी मे महिन्यामध्ये संध्याकाळी मुंबईच्या चौपाटीवर बसलो असता, सुप्रसिद्ध विद्वान् आणि कवि, पुण्याच्या माजी महाराष्ट्र कॉलेजचे प्रोफेसर, डिस्ट्रिक्ट व सेशन जज्ज, कट्टे टिळकानुयायी कै. दे. भ. अच्युतराव सीताराम साठे, एम. ए. एल एल. बी., हे आपल्या एका मित्रासह चौपाटीवर फिरावयास आले. नाना बेहरे यांच्याशी त्यांचा स्नेह व परिचय असल्याने त्यांस पाहिल्याबरोबर आम्हा मंडळीतच ते येऊन बसले आणि नानांशी बोलू लागले. नानांनी त्यांना माझा परिचय व ओळख

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे



वि: ३।१९।६३
३२७०
क्रमांक ...... मो. दि.

करून दिली. दोन चार मिनिटे माझ्याशी बोलल्यानंतर अच्युतरावांनी मला कविता म्हणावयास सांगितले. त्या वेळी 'प्रभु कृति' आणि 'रजनीचंद्राचा मंगल' असे सांगून दोन कविता (भाग पहिला) तेथे त्यांस मी म्हणून दाखविल्या. कविता म्हणावयास सुरुवात केल्याबरोबर सुमारे पाच सहाशे मंडळींचा गराडा आम्हा सभोवती पडला. तो समाज, दोन्ही कविता म्हणून संपल्यावर आणखी कविता म्हटल्या जातील, या आशेने पंधरा वीस मिनिटे तसाच चित्रासारखा तटस्थ उभा होता.

१९२० आणि १९२१ या दोन साली येथील आम्ही काही मंडळींनी फक्त नागपूरस्थ कवींचीच दोन संमेलने भरविली. पहिल्या संमेलनाचे अध्यक्ष नागपूर महाविद्यालयाचे (मॉरिस कॉलेजचे) आद्य प्रिन्सिपॉल श्री. विद्वद्रत्न महामहोपाध्याय केशवरावजी ताम्हणे आणि स्वागताध्यक्ष श्री. महामहोपाध्याय कृष्णशास्त्री घुले हे होते; व चिटणीस कवि जयकृष्णपंत उपाध्ये (रामानुज) आणि मी असे दोघे होतो दुसऱ्या संमेलनाचे अध्यक्ष प्रो. ना. के. बेहरे प्रमुख नार्मल स्कूल, वर्धा, आणि स्वागताध्यक्ष हिंदी भाषेचे तज्ज्ञ आणि प्रसिद्ध वैद्य श्री. छांगाणी हे असून, कवि द. श्री. केळकर आणि वे. शा. सं. बाळाजी गोसावी हे दोघे चिटणीस होते. ही दोन्ही संमेलने म्हणजे संस्कृत, मराठी आणि हिंदी या तीन भाषांचे प्रतीकच होती. संमेलन-प्रसंगी आम्ही मोजदाद केली, त्या वेळी या तिन्ही भाषांतील कवींची संख्या सुमारे सव्वाशेच्या वर भरली. पत्ता न लागलेली आणखीहि काही कवि-मंडळी खास असतील. या दोन्ही संमेलनात नागपूरचे शाहीर, गोंधळी व भाट याचा सुशिक्षितांच्या मेळाव्यात प्रथम जाहीर सन्मान करण्यात आला दोन्ही कविसंमेलनातील रात्रीच्या काव्य, गायनप्रसंगी, नगरपालिकेच्या मैदानात जमलेल्या आठ दहा हजार जनसमुदायासमोर, मराठी हिंदी कवि, गोंधळी, शाहीर वगैरेंचे काव्यगायन झाले. त्यात कवि अण्णा बोबडे, कवि नाना बेहरे या दोघांच्या आणि स्वतःच्या कविता मी म्हणून दाखविल्या.

विदर्भ साहित्यसंघामार्फत अगदी सुरुवातीचे पहिले विदर्भ साहित्य-संमेलन कै. तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली उमरावती

मुक्कामी भरले होते. तात्यासाहेबांचा मुक्काम श्रीमंत खापर्डे यांजकडे होता. संमेलनाच्या आदल्या दिवशी सायंकाळी खापर्डे यांच्या भव्य दिवाणखान्यात स्थानिक आणि संमेलनानिमित्त आलेली बाहेरगांवची. श्री नऊ दहा-ळीस मंडळी तात्यासाहेबांशी विदर्भ साहित्यसंघ आणि संमेलन-याविषयी बोलत होती. त्या शिवाय इतरही गप्पा गोष्टी चालू होत्याच. गोष्टीस थोडा खंड पडताच तात्यासाहेबांनी मला कविता म्हणा म्हणून म्हटले. त्यांच्या आज्ञे-वरून चार पाच कविता मी म्हटल्या. शेवटची कविता 'अभिसारिका' (भाग दुसरा) होती. म्हणणे संपल्यावर तात्यासाहेबांनी, 'अभिसारिका' ही कविता कोणत्या रागात आणि चालीवर आहे, म्हणून विचारले. मी त्यांना म्हटले, "राग कोणता ते मला माहीत नाही पण चाल आपल्याच 'वीरतनय' नाटकांतील 'मृदु बालवाक्य' ही आहे." त्यावर ते म्हणाले, "माझ्या चालीपेक्षा आपण लावलेली चाल जास्त चांगली आहे, राग बहुधा 'गारा' असावा." आणि तेव्हापासून तात्यासाहेबांची आणि माझी गाठभेट कोठेही–कोणत्याही ठिकाणी पडो, त्या वेळी 'चित्तरंजन' आणि 'अभि-सारिका' (भाग दुसरा) ह्या माझ्या दोन कविता माझ्याकडून म्हणवून घेतल्याविना त्यांनी मला सोडले नाही.

आताही रा. नाना बेहरे आणि मी एकत्र असता कोणास कविता म्हणून दाखवायची असल्यास नाना 'चित्तरंजन' प्रथम म्हणावयास सांगतो; बाळ ढवळे 'अभिसरिका' म्हणण्याची हळूच सूचना करितो आणि भाऊसाहेब माडखोलकर माझ्या इथे आले असता माझ्या तोंडून 'चित्तरंजन' आणि 'चंद्रागमन' ऐकल्याविना उठत नाहीत.

बडोद्यास १९२१ साली कै. दे. भ. तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या महाराष्ट्र साहित्य-संमेलनात एक कविता मी म्हणत असता, बडोद्याच्याच दोन तीन मंडळींनी खळबळ माजवून, ती कविता मी म्हणू नये, म्हणून तिच्या बाबतीत आक्षेप घेतला. अध्यक्षांनी तो जुमानला नाही. तेव्हा त्या आक्षेपाचा पाठपुरावा कविता न वाचताच बडोद्याच्या मोठमोठ्या थोर लोकांनी करून, संमेलनात गोंधळ माजविला जाईल, बैठक बंद पडेल, अशा धमक्याही अध्यक्षांस–सन्मान्य अध्यक्षांस–

देण्याचा प्रयत्न केला. त्यासही तात्यासाहेबांनी दाद दिली नाही. अखेरीस रा. गोपाळराव ओगले आणि नाना वेहरे या दोघांनी, पुढे कविता म्हणू नको, असे सांगून मला माझ्या जागेवर बसविले. या सगळ्या प्रकाराचा मी पाठमोरा असल्यामुळे प्रथम मला काहीच उमज पडला नाही आणि मी थोडा गोंधळात पडलो. नंतर मला नाना आणि गोपाळराव यांनी सर्व हकीकत सांगितल्याने ते सारे चित्र आणि त्याची पार्श्वभूमि ही चटकन माझ्या ध्यानात आली. त्या पार्श्वभूमीचा एकंदर इतिहास मोठा उद्‌बोधक आहे. पण तो सांगण्याचे हे ठिकाण नव्हे. मी खुर्चीवर बसताच ज्या ज्या थोर गृहस्थांनी कविता न वाचताच किंवा कवितेत काय आहे ते न पहाताच आक्षेपास पाठिंबा दिला होता, त्या त्या प्रत्येकाने माझ्यापासून कवितेची वही मागून घेऊन ती कविता समग्र वाचली. आणि वही परत देतांना 'कवितेत तर आक्षेपार्ह काहीच नाही. उगीच हरकत घेतली!' असे–कदाचित् मला बरे वाटावे म्हणून असेल पण–प्रत्येकजण मला सांगू लागला! अशा रीतीने त्या कवितेने जवळ जवळ सबंध बैठकभर प्रवास केला! ती कविता आनंद–गीताच्या दुसऱ्या भागात प्रसिद्ध झाली आहे.

मुख्य संमेलन संपले. आभारप्रदर्शन सुरू झाले. ते सुरू असतानाच रा. गोपाळराव ओगले मला म्हणू लागले, "आनंदराव, 'हा हिंद देश माझा' हे गाणे शेवटी म्हण." मी थोडा काकू करीत होतो. कारण वेळ फार झाला होता. लोक बसून कंटाळले होते. संमेलनाध्यक्ष गाणे म्हणण्याची परवानगी देतील की नाही ही भीति वाटत होती. लोक हळूहळू उठून बाहेर जाऊ लागले होते. गोपाळरावांस मी माझी शंका सांगितली. त्यावर ते म्हणाले, "मी सांगतो नरसोपंतांना. तू ऊठ लवकर आणि त्यांना म्हण, गाणे म्हणावयाचे आहे म्हणून." कसाबसा खुर्चीवरून मी उठलो. उठताच गोपाळरावांनी मला पाठीमागून व्यासपीठापर्यंत जवळजवळ ढकललेच. मी तात्यासाहेबांजवळ जाऊन शेवटी गाणे म्हणावयाचे आहे असे म्हटले. तेव्हा ते, "वेळ बराच झाला आहे, आता कशाला म्हणता?" असे म्हणाले. लगेच त्यांनी पुन्हा "किती वेळ लागेल?" असे विचारले. 'दोन मिनिटात संपवितो असे मी म्हणताच 'बरे, तर करा सुरुवात.' ताबडतोब 'हा हिंद

देश माझा ' हे राष्ट्रगीत म्हणायला मी प्रारंभ केला. ध्रुवपदाचे कडवे म्हणताच उठलेली आणि उठू लागलेली मंडळी स्वस्थानी बसलीच, पण बाहेर उठून चालू लागलेली मंडळीसुद्धा गीताचा स्वर कानी पडताच आतमध्ये परत आली. माजू लागलेला गोंधळ शांत होऊन संमेलन सभा अगदी चित्रासारखी तटस्थ झाली ! श्री. तात्यासाहेब केळकर, दाजीसाहेब आपटे (चिटणीस–म. सा. संमेलन, बडोदे) प्रभृती मंडळी फार खुष झालेली दिसली. 'संमेलनाचा शेवट छान उत्कृष्ट झाला,' असे जो तो म्हणत असल्याचे प्रतिनिधीनिवासात परत जाताना कोणी तरी मला सांगितले.

हेच म. सा. संमेलन आटोपल्यावर दुसरे दिवशी एक गोष्ट घडली. सकाळी आठ साडे आठच्या सुमारास बडोदे सरकारचे एक वृद्ध कारभारी नायब दिवाण श्री. वैशंपायन हे मजकडे आले आणि म्हणाले, " महाराणी साहेबांची (श्रीमंत चिमणाबाईसाहेब गायकवाड) कोल्हापूरचे सुमंत कवि, यशवंतराव पेंढरकर आणि आपण या तिघांच्या कविता व श्री. दत्तोपंत पोतदार यांचे श्रीसमर्थचरित्रावरील प्रवचन असा एक खास कार्यक्रम खाजगी रीतीने लक्ष्मीविलास राजवाड्यात करण्याची इच्छा आहे. तरी आपण रात्री ८॥ च्या सुमारास तयार असावे. कार्यक्रम नऊपासून सुरू होईल." असे मला निमंत्रण देऊन व ते मी स्वीकारल्यावर ते निघून गेले. आणि ठरल्याप्रमाणे आम्हा चौघांचा तो राजवाड्यातील खास कार्यक्रम महाराणीसाहेब आणि रियासतकार रावबहादूर सरदेसाई, वैशंपायन प्रभृति अगदी निवडक अशी पाच सहा मंडळी यांच्यासमोर व्यवस्थित आणि चांगल्या रीतीने पार पडलाही.

पण या प्रकरणात मध्यंतरी एक मौज घडून आली. वास्तविक या अनाहूत प्रकाराशी स्वतः महाराणीसाहेबांचा बिलकूल संबंध नव्हता हे येथे स्पष्टपणे अवश्य सांगितले पाहिजे. खुद्द साहित्यसंमेलनात माझ्या एका कवितेच्या बाबतीत जो कल्लोळ माजला, त्यावरून कोणी तरी श्री. वैशंपायन यांना, मी राजवाड्यामध्ये कविता म्हणावयास जाणार, या वार्तेने तशी सूचना दिली असावी, असा माझा खात्रीचा अंदाज आहे. नाही तर निमंत्रण देताना त्यांनी प्रथमच मला तसे म्हटले असते. काही असो,

पण मला निमंत्रण देऊन गेल्यानंतर श्री. वैशंपायन पुन्हा माझ्याकडे आले आणि म्हणू लागले, 'तुम्ही आज कोणत्या कविता म्हणणार आहात त्या माझ्या बंगल्यावर खाजगी रीतीने मला म्हणून दाखवा म्हणजे राजवाड्यात कोणत्या कविता म्हणावयाच्या ते ठरविण्यास बरे पडेल.' त्यावर त्यांना मी सांगितले, 'तिथे कोणत्या कविता म्हणावयाच्या हे अद्याप मी ठरविले नाही. दिवसभऱ्यात केव्हा तरी निश्चित ठरवीन. परंतु त्या या निमित्ताने आपणास मी आगाऊ म्हणून दाखविणार नाही.' 'का ?' त्यांनी प्रश्न केला. 'ही माझी रीत नाही,' मी उत्तर दिले. ते परत गेले. पुन्हा अकराच्या सुमारास येऊन त्यांनी विचारले, 'ठरविल्या का कविता ?' 'काही ठरविल्या,' असे मजकडून ऐकल्याबरोबर ते म्हणू लागले, 'मला म्हणून दाखविता का ? चला माझ्या बंगल्यावर ही गोष्ट कोणास कळणार नाही.' तेव्हा मी त्यांना म्हणालो, 'इतर वेळी दोन तीन नव्हे, वीस पंचवीस कविता आपणास मोठ्या आनंदाने मी म्हणून दाखवीन पण या प्रसंगी आपण मला भीड घालू नये ही माझी मनीषा आहे.' यावर ते म्हणाले, 'त्यात काय हरकत आहे ? बाकीचे दोघे कविता म्हणून दाखविण्यास कबूल आहेत. आपलाच तेवढा नकार का ?' मी म्हटले, 'ही त्यांच्या मर्जीची गोष्ट आहे. मला स्वतःला आवडत नाहीत असल्या गोष्टी· मी आपणास आधी कविता म्हणून दाखविणार नाही. मला माहीत आहे कोठे कोणत्या कविता म्हणावयाच्या.' पुन्हा दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास श्री. वैशंपायन येऊन अगदी आर्जवाच्या स्वरात म्हणू लागले, 'मला अगोदर कविता म्हणून दाखवाच. आणि तेच चांगले होईल. आताच्या आता चला माझ्याबरोबर लगेच तुम्हास परत करतो.' या म्हणण्याला, 'असा जर आपला निकडीचा आग्रह आणि हट्टच असेल, तर कविता म्हणावयास राजवाड्यात मी येतच नाही. माझा कार्यक्रम रद्द करा,' असे अखेरचे आणि स्पष्ट त्यांना सांगणे मला भाग पडले. हे माझे निर्वाणीचे उत्तर ऐकून काही एक न बोलता वैशंपायन चालते झाले. आणि त्यानंतर रात्री साडे आठच्या सुमारास आम्हा मंडळीस नेण्यास दरबारी मोटारच दारात येऊन थडकली! नंतर थोड्याच दिवसांनी यासंबंधी खरी गोष्ट मला कळून आली. बाकीच्या दोघाही कवींनी आगाऊ कविता म्हणून दाखविण्याचे कबूल केले नव्हते

आणि त्यांनी त्यांना तसे विचारलेही पण नव्हते. माझी कबुली मिळविण्याकरिता श्री. वैशंपायन ह्यांची ती निव्वळ मुत्सद्देगिरी होती !

'हा हिंद देश माझा' हे गाणे लहानापासून मोठ्यापर्यंत आणि चुलीपासून रणमैदानापर्यंत जाऊन पोहोचले असता वाजंत्र्यांची सनई देखील त्या गीताचे गोड आलाप काढीत असे हे सर्वत्र महशूर आहे. त्याच सुमारास एके दिवशी साडे सात आठ वाजता रात्री रा. तात्याजी वझलवार (माजी सुपरिटेंडेंट, नील सिटी हायस्कूल, नागपूर), कै. अण्णा बोबडे कवि, कै. जयकृष्णपंत उपाध्ये कवि वगैरे आम्ही सहासात मंडळी महाल सिटी पोलीस कचेरी पुढून तात्याजींचे घरी जात होतो. केळीबागेपर्यंत जाताच समोरून श्रीजागृतेश्वराच्या रथाची मिरवणूक येत होती. मिरवणुकीच्या अगदी पुढे वाजंत्री होते. आणि ते सनईतून 'हा हिंद देश माझा' ह्या गाण्याचे सूर तल्लीनतेने काढीत होते आणि मिरवणुकीतील मंडळी आणि रस्त्यावरून जाणारा येणारा लोकसमाज मोठ्या उत्सुकतेने ते ऐकत होता. केळीबागेपासून आमचा मार्ग पूर्वेकडे फुटत होता. त्या दिशेने आम्ही सर्व मंडळी पाच सात पावले गेलो असेल नसेल, तोच त्या वाजंत्र्यांच्या मुख्याचे लक्ष माझ्याकडे गेले आणि त्याने धावत येऊन आम्हा साऱ्या मंडळीस हात जोडून पुन्हा मुख्य रस्त्यावर आणून आपणासमोर आम्हास उभे केले. नंतर त्या मुख्याने आपल्या साथीदारांसह प्रस्तुत गीत ज्या कौशल्याने आणि बहारीने सनईवर आम्हास वाजवून दाखविले, त्याचे सुंदर, मनोहारि आणि मधुर स्वर आम्हा हयात असलेल्यांच्या कानात अद्यापही घुमत आहेत !

बहुधा १९२० अगर १९२१ साल असेल. पुण्यास त्या वर्षीचा श्रीशिवराज्यभिषेकोत्सव कै. दे. भ. शिवरामपंत परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्या उत्सवात पहिले व्याख्यान आमच्या नागपूरचे सुप्रसिद्ध कार्यकर्ते आणि हाडाचे देशभक्त कै. नारायणरावजी वैद्य यांचे होते. व्याख्यानानंतर मी एक कविता म्हणणार होतो. सभेस श्रोतृसमुदाय चांगलाच जमला होता. नारायणरावजींचे व्याख्यान सुरू होऊन दहा बारा मिनिटे झाली असतील नसतील, तोच पावसाचा मोठा टपोरा थेंब पडू लागला. इतकेच नव्हे, तर त्या थेंबाबरोबर पावसाने चार पाच मिनिटात ती प्रचंड सभा उधळून

लावली. लगेच ती सभा शिवाजी मंदिराचे जागेतून खुन्या मुरलीधराच्या देवळात जाऊन सुरू झाली. नारायणरावांचे व्याख्यान झाल्यावर 'तारिले महाराष्ट्राला' ( भाग पहिला ) हे श्रीशिवाजीमहाराजांवरील मी आपले गीत म्हटले. गीताचा सत्कार सभेकडून उत्कृष्ट झाला. गाणे संपल्यावर अध्यक्षांचें समारोपादाखल भाषण सुरू झाले. व्याख्यानावर काही वेळ बोलून नंतर अध्यक्ष मी म्हटलेल्या कवितेकडे वळले. त्या कवितेचे हृद्गत आणि श्रीशिवाजीमहाराज यावर शिवरामपंतांसारख्या दिव्य प्रभावी वक्त्याचे बोल ऐकता ऐकता सभा मंत्रमुग्ध होऊन चित्रासारखी तटस्थ झाली. शिवरामपंतांनी आपल्या तेजस्वी आणि ओजस्वी वाणीने माझी शब्दसृष्टीतील कविता त्या जनवृन्दासमोर सजीव स्वरूपात मूर्तिमंत उभी केली ! त्या वेळी माझ्या अंतःकरणास काय वाटले असेल आणि आजहि हा मजकूर लिहिताना त्या आठवणीने ते जिवंत चित्र समोर उभे असता काय वाटते आहे, याची यथार्थ कल्पना वाचकानीच करणे बरे. लेखणी सर्वथा असमर्थ आहे !

सन १९२२-२३ च्या सुमारास वसंत-व्याख्यान मालेच्या मोसमात त्या वर्षी माझा मुक्काम पुण्यास होता. त्या मालेमध्ये मधून मधून दोन तीन दिवशी चिटणीसांच्या विनंतीवरून सभेच्या सुरुवातीस व शेवटी काही कविता मी म्हणून दाखविल्या होत्या. त्या वर्षी व्याख्यानप्रसंगी व्यवस्था ठेवण्याचे काम दहा बारा वर्षांच्या आतील मुलांच्या पथकाने पत्करले होते. समारोपाच्या अखेरच्या दिवशी त्या बाल स्काऊट पथकाच्या सूचनेवरून, 'हा हिंद देश माझा' हे माझे गाणे समारोपाच्या शेवटी म्हणण्याबद्दल चिटणीसांनी मला खास विनंति केली. समारोपाचे अध्यक्ष देशभक्त तात्यासाहेब केळकर हे होते. समाज चांगला सात-आठ हजारांचा होता. स्थळ शिवाजी मंदिर. अध्यक्षांचा समारोप झाल्यावर गाणे म्हणण्याची वेळ येताच व्यासपीठावर जाऊन गीत म्हणण्याची सूचना चिटणीसांनी मला दिली. अध्यक्षांनी माझे नाव पुकारताच व्यासपीठावर उभे राहून गाणे म्हणू लागलो. एक-दोन कडवी म्हणून झाली असतील नसतील इतक्यात एक छोटासा स्काऊट व्यासपीठावर येऊन तात्यासाहेबांस हळूच म्हणू

लागला, "मालेच्या व्याख्यानप्रसंगीची एकंदर व्यवस्था पहाण्याचे काम आमच्या स्काऊट पथकाकडे आहे. आणि हे गाणे आमच्या पथकाचे 'राष्ट्र-गीत' आहे. आम्हीच त्यांना म्हणावयास सांगितले आहे. तेव्हा आपण सभेस उभे राहण्यास सांगावे." ह्याच शब्दात त्याने सांगितले असेल, हे आज नक्की स्मरत नाही. परंतु ह्याच अर्थाचे ते म्हणणे होते खास. नंतर तात्या-साहेबांनी हसत हसत स्वत: उभे राहून त्या मुलाचे म्हणणे निवेदन केले व सभेला उभे राहण्याची आज्ञा केली. त्याबरोबर तो प्रचंड समाज उभा राहिला आणि पुन्हा पहिल्यापासून ते गाणे मला म्हणावे लागले. या गोष्टीस इतकी वर्षे झाली–एवढा कालावधि लोटला तरी तो प्रसंग, आज हा मजकूर लिहीत असतानाहि, माझ्या मन:चक्षूंसमोर जशाचा तसा उभा ठाकला आहे. आणि जणू काय आताच घडल्यासारखा अगदी ताजा वाटतो.

माझे राष्ट्रगीत म्हणून झाल्यावर सभा संपली. मी व्यासपीठावरून खाली उतरताच एक सद्‌गृहस्थ माझ्याजवळ येऊन मला हलकेच म्हणाले, "का हो आपल्या या राष्ट्रगीतात महात्मा गांधींचे नाव नाही ?" त्यावर मी सांगितले, "ह्या गाण्यात होऊन गेलेल्या राष्ट्रपुरुषांची नांवे आहेत. गांधीजी नुकतेच बाहेर आले आहेत. त्यांचे चरित्र अद्याप व्हावयाचे आहे ते अनुभवास आल्यावर पुढे पाहता येईल." आणि त्याप्रमाणे म. गांधीजींच्या दांडी–सत्याग्रहाच्या प्रयाण समयींच्या प्रसंगावर 'अद्‌भुत रणसंग्राम' हे माझे गीत निर्माण झाले आहे.

वऱ्हाडातील तळेगाव दशसहस्र येथे डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्वाची राजकीय परिषद भरली होती. परिषदेला नागपूर–वऱ्हाड-मधील लहान थोर कार्यकर्ते आणि नेते यांचा चांगलाच मेळावा जमला होता. त्या वेळी नागपूर शहरात सभाबंदी व उमरावतीचे प्रसिद्ध दे. भ वीर वामनरावजी जोशी यांना भाषणाबद्दल सक्त मजुरी कैद या इंग्रज सरकारच्या बेगुमान दडपशाहीने वऱ्हाड–नागपूर प्रांतात चांगलीच खळबळ उडाली होती. त्या परिषदेला मीही निमंत्रणावरून गेलो होतो. माझे 'आनंद–गीत' (भाग पहिला) हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले होते. त्याच्या काही प्रती कोणी मागितल्यास जवळ असाव्यात म्हणून मी बरोबर घेऊन

गेलो होतो. परिषद सुरू होण्यापूर्वी, सरकारी रिपोर्टरांनी स्वयंसेवकाकडून 'आनंद गीता'ची प्रत विकत घेतली, ही गोष्ट मला कळली. परिषदेची सुरुवात माझ्या गाण्याने झाली. त्या वेळी मी पुस्तकातील छापील गाणे न म्हणता वहीमधील गीत म्हणावयास सुरुवात केली. सरकारी रिपोर्टर ते गीत विकत घेतलेल्या 'आनंद-गीता'त पाहू-शोधू लागले. ते पुस्तकात सापडेना. दिसेना. तेव्हा त्या रिपोर्टरांची जी त्रेधा तिरपीट उडाली, ती मोठी पाहण्यासारखी मजेदार होती. ती मी गाणे म्हणत असता पहात होतो. गाणे बरेचसे म्हणून झाल्यावर मग त्यांनी गाण्याचा रिपोर्ट घेण्यास सुरुवात केली! त्या काळात, राजकीय सभा-परिषदास मी नेहमी हजर राहून राष्ट्रीय गाणी म्हणत असल्याने, सरकारच्या काळ्या यादीत माझे नाव अगोदरपासूनच दाखल झाले होते. त्यामुळे माझ्या गाण्याचा रिपोर्ट घेणे सरकारी रिपोर्टरांना भागच होते.

१९२० साल असेल. मुंबईच्या 'आनंदमंडळा'तर्फे ( ज्याचे सभासद श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, संपादक 'तरुण भारत,' वि. म. उर्फ बाबुराव नवाथे-अकौंटंट, इंपीरीयल टोब्याको कंपनी मुंबई. श्री. श्रीपाद अ. डांगे वगैरे वगैरे मंडळी होती.) सँढर्स्ट रोडवरील 'मारवाडी विद्यालयात' माझ्या कवितांचा कार्यक्रम झाला. त्याचे अध्यक्ष डॉ. सावरकर होते. त्या वेळी मी कविता म्हणावयाचे आधी ते मला तिच्यातील कल्पना विचारीत. ती ऐकून त्या कवितेची पार्श्वभूमि-रूपरेषा अगदी थोडक्यात स्व-भाष्यासह डॉ. सावरकर श्रोत्यांना सांगत असत. त्या कारणाने ती कविता म्हणत असता आणि म्हटल्यावर जी बहार उडत असे, ती काही औरच! तसा अध्यक्ष माझ्या कवितेच्या कार्यक्रमाला दुसरा लाभला नाही.

१९३० सालच्या श्रीगणेशोत्सवाचे, निजाम-हैदराबादच्या 'बाल विद्यार्थी गणेश मंडळा'चे, निमंत्रणावरून मी तिथे गेलो. सिकंदराबादच्या स्टेशनवर उतरून हैदराबादच्या हद्दीत आमचे वाहन जाताच तेथील सरहद्दीवर असलेल्या पोलीसठाण्याच्या शिपायाने मला अडविले. त्या ठाण्याचे प्रमुखाने माझे नाव, गाव, काय करतात वगैरे वगैरे इत्थंभूत चौकशी केल्यावर,

माझ्या कपडयाच्या पेटीची व बिस्तऱ्याची अगदी कसून झडती घेतली. खिसे तपासले की काय हे आज नक्की आठवत नाही. तदनंतर त्या दिव्यातून आमची सुटका होऊन रेसिडेन्सी बाजारातील गणेश मंडळाच्या उत्सवाचे ठिकाणी एकदाचे आम्ही दाखल झालो. माझा मुक्काम तिथेच होता. फक्त माझ्या जेवणाची व्यवस्था त्या मंडळाचे अध्यक्ष श्री. माढकर या तरुण वकीलांकडे होती. पोलीसठाण्याच्या प्रथम चौकशीत, मी स्वतःच्या कविता उत्सवामध्ये म्हणून दाखविण्याकरिता आलो, असे गणेश मंडळाच्या व्यवस्थापकांनी सांगितले होते. माझे स्नान, जेवण वगैरे झाल्यानंतर काही वेळाने एक गुप्त पोलिस दूत पुन्हा माझी चौकशी करण्याकरिता तिथे आला. व्यवस्थापकांजवळ त्या बाबतीत विचारपूस करून तो परत गेला. त्यानंतर एक–दीड तासाने पुन्हा एक दूत आला. त्याने व्यवस्थापकांना विचारले, 'वे कौनसा गाना कहनेवाले है ? उनका उर्दूमें तर्जुमा करके हमको देव !' त्या व्यवस्थापकाने माझ्या 'आनंद–गीता'चे तीनहि भाग त्यास दाखवून म्हटले, 'इस छपे हुये कितावमे से कहनेवाले है.' 'वे कोनसे भाषामें कहेंगे ?' 'हमारे मराठी भाषा में !'

अशा प्रकारे तास–दीड तासाच्या अंतराने राजदूतांच्या फेऱ्या सतत होत होत्या. कवितेचा कार्यक्रम रात्री १० वाजता होता. त्या वेळी निदान चार पाच तरी हे पोलिस दूत खात्रीने हजर असले पाहिजेत. दुसरे दिवशी सकाळी उजाडते न उजाडते, तोच माझ्या चौकशीकरिता –मी इथेच आहे की रात्रीचा कार्यक्रम झाल्यावर चोरून दुसरीकडे कुठे गेलो हे पहाण्यास –राजदूत त्या स्थली हजर! त्या दिवशीहि दीड दोन तासानी रात्री १२-१ वाजेपावेतो राजदूतांच्या फेऱ्या सारख्या चालूच होत्या. दुसऱ्या काही उत्सवाची निमंत्रणे आली असता व्यवस्थापकांनी कविता म्हणावयास मला तिथे जाऊ दिले नाही. तिसरे दिवशीहि सकाळपासून तोच प्रकार ! त्या दिवशी दुपारी श्रीगणरायासमोर स्त्रियांसाठी अखेरचा कार्यक्रम करून संध्याकाळी शिरसलामत हैदराबाद सोडले ! हैदराबादचे ते बाल विद्यार्थी गणेश मंडळ आणि त्याचे सल्लागार श्री. भावे मास्तर खमके खरे! !–ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी !!

ओघानेच आल्यामुळे येथे एक गोष्ट सांगून टाकतो. हैदराबादच्या १९३० सालच्या श्रीगणेशोत्सवानंतर लगेच पुढच्या वर्षी म्हणजे १९३१ सालीं ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यं. केतकर यांच्या अध्यक्षतेखाली हैदराबादला महाराष्ट्र साहित्यसंमेलन झाले. त्या संमेलनात झालेल्या कवितगायना संबंधाने श्री. न. र. फाटक (सन १९४९) आणि श्री. ना. मो. भिडे (सन १९५०) या दोन लेखकांनी आपल्या 'साहित्य–संमेलनांतील आठवणी' चित्रमय जगत् मासिकात लिहितांना दोघांनीही माझ्या नांवाचा प्रामुख्याने उल्लेख केला आहे. त्या बाबतीत तूर्त एवढाच खुलासा मजला करावयाचा आहे की, श्री. फाटकांच्या आठवणीत जितके सत्य आहे, तितकाच विकृतपणा श्री. भिडे यांच्या आठवणीमध्ये आहे. हे त्या संमेलनातील काव्यगायनाच्या प्रसंगी हजर असलेल्या सज्जनांस दोघांही लेखकांचे लिखाण वाचून सहज कळून येईल.

'आनंद–गीता'चा पहिला भाग प्रसिद्ध झाल्यानंतर एका थोर सन्माननीय राष्ट्रभक्त नेत्याने बोलता बोलता म्हटले की, "आनंदराव, आमचा प्रवेश तरुण विद्यार्थ्यात होऊ शकत नाही. तुमचा होतो. तेव्हा तुमच्या कवितारूपाने तरी राष्ट्रीय कल्पना आणि विचार त्यांच्या कानावर जाऊ द्यात." आणि मी देखील ती सूचना तात्काळ ग्राह्य मानून त्या वेळेपासून विद्यार्थ्यांचे निमंत्रण सहसा टाळीत नाही. पुढे काही एक दोन कॉलेजात, कार्यक्रम सुरू होण्याच्या अगोदर विद्यार्थ्यांना पाहिजे त्या कविता म्हणण्याविषयी त्यांनी मला प्रेमपूर्वक अतिशय आग्रह केला. पण त्या प्रेमाग्रहाला मी सर्वथा नकार दिला. काही कॉलेजातील मुलांचा या बाबतीत रोषही पत्करला. खाजगी रीतीने कोणत्याही कविता म्हणून दाखविण्यास माझी ना नव्हती व नसते. पण त्यांना जाहीर कार्यक्रमांत त्या म्हणावयास पाहिजे होत्या. स्वदेशातील एकंदर राष्ट्रीय आंदोलन लक्षात घेऊन सार्वजनिक कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय विचाराच्या आणि कल्पनेच्या कविताच बहुतांशाने म्हणत असतो. आणि विद्यार्थ्यांच्या समूहात माझ्या दृष्टीने तरुणास आदर्शवत् अशा राष्ट्रीय कवितांची निवड करतो. १९३६ सालच्या सप्टेंबर महिन्यात पुण्यास असता सर परशुरामभाऊ कॉलेज-

मधल्या काही राष्ट्रीय वृत्तीच्या विद्यार्थ्यांनी कविता म्हणण्याकरिता मजला निमंत्रण दिले. निमंत्रण विद्यार्थ्यांकडून असल्याने मराठी विषयाचे प्रोफेसर वगैरे कोणी अधिकारी माणसे कार्यक्रमास हजर नसणे स्वाभाविक आहे. मी कविता म्हणावयास सुरुवात केली. सुरुवातीच्या वेळी प्रोफेसरांच्या शिकविण्याची ती खोली भरगच्च भरली होती. सारी मुलेच मुले ! पण जसजशा कविता म्हणू लागलो, तसतशी एक-एक दोन-दोन मुले पसार होऊ लागली आणि शेवटी 'भरत-वाक्य' म्हणावयाचे वेळी कविता म्हणणारा मी, मला निमंत्रण देणारे दोघे तिघे आणि इतर पाच-सात विद्यार्थी असे एकंदर बाराचे आत शिल्लक होतो !

हो, वरी आठवण झाली. "मला काही येत नाही" हे यापूर्वी सांगितलेच आहे. आणि त्याविषयी "आनंदराव हे ढोंगी आहेत, हे ढोंग त्यांनी टाकून द्यावे" अशा प्रकारची टीका माझ्यावर झाली आहे आणि होत असते, ह्याचेहि कथन केले आहे. याविषयीची एक स्मरणीय आठवण खाली देत आहे. माझा मुक्काम, माझे स्नेही उमरावतीचे प्रसिद्ध वकील श्री. बाबूराव सरंजामे-आता रावबहादूर यांच्याकडे १९२२ साली असता त्या वेळचे उमरावतीचे प्रसिद्ध वकील आणि पब्लिक प्रॉसिक्यूटर कै. रावबहादूर अनगळ यांचे येथे माझा एक खाजगी कार्यक्रम झाला. त्या कार्यक्रमास स्वतः रावबहादूर अनगळ, मध्यप्रांत-वऱ्हाडचे माजी गव्हर्नर तात्यासाहेब तांबे, दिवाण बहादूर नानासाहेब ब्रम्ह, रावबहादूर खरे, श्री. बाबूराव सरंजामे, मिनिबाबा देशपांडे ( माजी 'भवितव्या'चे संपादक श्री. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे ), कवि 'अनिल,' आणखी दोन तीन इतकेजण होते. या सर्व मंडळीस माझ्या संबंधीची सगळी माहिती बाबूराव सरंजामे यांनी आधीच करून दिली होती. मी कविता म्हणता म्हणता 'केवळ मनोरंजनासाठी' ही कविता म्हटली. कविता संपताच आरामखुर्चीवर आरामाने ऐकत बसलेले नानासाहेब ब्रम्ह वकील ताठ होऊन ताडकन मला म्हणाले, "आनंदराव, तुम्ही खोटे बोलता मला काही येत नाही म्हणून. तुम्ही उपनिषदे गाता !' आणि लगेच उपनिषदातली ऋचा नानासाहेबांनी म्हणून दाखविली!

श्री भगवती शारदेने 'अद्भुत सुयोग' ही माझ्या वाट्यास आणून

दिला आहे. १९३३ साली नागपूरला दे. भ. कृष्णाजीपंत खाडिलकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र–साहित्य–संमेलन भरले. संमेलनाच्या कार्यकारी मंडळाने, संमेलनाच्या आरंभी म्हणण्याकरिता कविता लिहावी, असा आदेश मला दिला. त्याप्रमाणे मजकडून कविता लिहून झाली. सुरुवातीस ती मी म्हटली. त्या वेळी हल्लीच्या मुंबईच्या विधानसभेचे सदस्य आमदार श्री. शि. ल. करंदीकर, एम्. ए. एलएल. बी., यांच्या संपादकत्वाखाली 'साप्ताहिक त्रिकाळ' हे प्रभावी वृत्तपत्र पुण्यास निघत असे. त्याच्या संमेलनास हजर असलेल्या प्रतिनिधीने ता. १ जानेवारी १९३४ च्या 'त्रिकाळ'चे अंकात माझ्या कवितेसंबंधाने जो अभिप्राय प्रसिद्ध केला, त्यातील उतारा खाली देत आहे. तो वाचल्यावर 'अद्भुत सुयोग' वाचकास कळून येईल. 'त्रिकाळ'मधील उतारा–

"टेकाडे यांनी या प्रसंगी म्हटलेली 'तेजस्विनी' ही कविता औचित्य, पदलालित्य व म्हणण्याची हातोटी या दृष्टींनी मला फार आवडली.

**ब्रम्हाची गायत्री । विश्वाची धरित्री**
**वाणी अधिष्ठात्री । वंदू आधी ।।**
**वाणीचे सामर्थ्य । उज्ज्वल वदान्य**
**अनन्यसामान्य । ब्रम्हांडात**

ही आरंभीची कडवी तर माझ्या कानात अद्यापही घुमत आहेत. टेकाडे यांनी केलेले वाणीचे वर्णन श्री. काकासाहेब खाडिलकर यांच्या भाषणाच्या रूपाने त्याच बैठकीत तंतोतंत खरे ठरावे, हा एक अद्भुत सुयोगच म्हटला पाहिजे."–सा. त्रिकाळ. वर्ष १ ले, अंक ९ वा, ता. १ जानेवारी १९३४.

यवतमाळच्या सार्वजनिक राष्ट्रीय गणेशोत्सवात जाहीररीत्या अगदी पहिला झालेला माझ्या कवितेचा कार्यक्रम, मुंबईचे दे. भ. डॉ. वेलकर यांनी आपल्या येथे खाजगी रीतीने माझ्या कवितेचा कार्यक्रम करून मला सोन्याची आंगठी बक्षीस दिली तो प्रसंग, मुंबईच्या 'आनंद मंडळा'च्या विद्यमाने डॉ. सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेला मारवाडी विद्यालयातला कार्यक्रम, पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये कै. प्रो. वासुदेवरावजी

पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली झालेला कवितेचा कार्यक्रम, कै. दे. भ. अच्युतराव कोल्हटकरांच्या 'संदेश' कचेरीच्या गच्चीवरील ( मुंबई, खेतवाडी १० वी गल्ली ) कार्यक्रम, वडोदा मुक्कामी राजरत्न प्रोफेसर माणिकरावांच्या जुम्मादादा व्यायामशाळेमध्ये रम्यभयोदात्त आणि चैतन्यमय उपकरणांनी सजविलेल्या जागेत झालेला कार्यक्रम, मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजांतील कै. प्रो. अ. बा. गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेला कार्यक्रम व त्या वेळी तिसऱ्या भागामधील 'चांदणी' या कवितेचे त्यांनी केलेले बहारदार विश्लेषण, झेविअर कॉलेज, विल्सन कॉलेज व व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूट मधील कार्यक्रम, इंदूरच्या दोन्ही कॉलेजांतील कार्यक्रम, खांडव्याचे सुबोधसिंधु छापखान्याचे संस्थापक श्री. अण्णासाहेब प्रयागी यांच्या येथील कार्यक्रम, पुण्याच्या न्यू पूना कॉलेजात ( सांप्रतचे सर परशुराम भाऊ कॉलेज ) दे. भ अण्णासाहेब भोपटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेला कार्यक्रम आणि त्या प्रसंगी अध्यक्ष या नात्याने अण्णासाहेबांनी माझ्याविषयी आणि माझ्या कवितेच्या बाबतीत काढलेले उद्गार, नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजमध्ये कै. अच्युतराव साठे (पुण्याच्या माजी महाराष्ट्र कॉलेज मधील प्रोफेसर आणि नागपूरचे डि. व से. जज्ज) यांच्या अध्यक्षतेखाली त्या कॉलेजांतील 'महाराष्ट्र भाषा संवर्धक मंडळा'चे, वाढदिवशी झालेला कार्यक्रम, सोलापूरचा पहिल्या टिळक उत्सवातील कार्यक्रम, नाशिकच्या भोंसला मिलिटरी स्कूलमधला कार्यक्रम, मालेगांवच्या श्रीमंत राजेबहादूर बाळासाहेब यांच्या येथील श्रीगणेशोत्सवांतील कार्यक्रम, इंदूरचे श्रीमंत सरदार रावबहादूर भैय्यासाहेब किबे यांच्या भव्य दिवाणखान्यामधील कार्यक्रम, पुण्याच्या अनाथ विद्यार्थिगृहाच्या पंचवीस वर्षांच्या ज्युबिलीच्या उत्सवप्रसंगीचा कार्यक्रम, श्रीशिवाजी महाराजांच्या तीनशे वर्षांच्या राज्यभिषेकोत्सवाच्या प्रसंगानिमित्त ग्वाल्हेर दरबार उत्सवात झालेला कार्यक्रम, नागपूरस्थ कविसंमेलनाच्या दोन्ही अधिवेशनात म्हटलेल्या कविता, सार्वजनिक श्री गणेशोत्सवात निरनिराळ्या विविध ठिकाणचे बहुतेक कार्यक्रम, 'नागपूरच्या' 'कायंदे हायस्कूल मधील आनंद—गीताचा सप्ताह, मुंबईच्या ग्रंथसंपादक आणि प्रकाशक मंडळीचे चालक श्री.

दामोदर सावळाराम यंदे यांनी औंधचे राजेसाहेब श्रीमंत बाळासाहेब यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रांतील थोर थोर साहित्यिकांचा मुंबईमधील कावसजी जहांगीर हॉलमध्ये शालफर्द देऊन केलेल्या सन्मानप्रसंगी मला सन्मानदर्शक मिळालेला शालफर्द, काटोलच्या (जि. नागपूर) विद्यार्थ्यांनी सन्मानपूर्वक मला एक सुंदर रुमाल दिला आणि ज्याला मी अद्याप जपून ठेवला आहे वगैरे वगैरे प्रसंग माझ्या अंत:करणावर कायमचे कोरले गेले आहेत.

नागपूरच्या कायंदे हायस्कूलात या शाळेचे प्रमुख श्री. भैय्याजी कायंदे असेतोपर्यंत ' नव भारतास ' ( भाग तिसरा ) ही कविता दररोज म्हटली जात असे.

कवितेचा कार्यक्रम चांगला होवो अगर न होवो. पण व्यासपीठ म्हणजे नारदाची गादी समजली जाते. त्याचा अनादर होईल, त्याला बट्टा लागेल, श्रोतृसमुदायास मान खाली घालण्याचा प्रसंग येईल, प्रौढ पुरुष, स्त्रिया आणि तरुण मुले–मुली व भिन्नधर्मीय अशा मिश्र समाजात कोणा तरी एका वर्गाचे मन विनाकारण दुखावले जाईल, अशी चूक मी कार्यक्रमाकरिता कविता निवडतांना व म्हणतांना केव्हाहि होऊ दिली नाही. काही काही कार्यक्रमात माझी नाचक्की करण्याचेहि प्रयत्न झाले, हमरीतुमरीचेहि प्रसंग उद्‌भवले, काही राजकीय परिषदामध्ये विवक्षित कविता म्हटल्याबद्दल विरोधी मताच्या प्रसिद्ध व्यक्तींकडून अध्यक्षपदावरून माझा जाहीर निषेधही करण्यात आला. पण माझे मन सद्धेतुप्रेरित आणि निर्विकल्प असल्याने त्या सर्व बिकट प्रसंगातून मी क्षिरसलामत पार पडलो !

सुशिक्षित–अशिक्षित, गरीब–श्रीमंत, लहान–थोर, पंडित–रसिक जवळ जवळ नागपूर–वऱ्हाडसहित संबंध महाराष्ट्राने माझे आणि माझ्या कवितेचे जे कौतुक केले, जो गौरव केला, जे प्रेम आणि आपुलकी दाखविली, ती अद्याप त्याच प्रमाणात मी अनुभवीत आहे. महाराष्ट्रांतील आणि महाराष्ट्रबाहेरील कित्येक पूज्य, थोर, सुप्रसिद्ध, विद्वान्, रसिक आणि अधिकारी व्यक्तींचा परिचय, प्रेम आणि आशीर्वाद मला लाभला असून, कवितालेखक

आणि कवितागायक या नात्याने सार्वजनिक आणि खाजगी रीतीने जेवढा सन्मान, सुखानुभव आणि आनंद मी उपभोगिला, तेवढा क्वचितच दुसऱ्याच्या वाटयास आला असेल. या दृष्टीने मी स्वत:स मोठा भाग्यवान समजतो.

तसेच मुंबई विश्वविद्यालय. नागपूर विश्वविद्यालय, अलाहाबाद विश्वविद्यालय आणि बनारस हिंदु विश्वविद्यालय यांनीहि इन्टरपासून एम्. ए. पर्यंतच्या आपल्या अभ्यासक्रमांत माझ्या 'आनंद-गीता'चा समावेश करून यथोचित आदर आणि सन्मान केला आहे.

'आनंद–गीता 'चा पहिला भाग प्रसिद्ध झाल्यावर नागपूरचे माझे स्नेही आणि कवि कै. अण्णा बोबडे, वकील, यांनी त्या भागाचे कौतुक आणि अभिनंदनार्थ एक खरोखरच 'अनमोल' कविता लिहिली ती 'बोबडे यांची कविता' या पुस्तकात छापली आहे. पण निराळ्या नावाखाली.

मोठा असो की लहान असो कोणाची ओळख किंवा परिचय करून घेण्याकरिता आपण होऊन मुद्दाम कोणाकडे जाण्याची माझी प्रवृत्ति–सवय –नाही. मी जात नाही. लहान मोठ्या व्यक्तींशी जो माझा स्नेह, ओळख आणि परिचय झाला तो अनायासे–अगदी सहज रीतीने. तरी कोणाचा द्वेष केला नाही, कोणाविषयी मत्सर बाळगला नाही, कोणाच्या बाबतीत असूया निर्माण झाली नाही. अशा वृत्तीने माझे कवितेचे जीवन आजवर व्यतीत झाले आहे.

ता. २६ जानेवारी १९२८ गुरुवार रोजी माझ्याकडून 'स्वतंत्र भारत' ही भारत–स्वातंत्र्याच्या भविष्यात्मक कविता लिहून झाली आणि ती पुण्याच्या चित्रमयजगत् मासिकाच्या सप्टेंबर १९२८ च्या अंकामध्ये प्रसिद्ध झाली. त्या कवितेचे ध्रुवपद असे आहे–

**लाभेल याच काला**
**स्वातंत्र्य भारताला**

आणि पुढील कडव्यांमध्ये त्या बाबतीत जी जी विधाने आणि विचार आले

आहेत, त्याप्रमाणेच बहुतांशाने घडून येऊन अखेरीस ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजी प्रदीर्घ कालाच्या पारतंत्र्याच्या नरकवासामधून मुक्त होऊन भारत—

हा हिन्द देश माझा

स्वतंत्र झाला !! हे सारे दिव्य परिवर्तन माझ्या हयातीत घडून आले. ते मी स्वत:चे डोळ्यांनी पाहिले आणि अनुभविले आहे. कृपाघन परमेश्वराने माझ्या ठिकाणी निर्माण केलेल्या गुणाचे सर्वथैव सार्थक होऊन 'आनंद-गीता'चा जन्म धन्य झाला असे अगदी आत्मविश्वासपूर्वक आणि नि:संदेह स्वत:चे ठिकाणी आज मी समजतो.

**सहृदय रसिका रे, सांगतो एक मात्र**
**क्षिति न मुळि तयाची हो जरी दोषपात्र**
**रमत विधिसुतांकी आर्यवाणी मदीय**
**गुणरहित तरी ती साच माझीच होय**

माझा जन्म चैत्र पौर्णिमा शके १८१२, ता. ५ एप्रिल १८९० शनिवार रात्री झाला. १९०८-०९ सालापासून मी कविता लिहू लागलो. तेव्हापासून आतापर्यंत अकराशे पानांच्यावर स्फुट कविता माझ्याकडून निर्माण होऊन ती 'आनंद गीता'च्या चार भागामध्ये समाविष्ट झाली आहे. ही वाङ्मयसेवा म्हणा-जनसेवा म्हणा-राष्ट्रसेवा म्हणा किंवा पांढऱ्यावर काळे केलेले म्हणा, माझ्यासारख्या अशिक्षित-सर्व दृष्टींनी अगदी अक्षरश: अशिक्षित-लेखकाकडून होऊ शकली, हे मी आपले सद्भाग्य समजतो. आणि मी स्वत: सात्विक, महत्त्वाकांक्षी असल्याने त्यामध्ये मला पूर्ण समाधान आहे. ती सेवा जनता-जनार्दनाच्या चरणी रुजू होवो ! इत्यलम्.

# प्रस्तावना

**आनंद-गीताचा** हा **चवथा** आणि **अखेरचा भाग** परमेश्वर कृपेने आणि विदर्भ साहित्य संघाच्या प्रेमळ उदारतेने रसिक वाचकांच्या हाती आज आदरपूर्वक देत आहे. हा चवथा भाग, तिसरा भाग प्रसिद्ध झाल्यानंतर बऱ्याच कालावधीने छापून बाहेर पडत आहे. उशीराने का होईना पण मनाप्रमाणे हा चवथा भाग या घडीस हातानिराळा झालेला पाहून मला खरोखरच समाधान वाटत आहे. **आनंद-गीताचा पहिला भाग** १९२० साली प्रसिद्ध झाला. त्याची दुसरी आवृत्ती १९२३ साली निघाली. **दुसरा भाग** १९२४ साली बाहेर पडला. **तिसरा भाग** १९२८ साली छापला गेला पण १९२९ मध्ये तो पुस्तक रूपाने बाहेर आला. आणि त्यानंतर आजला हा **चवथा भाग** १९६१ साली प्रसिद्ध होत आहे. त्याचा पहिल्या तीन भागांप्रमाणेच **आनंद-गीताचे** प्रेमी वाचक आनंदाने आणि प्रेमाने स्वीकार करतील ही मला खात्री आहे.

या भागांतील कविता जसजशा लिहिण्यांत आल्या त्या अनुक्रमानेच दिल्या आहेत. जुनी कागदपत्रे चाळीत असता लहान लहान चिटोऱ्यांवर लिहिलेले तीन श्लोक सापडले तेही या भागांत समाविष्ट केले असून माझे दिवंगत विद्वान स्नेही श्री. बळवंतराव हरि पंडित यांनी बऱ्याच वर्षांपूर्वी लिहून प्रसिद्ध केलेल्या 'सामर्थ्य सोपान' या उत्कृष्ट पुस्तकात मी लिहिलेल्या पाच कविता काही मित्रांच्या सूचनेवरून या भागात पुनः छापल्या आहेत. तसेच **आनंद-गीताच्या** पहिल्या भागातील **'बंदिवान तरवार'** या कवितेच्या शेवटच्या कडव्यामध्ये थोडा फेरबदल केल्या कारणाने ती पुन्हा या भागात छापली आहे. शिवाय **आनंद-गीताच्या** तिन्ही भागात प्रसिद्ध न झालेल्या दोन कविता अशा ह्या एकंदर मिळून अकरा कविता, या भागातील कविता संपल्यावर अगदी शेवटी परिशिष्ट रूपाने दिल्या आहेत.

या चवथ्या भागामधील बहुतेक कविता चित्रमय जगत् मनोरंजन, लोकशिक्षण, सह्याद्रि, स्फूर्ति, महाराष्ट्र-शारदा, ध्रुव, लोकमित्र, मधुकर, काव्यरत्नावलि, वागीश्वरी, विश्ववाणी, कलादर्श, विहंगम, सुबोध, कला,

आनंद, मुलांचे मासिक, शालापत्रक, प्रभात, नवजीवन, सुवर्ण, संजीवनी, निर्झर, ज्ञानमंदिर, प्राविण्य, वऱ्हाड शालापत्रक, यशवंत, मतिविकास, कलाविकास, संधिकाल, मनोहर वगैरे मासिका त्रैमासिकामधून आणि नवाकाळ, महाराष्ट्र, तरुण भारत या दैनिकातून; केसरी, मौज, निस्पृह, सचित्र करमणूक, धनुर्धारी, विहार, संकेत, सुबोधपत्रिका, बालसन्मित्र, कामगार खबर, वार्ताविहार इत्यादि वृत्तपत्रातून आधीच महाराष्ट्र-वाचकांसमोर ठेवल्या आहेत. तेव्हा या सर्व चालकांचे आणि संपादकांचे मन:पूर्वक आभार मानणे उचित आहे.

माझ्या कवितांचे बाबतीत माझे नागपूरचे कविमित्र श्री. जयकृष्णपंत उपाध्ये आणि श्री. द. श्री. ऊर्फ बाबूराव केळकर यांच्या कविपणाचा उपयोग मला नेहमी होत असे. तसेच नागपूरचे चि रामाजी कोठेकर (आता डॉक्टर L. M. P. जवलपूर ) डॉक्टर होण्यापूर्वी यांचीही काही गोष्टीत फार मदत झाली आहे. करिता या त्रिवर्गांचा या ठिकाणी प्रेमपूर्वक उल्लेख करणे अवश्य आहे. शिवाय माझ्या अनेक सुहृदांच्या रसिक दृष्टीचे आणि इतर अनेक प्रकारे **आनंद-गीतास** बहुमोल सहाय्य झाले आहे हे येथे कृतज्ञतापूर्वक सांगितले नाही तर कृतघ्नपणाचा दोष मजवर खचित येईल. त्यातल्या त्यात नागपूरचे नाना बेहरे ( प्रो. ना. के. बेहेरे ), त्यांचे धाकटे बंधु रामभाऊ बेहेरे, लक्ष्मणराव तेलंग, दे. भ. नारायणराव अळेकर वकील, गोपाळराव ओगले ( संस्थापक महाराष्ट्र ), प्रसिद्ध लेखक आणि नाटककार बळवंतराव पंडित वकील, कवि जयकृष्णपंत उपाध्ये (रामानुज), कवि श्री. रा. ऊर्फ अण्णा बोबडे वकील, नीलसिटी हॉयस्कूलचे माजी प्रमुख तात्याजी वझलवार, न्यू इंग्लिश हायस्कूलचे माजी प्रमुख श्री. दत्तोपंत पाध्ये, भैय्या खोत (ऑडिटर), बाळ ढवळे (संपादक दैनिक महाराष्ट्र), प्रो. नी, व. भवाळकर, महामहोपाध्याय कृष्णशास्त्री घुले, तरुण भारताचे संपादक श्री. भाऊसाहेब माडखोलकर, श्री. नरसोपंत सावंगीकर वकील, प्रो. भवानीशंकर पंडित, प्रिंसीपाल डॉ. वि भि. कोलते (पाटील), यवतमाळचे वामनराव धर्माधिकारी, अमृतराव साखळे वकील, आत्मारामपंत देशपांडे (आनंद-गीताच्या पहिल्या भागाचे, पहिल्या आवृत्तीचे प्रकाशक), उमरा-

वतीचे बाबूराव सरंजामे वकील (रावबहादूर), माधवराव जोग एम्. ए. (न्यू हायस्कूल), उमरावतीचे दे. भ. नारायणराव वामणगावकर (संपादक उदय), पुण्याचे श्रीमंत माधवराव केळकर, प्रो. श्रीकृष्ण नीळकंठ चाफेकर, कवि अनंततनय, दे. भ. त्र्यं. र. देवगिरीकर (संपादक चित्रमयजगत). दे. भ. वासुकाका जोशी, श्रीमंत सरदार आबासाहेब बावडेकर, प्रसिद्ध इतिहास संशोधक आबाजी चांदोरकर, वासुदेवराव आपटे (सं. आनंद). मुंबईचे वैद्यतीर्थ आप्पाशास्त्री साठे, बळवंतराव लेले (जवाहिराचे व्यापारी), अण्णा घाटे (नवाकाळ पत्राचे माजी बातमीदार,) बळवंतराव परचुरे आणि पुराणिक (सुप्रसिद्ध परचुरे पुराणिक आणि मंडळीचे चालक-द्वय), वि. जी. ऊर्फ आप्पा नाडकर्णी (संपादक नवयुग आणि मनोरंजन), रामभाऊ तटणीस (संपादक विविध वृत्त), अनंतराव मोरमकर (मालक श्री लक्ष्मीनारायण छापखाना), रावसाहेब मोरमकर (विविधज्ञान विस्तार या सुप्रसिद्ध मासिकाचे चालक), दामोदरपंत मित्र (चालक, मनोरंजन छापखाना), बाबूराव नवाथे (इंपीरीअल टोब्याको कंपनीचे अकौंटंट), अच्यूतराव कोल्हटकर, दाजीसाहेब तुळजापूरकर, सुप्रसिद्ध लेखक-संशोधक प्रो. न. र. ऊर्फ बाबूराव फाटक, वऱ्हाडचे दे. भ. पंडित दिनकर शास्त्री कानडे, तात्यासाहेब कोल्हटकर आणि नागपूरच्या बिझाणी सिटी कॉलेजचे संस्थापक व नाशिकच्या भोंसला मिलिटरी स्कूलचे माजी जनरल सेक्रेटरी ज. मा. ऊर्फ भय्याजी कायंदे या प्रेमी आणि स्नेही मंडळींचा प्रामुख्याने श्रद्धापूर्वक नामनिर्देश करणे माझे कर्तव्य होय. या उपर आणखीही कोणी सुहृज्जन नामोल्लेख करण्याचे विस्मरणाने राहिले नसतील असे नाही. त्यांनी मला उदार मनाने क्षमा करावी ही माझी प्रामाणिक इच्छा आहे.

माझ्या प्रसिद्ध झालेल्या कवितांपैकी ज्या ज्या कविता माझ्या परिचयाच्या मित्र मंडळींना आवडल्या त्या त्या कवितांविषयी काहींनी प्रत्यक्ष भेटीत आणि काहींनी पत्रद्वारे त्यांना झालेला संतोष आणि माझ्याविषयीचा आदरभाव अनेकवार व्यक्त आणि प्रकट केला आहे. कदाचित् तो मजविषयी त्यांना वाटणारा आपलेपणा असू शकेल— असणे शक्य आहे. पण काही ओळखदेख किंवा परिचय नसताना प्रसिद्ध कादंबरीकार नारायण-

राव हरि आपटे हे काशी क्षेत्री असताना, रा. कृष्णाजी रघुनाथ पोतदार, मुंबईचे प्रसिद्ध लेखक बाळकृष्ण रामचंद्र प्रभु बी. ए. प्रिंसीपाल गोविंदराव चिमणाजी भाटे वगैरे सारख्या रसिक वृन्दांनी माझ्या कविता वाचून स्वतःचा अभिप्राय आपण होऊन आस्थापूर्वक मनमोकळेपणाने आणि प्रेमभावाने मजला लिहून कळविला त्यांचे आदरपूर्वक आभार मानताना मला अतिशय आनंत होत आहे. तसेच मला सर्वस्वी अपरिचित असलेले चिंचवडचे (जि. पुणे) हौशी पंडित श्री. गो. र. पुरंदरे यांनी माझ्या काही कवितांचे संस्कृत भाषेमध्ये रूपांतर करून ते मजकडे पाहण्यास पाठविले त्याबद्दल त्यांचाही मी मनापासून आभारी आहे. त्याचप्रमाणे काही प्रेमी जनांनी (ओळखीच्या आणि अनोळखीच्या) माझ्यावर लहान मोठ्या कविता रचून त्या मला प्रेमाने पाहण्यास दिल्या त्याबद्दल त्यांचेही तितक्याच प्रेमाने अंतःकरणपूर्वक आभार मानतो. त्याच बरोबर **आनंद–गीतावर** निरीक्षण, परीक्षण, समीक्षण आणि नाना तऱ्हेचे स्वेच्छेनुसार टीका लेख लिहिणाऱ्या लेखकांचाही मी फार फार आभारी आहे.

ह्या आनंद–गीताच्या चवथ्या भागातील अनुस्वार वि. सा. संघाच्या व्याकरण विषयक सूचनेनुसार काढून टाकले आहेत.

'आनंदाचे आत्मकथन' हे प्रकरण 'तरुण भारता'मध्ये मागेच प्रसिद्ध झाले त्याबद्दल त्याचे संपादक आणि माझे स्नेही श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांना जरुरी नसली तरी त्यांच्या नकळत मी त्यांचे मनापासून आभार मानतो.

नुकतेच दिवंगत झालेले माझे स्नेही कै. वा. नाना बेहेरे (प्रो. ना. के. बेहेरे, सुप्रसिद्ध कवि–लेखक) हे माझे पुस्तक पाहण्यास आज हयात नाहीत याचे माझ्या मनाला परमदुःख होत आहे.

कविता लिहू लागल्यावर 'शारदा देवी' प्रथम 'आनंद' मासिकात (ता. १५ एप्रिल १९११) प्रसिद्ध झाली. आणि शेवटची कविता 'मुलाचे सांगणे' तीही 'आनंदा'तच (सन १९५७ आक्टोबर–दिवाळी अंक) प्रसिद्ध झाली. हा योगायोग !

या चवथ्या भागात प्रथम छापलेली कविता 'स्वातंत्र्य–गीत' ही, पहिला भाग प्रसिद्ध झाल्यानंतर सन १९२० साली लिहिण्यात आली पण

दुसऱ्या व तिसऱ्या भागामध्ये प्रेस ॲक्टच्याभीतीमुळे मुद्रक छापू शकले नाहीत. भारत स्वतंत्र झाल्यावर ती प्रसिद्ध होत आहे.

सन १९०८–०९ सालापासून मी कविता लिहू लागलो आणि सन १९५८ पासून आपोआप लिहिणे बंद पडले.

गेल्या तीन चार वर्षांपासून माझ्या प्रकृतीच्या नादुरुस्तीमुळे चिरंजीव कुमारी मंदाकिनी–माझी मुलगी, इचे मजला बहूमोल सहाय्य होत आहे हे लिहिण्यास मला अतिशय आनंद होतो.

आमच्या नागपूरचे भूषण श्री. डॉ. भवानी शंकर नियोगी, माजी मुख्य न्यायाधीश, मध्यप्रदेश हायकोर्ट नागपूर, यांनी नागपूरला उभारलेल्या टिळक पुतळ्यासंबंधीची इत्थंभूत माहिती मजला दिली त्याबद्दल त्यांना माझे धन्यवाद.

मॉंटेग्यू–चेल्म्सफर्ड सुधारणांचा द्विदल राज्यपद्धतीचा अंमल हिंदुस्थानात चालू असता आमच्या मध्यप्रांत–वऱ्हाडच्या सरकारात नामदार डॉ. राघवेन्द्रराव आणि बॅरिस्टर रामराव देशमुख हे पहिले लोकनियुक्त आणि बाणेदार राष्ट्रीय वृत्तीचे मंत्री म्हणून सामील झाले. ते सामील होण्याच्या किंचित् अगोदर, सरकारी मराठी क्रमिक पुस्तकात, **आनंद–गीताच्या** दुसऱ्या भागामधील **हा हिन्द देश माझा** हे माझे गीत घालण्याकरिता मध्यप्रांत सरकारच्या शिक्षण खात्याच्या प्रमुखांनी (डायरेक्टरांनी) माझी परवानगी मागितली. ती मी दिली. परंतु पुस्तक छापून शाळांमधून शिकविणे सुरू झाल्यावर त्या पुस्तकातील 'हा हिन्द देश माझा' या गाण्यामधले लोकमान्य टिळकांसंबंधीचे कडवे अजीबात गाळलेले दिसले. तेव्हा शिक्षकांनी आणि इतर लोकांनी त्याबद्दल माझ्याकडे तक्रारी करण्यास सुरुवात केली. मी त्या तक्रारी 'महाराष्ट्रा'चे संपादक रा. गोपाळराव ओगले यांच्या नजरेस आणल्या. त्यांनी अगदी खडखडीतपणे महाराष्ट्रातून त्या चव्हाटयावर मांडल्या. त्यावेळी शिक्षणखाते ना. डॉ. राघवेन्द्रराव यांजकडे होते. ही गोष्ट त्यांच्या दृष्टीस येऊन, आपल्या राष्ट्रीय बाण्यास अनुसरून ही तक्रार सरकारकडून दूर करविण्याचे त्यांनी मनावर घेतले. आणि लगेच मध्यप्रांत सरकारात त्याबद्दलची हालचाल सुरू केली. काही

कौंसिल सभासदांनी कौंसिलमध्ये मध्यप्रांत सरकारास या संबंधात अनेक प्रश्न विचारले. आणि शेवटी नामदार डॉ. राव यांच्या दीर्घ प्रयत्नाने आणि सततच्या झगड्याने मध्यप्रांत सरकारात यश मिळवून ते कडवे त्या गाण्या-मध्ये पुन्हा प्रविष्ट करण्यास सरकारी शिक्षण खात्याला डॉ. राव यांनी भाग पाडले ! त्याबद्दल महाराष्ट्राचे संपादक श्री. गोपाळराव ओगले, त्यावेळचे कौंसिलचे सभासद आणि मंत्री ना. डॉ. राव या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे. विशेषत. याबाबतचे सारे अंतिम श्रेय तडफदार मंत्री नामदार डॉक्टर राघवेन्द्रराव यांजकडेसच असल्याने त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. दुर्दैवाने डॉ. राव आज हयात नाहीत याचे अतिशय वाईट वाटते !

आता या आभाराच्या सदरात येणारी एकच पूज्य विभूति राहिली आहे. आणि ती पूज्य विभूति म्हणजे लोकनायक माधवरावजी अणे, माजी राज्यपाल बिहार प्रांत, हे होत. आनंद–गीताच्या तीनही भागांस प्रस्तावना लिहून त्यांचे एकदाही मी आभार मानले नाहीत. त्याबद्दल काही टीका लेखकांची माझ्यावर खप्पा मर्जी होऊन कृतघ्नपणाचा दोषारोपही मजवर त्यांनी केला आहे. सर्वांत मला अतिप्रिय असलेले हे गोड कर्तव्य माझ्या-कडून आजवर पार पडले गेले असते तर इतरांपेक्षा मला स्वत:लाच अधिकात अधिक आनंद झाला असता हे निर्विवाद आहे. पण त्यावेळी जसे हे प्राप्त कर्तव्य माझ्या हातून पार पडले नाही तसेच या खेपेसही ते तसेच शिल्लक राहू इच्छिते. याबद्दल टीकाकारांची पाहिजे तर मनापासून मी माफी मागतो. आणि ती त्यानी उदार मनाने स्वीकारावी ही माझी त्याना नम्र विनंति आहे. त्याचप्रमाणे स्वत:ला होणारा आनंद गमावल्याबद्दल माझ्या मनाचीही समजूत घालण्याची शक्य ती खटपट करतो. मात्र एवढेच सांगतो की, या विभूतीचे दर्शन, मनन आणि चिंतन अतीव भूतिप्रद आहे !

या भागाचे मुद्रण विदर्भ साहित्य संघातर्फे ‘प्रदीप’ छापखान्यात झाले. त्याचे चालक श्री. श्री. वि. गंधे आणि व्यवस्थापक श्री. म. बा. राव यांनी आपले काम सुंदर, सुबक आणि सरस केले याबद्दल मीच काय पण वाचकही त्यांचे अभिनंदन करतील.

माझ्या कल्पवृक्षाच्या पाठीमागे ( कै. वा. रामचंद्र नारायण ऊर्फ तात्याजी गडकरी, मॅनेजर सीनीअर भोंसला इस्टेट, नागपूर, मृत्यु ता. २० एप्रिल १९२०– माझे मातुल ), माझे कै. वडील बंधु ती. स्व. शंकरराव दादांच्या प्रेमाचे छत्र माझ्या शिरावर ता. ६ डिसेंबर १९४६ पावेतो जसे उभे होते, तसेच माझ्या तीर्थरूप काशीचा-जन्मदात्रीचा मायेचा हात माझ्या पाठीवरून ता. ३१ जानेवारी १९५० पावेतो फिरत होता. माझ्या काशीच्या हयातीत हा भाग प्रसिद्ध होऊन तिच्या पवित्र पादयुगुलांवर वहावा ही माझी आत्यंतिक इच्छा, आटोकाट प्रयत्न करून देखील काही विचित्र घटनेमुळे फलद्रुप होऊ शकली नाही याचे माझ्या मनाला अतिशय दुःख होत आहे. तिचे स्मरण–चिंतन करून तिच्या अमूर्त पावन चरणी माझे शतशः नमस्कार भक्तीपूर्वक अर्पण करतो.

शेवटी दयाघन परमेश्वराच्या इच्छेने मनाशी योजिलेला आनंद–गीताच्या चार भागांचा संकल्प आज सफल झाला. आणि त्या साफल्याचे श्रेय सर्वस्वी नागपूरच्या विदर्भ साहित्य संघाला आहे. श्री कृष्णार्पणमस्तु.

श्री. वखले यांचा लाल बंगला,<br>
टिकेकर रस्ता, धनतोली, नागपूर,<br>
ता. २८ आगस्ट १९६१ सोमवार

आनंदराव कृष्णाजी टेकाडे

## भरत वाक्य

भरत वाक्य आता । गाउ खरे देवा !<br>
मुक्तपणे तव यश गाना, धन्य गमे मना<br>
क्षण हा धन्य नवा<br>
मुक्त जीवनी ये भरुनी, शुभद भाव आननी<br>
धन्य होय जिव्हा<br>
पारतंत्र्य–मायेमधुनी, मुक्त भरत मेदिनी<br>
नमन तुला देवा !<br>
भरत वाक्य आता । गाउ खरे देवा !

# तेजस्विनी

१८ वे महाराष्ट्र साहित्य संमेलन, नागपूर सन १९३३

( खास महाराष्ट्र साहित्यसंमेलनासाठी )

संमेलनाध्यक्ष—दे. भ. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

चाल – अभंग

ब्रम्हयाची गायत्री
विश्वाची धरित्री
वाणी अधिष्ठात्री
वंदू आधी

वाणीचे सामर्थ्य
उज्ज्वल वदान्य
अनन्यसामान्य
ब्रम्हांडात

कुणी न समर्थ
तया विरोधाया
नमितसे पाया
दुजी शक्ति

कितीक साम्राज्ये
तिने निर्मियेली
तैशी मिळवीली
धूलीमाजी

तिच्यावीण राही
अगतिक जीव
जाणे तया ठाव
दिव्य पदी

आत्मे थोर थोर
तिजसि भाविती
पुनीत करिती
जीवनाते

कुण्याही स्थितीत
मानवी जीवन
नेबसे तरून
वाणी एक

तिच्याच कृपेने
होती वीर, ज्ञानी
नाशिती शस्त्रांनी
तमरिपू

दुर्बल जीवनी
उपजवि त्वेष
शक्तीचा आवेश
प्रचंड तो

दुर्मती जे कोणी
तिज धि:कारिती
नाशाप्रति जाती
सर्वही ते

राष्ट्राचे रक्षण
तारण धारण
तिच्याच आधीन
एक मात्र

मनाचा उल्हास
मतीचा विकास
वाणीचा विलास
जाणिजे तो

वाणीची ही बाग
फुलली सुगंधी
तेथे कृष्ण गंधी
विराजतो

ऐशी तेजस्विनी
शुभद तुम्हाला
तैशी भारताला
होवो आज

अभंगाची वाणी
विठ्ठलाकारणे
'आनंदा' चे गाणे
वाणीस्तव

वंदेमातरम्

★ ★

॥ श्री ॥

# आनंद-गीत

[ भाग ४ था ]

## १ : स्वातंत्र्य गीत

( डिसेंबर १९२० साली नागपूर येथे कै. वा. दे. भ. लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेसाठी तयार करून म्हटलेले )

चाल – सवसे राम भजन

स्वातंत्र्यभक्त वीरांनो ! व्हावे धन्य धन्य लोकी

स्वदेशमाता परवशतेच्या कारागारी असताना
नामर्दाचे बोल सुचावे तुम्हां हिंद-तरुणांना
जो आईचे पांग फेडिना करुनि जिवाची होळी
जन्मा येउनि वृथा जननिची कूस भ्रष्ट केली

गुलाम राहुनि गुलाम-वृद्धि करणे बरवे नाही
याहुनि मरणे असे शुभप्रद स्वातंत्र्याच्या पायी

दास्यशृंखला सहजपणे का तुटली कवणाची ?
रुधिराच्या गंगेतुनि प्रगटे मूर्ति स्वातंत्र्याची

हातावरि शिर घेउनि धैर्ये उभे ठाकल्याविण समरी
स्वतंत्रतेच्या रंगमहाली कोण प्रवेशे आजवरी

पंचप्राणांच्या नैवेद्या समर्पिल्याविण या जगती
प्याला मधु स्वातंत्र्य-सुधेचा कुण्या लागला ओठी ?

काळचा धरणीवरी अक्षरे रक्ताने जी लिहिलेली
वाचा वाचा काय बोधिती तुम्हांस ती या काली

स्वातंत्र्यास्तव अंतावरि जो लढे रिपूशी या भुवनी
त्यासचि लाधे मुक्ती, वैभव बोले गीता-वाणी

★ ★

# २ : लीला

(तत्कालीन न्यायमूर्ति श्री. भवानीशंकर नियोगी हे नागपूरचे नगराध्यक्ष असताना, त्यांच्या खटपटीने आणि चिकाटीच्या परिश्रमाने नागपूरला उभारला गेलेल्या लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याचा अनावरण-समारंभ, त्यावेळचे राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष मरहूम डॉ. अन्सारी यांचे हस्ते ता. २१ आक्टोबर १९२८ रोजी झाला. त्याप्रसंगी जे काय वाटले ते सदर गीतात ग्रथित झाले आहे.)

भीमपलास – झंपा

अतुल लीला तुझी चतुर परमेश्वरा

जीवपार्थीवपण
अचिर जलबिंदुसम
थोरता जीविची–
राहि अजरामरा

रवि दिनी अवनिवर
वितरि चैतन्यकर
निशिहि शशिउडुमिषे–
न्हाणि तेजे धरा

नवयुगा दे जनन
स्फुरवि कर्तव्य, मन
तिलकमूर्ति इथे–
भूषवी फणिपुरा

अतुल लीला तुझी चतुर परमेश्वरा

आक्टोबर १९२८

★ ★

# ३ : आम्ही

चाल – पोवाडा

आम्ही तरुण शिपाई भारती
कुणाची रति
नाही भीती आम्हांला
अम्हि स्वतंत्र होऊ, करू भरतखंडाला
नाही भिणार कलिकाळाला
नाही भिणार शस्त्रास्त्राला
नाही भिणार त्या मरणाला
नाही भिणार त्या जगण्याला
तटतटा टाकु तोडुनी
सुताच्यावाणी
त्या पारतंत्र्य–बंधाला
करु स्वतंत्र अम्हि देशाला
— आम्ही तरुण०

सर निर्झर गंगा अमुच्या
गिरि अरण्य गुंफा अमुच्या
फळफुले तरुलता अमुच्या
तृण धान्य–संपदा अमुच्या

तो धर्म देइ आराम
जिवीचा राम
जो पंचप्राण हिंदाला
तो विटे पारतंत्र्याला
— आम्ही तरुण०

ती थोर बंधुता अमुची
ती हृदय-स्नेहता अमुची
ती ज्ञानवाटिका अमुची
बल बुद्धि युक्ति ती अमुची
सामर्थ्य सकल आमुचे
—नव्हे हिंदचे
—चैतन्य-लाभ व्हायाला
स्वातंत्र्य हवें जीवाला
— आम्ही तरुण०

भूपती आमुचा आम्हा
संस्थान आमुचे आम्हा
ती फौज आमुची आम्हा
तरवार आमुची आम्हा
हे वैभव सारे महा
आमुचे अम्हा
हवे अताच भोगायाला
स्वातंत्र्य हेच दे त्याला
— आम्ही तरुण०

सर्वस्व लूट ही पुरे
हे जिणे भिकारी पुरे
निर्लज्ज गुलामी पुरे
हे मरण सदाचे पुरे
अम्हि खरे आमुचे धनी
झणी होउनी
अम्हि कोण दावु जगताला
कसल्याहि धरुनि मार्गाला
– आम्ही तरुण०

हा काल दीड शतकाचा
वर्तला पारतंत्र्याचा
भारता नरकवासाचा
झाला होम हिंदपणाचा
आपुल्या करी अम्हि अता
घेतले स्वता
त्या हिंद-दैवरेषेला
'स्वातंत्र्य'–बोल लिहिण्याला
–आम्ही तरुण०

अम्हि तरुण षंढ नाहित
बांगड्या हाति नाहित
अम्हि हिंददेविचे भक्त
अम्हि स्वातंत्र्याचे सूक्त
अम्हि नाही असे मरणार
दुज्या बघणार

सांगणे एक अंताला
आमुचे हवे आम्हाला

— आम्ही तरुण०

★ ★

# ४ : स्फूर्ति

स्फूर्ति हिन्ददेशा
हिन्ददेश देई
मूळची दरिद्रता
दैवयोग दे जया सनाथता
काय देइ थोरता
तो दुज्या, न हा स्वभाव तत्वता

हिन्ददेश आपुला
जरि गरीब तो दिसेल आजला
जातिचा तरि भला
कणकणात थोर भाव साठला

स्फूर्तिनेच त्या स्वता
तो क्षणात घालवील दीनता
तीच स्फूर्ति सर्वथा
दाखवील मूळ थोर श्रेष्ठता

★ ★

# ५ : प्रतिक्षा

चाल – लावणी

किती पहावी वाट तुझी रे ! बोल कन्हैया बोल

झोप उषा घे पूर्वदिशेची
अर्धोन्मीलित पुष्पे तरुची
जोत्स्ना नाचे चन्द्रमुखीची
अशा समयि मी आले कृष्णा ! प्रशांत जग-हिंदोल

फूल उमलले की तोडावे
गुणामधुनि म्या ते ओवावे
ओवुनि होता तुजसि बघावे
हार संपला, उषाहि उठली, ऐकु न ये तव बोल

खेळवि प्राची रविराजाला
बहर नवा ये चैतन्याला
असशि कुठे तू स्नेहनृपाला
तुझ्या गुणाचे गाणे गाई एकरवे चंडोल

सकाळ सरली, सांज उजळली
माळ फुलांची सुकुनी गेली
नवीन पुष्पे बघ टवटवली
कुणीकडेही बघता दिसतो प्रेम-समीर विलोळ

उदयाचलि हा शशांक दीपक
उजळा देई तमा विनाशक
उगाच होई मनास दाहक
टाक विझवुनी असशिल तिथुनी, अधीर आशा खोल

गाढ तमामधि आशा-जीवन
मधुर कल्पनी जाई रंगुन
जवळि निराशा येइ कदापि न
सहज निवारी इन्दुविणे तम सुफलित आशा-दोल

प्रश्न तुझा तो ये केव्हाही
दोष तयाचा मुळि नच देई
मनिषेने तव येणे होई
निश्चिततेची वाट पाहणे इतर दुजे मज फोल

चिंतुनि चिंतुनि ही फुलमाला
शेवटि तनुच्या करि त्यागाला
संगम ना तरि मुख बघण्याला
जाउनि बसली नभि आशेने, शोभे रम्य खगोल

शांत रूप ये तरलपणाला
तरलपणा ये शांत रुपाला
खेळ सदाचा चाले असला
पण राधेला होइल केव्हा हरिची भेट अमोल

★ ★

# ६ : अतिथि

चाल – उद्धवा शांतवन

विधिलाहि विधीची घटना । नाकळे, कळे मग कोणा

सौंदर्यमूस विधि नतरी । निर्मुनी यत्ननिकरांनी
रसिकता जगाला दावी । बुद्धिचा कोष उघडोनी
लाजविले प्रति सौंदर्या । मानसी तया दिपवोनी
येताच दृष्टिला परि ती
अभिलाषी होऊ चित्ती
हे स्वप्न काय त्या आधी
म्हणुनीच बोलती अंती । की अगम्य विधि-करणी ती

श्रीजगन्नाथ वंदोनी । मोदभरे उदयि उठावे
आचरुनि प्राप्त योगाते । निश्चिंत निशी झोपावे
सुषुप्तीत मांगल्याचे । स्वप्नही जये पाहावे
ही अशी रामराज्याची
ती देवभूमि गोकुळिची
अनुभूति घेत असताचि
तो अकस्मात ये पुढती । व्रजि अगम्य विधि-घटना ती

जणु सुधाच सुरलोकींची । भूवरि ये यमुनारूपे
कैवळ त्या दर्शनमात्रे । जळती की सारी पापे
पशु, पक्षी, थोर, मुलांना । जननीच गमे अनुकोपे

नर, नारी, शिशु, बाळे ती
खेळती, पोहती, रमती
पशु पक्षि घेति विश्रांति
तो प्रभाति एका बघती । विषमया सकल यमुना ती

खल, नष्ट, दुष्ट, चांडाळ । तो कोण असावा लोकी
सुख वैभव गोकुळिचे ते । यन्मना जाळुनी टाकी
गोकुळिच्या कंठाभवती । मृत्युचा पाश लावी की
कालवी कालकूटाला
त्या सुधामया यमुनेला
करि निमिषि विषाचा प्याला
कोणता लाभ या कृतिने । त्याचिया पडे पदरात

किति उग्र दर्प गरलाचा । कालही कालमुखि जावा
मग स्वता मर्त्यजीवांचा । त्यापुढे काय तो केवा
गतधैर्य, निराशा व्यापी । जाणताच गोकुल-जीवा
पीणारा, जलि वसणारा
सहजता श्वास घेणारा
मौजेने नभि उडणारा
पटपटा जाति परलोकी । कथु काय दुर्गती त्यांची

जलसुधा तदा गोकुळिची । गोकुळा पारखी होई
ते अन्नब्रम्ह गोकुळिचे । गोकुळा पारखे होई
गोकुल-प्राणवायू तो । गोकुळा पारखा होई

जीवही त्रयाचा त्याला
सर्वस्वि पारखा झाला
ये अनन्यगतिक स्थितिला

गोकुळिचे ते वैकुंठ । घे स्मशानरूप घडीत

निरखिता शेवटी कळले । अपुल्याच अतिथिची करणी
जो हीन दीन होवोनी । जोडुनिया येई पाणी
जीवनाधार द्यायाते । विनवणी करी मृदु वचनी

स्मरुनीया स्वब्रीदाला
प्रकटवी स्नेहभावाला
दे यमुना थारा ज्याला

तो हाच कालिया, सारा । करि अनर्थ जो गोकुळिचा

पण असाध्य रोगालाही । औषधी निर्मि प्रभुराय
कालिया कोठला कोण । पाहता कथा ती काय
कालही भिउनिया जेथे । वाचवी आपुला काय

संकटे येति जीवाला
परि श्रद्धा, विक्रम अपुला
दावुनी भाविता हरिला

तो कृष्ण वारि लवलाही । करि मुक्त गोकुळा जेवी

★ ★

अनुक्रम 32906 दि: 3/07/ 33
क्रमांक 7552 नों दि. 7/7/94

# ७ : दीप-निर्वाण

( दे. भ. लाला लजपतराय यांचा स्वर्गवास )

बोलु नको बोला । भारता !
बोलु नको बोला
की भारतिचा—
स्वातंत्र्याचा—
दीपक मालविला

एकच कुंभी साठविलेली
चैतन्याची दीप्ती सगळी
समष्टीत ती बघ अवतरली
लाभ किती झाला । भारता !

पारतंत्र्य-अंधार घोरतर
एकच दीपक नाशिल कुठवर
होऊ दे तव लज्जित अंतर
विचार जरि असला । भारता !

शांतीचा संताप येउ दे
अन्यायाची चीड येउ दे
परवशतेचा वीट येउ दे
दावि पौरुषाला । भारता !

अधम रिपूला मालविण्यास्तव
दीप असे किति हवेत अभिनव
तरिच करी ये स्वराज्य-भव तव
उमज उमज काला। भारता !

'वाल' हरपला 'बंधु' निमाला
अजि असलेला 'लाल'हि गेला
अश्रु कुठे तुज गाळायाला
उरलि क्रोध-ज्वाला। भारता !

जगा दिसू दे असंख्य दीपक
निज ज्योतीने करुनि प्रज्वलित
दीप जाइ तो निर्वाणाप्रत
हेचि योग्य तुजला। भारता !

भक्ति खरी जरि तुझिया ठायी
असेल पौरुष अंगी काही
एकच करणी ऐशा समयी
'हर हर' वद बोला। भारता !
स्व-राज्य घ्यायाला

★ ★

# ८ : फूल

(महाराष्ट्राचे संपादक श्री. गोपाळराव ओगले यांचे येथे एके दिवशी सकाळी गेलो असता आंगणामध्ये एका कुंडीत एक सुंदर फूल फुललेले दिसले. दुसरे दिवशी पुन: त्याच वेळी तेथे जाता ते फूल झाडावरच सुकलेले आढळले. त्यास उद्देशून पुढील गीत लिहिले गेले.)

चाल – लावणी

फूल वेलिचे वेलीवरती हळुहळु सहजी फुले
जगाने निमुटपणे देखिले
काय करावे ह्या पुष्पाचे काहि सुचेना कुणा
गुंतवी विचारीच निज मना
दुसरे दिनि पाहिले जगाने मरण येइ त्या फुला
तरी तद् विचार नच संपला
सुखदु:ख तयाचे मुळि न जगा वाटले
जीवनप्रवाहा भंग न रति त्यामुळे
आरशापरी मन निर्मळ जणु बावळे
फूल जन्मले, मरुनी गेले तेहि न स्मरणामधी
क्रमितसे अखंड कालावधि
निज जन्माने हृदयी जगती कोण कोण तोषले
फुलाने काहि न परि जाणिले

निज सौंदर्ये जगतामाजी कोण कोण लोभले
तेहि नच त्याने अवलोकिले
निज गंधाने जगतामधि की कोण कोण मोहिले
तयाने तेहि न मुळि लक्षिले
सामर्थ्य तदंगी प्रभुने जे ठेविले
ते वेचुनि अवघे सु-मने प्रज्ञाबले
भवतीच्या अपुल्या दुर्गंधा वारिले
काल ठाकला समोर अंती शरीर तैं आपुले
सुखाने त्याच्या करि दीधले
मानवसृष्टी परमेशाची इतस्तता पसरली
एवढ्या अमर्याद भूतली
परवशतेचे अन्यायाचे दुःखाचे मार्जन
अहर्निश करिती किति सज्जन
स्तुतिनिंदेची फिकिर न करिता एक विचारी मति
भोगिती अनंत कष्टाप्रति
सुखदुःख जगाचे प्रत्येका कळतसे
प्रत्येक वीरगुण-प्रशस्ति मुखि गातसे
का जगदुद्धारी एखादाची दिसे ?
असे फूल जे मेल्यावरि ते घेइ जन्म मानवी
म्हणुनिया विरल साधुता भवी

* *

# ९ : चांदण्यांचे नवल

नवल बहु वाटे । चांदण्यांचे
एके ठायी दोघी युवती
कधि न नांदती बोलति जगती
मग ह्या इतुक्या कैशा वसती
नवल नवलाचे । चांदण्यांचे

शुक्र चांदणी तेजस्वी ती
तिचेच सारे कौतुक करिती
दुज्या न मग का द्वेषित होती
नवल नवलाचे । चांदण्यांचे

ब्रम्हा घडवी ज्या रूपाला
त्यातच मानुनि संतोषाला
आचरिती का निज कर्माला
नवल नवलाचे । चांदण्यांचे
'पायि विजेच्या घालि' शृंखळा
बंधनि टाकी मेघ तयाला
दिसति पुन्हा का विमुक्त विमला
नवल नवलाचे । चांदण्यांचे

सहस्त्ररश्मी चंडकरांनी
स्वरूप सुंदर दाही श्रमुनी
तदधिक निशि का कांती वदनी
नवल नवलाचे । चांदण्यांचे

प्रलय प्रभंजन तो वाहुनिया
स्थानभ्रष्ट त्या झटे कराया
राहति मग का स्थिर निज ठाया
नवल नवलाचे । चांदण्यांचे

वृत्तिभंग तो एकदा तरी
का नच होई तारकांतरी
कुणास काही वाटो मज परि
नवल बहु वाटे। चांदण्यांचे

★ ★

## १० : तरवार

(चित्रमयजगताच्या जानेवारी १९२९ च्या खास अंकाच्या मुखपृष्ठावरील चित्रास पाहून पुढील गीत लिहिले गेले.)

समशेर तुझी कैशी । तुजपाशी
कोठुनि अणिली । कुणी दीधली
गवसे ही कैशी । गे तुजसी
समशेरीचे तूझे मीलन
होऊ नये कधि अथवा दर्शन
तुजला तिजला म्हणुनी बंधन
दृश्य तुझे बघुनी । किंतु मनी

सूर्यकिरणही ये न दृष्टिला
द्वारी निशिदिन ‘ संगिनवाला ’
कुलुप सदाचे मुख–जिव्हेला
विरह–काल–पाशी । वनवासी
परवशतेचा वीट मनाला
यास्तव दावुनि आत्मबलाला
काय तोडिल्या उभयि शृंखला
हृदय भेटवाया । निज हृदया
जिवा अवस्था येवो कशि ही
अवसर मिळता एक क्षणही
हृदय जिकडचे तिकडे जाई
निसर्ग–करणी ही । नच काही
समाधान मुखि विलसे तुझिया
क्रोध–रक्तिमा भूषवी तया
दृढ निष्ठेने शोभे काया
खरी हिन्दजननी । ये नयनीं
पंजरातुनी मुक्त होउनी
जगन्नाथ तो भावे वंदुनि
उभी अशी तू खड्ग घेउनी
हृदयोत्कंठेने । ईर्षेने
पण ठेवी स्थिर निज चित्ताला
पारखुनी दे समशेरीला
भलत्या करि नच देई तिजला
अनुताप न व्हावा । निज जीवा

तुझ्याच नातरि खड्गा घेइल
तुझ्याच मानेवरी चालविल
पुन्हा निरयपंकात पहुडशिल
चढवि तुला विभवी । त्या देई

★ ★

## ११ : का हसतेस

काय तुला जाहले हसाया
वाइ अशा समयाते
कृष्ण सखा जाइ कुठे
ऐन समयि ना कळते
बुद्धि कशी ही सुचते
तोच हवा हास्य हे बघाया
का हससी, किति हससी
काय इथे हसण्यासी
कृष्ण नसे पाठीशी
ऐकु न ये वेणु तशी
नवल घडे कोणते क्षणी या
नवलाचे हसणे हे
मज वाटे मुळि नोहे
कौतुकही गम्य नव्हे
तूचि तुझे ते पाहे
वेड नवे वाटते दिसाया

अपुरा हा हार करी
गळति फुले धरणिवरी
भान कुठे जाइ दुरी
हसत उभी अचल तरी
याच घडी कुठलि मोहमाया

पाहसि ना कोणिकडे
बघसी मन्मुखाकडे
काय तिथे दृष्टि पडे
हसण्याचे सार जडे
बाहसि की वेडपे कराया

आतावरि स्वस्थ मने
हार गुंफिसी सुमने
येता मी सहजपणे
हससि अशी तू सगुणे !
हासच गे हास्य पूर्ण व्हाया

श्लोक

वळोनि बघता सखी सहज पाठिशी तेधवा
तशी दचकली उभे बघुनि हासऱ्या माधवा
कळे तदुपरी तिला हसत राधिका का अशी
हसे न नलिनी कशी नभि विराजिता तो शशी

★ ★

# १२ : पुन्हा एकदा

विचार याचा करी। भारता ! विचार याचा करी

पाठि हिमालय उभा निशिदिनी
सुधा जान्हवी तुझ्या आंगणी
द्वारी सागर खेळत बहुगुणि
म्हणुनि धन्य अंतरी। काय रे ! विचार याचा करी

शतयोजनिच्या तोफा असती
सदैव रोखुनि हिमगिरिवरती
नष्ट कराया तव तेजाप्रति
हे न तुझ्या अंतरी। काय रे ! विचार याचा करी

भरली गंगा समोर तुझिया
मिळे न पुरते तुजसि बघाया
थेंब दुरी मग तृषार्थ प्याया
हे न तुझ्या अंतरी। काय रे ! विचार याचा करी

सागरातले मोती वेचुनि
हार तयांचा सुंदर गुंफुनि
तुजपुढतिच मिरवितो दुजा कुणि
हे न तुझ्या अंतरी। काय रे ! विचार याचा करी

पदतलिची तव धरणीमाता
पाउलभर परि नच तव सत्ता
कुण्या तरी दुसऱ्याची मत्ता
हे न तुझ्या अंतरी। काय रे! विचार याचा करी

तुझ्या शिरावरि डोलत राही
समीरगामी यान सदाही
शस्त्रास्त्रांसह जीवनदाही
हे न तुझ्या अंतरी। काय रे! विचार याचा करी

भरतखंड हा भारतियांचा
बोल कालवर हा जगताचा
आज काय?–छे, नुमटे वाचा
हे न तुझ्या अंतरी। काय रे! विचार याचा करी

निमुट ऐकशी निमुट पहासी
निमुट निशिदिनी झोपसि, उठसी
निमुट आपुली कर्मे करिसी
हे न तुझ्या अंतरी। काय रे! विचार याचा करी

नच ओळखिसी अपुल्या स्थितिसी
उठाठेव दुसऱ्याची करिसी
जग बोले ह्या काय खुळासी
हे न तुझ्या अंतरी। काय रे! विचार याचा करी

भरतखंड हा तुरुंग सारा
त्यातच तव हा हीन पसारा
तवाभिमाना लेश न थारा
हे न तुझ्या अंतरी। काय रे! विचार याचा करी

तरी अजुनि तू जिवंत दिससी
म्हणुनिच कथितो प्रेमे तुजसी
पुन्हा एकदा या बोलासी
काय तुझ्या अंतरी। भारता ! विचार याचा करी

★ ★

# १३ : तरुण भारतास

चाल – खडी

तरुण भारता ! कुण्या विचारी ? अता कुठवरी तो विचार
आपण होउनि दार लावुनी भोगिसि रे ! कारागार

तारुण्याचा गरुड भरारी अपुरे गगन तया अनंत
फडफडुनी भूवरीच जगता दाविसि तू अपुला अंत

तडफ कुठे तव, तेज कुठे तव, निधडेपणही तुझे कुठे
चपलेचे चापल्य कुठे तव, सर्वच लपले ते कोठे

हिन्दराष्ट्रधर्माचा नूतन देवदूत रे ! तू खरा
स्वाभिमान–चैतन्य–पूर्ण घट तूचि एक नरवीरा

उदात्त करणी निष्ठा शक्ती रोमरोमि रे ! तूझिया
जागृतिचा तू सूर्य अससि रे ! नीज न मुळि तव ठाया

परंपरा, सामर्थ्यं, प्रतिभा, स्व–राष्ट्र–वैभव आजचे
सत्कार्यी आत्मार्पण करणे बाळकडू तुज साचे

मुले मुले ती, जरठ जरठ ते परिणामी निर्माल्य ते
सगळ्या पुण्याईच्या तरुणा ! तूची साफल्याते

तुझ्याठायि जी अमोघ शक्ती पार न लागे रे ! कुणा
तुझ्यामुळे उत्साह लाभतो निराशमन बलहीना

तरुण मुखीचा बोल होतसे सुधाबिंदु रे ! निर्जिवा
श्वासमात्रि तरुणाच्या केवळ मनू निर्मि नव भावा

भारतवर्षाच्या नव तरुणा ! भवितव्याचा तू धनी
उज्ज्वलतेचा, उत्कर्षाचा तूचि दिव्य मेरूमणी

का मग तव ही सुप्त संपदा अजुनि न अनुभवि येतसे
उघडि उघडि भांडार भारता ! ऊठ ऊठ निज वेषे

★ ★

## १४ : ऋतुराज !

असावरी – झंपा

ये रे वसंता !
नच पाहि अंता
या कोकिलाची । करि दूर चिंता

उत्साह वाटे
मनि हर्ष दाटे
उघडी मुखा तो । गायास गीता

लपती नभाआड
जलमेघ ते द्वाड
प्रकटे म्हणोनीं । तन्मोद आता

डुलवीत पर्णे
फुलवीत सुमने
मृदु वायु देखे । तो गंधदाता

जल निर्झराचे
दिसते रुप्याचे
सस्नेह चंचू । पिक तोय पीता

रिझवी विलासी
नव मंजिऱ्यांशी
करुनी प्रमोदे । लीला अनंता

सौधी विरामा
रमणीय रामा
ये दृष्टिला त्या । सदनासि येता

प्रिय सूर्य–दीप्ति
मधु चंद्र–कांति
प्रेमार्द्र होई । अनुभूति घेता

आनंद जगती
आनंद चित्ती
स्फूर्ती न मध का । होईल चित्ता

पण यत्न करुनी
उमटे न वाणी
तुझिया अभावी । ऋतराजसंता !

★ ★

# १५ : आईचे कौतुक

चाल – सुटला पितृदिशेचा

कसली घाइ एवढी तुजला
धरि रे ! जरा तरी स्थैर्याला
संपलेच आता घालुनि पोषाखाला
जाहला न पुरता प्रहर अजूनी बाळा
भगवा फेटा बांधुनि शिरी
मंगल तुरा लाविते बरी
हा कंबरपट्टा कमरेला सोनेरी
त्यामाजि खोविते पिस्तुल जंबिया तरी
नंतर टिळा केशरी भाली
भारत–विजयाचा जो मौली
हं थांब राहिले ! –तीट लाविते गाली
तुज लागु नये रे ! दृष्ट कुणाची काळी

गेले वैभव हे लाभाया
ऐसे भारतवर्षा तुझिया

किति दिव्य त्याग रे ! होय भारती समया
ती ये न कल्पना तुझ्या आजच्या हृदया

गणणे परमेश्वर देशाला
झटणे त्याच्या उत्कर्षाला

अक्षम्य पाप हे वाटे परसत्तेला
थैमान घालि मग पिशाच्चिनी ती कुटिला

लोभी भुते जागली सारी
होती सज्जनास ती भारी

त्या निबिड तमाला चंद्र छेदिता करी
जणु गर्जत यावे मेघ भवति आसुरी

धर्माधर्मी उपजे कलह
बंधुप्रेमी माजे प्रलय

जणु मच्छगणी जलि व्हावे रण दुस्सह
एकमेक त्यापरि मान कापिती अभय

तरिही भक्तिघोष हृदयीचा
अपुल्या भारत–परमेशाचा

बेगुमान चढता घेइ ठाव गगनाचा
की स्पर्शे पश्चिम रविकर झणि पूर्वेचा

बघुनी कुटिला झाली खुळी
अपुले भान विसरुनी गेली

राउळा समजुनी स्मशान, तांडव घाली
ते कसे कथू रे ! तुजला या शुभ काली

न बघे न्याया अन्यायाला
विकिले लोकलाजलज्जेला

मग साधू, खलजन भेद तिथे कोठला
दावाग्नि पाहिना कधी कंटका, फुला

न मिळे कुणास जल प्यायाला
तैसे अन्न कुणा खायाला

न प्रकाश लाभे मुळिच कितिक रात्रीला
बंदिस्थ वाहने, मार्गहि अवरोधिला

बंधू बंधुस नच भेटावा
प्रिय जनि शब्द न उच्चारावा

सहवासि नसावे जननि, सुता, रमणी वा
हा दंडक नादे प्रतिघडिला गर्जावा

प्यादे सशस्त्र ठायी ठायी
जन-करि छडिही राहु न देई

नभि फिरे सदाचे यान ज्वालाग्राही
समुदाय देखता पाठविण्या यमगेही

लटकति कितीक फासावरती
तोंडी तोफेच्या किति जाती

प्रिय मातृभूमिला कितिक पारखे होती
अंधार कोठडित सडत, कुजत किति पडती

कोठे एकच ताऱ्हा उरे
कोठे म्हातारिच एक रे !

कुणि थुटा, पांगळा, लुला कुठे वावरे
भरलेले गोकुळ उजाड कोठे सारे

नुकता उष:काल जीवाचा
अंकुर तेजस्वी आशेचा

करि नाश दुर्मती तुडवुनि पायि अशांचा
प्रत्येक रज:कण पुतळा प्रत्येकाचा

मी ही बाई माणुस मुला !
कळणे समग्र शक्य न तिला

असतील याहुनी घोर विपत्ती अतुला
अधिकार-विभंजन रुचे कुण्या सत्तेला

वाटे वाऊ अजि मृत्यूचा
क्षणि त्या पोरखेळ देशाचा

तइ एकच वस्तू-मृत्युच बिनमोलाचा
नच बोल मृत्युविण त्रिकाळ बोले वाचा

उगवे एक दिवस रे ! असला
अजुनी भरे कापरे तनुला

सर, निर्झर, सरिता-भारतिची जलबाला
लेवुनी भूषिली सघन रक्तरंगाला

जे जे उत्तम म्हणुनी ख्याति
जे जे रम्य अलौकिक म्हणती

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११८७४

ते सारे प्रेमे ब्रम्हार्पण भारती
तेव्हाच मिरवि अजि 'स्वतंत्र' भारत जगती

असल्या स्वतंत्र धामी अससी
समरी समर कराया जाशी

रणवेश चढविते आई निज बाळासी
वाटणे सहज रे ! कालावधि हा तुजसी

★ ★

## १६ : वेडा मुलगा

चाल – भूपती खरे ते

या नविन पुस्तकी चित्र मुलाचे आई !
किति मजेदार हे जरा जवळुनी पाही
किति ऐटदार हे लेणे पोषाखाचे
हे उभे राहणे झोकदार किति याचे
ही खांद्यावरती बंदुक कैशी घेई
जातसे कुठे तरि, दिसे केवढी घाई

माझ्याच एवढा तो ग । दिसतसे
मग मीहि तसा नच का ग । दिसतसे
कोणता भेद उभयी ग । दिसतसे

तो दुज्या आइचा म्हणुनि मिरवि का तैसा
मी तुझ्या पोटचा यास्तव राही ऐसा

मज नको तुझी ती पाटी दप्तर, शाळा
मी तसाच होइन वदतो बंदुकवाला
पोषाख असा हा सांग मिळतसे कोठे
दे बंदुक ऐशी कोण मुलांना कोठे
हा असाच आता जातो तेथे आई !
मी असा भिकारी राहणार मुळि नाही

माझेहि चित्र येईल। पुस्तकी
यापरिच दुजा पाहील। पुस्तकी
मग तोहि तसा होईल। जाण की
दुबळ्यानें दुबळे सदैव का राहावे
जगि यत्न–विक्रमे सिंहापरि गर्जावे

★ ★

## १७ : उत्कंठ

चाल – मज मदने फसविले

जगताचे जग जरी। धीर धरी अंतरी

पतंग कधिचा मगनि उडविला
अजुनी खाली नसे परतला
महति नभीची जाणायाला
येऊ दे भूवरी

बहु दिन पंजरि राघू राही
बाहिरचे त्या वारे नाही
सुखदु:खाची तेथिल ग्वाही
देइ कशी तो खरी

अताच तेजे दीप उजळिला
तैंपासुनि तो नाशि तमाला
जीवन कथना अवधि न त्याला
वाट बघे तोवरी

इतुक्यातचि रवि झोपी गेला
जागृत होता निज करणीला
वदेल तुजला, तरि या घडिला
ठेवि उगी वैखरी

धीर न धरवे जरि तव हृदया
तूचि श्रमवी अपुली काया
इच्छेपरि घे जाणुनि सखया !
ऊठ कसा झडकरी

★ ★

# १८ : मंगलम्

श्लोक

वीणा वादनि शारदा चतुर ती लंबोदरा तोषवी
तैसे तांडव–नर्तनी कुशलशा तोही तिला हर्षवी
ही लीला मनरंजनार्थं उभयी चाले अशी सर्वदा
ती होवो शुभदायि या वधुवरा–कुर्यात् सदा मंगलम्

विश्वाचा पति बोलवी तरि भवी वैराग्य–मूर्ती खरी
नाना सुंदर भूषणे जगि तरी अंगी विभूती धरी
कन्या भूपतिची तरी परिणिले गौरी सतीने जया
तो शंभू शुभदायि हो वधुवरा–कुर्यात् सदा मंगलम्

स्नेहाची पुतळी, मनोज्ञचरिता वात्सल्य भूषा गुणी
प्रेमाची जननी, तशी अवतरे वैकुंठ–भक्ती जनी
सर्वस्वी वश जो, मुळी नवल ना, त्या राधिकेला अशा
तो श्रीमान शुभदायि हो वधुवरा–कुर्यात् सदा मंगलम्

★ ★

अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों दि ...

# १९ : साधुबोवा

चाल – तरवार लाकडी ही

हा कोण बुवा येई । पहा आई
मज नेइन म्हणतो सवे आपुल्या पण नेउ न देई

शिरि जटाभार केसांचा
करि कमंडलू मातीचा
करगोटा हा दोरीचा
सर्वांगि फासली राख तयाने, कसा ग हा राही

वाजवितो मधुनि मधुनि
शंखास दोन्हि हातांनी
मज वाटे भय ऐकोनी
हा कुठला, अवचित अपुल्या दारी कोठुनि गे येई

धिप्पाड कसा शरिराचा
आवाज केवढा याचा
अवतार जणू दैत्याचा
त्या पुराणिकाने सांगितलेली गोष्ट खरी आई

पोटावरि दाढी खेळे
बोलताच डुलु डुलु हाले
की चवरी हळु हळु डोले
झाकिले मिशांनी मुखा त्याचिया जणू मुखच नाही

लालभडक डोळे दिसती
चांदिचे केस तनुवरती
वाऱ्याने भुरुभुरु उडती
जणु गवत कोवळे जमिनीवरचे भास असा होई
हा बोवा आल्यावरती
मज टाकिसि त्याच्यापुढती
कोणता हेतु तव चित्ती
बघ इथुनि मला ग उठवेना की हलवेना मुळिही
घालवुनी याला देई
मजला वा उचलुनि नेई
बघु नको टकमका अशि ही
दाढीस नातरी बांधुनि नेइल बोवा मज आई
यापुढे अता केव्हाही
धरूनिया हट्ट कसलाही
मागणार नाही काही
तू जसे सांगशिल तसे करिन मी आण तुझी वाही
हा मला कुठे नेणार
मग पुढे काय करणार
वाटे हा मज खाणार
खायाचे याच्या हाती, जवळी मुळि न दिसे काही

● ●

बोलताच यापरि बाळी
साधु–मुखी दृष्टि पडली
आकांत मांडि त्या काळी
ती आई, बोवा तदा खदखदा हसती दोघेही

# २० : शाळा

दिंडी

" रडसि का रे! एवढा मुला सांग
निळे हिरवे दिसुनि ये तुझे अंग
असा कसला अपराध तुवा केला
म्हणुनि कोणी करि घोर शासनाला "

प्रश्न मायेचा ऐकुनी तयाने
रडे सावरिले महा प्रयासाने
तरी वाणीतुनि शब्द मुळि फुटेना
हलति ओठच ते, विफल यत्न नाना

कसा तरि मग एकेक शब्द त्याने
मुखावाटे उच्चारिला श्रमाने
शब्द बोलावा, अश्रु पुशित जावे
त्याच अवधीमधि वृत्त आठवावे

" रुग्ण शय्यी दिनि बहुत माझि आई
तिच्याजवळी मजवीण दुजे नाही
मीच सारे करुनि दे औषधाला
म्हणुनि शाळेला आज उशिर झाला

" छडी पहिली ठाउके बैसली ही
कोण जाणे ते पुढति काय होई

नयन उघडीता एकटाच तेथे
उठुनि नंतर हा चाललो गृहाते "

* *

## २१ : प्रेम-कुंज

चाल – मज समीप

चल, कशास बससी येथे
श्रमले, दमले
शिणले, मन ते
चल, कशास बससी येथे

सुमनतरू टवटवीत नाना
सदैव जणु की वसंतराणा
कुंजवनी
त्या फिरुनी
चल, मनास रमवी तेथे

उदासवाणा समीर इथला
प्रसन्नतेचा समीर तिथला
क्लेश इथे
तोष तिथे
चल, जिवास रिझवी तेथे

विकल्प येथे हृदयी खेळे
चरणी शांती तेथे लोळे
द्वेष इथे
स्नेह तिथे
चल, खुशाल जाई तेथे

सुगंध केवळ तृप्ति न देई
कुसुम सुगंधित मना मोदवी
नाद इथे
वेणु तिथे
चल, सुखास अनुभवि तेथे

राधा येथे माधव तेथे
ह्यासाठी नच जन्म तुम्हाते
एकपणा
दिव्य गुणा
चल, जगास दावी तेथे

★ ★

# २२ : कालाय तस्मै नमः

चाल – सबसे राम

वंदितो तुझ्या चरणाला । काला ! अगम्य तव लीला

परम थोर संस्कृती–लता जी जगताची आई
उगवे, विहरे वैभवि तेथे हीन दशा का यावी

शौर्य, धैर्य, सामर्थ्य, प्रज्ञा अतुलनीय ज्याची
त्यावरती का मात जहाली अनाहूत परक्याची

अर्ध जगावरि चांद तळपला, झेंडा अटकेला
त्या चांदाला, त्या झेंड्याला कोण पुसे या घडिला

निवास जेथे करी चतुर्भुज मूर्तिमंत कमला
थारा मग का अठराविश्वे तेथे दारिद्र्याला

स्वतंत्रतेच्या एकच रंगी चित्र ‘आशिया’चे
त्यावरि अजि का ठिपके दिसती नानाविध रंगाचे

दीन वेश घेउनी भिकारी द्वारि काय येतो
गोड बोलतो, हात पसरितो, धनी काय तो होतो

विचित्रता सारीच, कुंठिते गती कल्पनेची
धनी पाहुणा, पाहुणा धनि धन्य असो घटनेची

इतिहासाचे पान उघडिता जगी कुणाच्याही
परिस्थितीचे चक्र बदलते असेच दिसुनी येई

हताश होउनि निराश होणे नच शोभे कवणाही
फिरता फिरता चक्र येतसे पुन्हा मूळच्या ठायी

★ ★

## २३ : अनुरागाचा प्रभाव

चाल – तू जाइ गड्या मंदिरा

चंद्रमा येइ अंबरी
कशाला तरी । याच काला
पळविले तिमिरसुहृदाला

झोपले दिसे जागले
कुंजवन फुले । गंध खुलले
पिउनिया सुधेचे प्याले

खेळतो तिमिर मानसी
अतावरि तशी । सृष्टि सारी
आनंद तयातचि भारी

अंधार हृदयि दाटता
कसे जीविता । रुचे जगता
ही चंद्र ज्योत उजळीता

ही फुले कशी नाचती
माझिया पुढति । गालि हसती
मज वेडावुनि दाविती

दो सुहृदांचे मीलन
निमिषि भंगुन । विकल करिसी
शशिराय ! उचित का तुजसी

हा तुझा खेळ जाहला
तसा चालला । सहजतेचा
परि जीव जाइ रे माझा

हृद्‌भंग तुझ्या प्राक्तनी
तयाची स्मरणी । तुझ्या स्वमनी
ठावे न तुला का अजुनी

हे हृदयाचे भंजन
अश्रु सिंचन । जीवनाचे
आजन्म होतसे साचे

तो श्याम जाइ सोडुनी
स्नेह लावुनी । अंतराला
करि म्हणुनि सुहृद तिमिराला

नावडे तेहि तुज शशे !
जिथे वसतसे । तिमिर जगि या
जाईन तिथे भेटाया

प्रिय मजला तो अंधार
हृदयिचे सार । आजला रे
त्यापुढे तुच्छ जग सारे

जावया उठू लागली
दृष्टि फिरविली । राधिकेने
झाकिली तोचि कृष्णाने

बाहेर सर्व अंधार
हृदयि बडिवार । चंद्रिकेचा
हा प्रभाव अनुरागाचा

★ ★

## २४ : आम्ही मथुरेच्या

चाल – लावणी

आम्ही मथुरेच्या
नको आडवू अम्हा कन्हैया !
अम्ही न गोकुळिच्या

तुझी बासरी कशी वाजते,
कसे ऐकता चित्त मोहिते,
यास्तव आलो बघायास ते,
आम्ही मथुरेच्या.

तुझ्या वेणुला अम्ही ऐकिले,
टाकुनि मनिचे विकल्प सगळे,
परि न आमुचे चित्त मोहिले,
आम्ही मथुरेच्या.

गोकुळिच्या ह्या खुळचा गोपिका,
"अम्हीच" वदती "खऱ्या भाविका"
वृथा करिति बडिवार तव निका,
आम्ही मथुरेच्या.

साधे भोळे जीव कशाला
उगीच फसविसि तू गोपाळा !
सोडुनि दे ह्या वाम पथाला,
आम्ही मथुरेच्या.

ऐकुनि अमुचे जरि या घडिला,
तुवा त्यागिले ऐशा कृतिला,
मानु अम्ही तरि धन्य स्वताला,
आम्ही मथुरेच्या.

● ●

तोच बन्सिधर गुप्त जहाला,
भिरभिर भिरभिर बघति तयाला;
कथिति पिशापरि ज्याला त्याला,
"अम्ही न मथुरेच्या."

आम्ही गोकुळिच्या
कुणी दाखवा अम्हा कन्हैया
अम्ही न मथुरेच्या.

★ ★

# २५ : देवपणा

[ जतीन्द्राचा आत्मत्याग ]

चाल – सबसे राम

देवासि देवपण आले। जतीन्द्रा ! धन्य धन्य झाले

परवशतेची निशा मेघमय घालित थैमाना
चमकुनि गेली तरुण ज्योति तव वट, पिंपळ असताना

'स्वदेश माझा स्वतंत्र व्हावा' एकचि तुज हा ध्यास
निष्ठेपायी तुवा सोडिलिस प्राणांची ती आस

हिमालयासम बलाढ्य शत्रू तू चिलटावाणी
खळखळ हलला बघुनि तुझ्या परि देशभक्तिचे पाणी

पुराणग्रंथा, इतिहासा जो सुप्तपणा येई
तुझ्यामिषे नव रूपि तयांचे जिवंतपण जग पाही

अस्थीपंजर तुझिया देही असा थोर आत्मा
वास करित हे कळेल कुठले शत्रू बक, दुष्टात्मा

पावन तनुची राख तुझ्या रे गंगाजलि मिसळे
अमर सुधा ती पिता सन्मने जतीन्द्र भारत सगळे

हिंद-कंठिचा मणी निखळिता होइ नभी तारा
निशी बघाया दिव्य भक्तिच्या कुठे वाजती तारा

दिव्यात्म्या ! तू करिसी अपुल्या सोने जीवाचे
परंतु अजुनी भारत-जीवन पारतंत्र्य-नरकाचे

तुझी दिव्यता सूर्यमंडळा भेद करि जेव्हा
'स्वतंत्र झाला भारत अमुचा' क्षणचि भ्रांति ही तेव्हा
भारत–गंगेवरि खळबळला तरंग उठलेला
तोचि संथ जलप्रवाह चाले पुन्हा दुज्या घटकेला
परंतु घटना काय खळबळे पोटि भारताच्या
कोण कथी, परमेशचि जाणे लीला परमेशाच्या

★ ★

## २६ : वेडी राधा

चाल – चन्द्र आला वरी

चन्द्र येई शिरी । सरलि रे शर्वरी.

बोलू किती बोल ? सारेच का फोल ?
जीवा ! मना खोल । अजुनी तरी.

प्रत्येक बोला । माझ्या कृपाला !
अणिसी स्मिताला । अधरावरी.

रोखोनि नयनां । काही कळेना
बघतोसि वदना । वरचेवरी.

हरि ! मन्मुखी या । त्वप्रेम–छाया
विधु दावि राया । अपुल्या करी.

तव रम्य चित्ती । जी प्रेम-मूर्ति
म्या पूजिली ती । हृन्मंदिरी.

इन्दू नभी या । तशि प्रेम-छाया
बघ सर्व ठाया । जगतांतरी.

तमि कृष्ण दोघे । जोत्स्नेत दोघे
एकात दोघे । एकापरी.

तू प्रेम- कांति । मी प्रेम-शांति
जणु प्रेम-मूर्ति । सुखसागरी.

हृद्‌बंध सोडी । हृदयास जोडी
'मी-तू' स तोडी । वेडे करी.

★ ★

# २७ : फुलमाळीण

हा येई कशाला । हरि याच काला
कोणी तयाला । पाचारिले

काळ नाही वेळ नाही
जाइ अपुला तो कुठेही

त्या नाही जनाची । नाही मनाची
लज्जा कशाची । करी बळे

उचलि वेणू लावि अधरी
स्वैर फेकी गीत-लहरी

स्मृति राहू न देई । कैशी कुणाही
जगतास मोही । इच्छाबले

कसलि वार्ता कुठुनि आणी
कळत नाही काहि अजुनी
कुणि काही करावे । ते याज ठावे
समजोनि घ्यावे । मनि आपुले

हृदयि नुसता भाव अणिता
तोचि घेई ठाव परता
परि समजू न देई । कृति मात्र दावी
निज लोकि म्हणवी । उलटे भले

सहजि दिसतो वाट चाले
'जाणता हा' कोण बोले
नच येईल येथे । राहील तेथे
भुलवील गीते । मन हे खुळे

याच घडिला भेटण्याचा
हेतु नव्हता मानसीचा
जे कधिही न येई । ते याच समयी
दारात बाई । पद ठाकले

हार अपुरा राहि अपुरा
कोठला तो संपणारा
मग म्हणवीत अमुचा । तो श्याम कैचा
न तरी सुखाचा । ठेवा खुले

ये कशाला कोण जाणे
थांबले की हार होणे
ही एका फुलाची । फुलमाळ साची
फुळमाळिणीची । शोभा खुले !

★ ★

# २८ : जाणीव

चाल – तुझी अन्यथा ती

अशा घोर रात्रीस जाशी कुठे
नसे चंद्र, तारा नभी मेघ ते

तुला मार्ग दावावया या क्षणी
तुझी दृष्टि तूझीच हो वैरिणी

तुवा ऐकिली वेणु आतावरी
दिनी ऐक वेडे ! मनीषा जरी

तया घेउ दे काहि गे विश्रमा
वृथा देशि का त्या अवेळी श्रमा

तुला ऐकणे हेचि गे जाउनी
परी कष्ट होती किती गायनी

तुझे सौख्य गोविंद पाही जसे
नको वागणे का तुलाही तसे

★ ★

स्मृति राहू न देई । कैशी कुणाही
जगतास मोही । इच्छाबले

कसलि वार्ता कुठुनि आणी
कळत नाही काहि अजुनी
कुणि काही करावे । ते याज ठावे
समजोनि घ्यावे । मनि आपुले

हृदयि नुसता भाव अणिता
तोचि घेई ठाव परता
परि समजू न देई । कृति मात्र दावी
निज लोकि म्हणवी । उलटे भले

सहजि दिसतो वाट चाले
'जाणता हा' कोण बोले
नच येईल येथे । राहील तेथे
भुलवील गीते । मन हे खुळे

याच घडिला भेटण्याचा
हेतु नव्हता मानसीचा
जे कधिही न येई । ते याच समयी
दारात बाई । पद ठाकले

हार अपुरा राहि अपुरा
कोठला तो संपणारा
मग म्हणवीत अमुचा । तो श्याम कैचा
न तरी सुखाचा । ठेवा खुले

ये कशाला कोण जाणे
थांबले की हार होणे
ही एका फुलाची । फुलमाळ साची
फुळमाळिणीची । शोभा खुले !

★ ★

# २८ : जाणीव

चाल – तुझी अन्यथा ती

अशा घोर रात्रीस जाशी कुठे
नसे चंद्र, तारा नभी मेघ ते

तुला मार्ग दावावया या क्षणी
तुझी दृष्टि तूझीच हो वैरिणी

तुवा ऐकिली वेणु आतावरी
दिनी ऐक वेडे ! मनीषा जरी

तया घेउ दे काहि गे विश्रमा
वृथा देशि का त्या अवेळी श्रमा

तुला ऐकणे हेचि गे जाउनी
परी कष्ट होती किती गायनी

तुझे सौख्य गोविंद पाही जसे
नको वागणे का तुलाही तसे

★ ★

# २९ : प्रवीण

प्रवीण तो या जनी
खरोखर । प्रवीण तो या जनी
समरस होई जगताच्या जो
सुखदु:खी जीवनी
सखोखर । प्रवीण तो या जनी

विश्वाला ह्या खल तिमिराने
ग्रासियलेले बघता नयने
विसरुनि अपुले लांछन सु-मने
शशि येई धावुनी
खरोखर । प्रवीण तो या जनी

ग्रीष्मरवीच्या चंड करांनी
त्रस्त होतसे सारी अवनी
शांतवि तिजला अंत:करणी
मेघ जिवा वेचुनी
खरोखर । प्रवीण तो या जनी

वसंत खुलला गंध बहरला
फलभारांनी तरुगण लवला
भरती आणी त्या मोदाला
पिक गीता गाउनी
खरोखर । प्रवीण तो या जनी

बाल बाल गोपाल भोवती
खेळत असता नाना रीती
थोर जीवही रमे त्यामधी
थोरपणा नेणुनी
खरोखर । प्रवीण तो या जनी

चंचल घडिच्या वातावरणी
बुधजन लोकी जाई भ्रमुनी
भ्रम-पटला त्या टाकि विदारुनि
कवि अपुल्या गायनी
खरोखर । प्रवीण तो या जनी

★ ★

## ३० : जिवाचा ठेवा

चाल – नवजीवन हे

ठेवा जिवाचा भक्ति सुखाचा
ठेवा जिवाचा । नच तुलनेचा
नच तुलनेचा । नच उपमेचा
ठेवा जिवाचा भक्ति सुखाचा

चंडाग्निस शीतलता येई
शीतलता प्रखरतेस घेई

असिधारा ती बोथट होई
        गुण भक्तीचा । राहि सदाचा
        राहि सदाचा । सतेज साचा
ठेवा जिवाचा भक्तिसुखाचा

जन्म भक्तिचा होय केधवा
अंत भक्तिचा होइ केधवा
ते नच वदता येइ केधवा
        विषय भक्तिचा । नच बोलाचा
        नच बोलाचा । बिनमोलाचा
ठेवा जिवाचा भक्तिसुखाचा

भक्ती–जीवन असे चिरंतन
जगदीशापरि तरि इतुकेचि न
वर्धित होई शुक्लेंदूसम
        पार न लागे । त्या भक्तीचा
        त्या भक्तीच्या । अनंततेचा
ठेवा जिवाचा भक्तिसुखाचा

विश्वांतरि मांगल्य खेळते
वृत्ति आसुरी वंचित होते
उज्ज्वल भक्तिच कारण त्याते
        अनुभव हाचि । जगि भक्तीचा
        त्या भक्तीच्या । अपूर्वतेचा
ठेवा जिवाचा भक्तिसुखाचा

नानापरिची जगात भक्ति
जीव आचरी नाना रीती
अणुरेणूमधि वास करी ती
विलास चाले । त्या भक्तीचा
त्या भक्तीचा । मानसतेचा
ठेवा जिवाचा भक्तिसुखाचा

★ ★

## ३१ : ओळख

चाल – लावणी

मूर्ति जयाची उभी अचलतर मानस–नयनापुढे
मग कशास फिरता बघता कोणीकडे
आजवरी दाविला आपुला स्नेह जीव ज्यावरी
का लयास जाई तो ग निमिषांतरी
वेदवचन जणु बोल जयाचे साठविले अंतरी
विसरलात सगळे इतुक्यातचि का तरी

डोळ्यात भरुनि उरलेला
क्षण दृष्टिआड तो झाला
म्हणुनि का कितु उद्भवला

लोचनि भरला मनात ठसला सर्वंकश जाहला
का असाच तुमचा भाव तयावरि खुळा

चुकुनि मुखे अपशब्द बोलता जरि कोणी त्याजला
दाविलेत अपुल्या किति ग कोपानला
वळेचि कुणि स्तुतिपाठ तयाचे गाता दिसता मुखे
बेहोष जाहला क्षणात कितिदा सुखे
यदा पहावे तदा निशिदिनी गुण त्याचे स्मरतसा
त्याविणे न जणु की प्रिय दुसरे मानसा

'तद्गुणास वाणी गाया
तद्रूपा नयन बघाया
तत्कीर्ति श्रवण ऐकाया'

पोटि एक ओठांवरि दुसरे कुठवरि चाले असे
हा स्फोट तयाचा कधी तरी होतसे

अंध्र नसुनि जो अंधपणा ये तुमच्या ग दृष्टिला
तो पार घालवी सूर्य जसा रजनिला
आकुंचित हृदयासी केले विशाल गगनापरी
त्या ठायि धरेची उदारता रुजविली
कोण तुम्हाला जगी विचारी काय मूळ थोरता
वसविले ग तुमच्या अमरपदी जीविता

निज कार्य करुनि तो जाई
आनंद तयाचा घेई
हृदयाची ओळख देई

स्तुतिनिंदेने थोरवि लघुता मुळि न हरिस येतसे
जो थोर थोर तो सदैव जगता दिसे

★ ★

# ३२ : हा घे चांदोबा

चाल – कशास आलासी

चांदोबा दिधला । बालका ! चांदोबा दिधला
जा घेउनि येई खेळ त्यासवे मनापरी अपुला
आक्रोश मांडिला कितिक तुवा अजवरी
गाळिली आसवे त्यासाठी बहुपरी
अभिषेक तयांचा होइ फणीच्या शिरी
हेतु सफल झाला । बालका ! हेतु सफल झाला
मग अता उशिर का, खेळ जाउनी, गमत्‌ नको घडिला

स्थब्ध कसा बससी । बालका ! स्थब्ध कसा बससी
हा स्वभाव नोहे तुझ्या वयाचा, नवल गमे मजसी
ज्यासाठी पळभर झोप न येई तुला
नच घेउ दिला त्वा श्वास नीट रे मला
विश्वातिल कणकण करुणेने हलविला
विजयी परि होसी । बालका ! विजयी परि होसी
हा उगा राहुनी विचार कसला करिसि स्वमनाशी

वरती बघ नयनी । बालका ! वरती बघ नयनी
तो तुझा चंद्रमा खेळत राही नील नभामधुनी
मेघास पांघरी शीत पवन म्हणुनिया
होताच उष्णता फेकुनि झणि दे तया
थांबतो, धावतो दुडदुड न धरी भया

थोर भाग्य म्हणुनी । बालका! थोर भाग्य म्हणुनी
हा दिव्य मनोरम खेळगडी तुज लाभे या जननी

स्वागतास तुझिया । बालका ! स्वागतास तुझिया
करि हार हिऱ्यांचा चन्द्र गुंफि तव कंठी घालाया
या नभःपटावरि इतस्तता विखुरती
हे खडे त्यातुनी अमोल जे वाटती
वेचुनी घेतसे साधु मने त्याप्रती
तूही दावि तया । बालका ! तूही दावि तया
ओवुनी येथल्या माळ फुलांची, उदारशा हृदया

टकमक रे बघसी । बालका! टकमक रे बघसी
वद काय एवढे गूढ पडे जे उकलेना तुजसी
सामोर तुझ्या रे चंद्र हसुनि राहिला
तू इथुनि पहासी डोळाभर त्याजला
मम पूर्ण अनुज्ञा भेटायाची तुला
पसरी स्वकरांसी । बालका ! पसरी स्वकरांसी
करि सहस्रशा निज आलिंगन तुज देइल जाण शशी

विचार करि अपुला । बालका! विचार करि अपुला
तो पहा चंद्रमा माथ्यावरुनी पश्चिमेस झुकला
आवेश तुझा पण सकल पळाला कुठे
उत्सुकता मनिची सांग हरपली कुठे
रे तुझ्या मुखीचे तेज निमाले कुठे
वाटे काय तुला । बालका ! वाटे काय तुला
इतुक्यातचि तुझिया पालट होई अंतरंगि कसला

३२७८ ३/०५ ९७
५५५२ ३२१८

आधिच की कथिले । बालका ! आधिच की कथिले
नच तुझ्या हिताचे चंद्र खेळणे, नाही ऐकियले
तू अजाण अजुनी विधुशी खेळावया
येउ दे थोरता लोकी तुझिया वया
मग इंदुच तुज का जग ये रिझवावया
स्वता थोर गणिले । बालका ! स्वता थोर गणिले
इतरांचे बघुनी ! –असो, राहु दे, दैव तुझे फळले

करी निश्चयाला । बालका ! करी निश्चयाला
नच समय विचारा, चंद्रबिंब ते ठाके क्षितिजाला
करि मना उल्हसित प्रभातसमयापरी
झळकु दे अग्निची कांती वदनावरी
आवेश रणाचा चढवी रे अंबरी
सोडि संशयाला । बालका ! सोडि संशयाला
ते बिंब चेंडुपरि करी खेळवी याच संधिकाला

★ ★

## ३३ : स्वातंत्र्याचे निशाण –

( १९२९ साली लाहोर येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू यांनी अधिवेशन प्रसंगी ता. २६ डिसेंबर रोजी रात्रौ बारा वाजता अखिल भरतखंडाच्या स्वातंत्र्याचे निशाण फडकविले. त्या निमित्य प्रस्तुत गीत निर्माण झाले. )

स्वातंत्र्याचे निशाण फडके हिन्दभूमिवरती
तियेची फिरली दैवगति

दुमदुमली गर्जनादुंदुभी एक निनादाची
हिंद–स्वातंत्र्य वैभवाची

गाइ मुका चंडोल प्रभाती देई ललकारी
यावया मंगल सहकारी

आनंदा ! ये उसळविण्याते लहरीवर लहरी
सरे तव वसती गिरिकुहरी

स्मिता ! तुझा वनवास संपला धावत ये ये रे
उमलवी कोमल दल सारे

स्मशानवासी हर्षा ! ये ये करिसी उशिर किती
आणि रे महोत्सवा भरती

दुःखाची बंधने सुखा ! रे तटतट तव तुटती
बघाया ये ये निज सिद्धी

भारत–लक्ष्मी ! ये ये झणि ये माते अनुरागे
फिटला बंदिवास तव गे

भारत–शौर्या, अमोघ वीर्या, अगाध धैर्या ! या
या या निर्भय होउनि या

दुर्मुखतेची कात टाकुनी उज्ज्वलते ! ये ये
हिन्द–सौभाग्य बघाया ये

अष्ट दिशांनो ! ध्वजा मंगला ओवाळाया या
रविचंद्र ज्योति उजळुनिया

पृथ्विराज, रणप्रताप, बंदा, शिव, गुरुगोविंद !
सकल या पुरवा निज छंद

जीजामाते, देवि अहिल्ये, रणलक्ष्मी ! या या
या, या आशीर्वच द्याया

ध्वजाभवति या हिन्दसुतांनो ! अवधी मुळि न जरा
तयाचा जयजयकार करा ।

दो शतकांचा नवस पुरे हा भारत–हृदयीचा
क्षण तो खरा धन्यतेचा

करुणेशा ! विनवितो पदाब्जी क्षण हा अमर करी
मनीषा याविण नच दुसरी

★ ★

# ३४ : 'स्वातंत्र्य-सूर्य नव भारति हा उदेला'

श्लोक

का हा पळे द्रुतगती तम, सोडि शांति
का हे निशाचर असे भयभीत होती
का हिन्द–पद्म हसुनी फुलवी दलाला
स्वातंत्र्य–सूर्य नव भारति हा उदेला

★ ★

# ३५ : भ्रमर-गीत

चाल – वद जाशि कुठे यदुराया

चल, जाउ गडे कुंजवनी इच्छिसी तरी
हरि एकलाच वाजवीत मधुर बांसरी
त्या बासरिची जगति अशी काय मोहिनी
जे आर्त मने तू पुससी मजसि निशिदिनी
तो किंतु तुझा जाइल गे सकल निवटुनी
त्या हाच समय, नच दुसरा, चल त्वरा करी

प्रति नादलहरि एक एक फूल फुलविते
जणु आकुंचित हृदयासी सहज उघडिते
की चंद्र-किरणि तिमिर-वदन काय उजळिते
पुरतील हेतु बघुनि तिथे मौज ही खरी

त्या फुललेल्या हृदयामधि नाद साठती
जणु मृदुलासनि रेणुमिषे काय खेळती
तो स्वाद गोड सेविण्यास मधुप धावती
मग तेच वेणु-गीत स्फुरुनि गाति सुस्वरी

तव वदनकमलि तेच भृंग पाहि बैसुनी
तुज तेच गीत ऐकविती मधुरशा स्वनी
म्हणुनीच तुला वेणु-महति वाटते मनी
का अडखळसी, पद उचली, काय अंतरी

हे भ्रमर-गीत ऐकुनिया सकळ गवळिणी
केव्हाच् तिथे हरि-भवती मिळति मोहुनी
तू अजुनि इथे संशयात असिस गुंतुनी-
-पण जवळि तुझ्या हरिच उभा! धन्य माधुरी!

★ ★

# ३६ : अद्भुत रण-संग्राम

( महात्मा गांधी मिठाच्या सत्याग्रहास दांडीस जावयास बुधवार ता. १२-३-१९३० रोजी निघाले. त्यावेळी त्यांच्या गमनप्रसंगी साबरमती-आश्रमाच्या दाराशी जे दृश्य दिसून आले त्याला अनुलक्षून सदर गीत लिहिले गेले. )

चाल - पोवाडा

हा प्राण हिन्दभूमीचा
जयघोष स्वातंत्र्याचा
मुखि करित चालला साचा
स्वातंत्र्य-दुर्ग घ्यावया
मुक्त व्हावया
बंधनामधुनी
जो गळा फास चहुकडुनी

जणु सुदाम-यष्टी ज्याची
परि मूर्ति भानु-तेजाची

तशि पूर्णचंद्र-शांतीची
शोभतो हिन्द-राउळी
कृष्ण गोकुळी
श्यामवर्णाचा
हा पुतळा स्वातंत्र्याचा

स्वातंत्र्य-समर जे झाले
आजवरी की घडलेले
इतिहास-पुराणी लिहिले
खड्गांचा खणखणाट
वाहती पाट
तप्त रुधिराचे
पण रण हे बहु नवलाचे

कौटिल्य रोमरोमात
शस्त्रास्त्रे तीक्ष्ण अनंत
करि सत्ता दृढ, बलवंत
हा असा शत्रु सामोर
तसा चौफेर
सागरावाणी
हा तेथे टिटवीवाणी

स्वार्थाग्रणि जगती तेवी
तामसी वृत्ति निर्दयी
पत्थरही लाजे हृदयी
रिपु मदांध पुढती असा
पाहिना कसा

पापपुण्याते
हा फकीर केवळ तेथें

ह्या शत्रु–राहुच्या पाशी
सापडुनी भारत–शशी
सर्वथा दीन, परवशी
जो पूर्वी लक्ष्मीधर
अस्थिपंजर
आजला उरला
बघवे न तया हे डोळा

कसले न शस्त्र त्याजवळी
दुर्मती न ठावे मुळी
समभाव चित्तमंडळी
आत्म्याचे बल एकले
हृदयि पूजिले
वर्धिले ज्यास
सत्याची धरुनी कास

दीनांचा जो सेवक
धर्माला जो धारक
जो पारतंत्र्य–भंजक
तो आत्म–बला घेउनी
निघाला रणी
धैर्य मेरूचे
मुखि हास्य बालसूर्याचे

वट विशाल एकीकडे
तृण दुर्बल दुसरीकडे
रिपु असले दोहीकडे
क्रोधाग्नि एक वर्षतो
दुजा फेंकितो
प्रेम-लहरीस
जणु मृदुल सुमन मानस

नृप गाधिजाची राजता
ऋषि वशिष्ठाची सत्वता
मधि कामधेनु भूमाता
ही कथा पुराणी किती
तीच भारती
दिसे अजि जगता
जय कुणा ?–काल ठरविता

'पारतंत्र्य–नरकामधुन
निज राष्ट्रा मुक्त करीन
नातरी मृत्यु कवळीन'
ही अमर प्रतिज्ञा करुनि
जाइ तो रणी
घेइ शेवटचे
दर्शन निज प्रिय कुटिराचे

ठाकली द्वारि रणमूर्ति
तिथे भारत–भागीरथी

द्यावया निरोपाप्रति
    सारखा चालुनी गजर
    घुमवि अंबर
लोकगंगेचा
साधूचा, स्वातंत्र्याचा

कुणि फुले शिरीं उधळिती
कुणि प्रेमे आलिंगिती
कुणि पदांबुजा वंदिती
    कुणि ललना ओवाळिती
    तिलक लाविती
कुंकुमी भाली
जो सुभग, सुमंगल काली

हो दुभंग जन–सागर
पथ धरी धीर गंभीर
अनुचरांसवे तो वीर
    तों दुःख सुखाच्या लहरि
    उठुनि सागरी
भेटती गगना
हालविले साऱ्या भुवना

हृदयीच्या आनंदाची
प्रेमाची, भक्तिरसाची
नयनि हो गर्दि अश्रूंची
    जलधारा ज्या वर्षती
    तयांची सती '–

निकटिची सरिता[1]
वाटले तेधवा चित्ता

इतुक्यात रवी उगवला
तोच ये दृश्य हे डोळा
आश्चर्य वाटले त्याला
    शतकानुशतक जाहले
    नाहि देखिले
अशा चित्राला
जो अवर्ण्य सुख–सोहळा

मथुरेस गोकुळामधुनी
अक्रुरासवे व्रजगुणी
मर्दिण्या निघे खलमणी
    तदुपरी दृश्य हृदयिचे
    पाहि भुवनिचे
आजचे असले
म्हणुनि त्या नवल वाटले

सन्मने हर्ष पावुनी
करछत्र शुभद निज तरणी
त्या भक्तशिरावरि धरूनी
    'हा अद्‌भुत रण–संग्राम
    होवु सुख–धाम

[1] सती, सरिता=साबरमती नदी

हिन्द–भाग्याचे !'
दे आशीर्वच द्विज–वाचे

★ ★

## ३७ : ते विसर !

भैरवी – दादरा

दाखविसी भय कोणा
ते विसर अता मरणा !

भारतिचे चैतन्य जोवरी
निद्रित राही शांत अजवरी
दिमाख चाले तुझा तोवरीं
ते विसर अता मरणा !

पूर्वेच्या ह्या क्षितिजावरते
चंडरवीसम काय विहरते
बघ रे अथवा न बघे मुळि ते
ते विसर अता मरणा !

चिता पेटवुनि तुझी स्मशानी
नव भारत–चैतन्य–दिनमणी
कण कण निर्भय करि निज किरणी
ते विसर अता मरणा !

★ ★

# ३८ : मनाची हाव

चाल – अभंग

कोण समोरून । येई मजकडे
घेई मज कडे । ये ये आई

त्याचे खांद्यावरी । पताक शोभते
देऊळावरते । जैशी आई

'हिंददेश माझा' । प्रेमाने म्हणतो
त्याची गाणी गातो । किती आई

करितो गर्जना । केवढी मुखाने
सकल दणाणे । घर आई

पांढरा पोषाख । साऱ्या अंगावरी
फिरे दिनभरी । ऐसा आई

जावे त्याच्यासवे । गाणे गोड गावे
देशासी भजावे । वाटे आई

मुखावरी शांति । अंतरी चैतन्य
कोण हा अनन्य । सांगे आई

★ ★

# ३९ : आजचे गाणे

( माझा एक इतिहासज्ञ रसिक स्नेही इतिहासातील काही रोमहर्षण प्रसंगावर कविता लिहिण्याविषयी मला नेहमी सांगत असतो. त्या निमित्ताने हे गीत निर्माण झाले आहे. )

चाल – उद्धवा शातवन

इतिहास आजचा घडता । का तुझ्या दिसेना डोळां
कोणत्या युगी वावरते । तव जीवन–आशाबाला
हरघडी नासिका घेई । कोणच्या स्थिति श्वसनाला

तव दिसते उघडी दृष्टि
अनुभविसी, बघसी सृष्टि
विसरिसी कशा ह्या गोष्टी

कालच्या कल्पनी रमसी । का विमुख आजच्या दृश्यी

निज उदारशा दृष्टीने । चौफेर भारता पाही
कालच्याहुनी या घडिला । नच उणे गमे तुज काही
इतुकेच न दिव्यपणाचे । वैशिष्टय आजला राही

कालचा काल दडलेला
आजचा पुढति असलेला
जो देई जन्म उद्याला

तिमिरात सत्य निरखीसी । दिनि मात्र अंधपण घेसी

कालच्या विक्रमी स्फूर्ति । वाटते जशी हृदयाला
कालचे शौर्य आनंद- । देतसे जसा हृदयाला
कालच्या वीर्यधनि हर्ष- । होतसे जसा हृदयाला
तैसेचि आजचे बघुनी
काहि न का वाटे स्वमनी
जे दिव्य गाजले भुवनी
संभ्रमी चित्त मम गुंग । उभयात कोण निस्संग

गतकालजवनिकेवरती । कसलाहि कालपट दावी
परवशता जी या घडिला । कळसावरि नाचत राही
भंगले खड्गही जवळी । ठेवणे पाप जिथ होई
भांडार रिते धनिकांचे
कवडी न मोल प्राणांचे
दे दर्शन ह्या चित्राचे
हा करुण काळ चित्राया । दुर्बला लेखणी राया !

प्रतिभेची माती झाली । पौरुषता विलया गेली
बुद्धीची दीप्ती झडली । कांतीची रक्षा उरली
शीलाची छाया विरली । हृदयीची माया हरली
चालता बोलता हिंद
निर्जीव जणू मृत्पिंड
परसत्ता-ब्रम्हानंद
हे ध्यानी आणुनि पाही । भारती आजची घडि ही

या असल्या पामरयोगी । छातीचा कोट करोनी
सामर्थ्यपूर्ण सत्तेशी । हा हिन्द राहि झुंजोनी
स्वातंत्र्य-लाभ लाभाया । प्राणांची करि कुरबानी

नारी नर बाळे नामी
जी स्वतंत्र हिंद–प्रेमी
या "अद्‌भुत रण–संग्रामी"
आश्चर्य जगाचे होई । ते तुझ्या दृष्टि नच येई

कालची स्थिती जगताची । आजला निराळी सारी
कालची गडा–खड्गांची । आजला न गर्दी भारी
कालच्या रित्या आकाशी । आजला यान संचारी
कालच्या फितूरीवीणे
आजच्या इतर जगताने
बदलिला वेष युगमाने
गुणलोप म्हणुनि का तेणे । होतसे अमर जे लेणे

इतिहास स्वातंत्र्याचा । कालचा जगी घडलेला
कालच्या कवींनी कथिला । काढुनी सार सत्याला
तत्स्वरूप प्रकटुनि आजी । मोहियले निखिल जगाला
मग पारतंत्र्य–हननाचे
अजि कार्य घडे कालाचे
ते गीत आजच्या कविचे
त्यावीण उद्या जगतासी । कळणार कथा ही कैशी

कालचा एक 'विश्वास' । आजही त्यापरी कितिक
कालची एक ती 'कृष्णा' । आजलाहि असति अनेक
कालचे 'बाजि' 'तानाजी' । आजही तया नच गणिक
युगजनक 'श्री शिवराज'
तुज दिसेल तोही आज
उभयांचे एकचि काज

करि विशाल दृष्टी काही । अनुभवि ये ठायी ठायी

स्वातंत्र्य हेचि सुखधाम । स्वातंत्र्य हाचि आराम
स्वातंत्र्य हेचि मांगल्य । स्वातंत्र्य हेचि प्रभुमूल्य
स्वातंत्र्य हाचि गोविंद । स्वातंत्र्य सच्चिदानंद
जो स्वातंत्र्या अनुभवितो
जो स्वातंत्र्या मिळवितो
जो स्वातंत्र्यास्तव झटतो
पोवाडे त्यांचे गाणे । भाट खरा हेची जाणे

★ ★

## ४० : बालपण

चाल – भूपती खरे तें

दुबळेपण सारे बाळपणी बाळांचे
बोलती जाणते सदैव ऐसे वाचे

आइच्या कडेवरि खांद्यावरती बसणे
पदि चालु लागता हात पित्याचा धरणे
अंधारी जाता, बघता सहजी भीणे
कुणि बागुलबोवा दिसता भिउनी पळणे
खाऊस कुणीही देता हर्षित होणे
कुणि वळे कोपता हसता हसता रडणे

अपुलीच सावुलीस हाति पायि तुडवीणे
कसल्या तरि नादे हट्ट रिकामा घेणे
उपहास असा हा निशिदिन होय मुलांचा
पण विसर पडे त्या शिशुपणिच्या शौर्याचा
जन्मताच् गिळिले बालसूर्यबिंबाला
तो कोण वायुसुत वृद्ध, तरुण की बोला

★ ★

## ४१ : प्रभाती

चाल – आनंद कंद एसा

आम्ही स्वतंत्र व्हावे । इतुकेचि एक ठावे
ठावे नसो मुळीही
त्यावीण अन्य काही
स्वातंत्र्य खेळवावे । इतुकेचि एक ठावे
असणे स्वतंत्र लोकी
जगणे स्वतंत्र लोकी
जगतात धन्य व्हावे । इतुकेचि एक ठावे
अज्ञान रात्र राहो
खग्रास सूर्य होवो
स्वातंत्र्यि चित्त न्हावे । इतुकेचि एक ठावे

स्वातंत्र्यि दुःख लाहो
स्वातंत्र्यि मृत्यु येवो
स्वातंत्र्य–तेज ल्यावे । इतुकेचि एक ठावे

स्वातंत्र्य, सृष्टि बघता
स्वातंत्र्य, झोंप घेता
स्वातंत्र्य–दुग्ध प्यावे । इतुकेचि एक ठावे

प्रतिबंध–बंध तुटला
भासे घडीघडीला
स्वातंत्र्य–प्रेम व्हावे । इतुकेचि एक ठावे

स्वातंत्र्य–प्रेम द्यावे
स्वातंत्र्य–प्रेम घ्यावे
स्वातंत्र्य ते लुटावे । इतुकेचि एक ठावे

हिन्द स्वतंत्र झाला
परतंत्र हिन्द मेला
स्वप्नातही बघावे । इतुकेचि एक ठावे

स्वातंत्र्य–जान्हवी ती
प्रकटावया न अवधी
शिरि शंभु घेइ भावें । इतुकेचि एक ठावे

★ ★

# ४२ : मग तोड

फूल जाइचे जाइवरी
राहू देई दिवसभरी
नवीन जाई ही फुलली
एकच कलिका तिज आली
कलिका शोभे जाईला
जाई शोभवि कलिकेला
रवि–प्रकाशी शोभा ही
कुणा बघू दे क्षण काही
मधुर चित्र हे विलोकुनी
खचित हर्ष हो तया मनी
मग अंधाऱ्या रात्रीला
अंधारापरि तोडि फुला
कुणी न तुजला अडवील
तसे न कोणी पाहील
आई प्रेमळ
बालक कोमल
संगम उज्ज्वल
तूहि दाखवी काहि अता
निज हृदयाची उदारता.

* *

# ४३ : पाखरास

चाल – तरुण कुलिन गोरा

इथेचि का गासी पाखरा ! इथेचि का गासी
नेमक्या घडीला येउनि काही गाउनिया जाशी
सहृदयता माझी अनुभविसी कैधवा
रसिकतेस माझ्या काय देखिले तुवा
आढळे अलौकिक गुण मम कसला नवा
नुमजे ते मजसी पाखरा ! नुमजे ते मजसी
पण नवे नवे संगीत गाउनी मन्मन रिझवीसी

अपूर्वता गीती पाखरा ! अपूर्वता गीती
जी प्रत्ययास ये काहि कळेना कुठुनी लाभे ती
ऐकिले पाहिले गीत न उच्चारिसी
निज गीति कुणाचे साम्य न मुळि दाविसी
की गीत दुजाचे अपुले नच बोलिसी
प्रभु दे जी स्फूर्ति पाखरा ! प्रभु दे जी स्फूर्ति
त्यापरी हृदयिचे तुझे निरंतर गीत-छंद नटती

न कळे मज काही पाखरा ! न कळे मज काही
पण तुझे हृदय-संगीत चालता देहभान जाई
गतकाल चित्रपट रम्यपणे रेखिसी
चालत्या क्षणाला पुढति उभे ठेविसी
तशि भविष्यावरी खेळविसी दृष्टिसी

भासे त्या समयी पाखरा ! भासे त्या समयी
की स्वैरपणे हे त्या त्या काली जीवन अवगाही

नवल गमे चित्ती पाखरा ! नवल गमे चित्ती
का रसिकहीन तुज म्हणुनी कोणी हळूच कुजबुजती
विसरुनी कलंका चंद्रिकेस वानिले
मधु पुष्प सुगंधा कधीहि नच रोधिले
निज राजपथा त्वां चुकुनि न की त्यागिले
म्हणुनिच या जगती पाखरा ! म्हणुनिच या जगती
नच तुझ्या भवति कुणि राघू मैना, कटु वच तुज वदती

परि तव मुखकमली पाखरा ! परि तव मुखकमली
नच चिन्ह तयाचे लेश दिसुनि ये, शान्ति सर्व काली
आनंद वितरिसी उज्ज्वल माझ्या मना
आनंद भोगिसी वेचुनिया गुणकणा
आनंदि रमविसी स्वयंवृत्ति कल्पना
बोल, मती शिणली पाखरा ! बोल, मती शिणली
हा अखंड संचय आनंदाचा कुठला तुजजवळी

★ ★

# ४४ : गोप–बाला

तू जाई रे येथुनी
अता असू दे मजसि एकले
विनवितसे तुजलागुनी

वाजविलेसी त्वा मुरलीसी
हर्षे पुलकित करिसी मजसी
अता कशाला येथे बससी
नसे विफलता जीवनी

मधुर फुलांचा हार गुंफिला
प्रेमे तुझिया कंठि घातला
प्रमोद होई तव हृदयाला
दाखविसी ते ह्रासुनी

येशी येथे मज भेटाया
मीही भेटे तुज यदुराया !
भेट शांतवी उत्सुक हृदया
शांतपणा ये लोकनी

बोल बोलिलो कितिक अतावरि
बोलचि सरती सारे अंतरि
अपाप मिटती ओठ मुक्यापरि
वदता वदता या क्षणी

हृद्गत माझे तुजसी कळले
तुझेहि मजला कळुनि आले
दुजे न काही मनिचे उरले
दावि मुग्धता बोलुनी

एकतार दृष्टिने सर्वथा
परस्परा बघतसो उभयता
दृष्टिस ये परि आकुंचितता
काय दिसे ह्या लक्षणी

मार्ग तुझा रे स्व-लोकरंजन
स्वधर्म माझा माधव-चिंतन
होय तयाला अवधि अकारण
रमू आपुल्या कारणी

● ●

श्लोक

ब्रम्हांदि दुर्लभ अशा प्रिय माधवाला
जा, जा म्हणोनि विनवी मुखि गोप-बाला
तच्चिंतनीच रमवी निज मानसाते
हा स्नेह काय नकळे, तिजला कळे ते !

★ ★

# ४५ : परीक्षेचा कागद

स्वातंत्र्य-देवता ही
ठाकली समरि समर पाही
देवता ही

भक्तीत भक्तराज
चढवितो कोण भक्ति-साज
भक्तराज

सत्प्रेमहृदयतेला
वाहितो कोण तत्पदाला
हृदयतेला

अभिषेक शिरावरती
करि कोण तप्त रुधिर-पात्री
शिरावरती

ललाटि तिलक साचा
लावितो कोण निज सुखाचा
तिलक साचा

कंठात कोण विमला
घालितो जीवपुष्पमाला
कोण विमला

निश्चित कोण पुढती
उजळितो पंचप्राणज्योति
                    कोण पुढती

सर्वस्व होम करुनी
नैवेद्य अर्पि कोण हसुनी
                    होम करुनी

परदास्य–शृंखलेला
तोडण्या कोण सज्ज झाला
                    शृंखलेला

शत्रूस दंडुनीया
करि कीर्ति अमर कोण जगि या
                    दंडुनीया

रक्षील अभयतेनी
छातिचा कोण कोट करुनी
                    अभयतेनी

ही आज परीक्षा ती
बोलवी कोण खरा जगतीं
                    परीक्षा ती

स्वातंत्र्य–विजय–हार
घालुनी मिरवि कोण वीर
                    विजय–हार

निष्काम कर्मयोगी
कोण ह्या वैभवास भोगी
                    कर्मयोगी

★ ★

# ४६ स्वतंत्र ऐसे व्हावे

चाल – सबसे राम भजन

स्वातंत्र्य-भक्ति-प्रेमाने । व्यापी भरतखंड सारे
काहि रुचेना काहि सुचेना काहि दिसेना कोणा
स्वातंत्र्याची एकच मूर्ति वेडे करि सकलांना
त्या वेडाने तिज वश करणे हिंद धरी छंद
त्याविण नेणे काहिच दुसरे तीच मनाला धुंद
त्या धुंदीने विलास भोगा तेवि बंदिशाला
समान सारे मनास वाटे ध्यास एक हृदयाला
त्या ध्यासामधि शिरि घन वर्षे अनंत कष्टांचा
सुमन वृष्टिसम तया झेलता मुखि जप स्वातंत्र्याचा
तो जप जपता फासावरि अरि चढवि दुःस्वभावे
चढता चढता बोल बोलतो, 'स्वतंत्र ऐसे व्हावे' !

★ ★

# ४७ : संयोगिता

चाल – लिहू कविता कोणती

काळ कसला । वेळ कसला
काहि नकळे गे तुला

कुंजवनी हरि तिष्ठत बैसे
साज न तव सरला । अजुनी
वेणु न वाजवि तुजविण माधव
गीत सुचे तुजला । ऐसे

तसेच असती मुखी धूलिकण
विषाद नच हरिला । त्याचा
फिरफिरुनी तू दर्पणि बघसी
रूपसंपदेला । अपुल्या

एकच हरिने गळा घातली
वैजयंतिमाला । नुसती
रिती न जागा चढविसी
नव्या भूपणाला । अजुनी

सहज ठेविले श्रवणि चिमुकल्या
आम्रमंजिरीला । हरिने
कचागणिक तव वेणित पुष्पे
दिसती नयनाला । सजणे

हरिवदनी गांभीर्य–माधुरी
खेळतसे खेळा । सुखदा
ओठी गाली तुझ्या ललितशा
तरंगती लीला । किती गे

हरि–मानसि परि शांति उपजवी
अवधि तुझा असला । सुभगे
त्याचपरीने तुझ्या ठायिची
दावी स्थिति अचला । रुचिरे

शशांक नभि ये तदा श्रीहरी
कुंजवनी आला । प्रेमे
अरुणागमनी सरेल तरि का
तुझा गडे ! चाळा । असला

जोत्स्नेचे मधु हास्य पसरले
हसवाया हरिला । सु-मने
हरि हसल्यावर उचलशील का
येथुनि चरणाला । अपुल्या

फुले उमलली कुंजामधली
सुगंध दरवळला । अवघा
सुगंध विरता भेटिसि का गे
तुझ्या माधवाला । मधुरे

★ ★

# ४८ : तृणाची प्रार्थना

तुझी अशी परात्परा ! अमरता नको मला
तृण अनाथ विनवितो जोडुनी करां तुला

निखिल जगत निंदिते
पदि सदैव तुडविते
काय जन्म हा भला । अमरता नको मला

मुळि न काहि आसरा
कुणि सखा नसे खरा
जीव राहि एकला । काय जन्म हा भला

भानु–किरण जाळिती
चन्द्र–किरण रडविती
ते विचारि अश्रुला । जीव राहि एकला

मेघ वर्षतो शिरी
ताडितो परोपरी
सांगु काय त्याजला । ते विचारि अश्रुला

दंति तृण धरी कुणी
जग तयास अवगणी
हा कलंक लाभला । सांगु काय त्याजला

झोपण्या वसुंधरा
ओढितो दिगंबरा
जवळि कुणि न ये भला । हा कलंक लाभला

पवन चुकुनि भेटतो
झणिच निघुनि जाइ तो
हेचि दिवसरात्रिला । जवळि कुणि न ये भला

जगवि जीव मजवरी
तुडवि मजचि पशु जरी
न्याय काय जाहला । हेचि दिवसरात्रिला

सुख न लेश जीवनी
दुःखभार जाचणी
अमर देह भागला । न्याय काय जाहला

अमरपण दिले तुवा
कासया रमाधवा !
कळे न हेतु यातला । अमर देह भागला

भाग्यवंत या जनी
चमकुनी विझे क्षणी
धन्य जनन चंचला । तीच अमर मंगला

★ ★

# ४९ : लक्ष्मीपूजन

भीमपलास – झंपा

विश्वमंगल सुधा । सिंचितो चंद्रमा
करुनि अभिषेक जणु । पूजि ललिता रमा

हरितपट नेसुनी
मधुर कुसुमाभरणि
शरद–सिंहासनी
शोभते जी क्षमा

भाव निज मानसी
कोणता धरि शशी
म्हणुनि रति तिजविशी
दावि ही उत्तमा

इन्दु गगनी वसे
भूतली क्षिति असे
एकमेका नसे
मुळि कुणाची तमा

कोण सु-मने परी
प्रेम, कौतुक न करि
वसत ज्या अंतरी
थोरता निरुपमा

★ ★

# ५० : फुला, हास रे

भैरवी – केहरवा

हास फुला रे हास फुला
भीसि कशाला । जगी कुणाला
विचार कसला । हसावयाला
सोडुनि देई संदेहाला

हास फुला रे हास फुला
अहित कुणाचे मुळि न इच्छिता
मोदभरे हसवावे चित्ता
हसू रुसू दे खुशाल जगता
नको कशाची खंत मनाला
सोडूनि देई संदेहाला

हास फुला रे हास फुला
वय सरले तव मुग्धपणाचे
प्राप्त जहाले हसावयाचे
उचितचि हसणे गोड वयाचे
लोकि अडविता कोण तयाला
सोडुनि देई संदेहाला

हास फुला रे हास फुला
निसर्ग बोले त्वा हासावे
तुझी मनीषा त्वा हासावे
काळाहि खुणवित त्वा हासावे

हसशिल तूही या निमिषाला
सोडुनि देई संदेहाला

हास फुला रे हास फुला
दुर्गंधीच्या वातावरणी
जर्जर होती जीव क्षणोक्षणि
जिवंत असुनी मेल्यावाणी
तरी उधळि रे हास्यसुधेला
सोडुनि देई संदेहाला

हास फुला रे हास फुला
जी जी पुष्पे आधिच हसती
ती या घडिला मलूल होती
नव सामर्थ्ये तयात नसती
हसता दिसती मात्र जगाला
सोडुनि देई संदेहाला

हास फुला रे पास फुला
मदोन्मत्त दुर्गंध मानसी
कृतांत मानी तव हसण्यासी
तृणवत् लेखी जरि इतरासी
हास्य तुझे त्या ने दुर्गतिला
सोडोनि देई संदेहाला

हास फुला रे हास फुला
हसुनि भवतिच्या जिवा हासवी
यातनेतुनी तया सोडवी
तुझ्यावरिच सर्वस्व थोरवी

जीवन तूची आर्त जिवाला
सोडुनि देई संदेहाला

हास फुला रे हास फुला
जिवंत माता तुझी जोवरी
कसलि न चिंता तुजसि तोवरी
चिरंजीव तव हास्य–माधुरी
तूचि तियेचा प्रेम–जिव्हाळा
सोडुनि देई संदेहाला

हास फुला रे हास फुला
अमूर्त परमेशाचे हसणे
जगा दिसे तव हास्यमिषाने
म्हणुनिच सकला लोभसवाणे
वेळ कशाचा तरि हसण्याला
सोडुनि देई संदेहाला

हास फुला रे हास फुला

★ ★

# ५१ : आश्चर्य

वागेसरी – झंपा

अंकी उषेच्या
नव बाल खेळे
　　जणु हिंद–स्फूर्ति निज रूपि डोले

एकेक तारा
नभि लुप्त होई
　　तो भारती या उदयास येई

सौदामिनीची
तज्जीव–ज्योति
　　दिपवोनि जगता जाई अनंती

दिनि पाश तोडी
तम रात्रि झोडी
　　क्रम हा तयाचा सच्चित्त ओढी

दिनि हिंद–तारे
निशि व्योम–तारे
　　त्या तेजि रंगे नव तेज सारे

ही दिव्य लीला
अजि या घडीला
　　आश्चर्य वाटे बघुनी भवाला

★ · ★

# ५२ : तरंग

तरंग उठती जलावरी
तैसे येती मनांतरी
　　एक तरंगे
　　क्षणि तो भंगे
　　दुसरा रंगे
तोही विरुनी जाइ कुठे
तिसरा नाचे क्षणि तेथे

परी कितिकदा विविध किती
तरंग खेळति जलि, चित्ती
　　प्रेमे भेटति
　　कलहा करिती
　　विसरुनि जाती
प्रशांत ठायी तरलपणा
येई, भ्रमवी जला, मना

तरलतेस ये शांतपणा
अनुभव ऐसा येइ कुणा
　　मालिन्याते
　　वारायाते
　　श्रमती बहु ते
तरंग नाना खरोखरी
तदा भासती उपकारी

सुखशैलावरि कुणी चढे
दु:खकंदरी कुणी पडे
कसला समयी
प्रसंग येई
नियम न काही
तरंगमालेची लीला
ठावे सगळी जगताला

परी तरंगे ज्या कोणी
स्फुरवी गीतेची वाणी
तोच जन्मुनी
सार्थ होऊनी
धन्य त्रिभुवनी
त्याविण सारे जगि नुसते
तरंगापरी तरंग ते

★ ★

## ५३ : फुलाचा खेळ

फूले गडे उमलले
कसे छानसे दिसे लोचना
पवने हाले डुले

कळी वेलिवर काल उगवली
आज मजेने हसू लागली
असे गुणाची जरी चिमुकली
अपणाही हसविले

तोडु नये ह्या कुणिच फुलाला
लावु नका कुणि त्या हाताला
असेच पाहू दुरुनि तयाला
मौज तदा आकळे

पाच मुलींचे मंडळ अपुले
फूल परी हे एकचि फुलले
कुणास द्यावे, घ्यावे पहिले
सकलासी मोहिले

हाच खेळ आपुला अताचा
उभे राहुनी पाहायाचा
उगे बैसुनी खेळायाचा
मात्र हसू आगळे

दिनभर आपण खेळत असता
उगिच भांडतो कारण नसता
शेवट होई रडता रडता
मग हसणे कोठले

खेळतो मना रमवायाला
परी होतसे त्रास जिवाला

फुलासवे तरि हसू आजला
मन करुनी मोकळे

● ●

तोच गडबडी पोर सानशी
चटकन् निमिषी तोडि फुलासी
जे रण माजे मग त्या घडिसी
नच कथणे ते भले

★ ★

## ५४ : तो तुझा आहे

कोणी तया म्हणावे
साऱ्यास लाडका तो
त्याच्यासवे न कोणी
गे राहि एकला तो
वाटेल त्या घडीला
दृष्टीस येतसे तो
वाटेल त्या क्षणाला
गे होय नाहिसा तो
वाटेल त्या ठिकाणी
भेटीस भेट दे तो

वाटेल त्या स्थली गे
बैसे, उठे, फिरे तो
वाटेल जे मनाला
ते गीत गातसे तो

वाटेल त्या जिवाच्या
जीवास ओळखी तो
वाटेल त्या कुणाला
वदता न बोलवी तो

वाटेल त्या कुणाला
करि मूक बोलता तो
वाटेल त्या कुणाला
हसुनीच हर्षवी तो

नादी उगीच त्याच्या
दे नाद सोडुनी तो
श्रमशी कशास वाया
तो दूर दूर जातो

तू बैस एक जागी
भेटेल गे तुला तो
सद्भाव मात्र ठेवी
जो प्रेम जागवीतो

निश्चित ऐस राधे !
गोविंद गे तुझा तो

★ ★

# ५५ : जय भारत

'जय भारत' हा माझा मजला
तुझा कोठला, तू नच इथला

माझ्यावरती माझी माया
नसू नये का बोले राया !

बोल लाविसी मजसि कशाला
दे तू अपुल्या परवृत्तीला

तू नच माझा तुझा न मीही
प्राक्तन आणी एके ठायी

असशिल राजा माझा जगती
माझेपण परि तुझ्या न हाती

धनी असिसि तू माझ्या तनुचा
नच चित्ताचा, मीच तयाचा

तुडविल सत्ता मम शरिराला
वदेल परि मन मनिच्या बोला

भारत–जयजयकार गर्जतो
होइ मनाला हर्ष–लाभ तो

माझ्याविण मज न दिसे कोणी
मीच थोर जगि सकलाहूनी

अजवरि माझे मला पारखे
ते लाभे मज माझिया मुखे

'जय जय भारत' या जयनादे
दुमदुमुनी जग सारे कोंदे

जय भारत-सुत मी भूपाला!
ओळख होई माझी मजला

स्वतंत्र भारत स्वतंत्र चित्ती
स्वतंत्र तनुही बघशिल दृष्टी

* *

## ५६ : हिमनंदिनी

चाल — लावणी

आदर्श जगा जन्मुनी । जीवनी
सुभगा हिमनंदिनी

कुंतलापरी तनु घेवोनी
जन्मा येई उदरामधुनी
मुखाजवळि परि सहस्रवदनी
मिरवी जलमोहिनी । प्रयत्ने
सुभगा हिमनंदिनी

जन्मस्थानिच तिने खेळणे
निसर्ग निर्मी दुर्गम धरणे
दूर करी परि विरोध कृतिने
त्रिलोकपथगामिनी । जाहली
सुभगा हिमनंदिनी

नितांत उज्ज्वल मनोज्ञ शुचितम
अखंड चाले प्रवाह निशिदिन
उज्ज्वलीत जनमनोभुवन-तम
अक्षय सौदामिनी । जान्हवी
सुभगा हिमनंदिनी

सुहृद सहचरी पथी भेटती
न मुळी मिळता तद्रूपामधि
निज रूपी घे त्या सकलाप्रति
उदार मधु रूपिणी । खरोखर
सुभगा हिमनंदिनी

खलास करि जी पवित्र, सज्जन
दर्शनमात्रे, दूर निमज्जन
जगदुद्धारक केवळ जीवन
पुण्यमयी पावनी । चिरंतन
सुभगा हिमनंदिनी

* *

# ५७ : स्नेहमीलन

चाल – मन्मानस हंसा

थांब कि रे चन्द्रा ! दयाळा
विनवि तुला ही बाला

जवळ राहिले स्नेह–कुंजवन
स्नेही लीन व्हावयाला

कर धरिता मम प्रफुल्ल दिससी
पण रे। अता विमुखलेला

येथवरी कर धरुनि आणिसी
त्यजिसी । मधेच प्रियतेला

विश्वसुनी तुजवरी सर्वथा
बघ रे । सोडिले गृहाला

जाणिसि तू ही जाइ भेटण्या
अपुल्या । स्नेह–निधानाला

मदन–स्नेह न, स्नेह–निधीहि न
नुसता । जीव घेइ झोला

ओझरता ये श्रवणि वेणु–रव
पण तो । विकल करि जिवाला

३२९८८ २५५२ १२१

स्नेह–बोल बोलेल स्नेह–मुख
नयनी । पाहु कसे त्याला
नसेल महती तुजसि तयाची
परि ती । स्नेह–मानसाला
स्नेह अंध जरि स्नेहालिंगनि
तरि ते । डोळस हृदयाला
कठोर नच तू खरा हृदयिचा
तिमिरा । पाजिसी सुधेला
जगत निंदिते तरि करुणा तव
देई । अमरता तयाला
दोष कसा मग तुजसी द्यावा
मुळि ते । शोभते न शीला
का मग हा विश्वास–भंग रे
नुमजे । काहि या क्षणाला
मम कर तव करि, हृदय स्नेह–करि
ही मी । माझी नच मजला
नयन चरण मम आधिन तुझिया
ठावे । का नच हे तुजला
स्नेह–सखा तू जगती म्हणुनी
तुझिया । घेइ आश्रयाला
मन्मानसिच्या स्नेह–जीवना
तूची । दाविसी पथाला

थांब, थांब रे ! थांब जरासा
न करी । विफल जीविताला
येइल तुज का झोप सुखाची
वद रे । वंचुनी सतीला
स्नेह–मीलनी प्रमोद घेउनि
कथिते । हर्षवी मनाला
हरि–संनिध मन गुंग गुंजनी
परि ही । अचलता पदाला
कृष्ण–पदाला राधाबाला
स्नेहे भेटवी कृपाला !

★ ★

## ५८ : समरझुंझार

( पंडित मोतीलाल नेहरू यांचा स्वर्गवास )

चाल – सबसे राम भजन

स्वातंत्र्य–समर–झुंझारा ! माता धन्य तुझी वीरा
पारतंत्र्य–कर्दमी जियेचा स्वर्ग नरक झाला
तिजसि मुक्त वैकुंठ–पदावरि श्रमसी बसवायाला
वैर्याने रणकुंड पेटवुनि गगनि भेटती ज्वाला
स्त्रीपुत्रांसह सर्वस्वाच्या देशि आहुतीला

इन्द्राचे ऐश्वर्य भोगता लाजविले भूपाला
मायभूमिस्तव लाथ मारिसी परी राजविभवाला

सशस्त्र रिपुशी झुंजविसी रे ! अशस्त्र हिंदाला
बोथट करुनी शस्त्रे सारी नमविसि उन्मत्ताला

फकीर असता फकीर होणे मोल नसे त्याला
अमीर असुनी फकीर होसी, धन्य करिसि जनताला

कल्पनेतली सृष्टि दाविसी जगताच्या डोळ्याला
काय तुझे कौशल्य वानु रे ! भूषविसी हिंदाला

सहचर सारे शत्रु-बंधनी – विपंख तू असलेला
निजजन-रुधिरे भूमि नटवि अरि तरि न चळे अवधानाला

शत्रु-शरी किति विंधियले तव जरठजीर्ण देहाला
हृदय तुझे परि प्रकट जहाले शांत म्हणवि वन्हीला

विजयाच्या त्या दृश्य-कोंदणी तुझिया मूर्तीला
बघता क्षणि-हाय् ! दुर्दैवाने राष्ट्र-घात केला !

भगवंताविण पार्थ तेवि करि काल भारताला
आनंदाच्या ऐन घडीला हर्ष शोक झाला

लोभ सुटे अनिवार वाटते निर्दय खल काला
तुझ्यासारखा अमोल 'मोती' कंठी घालायाला

कधीपासुनी काल घेतसे हिन्द-परीक्षेला
अधिकाधिक परि मिळवि हरघडी दिव्य गुणांची माला

नश्वर जगि तू तरी अमरता दिव्य तुझ्या तेजाला
त्या तेजी बघशील तळपता भारत-वैकुंठाला

एकच गावे, एकच ठावे हिन्द–मानसाला
नव संकीर्तनि म्हणुनी गर्जे हरहर महादेव बोला
बोले, हरहर महादेव बोला

★ ★

## ५९ : प्रेमकला

चाल – दिले नादानको

अशि कशी अचल तू या घडिला
बहु गमे नवल हे बघुनि मला
तुजपुढुनि जाइ गे ! गोविंद
गुणगुणत वेणुवरि मधु छंद
फुलवीत भवतिचा आनंद
मुळि न का तयाचा भास तुला
तुज वीट येइ का श्रीहरिचा
अपराध कोणता गे ! त्याचा
हिरमोड होइ का त्वन्मनिचा
विचलता तुझ्याही प्रेम–बला
जे हरि–प्रेम तुज करि वेडे
जे एक जगाचे प्रिय कोडे
ते वेड हेचि का गे वेडे !
निज जीव वृथा मग वेचियला

जे वेड हृदयिचे वेडच ते
मुळि दुजे न कसले राहि तिथे
जल जलचि ज्यापरी जलि वसते
तरिच घे थोरपण जीव-कला

मग कशास हाती फुलमाळ
तशि वाटि दुधाची स्नेहाळ
उभि तिष्ठत दारी लडिवाळ
तव विचित्र राधे ! प्रेम-कला

★ ★

## ६० : मधुर स्नेह

दिंडी

पौर्णिमेची मधुमास रम्य कांति
तेवि विहरे चौफेर मधुर शांति
कांतिशांतीच्या अंतरंग-ज्योति
अखिल विश्वाला स्वर्गरूप देती

पवन वाहे तेधवा मंद मंद
तया झोल्यावरि नाचतो मरंद
नर्तनी त्या आनंद सगुण लाभे
जागृतीच्या मृदु अधरि चिन्ह शोभे

चिन्ह–दर्शनि त्या होय चित्तशांति
चित्तशांती घे दिव्य रूप कांति
कांति–साम्राज्यी शांतिचा विलास
नवल म्हणुनी जनि कोण दे कुणास

★ ★

## ६१ : चकित चित्त

तुडुंब भरलेले
सरोवर मधुर जले सगळे

सुधाच भूवरिची
थोरवी अखंड ही ज्याची

रक्षक रे इथला
तुझ्यासम पुण्यवंत असला

परंतु या समयी
बघुनि ते चित्त चकित होई

तळाशीच जाई
सरो–जल दिसुनीया येई

उद्याच होणार
गमे की निर्जल कासार

होइल काहि असे
स्वप्नि तरि वाटावे कैसे

कधी तृषित हृदया
मिळेना जलबिन्दुहि प्याया

पशु, श्वापदांसी
निज बळे विन्मुख परतविसी

विहंग जलि कोणी
देखता धाडिसि यमसदनी

जलचर जल पीती
बघुनि किति हळहळसी चित्ती

करांगुली अपुली
तूहि ना कधीच भिजवीली

निष्ठेने जयसी
रक्षिसी रात्रंदिन त्यासी

मग हे केवि घडे
कळेना तुझिया दृष्टिपुढे

★ ★

# ६२ : बाहुली

दिंडी

देइ आई माझिया बाहुलीते
येइ तिजला मंजिरी पाहण्याते
किती तरि म्यां घरभरी शोधियेली
सापडेना मुळि कुठे ठेवियेली

करिसि नच तू काळजी बाहुलीची
बरी घेसी आपुल्या दागिन्यांची
कडी कुलुपामधि ठेविसी तयांस
मात्र माझी बाहुली विसरतेस

नाक, डोळे, जावळे सान सान
गाल, भिवया, पोषाख छान छान
दोन्हि हातांनी झांज वाजवीते
तदा होई किती हर्ष मानसाते

मोल तुजला काय गे ! बाहुलीचे
तुम्हा थोरा कधि न ते कळायाचे
हेतु तुमचा तिज तुच्छ लेखण्याचा
प्राण राही ती अम्हा बालिकांचा

बोलवीले गृहि मीच मंजिरीला
तिला कवण्या दाखवू बाहुलीला

का न तिजला पेटीत ठेविलेस
अता बघुनी मजकडे हासतेस

ससा अपुला मज तिने दाखवीला
उड्या मारी तो दाबता कळीला
कशी गंमत जाहली पाहताना
सशावाणी आम्हीहि नाचलोना

झांज आता वाजवुनि बाहुलीची
मजा त्यावरि बघु ससा नाचण्याची
दे ग आई! बाहुली त्वरित देई
तुला हसण्याविण सुचत दुजे नाही

जोरजोराने उडवि हातपाय
करुनि सोडी 'दे माय धरणि ठाय'
बाहुली ती–इतुक्यात मोज झाली
खिशामधुनी तीच्याच पडे खाली

★ ★

## ६३ : खरी कविता

चाल – भूपती खरे ते

परतंत्र हिन्दचा गुढी पाडवा कसला
त्या जयध्वजाचा विजय–महोत्सव कुठला

श्वासही कोंडतो जिथे आतल्या आत
जयनाद कोठला तिथे वदन पद्मात

पद्महो मुखीचे जीवन असता सुकले
त्यावरी कोठली हास्य–लहरि मग खेळे

ते हास्य मनाचे,–तया बंध चहुकडुनी
उसळावा कैसा भाव खरा त्यामधुनी

तो भाव जरासा उतास येता चित्ती
तत्क्षणी लटकतो जीवच फासावरती

या घडिस भारती मृतस्थिती ही असली
मग खऱ्या हृदयिची मनोज्ञ कविता कुठली

तुटतील जेधवा बंध हिंद–बंधाचे
होईल तेधवा दर्शन स्वातंत्र्याचे

दर्शनोत्सवी त्या चिदानंदि मन रमता
प्रकटेल सहजि मग खरी महोत्सव–कविता

* *

## ६४ : गंगावतरण

निवास सोडी स्वर्गाचा
हेतू कसला गंगेचा

स्वर्ग नकोसा का व्हावा
तुच्छ गणी का निज जीवा
अवमानियले की तिज कोणी

त्यजिले स्वर्गा म्हणुनीया
परम सुखाला टाकुनियां

निशिदिन धडपड चालतसे
मर्त्य जगाला एक पिसे
  स्वर्ग-सुखाच्या अभिलाषे
  अनंत कष्टा भोगितसे
    जीवन दावी परी जान्हवी

चिरंतना दे तिलांजली
नश्वर जगता कवटाळी

उदार हृदयी जीव खरा
स्व-सुखाचा त्या तिटकारा
स्वतासारखी मंगलता
द्याया झटतो हत जगता
  याच मनीषे हिमनगदुहिता

स्वर्गासन-बंधन तोडी
मानवतेची घे गोडी

* *

# ६५ : मंगल घडी

चाल – सुटला पितृ दिशेचा

कुठुनी सुगंध येई मधुर
आणी प्रसन्नतेला बहर
प्रतिभेचे फुलले कमलपुष्प जणु रुचिर
मकरंद तयाचा घुमवि पवन हा निकर

बसुनी सुगंध–वारूवरी
श्रवणी रव ये कुठुनी तरी
जणु सरस्वती निज छेडुनि वीणा करी
नो मंजुळ मंगल नाद जगभरी भरी

चंचल चित्त–तरंगावरी
चंचल खेळ करी माधुरी
या नाद–सुगंधे ताल अचलता धरी
जणु शरद् चंद्रमा तमास उज्ज्वल करी

मंजुळ नाद नाचती अधरी
मंगल आशा हृदयांतरी
चैतन्य भवति करि लीला नानापरी
मन लीन सर्वथा चिदानंद–सागरी

जीवन्मुक्ति–लाभ हा जिवा
लाभे दुर्लभ जो मानवा

जीवनी असा ये क्षण मंगल केधवा
म्हणुनीच बोलती 'मनोज्ञ' साधू भवा

★ ★

## ६ : नुसता माधव

नुसताच रे प्रियाला । कशाला येशि गोपाला
अशा रम्य काला । कशाला येशि गोपाला

अंबरि अंबर प्रशांत राही
भुवन भुवनि सुखविलीन होई
जीवनि जीवन जीवनदायी
वेधि मानसाला । कशाला येशि गोपाला

गोकुळिची ही राधा रमणी
उत्सुकतेने कधीपासुनी
तिष्ठत येथे चित्त-चिंतनी
तुझ्या गायनाला । कशाला येशि गोपाला

पाचारियले कशास तुजसी
मानस कैसे ध्यानि न घेसी
की जाणुनि रे ! बळेचि करिसी
भुलुनि थोरतेला । कशाला येशि गोपाला

मोल तुला तुजमुळेचि जगती
काय गमे रे ! तुझिया चित्ती

भ्रम हा सोडी तरी निश्चिती
कथी हृद्गताला । कशाला येशि गोपाला

मुरलीविण तुज कवण विचारी
मुरलिमुळे तव महती सारी
मुरलिच ठसवी तुज जगतांतरि
म्हणुनि थोर झाला । कशाला येशि गोपाला

मुरलीविरहित बघता तुजसी
घनाआड शशि लपवि मुखासी
अचल जहाला गंध विलासी
पवन पळुनि गेला । कशाला येशि गोपाला

तुझा चरणरव श्रवणी येई
प्रसन्न यमुना उदास होई
उज्ज्वल काळी कभिन्न हृदयी
किमर्थ ही लीला । कशाला येशि गोपाला

मुरलि तुझे चैतन्य माधवा
कळुनी येइल तुझिया जीवा
विसरु नको ह्या मनिच्या भावा
वंद्य जीविताला । कशाला येशि गोपाला

लुब्ध ज्यावरी तुझी राधिका
ज्यास्तव विसरे काल-जवनिका
नुसता माधव न तो जगि निका
तो मुरलीवाला । कशाला येशि गोपाला

★ ★

# ६७ : पुढचे पाऊल

चाल – उद्धवा शांतवन

पाऊल टाकिले पुढती । मागुती कसे येणार
हा स्वभाव नच हिदाचा । कुठुनि हे तया कळणार
या ठायी तो मतिमंद । शिकवुनी काय शिकणार
स्वातंत्र्य–गिरीवरि वास
वा पारतंत्र्य–गळफास
हीच तरी वृत्ति–मिरास
तिजपुढे तुच्छ जीवास । लेखितो, कथी इतिहास

विक्रांत वीर, रणधीर । भूषविती धारातीर्थ
ते प्रचंड वैभव, सेना । कामास येइ समरात
जणु विपंख झालेला तो । दुर्योधन मानी ख्यात
सापडे शत्रुच्या हाती
तरि राहि अचल तद्वृत्ति
नच वदे दीन वाणी ती
स्वर्गास चालता झाला । पुढच्याच पदा टाकीत

बंधनी पडे थोरीच्या । रणशाली तो पृथुराज
त्या लोहपंजरी कोंडी । बलवंत जणू वनराज
पीडियले विविध शरांनी । उतरविण्या धृतिचा माज
फोडियले दोन्ही डोळे
राजपथी त्या मिरवीले

खेळणे तयाचे केले
परि उडवुनि शिर घोरीचे । अमर करी निज पद पुढचे

मधुसमान वाणी मधुर । अंतरी गरल भरलेले
तो अकबर नृप दिल्लीचा । मोहाचे पसरी जाळे
मुर्दाड मनाचे राव । मोहुनी सहज वश झाले
जी एक भारता ज्योति
करि उज्ज्वलमुख या जगती
ती विझे न त्याच्या हस्ती
त्या प्रताप-ज्योतित अजिही । नृपमुखा जगत अवलोकी

शंभुला वधी औरंग्या । कंप भरे महाराष्ट्राला
जिंजीला राजाराम । शास्ता न कुणी धीराला
धिंगाणा घाली पापी । गिळिण्याते स्वातंत्र्याला
पाऊल परी पडलेले
ते पुढचे पुढेचि सरले
आश्चर्य जगाचे झाले
नष्टाच्या हाडांवरुनी । ते तसेच चालत गेले

त्या कुंजपुराचा वेढा । दत्ताजी शिंद्या लढला
तो लढता लढता समरी । घायाळ होउनी पडला
धूलिच्या भूषणी नटला ।–शत्रूचा ताबा झाला
–"लढशील पुन्हा का सांगे ?"
–"हम् बचे तो और भी लढेंगे !"
हे बोल बोलुनी वेगे
तो मर्द मराठा शूर । जाउनी बसे स्वर्गात

नरसिंह हिन्दचे सारे । पत्त्यातिल राजे होती
मन, बुद्धि फिरंग्या विकुनी । आपुले स्वत्व विसरीती
स्वातंत्र्य गुलामा राही । तेहि ना तयांच्या माथी
तइ झांशीची ती बिजली
घनि अकस्मात कडकडली
तेजाची ज्वाला गमली
चतुरंग शत्रु कुंठवुनी । ती स्वताच तेजी विरली

पापास पुण्य समजोनी । अन्याया न्याय म्हणावे
स्तुति गाउनि परवशतेची । स्वातंत्र्य तुच्छ लेखावे
कौतुक ते करुनि लुटीचे । परकीया देव गणावे
शिरि नाचे जे परराज्य
ते बोधुनि 'रघुचे राज्य'
मानावे सुखसाम्राज्य
हा हेतु पुरावा कैसा । दिव्य दृष्टि येता जीवा

कृति असली तिलकांकरवी । नच घडे कधी स्वप्नात
परराज्य लेखुनी तुच्छ । स्वत्वास बोधिले नित्य
दृढ असंतोष-वन्हीला । चेतविले हिन्द-जगात
टाकिले पाउला पुढती
रिपु असंख्य पंथे छळिती
तरि गिरिसम निश्चल वृत्ति
चौफेर वन्हि भडकून । रिपु मात्र होति हैराण

हे असे दुग्ध प्यालेला । प्रतिरोम-देह हिंदाचा
चालवी आजच्या घडिला । संग्राम स्वातंत्र्याचा

तो कुण्या लोभ मोहाने । मुळि कधी न परतायाचा
आपत्ति कोसळो कितिही
शिर तुटुनी मागे जाई
पद पुढचे पुढेचि राही
उमजावे तरि जगताने । व्हावे न अंध अभिमाने

★

## ६८ : नवा हिन्द

चाल – वीर शिरोमणि सकल

चैतन्याच्या अनलज्वाला आकाशी भेटती
हिंदचे नव तेजा दाविती
शीत, मंद अजवरी हिंदच्या सुप्त आत्मज्योतिला
उजळुनी प्रकाशिले त्याजला
मूळ रूप हिन्दचे असे हे समस्त जग देखुनी
घालि मुखि आश्चर्ये तर्जनी

गडबडली वृत्ती काहि सुचेना मनी
वाटले स्वप्न की सत्य बघत लोचनी
असुनिया दृष्टि जग अंध होय त्या क्षणी
भिरभिर पाही वेड्यावाणी आपुल्याच भोवती
मिळे मग विचारचक्रा गति

‘ खुळा बावळा जो पूर्वीचा हिन्ददेश सर्वथा
तिथे ही कोठुनि ये दिव्यत
हिन्दाचा प्रतिजीव गमे अजि स्फुल्लिंगचि वन्हिचा
कुठे तो अनुभवि मृत शांतिचा
हिंद जगाचा गुरू भासतो, शिष्य कुणाचा न तो
जादुचा खेळच हा वाटतो ’

हे बोल निघति मुखि स्वप्नी, जागेपणी
फेकुनी आवरण मदांधतेचे क्षणी
लागले बघाया भूमिस जग वाकुनी
हास्य मुखावरि, भीति अंतरी, ठिकाण सोडी मन
स्वताला स्वताच घे बोधुन

‘ सावध व्हावे त्वरित जगाने विकल्पना टाकुन
बघावा हिन्द–वेष नूतन
अंतर्बाह्यी गतकालाचा हिंद नसे आजला
तयाचा पुनर्जन्म जाहला
कसे म्हणावे बुद्धिहीन वा पिसाट त्याला कुणी
हरघडी अनुभवि करणी गुणी

हा अता कुणाचा गुलाम नच राहिल
तो स्वता–जगाचा धनी खचित होइल
हे कथी तयाचे जगास तेजोबल
स्वातंत्र्याचे निशाण त्याने उभारिलेले दिसे–’
–जगा ! मग उमज सत्य हे कसे

★ ★

# ६९ : वर्षा

चाल – देवदेवा वासुदेवा

ग्रीष्मराज्यी चंड भानू ताप देई अंबरा
मारुताचे तप्त शर ते विकल करिती अंतरा

त्रस्त होई बहुतपरिनी त्या सुचेना काहिही
परि जिवाला घडिघडी ते अमर आशा दाखवी

हृदयचंद्रे मार्ग शोधी शांत समयी त्यातुनी
तारकांच्या लोचनांनी वाट निरखी जीवनी

घोर तिमिरी काहि न दिसे यत्न सरती सर्वही
तरि मनाला धीर, आशा–मोहिनीने जागवी

त्या नभाच्या त्रस्त जीवा मेघ चित्ती जाणुनी
कळवळोनी शांतवी त्या स्नेहतेच्या भापणी

तदुपकारे सजवि काया कालमेघे मोहुनी
त्याच वेषे मिरवि लोकी नीलतेला टाकुनी

खल न सारे, सुजन काही या विचारे तोषुनी
पुष्कराचे हृदय भरुनी नीर साचे लोचनी

खळखळोनी तेधवा ज्या अश्रुधारा वाहती
कौतुकाने भुवनि कोणी त्यास 'वर्षा' बोलती

* *

# ७० : 'जगदीश'

तुला न कोणी जगी पिता
तूची सकलांचा त्राता

न्याय न दिसता तव ठायी
कुणी न बोले अन्यायी

क्रूरपणा तव अनुभविता
कुणी तुला नच अडवीता

मिटुनी घेसी निज नयना
तयास कोणी उघडीना

श्रवणी देसी हस्त जरी
तेथुनि कुणि त्या दुरि न करी

भेदिसि मर्मा कटु वचनी
मुकी जगाची तरि वाणी

भुके ठेविसी जरि जगता
भुकेचि राही नच वदता

कष्टवुनी तनु मन छळिसी
तरि न म्हणे कुणि तुज दोषी

एक छत्रि तू 'जगदीश'
म्हणुनि घडे का ह्या कृतिस

विच'रितो परि तुजसीच
जनक–लक्षणे का हीच

★ ★

## ७१ : स्व-रूपदर्शन

चाल – आनंदकंद ऐसा

देवी सरस्वती गे । तव ध्यानि चित्त रंगे
कांति प्रसन्नतेची
शोभा चिरंतनाची
वीणा करी विराजे । नादी निनाद साजे
नयनात तेज खेळे
ब्रह्मांड त्यात डोले
मोदे मयूर नाचे । पायी तुझ्या कृपाले !
गे श्वेत वस्त्र तूझे
मांगल्य मानसाचे
तव भाल कुंकुमाचे । सौभाग्य दिव्यतेचे
न मुळी मुखी निराशा
तळपे मनोज्ञ आशा
हृदयी नसे अशांति । गाली नितांत शांति

३२९६६ ९५५२

अश्रूंस ठाव नाही
अधरी हसे सदाही
न कदा विषादवृत्ति । आनंद–धाम–मूर्ति

तव रूप हे सदाचे
दृष्टीस ये जयाचे
तत्प्रेमचित्त–कोषी । करुणा रुजेल कैशी

कारुण्य–नाद गीती
सस्नेह केवि येती
जरि यत्न थोर होती । सारे वृथाच जाती

विसरूनि भान देहीं
आनंदमग्न राहीं
सहजी म्हणोनि वाणी । आनंद गीत गाई

★ ★

## ७२ : जीव जागृति

कशास येशी रविराया
झोपेमधुनी उठवाया
उदयाच्या तव किरणजले
सुप्त जगत हे टवटवले

म्हणुनी मजला
उठवायला
येशि दयाळा !
परी तुझे हे श्रम सारे
विलया जाती जाण खरे

अवती भवती उशागती
दुंदुभि वाजति, निनादती
नीज सरेना तरि मम ती
इतुकेचि न तिज ये भरती

तुझ्या दर्शने
अवघी भुवने
करुनी नमने
प्रफुल्ल हृदये बागडती
जाग न ये परि मम चित्ती

गतविभवाचे कीर्तीचे
तैसे पूर्वज–शौर्याचे
देशि कशाला स्मरणाला
ठावे सारे ते मजला

तुझ्या स्फूर्तिचा
चैतन्याचा
लाभ न साचा
अंत:स्फूर्ति हवी मना
तीच शुभप्रद स्वता, जना

जाग न येई तेच बरे
तेणे जग निश्चित पुरे
जागृत जीवन या पुढले
कुण्या पथे नच जाइ कळे

सुपथी कंटक,
तिमिरी दीपक,
त्रिशंकु जीवक,
शल्याची[1] वा मूर्ति नवी
अवतरुनी प्रकटेल भवी

जागृति जीवाची जगता
कल्याणाची सार्थकता
तरीच जीवन जागृतिचे
सार्थ जन्मुनी जीवाचे

नातरि निद्रा
शांति समुद्रा
सुखदा, भद्रा
म्हणुनि विनवितो विभो ! तुला
मजचि येउ दे जाग भला

★ ★

[1] राजा शल्य, भारतीय युद्धातील महारथी कर्णाचा सारथी.

# ७३ : योगी

चाल – भूपती खरे ते

स्वच्छद चालला आपुल्याच वाटेने
ना इकडे तिकडे बघे लोलदृष्टीने
वाटेत भेटता कुणी रंक वा राव
नच वाटु देइ त्या दुजेपणाचा भाव
ज्या मने ऐकतो विहंगमाचे गाणे
करि गर्दभ–गीता श्रवण त्याच वृत्तीने
तरुलता अर्पिता कुसुमरेणु नच तोष
माखता, धूलिने तनू पवन, नच रोष
कुणि मार्ग रोधिता वळुनि बाजुने जाई
कुणि सहाय्य होता अहंपणा नच दावी
शांतवी, तोषवी क्रूर जिवांना जेवी
घे परामर्ष तो साधुजनांचा तेवी
उन्मत्त वेष त्या चढवि कुणी जरी समयी
तरि दुज्या क्षणाला फेकुनिया तो देई
घन तिमिर असो वा सूर्य, चंद्रमा नविन
परमात्म–चिंतनी सदैव राही लीन
हा निसर्ग–राणा निर्झर जरि अनुयोगी
तरि गमे कविस तो योग्यांचाही योगी

★ ★

# ७४ : लोकनायकास वंदन

( लोकनायकांच्या अभिमान्यांनी त्यांचा स्फुटलेखसंग्रह पुस्तकरूपाने छापून ते पुस्तक त्यांस रा. रा. गोपाळराव ओगले संपादक महाराष्ट्र यांच्या अध्यक्षतेखाली ता. १७-१२-३९ रोजी यवतमाळ येथे मोठ्या समारंभाने अर्पण केले. त्या प्रसंगी म्हटलेले गीत–

चाल – आनंदकंद ऐसा

श्री लोकनायकाला । सप्रेम वंदनाला

कैसे तयास वानू
कैसे तयास जाणू
वैदर्भ–मानसाला । सप्रेम वंदनाला

धन्या विदर्भभूमि
करि भारता ललामी
त्या थोर आत्मजाला । सप्रेम वंदनाला

चैतन्य रोमरोमी
स्फुरवी विदर्भ–धामी
त्या धन्य वैखरीला । सप्रेम वंदनाला

झोपेत गुंगलेला
जडतेस वाहिलेला
वैदर्भ जागवीला । सप्रेम वंदनाला

वैदर्भ प्रेममूर्ति
वैदर्भ दिव्य कांति
बघता दिसे, तयाला । सप्रेम वंदनाला

श्रीलोकमान्य–स्मरणी
बल, बुद्धि-तेज-तरणी
दावी प्रकाश–लीला । सप्रेम वंदनाला

बलहीन पार्थ होई
प्रभुवीण, ऐकु येई
करि फोल ह्या वचाला । सप्रेम वंदनाला

असुनी जगात नाही
नसुनी जगात राही
त्या चित्त–साधकाला । सप्रेम वंदनाला

नवरत्न हिन्द–माला
दिपवीत जी जगाला
जो शोभवी तियेला । सप्रेम वंदनाला

परतंत्र भारताते
स्वातंत्र्य लाभण्याते
समरात ठाकलेला । सप्रेम वंदनाला

हृदयात साठलेला
हृदयात रंगलेला
हृदयात भाविलेला । 'आनंद' वंदि त्याला

★ ★

# ७५ : शूर सरदार !

चाल – जरि नाहि कमल

लष्करी थाट ऐटीत । खड्ग उडवीत
वीर गर्जे । रणधीरा भीती उपजे

"मी खरा शूर सरदार । करी तरवार
माझिया ही । रिपु कुठे पळुनिया जाई

व्हा दूर सरा बाजुला । वीर चालला
वाट सोडा । शिर नमवुनि कर मज जोडा

नच अता कुणाला भिणार । बार करणार
शत्रु-कंठी । घालीन यशाची कंठी

करि नसे शस्त्र जोबरी । शत्रु तोवरी
शिरी नाचे । निःशस्त्र शूरवीरांचे

फितुरांस करुनिया पुढे । मागुती दडे
कुटिलतेने । तरि वदे 'शूर' अभिमाने

शूरता मुळची नसे । भ्याडता वसे
शत्रु-ठायी । ते शस्त्र शूर त्या वदवी

मज भित्रा म्हणुनी सदा । काय बोलिला
हासुनीया । उलटली घडी या समया

अजि कर्णार्जुन ते कुठे । शिवाजी कुठे
कुठे बाजी । रणशूर एक मी गाजी

पुस्तकीच ते असणार । कुठुनि दिसणार
आज घडिला । मजलाच बघुनि घ्या डोळां

लाकडी तरी तरवार । करुनिया ठार
शत्रु अपुला । पाठवितो त्या गगनाला"

● ●

चिमुकला शूर सरदार । फिरवि तलवार
दशदिशांसी । घे करुनि घाव चरणासी

कुणि काय बघत लोचनी । हळुच चोरुनी
भवति पाही । दुःखास विसरुनी जाई

त्या निर्जन बागेमधी । कोण पाहती
विक्रमास । तरुलताहि असती शांत

परि समोर वेलीवरी । फुले हासरी
दृष्टि येती । वीराची ढळली शांति

परजुनि तइ सौदामिनी । पटापट गुणी
कापि माना । सुमनांच्या, सोडुनि भाना

★ ★

# ७६ : चिरंजीव !

चाल – 'शिलेदार'

रणचंडी स्वातंत्र्य–रणाचे
फुंकी रणशिंग
फुंकी रणशिंग
भारता ! फेडी निज पांग

अपूर्व हा सोहळा पातला
तुझ्या दैवयोगे
तुझ्या दैवयोगे
भारता ! ऊठ, ऊठ वेगे

करुनि ढाल छातिची खड्ग घे
अढळ निश्चयाचे
अढळ निश्चयाचे
स्मरुनिया नाम राघवाचे

रिपुच्या गाठी अमोघ शस्त्रे,
हृदय फत्तराचे
हृदय फत्तराचे
कुटिलता रोमरोमि नाचे

घेइ धडक निःशंक, निर्भये
दंड थोपटोनी

दंड थोपटोनी
पाठवी रिपुस बली–सदनी

भीति कुणाची, तिने घातली
माळ शिखंडीला
माळ शिखंडीला
शिवेना ती रणमर्दाला

सिंहाचा तू विक्रम छावा
करी गर्जनेला
करी गर्जनेला
कापवी भूमिमंडळाला

विशाल भारत तुरुंग सारा
तुरुंगवासी तू
तुरुंगवासी तू
फोडि झणि तया, पुरवि हेतु

पारतंत्र्य–रौरवात पिचणे
अता पुरे भारता !
अता पुरे भारता !
संपवी परवशतेची कथा

कपिलाषष्ठी ये न घडिघडी,
आयुष्यी एकदा
आयुष्यी एकदा
करुनि घे तिजला रे ! फलदा

स्वतंत्रता लाभते न जीवा
जीव वेचिल्याविना

जीव वेचिल्याविना
  न लाभे अमर सौख्य जीवना
मर्त्य जिवाचा मृत्यु टळेना
      कुण्या उपायाने
कुण्या उपायाने
  सार्थकी लावी मर्द जिणे
स्वातंत्र्याचा मुकुट घेउनी
      काल उभा समरी
काल उभा समरी
  विक्रमे तयासि घालि शिरी
रणझुंझारा, शौर्यागारा,
      भारत–भाग्योदया !
भारत–भाग्योदया !
  भारता ! चिरंजीव चिन्मया !
अमोल घटिका चालुनि येई,
      विजय श्री मिळवी
विजय श्री मिळवी
  नतरि रणि मरुनि स्वर्गि जाई

★ ★

# ७७ : संकेत

चाल – लावणी

वाट चालता मधेचि थांबुनि वरती बघसी कुणा
तुज वेड लागले काय खुळ्या मोहना !
कोण गवाक्षी माडीवरच्या, कुणी न दिसते मशी
तू चाल माधवा ! वाट आपुली कशी
कसा अतावरि हासत खेळत गुजगोष्टी बोलत
आलास येथवर जणु कुंजर डोलत
तव दृष्टी खिळली रित्या गवाक्षी हरी !
ते गवाक्ष पाही वदन तुझे त्यापरी
मम लोचन फिरती तुम्हा उभयतांवरी
सूत्री सगळे एक असति तरि हृदयि भावभिन्नता
भिन्नता न पुरवी मानस निज सर्वथा

एकतार दृष्टिनें कुठवरी बघसि गवाक्षाकडे
त्यामाजि दिव्यता कसली दृष्टी पडे
रित्या गवाक्षी, रिते तेज ते रिता पवन खेळवी
फसवुनी तुझ्याहि रित्या मना गुंगवी
नवल वाटते, ये न कशी ही तव ध्यानी वंचना
की तुझे ध्यानही रितेच लक्षाविना
की अमोल वस्तू एखादी सांडिली
ती तिथे निरखिण्या दृष्टि गुंग जाहली
पण काहि दिसेना मजसि तरी त्या स्थली

भानु-किरणि धूलिचे रिते कण स्वैरपणे नाचती
नर्तनी काय त्या तूहि शिणविसी मति

घुटमळसी का इथे कन्हैया ! ध्यानीं येई पुरे
तव चित्ति कशाचे तरंगजल वावरे

त्याच जलाची चमक अवतरे तुझ्या सुखद लोचनी
म्हणुनीच गवाक्षी दृष्टि बसे जाउनी

तीच चमक तव मुक्तश्रवणा बद्ध करी मोहुनी
हितबोल परतवी मघेचि, बोलो कुणी

पण तरंग मनिचा तुझ्या, विफल सर्वथा
जणु कमलदलावरि सलिलबिन्दु विहरता
निखळिता तयाची मुळि न जशी सलिलता

तुझी हृदय-चंद्रिका राधिका कुठली गृहि या क्षणी
ती कधीच गेली कुंजवनी उन्मनी

वनात निज टाकिताच पाउल येइ कळोनी तिला
संकेत माधवा ठावे नच आपुला

चिमणीवाणी वदन जहाले, दृष्टि वळे अंबरी
घडविली जणू की अचलमूर्ति साजिरी

क्षणात परि मुखकमल फुलुनि ते छंद तिचा प्रकटला
नयनांत नाचला, अधरांवरि शोभला

तोडुनी वेलिची फुले तरुंस वाहिली
तरुफले बिहंगा भक्षाया दीधली
ती विहंगवृन्दे गगनांगणि सोडिली

जल करि उडवी पुष्करिणीच्या जली चरण टाकुनी
मग तुझी राधिका गवाक्षि ये कोठुनी

चाल माधवा ! चाल झडकरी हलवी पद येथुनी
राधेची करणी पाहि जरा लोचनी
क्षणापूर्विच्या कुंजवनाची ओळख मुळि होईना
देखितो वाटते उजाडशा उपवना
तुझी राधिका किती गुणाची, समजुनि तुज येइल
रे ! जगत्कल्पना–निरसनही होइल
हरि ! सदैव म्हणसी 'लबाड' म्हणुनी मला
ते अताच निरखी, सत्य पडे दृष्टिला
या साठिच तेथे घेउन जाई तुला
हरि–कर धरुनी, बोलुनि ऐसे सहजी देखे वरी
तो दिसे राधिका हसत गवाक्षांतरी

★ ★

# : पिका ! ये

चाल – मधुर मुरलि मधु नाद

पवनवारुवरि वसंतराणा येई, कोकिला !
असिस कुठे श्यामला !
ज्याच्यासाठी निशिदिन झुरशी
नयनांमधुनी अश्रु गाळिसी
दृढतर धरिसी मुक्या व्रतासी
तो तुझिया द्वारी ठाकला, येई कोकिला

अजुनी वार्ता काय कळेना
क्षणात व्यापी जी या भुवना
कुठेहि तरि जगतीच वससिना
मग हा योग कसा आगळा, येई कोकिला

वसंत येता भान विसरिसी
त्याविण काही न सुचे तुजसी
अभेद उभयी जगा दाविसी
परब्रह्म गणिसी आपुला, येई कोकिला

वसंत–हृदया आळविण्याते
वसंत–प्रेमा उपजविण्याते
वसंत–भक्ती विस्तरिण्याते
कंठ तुझा, होई मोकळा, येई कोकिला

येइ पिका ! रे ये लडिवाळा
वसंत–जगती पाही डोळां
धन्य करुनि घे दृष्टिसुखाला
प्रसन्नता सारी कोमला, येई कोकिला

हृदय–संपुटी वसंत–मूर्ति
साठवुनीया पुष्पे डुलती
गंधश्वासे मोद विखुरिती
गुंगविती भावा प्रेमला, येई कोकिला

कटि स्कंधि तरु, वेली घेती
घेउनि त्या कौतुके मिरविती
तीच जिवाची गणिती पूर्ति
नयनरुचिर किति हा सोहळा, येई कोकिळा

उषा मंगला वसंत–कांति
मनोज्ञ संध्या वसंत–प्रीति
मधुरा ज्योत्स्ना वसंत–शांति
लोक-जीवनी या रंगला, येई कोकिला

वसंत–विभवी सकल चराचर
तोषित होई तुजविण निर्भर
विहित न हे तरि येई सत्वर
जीव–कला घेई चित्कला, येई कोकिला

* *

## ७९ : अविनाशी तेज

चाल – सुटला पितृदिशेचा वारा

घेई विश्रम दिनमणि जरी
निर्दय काला ! तव पंजरी
तरि तेज तयाचे चिरंजीव भूवरी
करि समर्थ जगता तुडवाया शर्वरी

भास्कर–चैतन्याची दीप्ति
चेतवि ज्या जीवाची ज्योति
ती राहि प्रज्वलित अखंड धरणीवरती
म्हणुनीच पळे तम दावि सजविता जगती

क्रूरा ! बंधनि तुझिया रवि
जरि ते अतीव तुज हर्षवी
तरि जाण खचित रे ! जिवास ज्या जागवी
तो तुझ्या शिरी निज विजयध्वज नाचवी

घडती यत्न भगीरथ किती
व्हाया नामशेष जागृति
तरि तुझे मनोरथ विफल सर्वथा अंती
तिज संजीवन दे अदृश्य रविची कांति

दीपक उजळि दुज्या दीपासी
ठावे नियम खला ! हा तुजसी
कोंडिले, दंडिले तदीय जरि जनकासी
जागते आधिचे काय तयांचे करिसी ?

* *

## ८० : दीप-माला

चाल – प्रणयतरंगासवे

रुचिर दीप–मालिका
सगुण मनविमोहिका
विलसती
चमकती

मगनि तमविनाशिका

● ●

क्रूर काल—नंदिनी
विकट रूपधारिणी
यामिनी
मोहिनी
दंग पिशुन नर्तनी

कुटिल खेळ बहुगुणी
बघु नये जनी कुणी
कवळुनी
झाकुनी
ठेवि म्हणुनि दिनमणी

कुटिल खेळ चालले
भान सकल सांडिले
मोहिले
गुंगले
मन मनासि विसरिले

सुजन जीव चिरडती
पिशुन जीव हरिखती
क्रंदणे
हासणे
हर्षुनी बघे रति

'खेळ आपुल्याविना
इतर जगत पाहिना
जागता
रवि स्वता
भोगितो विटंबना'

या विचारि रंगुनी
खेळ ये भरारुनी
सहजता
देखिता
गगन येइ लोचनी

ह्या असंख्य दीपिका
अंबरी अताच का
कोठुनी
येउनी
खेळ निरखिती निका

दीप–पंक्ति ह्या किती
मालवू कशारिती
एकला
विझविला
कुंठली इथे मति

रजनि–मन विभागले
गोंधळे, धृती गळे
द्रुतगती

मागुती
चरण घेउनी पळे

* *

## ८१ : अद्भुत

चाल – लावणी

नभात ही चांदणी
ध्रुवाची नभात ही चांदणी
दिसे सानशी विलोकनी रे !
नभात ही चांदणी

प्रति निशी बघसि लोचनी
नियमाने टक लावुनी
वद काय तुझ्या रे मनी

गुरु, भार्गव तेजोनिधी
त्यावरी न दृष्टी कधी
कशि तीच घालि मोहिनी

झाकिता मेघ तन्मुखा
तुज गमे 'वंचिलो सुखा'
हे नवल तुझ्या जीवनी

अपुल्याच्च ठायि ती वसे
ते तुजला बघवे कसे
तूं चंचल–मेरूमणी

तस्करा रुचे चांदणं
अंधारी अलि गुंजणे
कृति अद्‌भुत ही त्याहुनी

* *

## ८२ : खुळेपणा

भैरवी–केहरवा

जगि कुठला हा खुळेपणा
कैसा निपजे कळेचिना

पाताळीच्या ज़ला शोषुनी
पवन, मेघ आघात साहुनी
वितरि फला तरु दुज्यालागुनी
जगि कुठला हा खुळेपणा
कैसा निपजे कळेचिना

सौंदर्याची प्रिया निरुपमा
उघड्यावरती मिरवि चंद्रमा
परमन दृष्टी तोषवि रामा
जगि कुठला हा खुळेपणा
कैसा निपजे कळेचिना

दीप जाळुनी आत्मज्योतिला
निवारि तो घन तिमिरपटाला

खेळवि तेथे उज्ज्वलतेला
जगि कुठला हा खुळेपणा
कैसा निपजे कळेचिना

जीव–सुमन फुलताच हसोनी
गुंगवीत जगतास मोहुनी
तोचि विराजे स्व-देश-चरणी
जगि कुठला हा खुळेपणा
कैसा निपजे कळेचिना

विचार निशिदिन परसौख्याचा
लेश न मुळि आपुल्या स्वतांचा
त्यातच ब्रह्मानंद जिवाचा
जगि कुठला हा खुळेपणा
कैसा निपजे कळेचिना

★ ★

# ८३ : चिमण्या

चाल – अभंग

तांदुळाचे दाणे । टाकिता आंगणी
येउनी चिमणी । खाऊ लागे

तिच्या मागुनीया । आणखीही येती
दाण्यांसी टिपती । भरा भरा

९५५२ ७.२.५२



चिव चिव त्यांची । गोड गोड भारी
आनंदती पोरी । मनामाजी

लहानी विमल । हासुनीया पाही
आपुल्याच ठायी । टाळ्या पिटी

तिच्याहुनी सान । बाळ मंदाकिनी
धराया चिमणी । दौड मारी

तोल जाउनीया । आंगणी पडे ती
आवाजे उडती । भुर्र साऱ्या

वरती चिमण्या । खालती चिमण्या
देवाच्या चांदण्या । मौज मोठी

★ ★

# ८४ : निर्बंध

चाल – तेथेच उभी की

मज नको वेणु ऐकाया
तू जाई अपुल्या ठाया । माधवा
तू थोर मनाचा राव
जवळीच राहु दे भाव । माधवा
चाळविसी करि वेणूला
खोचुनि रे ! ठेवि कटीला । माधवा

श्रीहरि
तुझी बासरी
सुखाची सुरी
वाटते मजला
काय करू बोल तयाला । माधवा

मम सुखासाठि किति झटसी
परि वाटे काहि न मजसी । माधवा
तव तनू श्रमे ही सुकली
मन्मानसि खंति न कसली । माधवा
सामोर दीनवाणीचा
मम हृदयि न लेश दयेचा । माधवा

महिवरी
दुजी मजपरी
कुणी सुंदरी
कृतघ्ना नाही
मी खरीच रे ! दुर्दैवी । माधवा

देखताच दुरुनी मजसी
निज वेणु-गीत थांबविसी । माधवा
'वाजीव' बोलता तुजसी
वेणूच विसरुनी जासी । माधवा
ठेविता बांसरी अधरी
निघतिच ना स्वर बाहेरी । माधवा

श्रवणास
माझिया त्रास

नको व्हायास
हृदयि जाणोनी
ही घडे सदय तव करणी। माधवा

मी कुटिल प्रज्ञा बाला
जाणते न तव मनिषेला। माधवा
सर्वथा कुटिल जो जीव
कशि तया सत्य-जाणीव। माधवा
'वंचना करी हरि अपुली'
हा समज हृदय मग जाळी। माधवा

बोलणे
तसे चालणे
सरळ पाहणे
गमे विपरीत
ही कुटिलपणाची रीत। माधवा

रे! तुझ्या थोरपण हृदयी
विकृती माझिया ठायी। माधवा
तू श्रमसी द्याया तोष
उसळवि तो माझा रोष। माधवा
विसरिसी सकल मम दोष
मी करी तयाचा घोष। माधवा

हे असे
उभयि बघ पिसे
जुळे मग कसे

ऐक विनती ही
निर्बंध होउ दोघेही । माधवा

● ●

श्लोक

बोलूनि यापरि सती निघताच रागे
वेणूस वाजवित माधव तोहि मागे
ते गोड दृश्य पथि चालत पाहि सृष्टि
सूर्य, प्रभा विलग येइल केवि दृष्टि

★ ★

# ८५ : पतंग

चाल – अभंग

पतंग उडाला । उंच आकाशात
हर्षला मनात । बाळराणा

इकडे तिकडे । वाऱ्यावरी झुले
तैसा बाळ डोले । आनंदाने

बाल पृथ्वीवरी । पतंग अंबरी
गुण बद्ध करी । दोघांनाही

गुणाचा तो वारा । खेळे पतंगाशी
तोवरी स्वतासी । बाळ भुले

परी अल्प काळे । वाऱ्याने आपुले
गुण उधळीले । खलापरी

वाऱ्याच्या लाटेने । तोडिले गुणाला
स्वच्छंद जहाला । पतंग तो

विगुण पतंग । सैरावैरा धावे
वेड्या वाऱ्यासवे । वेडा होई

तुटलेला दोरा । हाती धरोनिया
पाही बाळ तया । टकामका

★ ★

## ८६ : सुखलाभ

चाल – शतजन्म शोधिताना

सुख–लाभ कोठुनीया
परतंत्र जीवनाला
दिनरात लाभ लाभे
करुणाश्रु प्यावयाला
स्वातंत्र्य रोमरोमी
नृपभोज सूर्यवंशी

प्रतिभा कवीश्वराची
नटली मनोज्ञ वेषी

सुखशैलि देह लोळे
आनंद चित्ति डोले
कारुण्य–गीतगंगा
शृंगारसाजि खेळे

स्फूर्ती–तरंग–लीला
स्वच्छंद जन्म घेती
करुणा–विलास नाना
तेथेच रंजवीती

तो काल काळराजा
कारुण्य गीतकाचे
हा काल काळपाशी
कारुण्य जीवनाचे

कारुण्य भोवताली
कारुण्य जीव–लेणे
कुठली स्वरूपता ती
कारुण्य सर्व बाणे

अजुनी पुरे न होई
कारुण्य मानसाला
म्हणुनीच वांछिसी का
कारुण्य–गीतकाला

विसरेल जीव काही
कारुण्य अंतरीचे

ते गीत ऐक कानी
   ते गीत गाइ वाचे

कारुण्य–काल वर्षे
   हृत्कोषि आसवांना
कारुण्य–गीत–गोडी
   तेथे मुळी रुजेना

परतंत्रता–विनाशी
   चैतन्य–जान्हवीला
कारुण्य विस्मरोनी
   या वाहवी क्षणाला

आधी करोनि देई
   स्वातंत्र्य–लाभ जीवा
मग ऐक, गा कितीही
   कारुण्य–गीत भावा

* *

## ८७ : मेघराज

या ग्रीष्म भूमिवर सजल मेघगण वर्षे
   अधिराज्य संपले सुचवि तया निज हर्षे
चौघडे घोषिती जयध्वनि स्वारीचा
   तो बघुनि होतसे हृदयकंप धरणीचा

प्रति तप्त कणाच्या शिरी तृणांकुर सान
जणु विजयश्रीचे डुलवी पवन निशाण

उन्मत्त रवीची सकल उग्रता नमवी
लीलेने सहजी चंद्ररूप त्या देई

फासुनिया काळे भर माध्यान्ही वदनी
अस्तित्व तयाचे लोपवि कितिदा भुवनी

दिनि ऐन भासवी गडद तिमिर अवसेचा
त्या छातीवरती नाच करी चपलेचा

बहु भयाण, भेसुर रुक्षतेस दे पलटी
त्या ठायि उभारी मनोज्ञ रम्या सृष्टि

कासारि निर्झरी खेळवि उच्छृंखलता
विनयास सोडवी–तुफान होती सरिता

बंधनामधुनि करि मुक्त चित्तकमलेसी
जनि वनी मिरवि तिज विविध मनोरम वेषी

सौंदर्य तियेचे नानाविध मधु भूपी
सन्मने विलोकित विसरुनि जाइ स्वतासी

तिज बघता बघता उन्मादाच्या लहरी
उसळुनी केधवा होइ अनावर भारी

जलधारागुणगणि स्वर्ग धरा गुंतवुनी
घे धन्य म्हणवुनी मेघराज अवतरुनी

★ ★

# ८८ : गुलामाची गर्जना

गुलामा कशाची । आवडी मनाची

गुलामी जया जगी
वाटते न वावुगी
मग वृथा फुगाफुगी
कशाला मुखीची

बुडबुडे जली जसे
बोल परवशी तसे
जन्मताच मरति ते
दृष्टि ना कुणाची

शरन्मेघ गर्जती
मुळि न मोल त्याप्रति
होय त्यापरी स्थिति
बंध–घोषणेची

कूपि दर्दुरे किती
विकट आक्रोशिती
काय मेघ वर्षती–
विफलता बलाची

बंधनात मृतमना
भोग निरययातना

गुलामा क्षणाक्षणा
अभिरुची धन्याची

भीरुतेस टाकितो
अचल धैर्य धारितो
बंधनी विमुक्त तो
जीव धन्य तोचि

गुलामा कशाची । आवडी मनाची

★ ★

## ८९ : प्रेमगीत

चाल – श्याम झूले हिंदोला

शारदेचा सखा हा
कमलनयने !
कन्हैया
शारदेचा सखा हा

तू राधिका शारदा
हरिमानसवीणा तिचा शुभदा
बोलवी बोल मनापरि सदा
जिवाचा
शारदेचा सखा हा

★ ★

# ९० : साधी कविता

( नागपूर नगर भवनाच्या मागे पावसाळ्यामध्ये एका उघाडीच्या सायंकाळी हिरव्या गवताच्या बाजारात नजरेस आलेले दृश्य. )

डोइवरी भारा
  दीन रमा
  घेउनि ये बाजारा

पदरा सावरुनी
  राहि उभी
  समोर त्या ठेवोनी

स्वरूप सुभगेचे
  वर्षाचे
  शांत बिंब संध्येचे

नजरेमधि भीति
  काहीशी
  तैशी उत्सुकता ती

मनोगती लीन
  जणु दुसरे
  जग नच अपुल्यावीण

आठ दहा आणे
मनि जाणे
मोलाचे हे नाणे

त्या मोलावरती
तरंगती
कितीक मनिच्या पूर्ति

येती कुणि जाती
विचारिती
उचित मोल नच देती

ऐशा समयासी
ये सुरभी
हळूच भाऱ्यापाशी

ललना पाहि तिला
तीहि बघे
करुणदृष्टि ललनेला

त्या क्षणि कळले ना
काय घडे
भारा सोडी ललना

मुक्त करी त्याला
धेनुपुढे
हसत, जाइ सदनाला

★ ★

# ९१ : निशा

तिलककामोद – झंपा

येइ चन्द्रा ! त्वरे श्रीनिशामंदिरी
द्वारि मधुराननना, स्वागता स्वीकरी

गगनतबकी किती
दीप तारातति
उजळि श्यामा सती
प्रीतिची वल्लरी

हृदयरमणाप्रति
मीलना हृदय–रति
परम सोत्कंठ रति
सफल भावा करी

अधरकुमुदी सया !
सज्ज खेळावया
तुजविना धरि भया
हृदयिचे स्मित परी

स्वैर, लहरी, तरल
गंधप्रणयी अनिल
कोंडुनी घे मृदुल
मुकुल कोषांतरी

प्रणयिनी अगतिका
तद्हृदय–चंद्रिका
ग्रासि तमजवनिका
विकल करि माधुरी

कोण रिपु नच दिसे
सुहृद कोणी तसे
वेड नसता पिसे
जवळ असुनी दुरी

स्नेहवंता अगा !
अंत बघसी उगा
स्नेह–रजनी जगा
शोभवी हासरी

* *

## ९२ : चित्तरीति

उज्ज्वल रविकिरणी
आनंद भोगि अवनी
परी घूक काढी
शापवाणी

पूर्ण चंद्रकांति
रिझवीत सर्व जगती

परी काजव्याते
खेद चित्ती

वसंत–विभवाचे
आलाप कोकिलाचे
विरस ऐनरंगी
काक–वाचे

सुमन चंपकाचे
दुनियेस वेड त्याचे
परीं भृंग–हृदया
नावडीचे

दाशरथी होई
जनतेस तोषदायी
परी कैकयी त्या
शत्रु बाही

आत्मविभवी डोले
गजराज वाट चाले
परि श्वान भुंके–
भाव बोले

अशुभा शुभ वदती
मांगल्य अशुभ गणिती
न हा दोष कोणा
चित्तरीति

* *

# ९३ : निर्झरास

वनदेवीचा प्राण खरा
तूचि निर्झरा ! तूचि खरा

● ●

ल्हानसा जरि जीव तुझा
रसिक मनाचा तरि राजा
सृष्टिसतीच्या स्नेहाचा
पयपान्हा तू शुचितेचा
गंगा, सागर
तेवि सरोवर
असता भूवर
तुलाच घेई ती पोटी
खिळवी तुजवरतिच दृष्टि

हृदयउदारा सुकुमारा
स्फूर्ति–प्रतिभा–प्रेम–झरा
मनोज्ञतेचा मधुरपणा–
तुझीच उपमा तुझ्या गुणा
तरंग–लीला
अभिनव माला
घालुनी गळा

'खल खल' मंत्रे निनादिसी
सुप्त मनाला जागविसी

मनापासुनी तुजवरती
प्रीति कुणाची परि जगती
कोण तुझ्यास्तव टाकि जिवा
सांग देखिले कधी तुवा
विहंग येती
तुझ्या संगती
तोषित होती
हर्षामधि त्या गुणगुणती
गुणगुणता उडुनी जाती

तहानलेला जीव कुणी
येई तुजजवळी श्रमुनी
सुधामधुर तव स्फटिकजला
पिउनी शांतवि हृदयाला
विश्रम घेता
देइ धन्यता
तुजसि तत्वता
धन्यतेत त्या मग अपुली
वाट धरी तो बघ पुढली

ग्रीष्मराय परि करपाशी
करि जइ निर्जीवन तुजसी
होसि तिरस्कृत जगामधी
जो तो अपवचने बोधी

परंतु सखया !
वैभवि तुझिया
दाविति माया
व्यथित मने तइ त्यामधुनी
काय आसवे गाळि कुणी

★ ★

# ९४ : रामा

दिंडी

हसत येई चंद्रमा देखिताच
हसू लागे ही यामिनी तशीच
चंद्र हासे का ? तिज न मुळी ठावे
एक जाणे ती त्यासवे हसावे

हसे चंद्राचे लोपताच मेघे
तीहि अपुले थांबवी त्याच वेगे
हसे लोपे का ? ये न तिच्या ठायी
दुजे चंद्राविण नेणतेच काही

वर्ण चंद्राचा गौर होइ काळा
तीहि लेई सर्वांगि काजळाला
चन्द्र–विभवी विभवास भोगि श्यामा
विपदि विपदा उपभोगि, धन्य रामा

★ ★

# १५ : पानिपत का घडले

चाल – हा कोण गडावरि चढे

हा भरतखंड देवांचा
जाहला ग्रास असुरांचा
नांदला, शोभला दिव्य मुकुट धर्माचा
आघात त्यावरी होय दुष्ट चरणांचा

'हरहर महादेव' गर्जना
थरकापवि गगना, मना
ती लुप्त होउनी कुठे दिसेना कुणा
दशदिशा पसरल्या 'दीन' 'दीन' वल्गना

ते शूरवीर हाडांचे
खणखणाट शस्त्रास्त्रांचे
पहुडती चितेवरि, लोळ नभी ज्वालाचे
तो प्रकाश उजळी वदन अर्धचंद्राचे

लक्षुमी किंकरी होई
गीता नत कुराण–पायी
हनुवरी शिरींची शिखा, बोल नाचवी
'आ' वासुनि पगडी आकाशाला पाही

यासाठि पानिपत घडे
पैजेचे उचलुनि विडे

ते रणकंदन दे तुझ्या मानसा धडे
ते निरखि भारता ! तुझें तुला सापडे

★ ★

## १६ : विशाल भारत

चाल – लावणी

विशालता ही किती
तुझी रे !
विशालता ही किती
नाहि तियेला मिति
भारता !
विशालता ही किती

क्षाळि पदांबुज सागर
शिरि छत्र धरी हिमधर
अंतरि भागीरथी
भारता !
विशालता ही किती

ती गीता मधु बांसरी
कर्तव्यविमुख सावरी
अलोट शांती, रति

भारता !
विशालता ही किती

श्रीराम, जनक, पशुपती
कर्णार्जुन, हरि सारथी
विमोहि पथ दाविती
भारता !
विशालता ही किती

अंबिकादि विदुला सती
दीपिका चिरंतन पथी
तमि संजीवन द्युति
भारता !
विशालता ही किती

गतकाल तुझा उज्ज्वल
वर्तमान तेजोबल
पुढचाहि तसा निश्चिती
भारता !
विशालता ही किती

* *

# ९७ : अधीर राधा

भूप – दादरा

येत मागुनी
श्याम तुझा थांब जरा
अधिर का मनी

घाई का, जाउ नको
मानसास विसरु नको
धीर सोडुनी

हास खेळ काहितरी
तोवरि गे येइ हरि
ऐक साजणी

कोकिल–रव श्रवणि पडे
ऐक तया ऐक गडे
जाय घडि क्षणी

फुलली ही तोडि फुले
रमवि त्यात मन अपुले
किंतु निरसुनी

सुमनांची करि माला
भक्तिरतीपूजेला
चित्त लावुनी

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 32976 दि: 3/65
क्रमांक 9452 कॉ. क्र. 7245 १८७



वेलींचा हा झोला
घे त्यावरि झोक्याला
मधुर गाउनी

पुष्करिणीलहरिवरी
खेळवि निज भावतरी
प्रेमलेखनी

विविध रंग संध्येचे
बघुनि तुलवि हृदयाचे
कोप विसरी

विरल गगनि घनमाला
फिरवि तेथ जीवकला
सजणचिंतनी

पवन मिरवि सुमसुगंध
त्यांत तरी होइ दंग
समय जाणुनी

गालांवरि दिसत तुझे
संध्येचे रूप दुजे
नवल देखुनी

ऐक गडे थांब जरा
पाउल घे माघारा
अहित नेणुनी

आजचि का करिसि असे
जाणसि गोविंद पिसे !
सगुणलक्षणी

चल चरणा अचल करी
सावरुनी चित्त धरी
क्षण विलोकुनी

तुजजवळी प्राण असे
श्रीहरिचा वेणुमिषे
अधिर का मनी

* *

## १८ : धन्य कुबेर

कुबेर–भांडार
लाभते
मनुजा साचार

स्वताच उपभोग
घेइ तो
सहजधर्मयोग

राजमहालाची
गोपुरे
भूषा जगताची

विशाल आरामे
सृष्टिची
मनोज्ञ आभरणे

मखमल आंथरुनी
लोपवी
मूळरूप धरणी

रूपवंत रमणी
वारुणी
सज्ज सदा असुनी

सहचारीमाला
भोवती
बोल झेलण्याला

रजनी–दिन जेवी
भोगितो
दिन–रजनी तेवी

तुच्छ लेखि जगत
वैभवी
नवल न मुळि त्यात

जीवकोटि असली
कुणी का
धन्यतेत गणिली

● ●

परि दीनोद्धारा
योजितो
कुबेर डारा

झोपडीत राही
दुजाला
राजसुखे देई

गरिबांचा वाली
बोलवी
जगताची बोली

पतित देश अपुला
चढविता
जगी थोरतेला

कुबेर तो धन्य
तयाची
संपदाहि धन्य

जीवकोटि असली
जगाला
वंद्य सर्वकाली

★

# १९ : शिवबा

चाल – पोवाडा

सौभाग्य येइ उदयास कुणाचे
कोण भाग्यवंत
अमूर्त चैतन्याचा गाभा
दृश्य मूर्तिमंत

अग्नीची प्रखरता त्यापुढे
जणू चंद्र–कांति
परम घोर निश्चंद्र निशेमधि
उजळि सूर्य–दीप्ति

भानु तरी उदयास्त तयाला
येई उपराग
तदभिधान परि अखंड तळपे
न शिवे तमराग

सदनी, द्वारी परवशता ती
पिशाच्चिनी नाचे
जीव एकला उज्ज्वल हाचि
ज्वलनी वणव्याचे

सुभग स्वातंत्र्याचे कंठा
जो तो चिरणारा

तिथे न मुळि आश्चर्य तयाचा
कुणी न घे वारा
गुलामगिरिचे असती जेथे
सर्वचि अभिमानी
प्रेमे नरशार्दूलास तेथे
कोण सखा मानी
विरयपंक–वैभवी प्रमोदे
जिथे लोळणारे
आत्मकष्ट–कैवल्यसुख तिथे
कोण भोगणारे
काकांचा कलकलाट अवघा
निनाद करि गगनी
कशी ऐकु ये कुणास तेथे
दिव्य हंस–वाणी
जिवंत प्रेतांचा खच सारा
परछायेमाजी
सजीवतेचा कल्पतरू हा
एकच रणगाजी
देव पळाला, धर्म बुडाला,
भयाणता पसरे
त्या सर्वांची मूस एक हा
तेजोनिधि विहरे
हा शूलपाणि ठाकला । रणमैदानी
चैतन्य-सुधा कणकणा-। वरि शिंपोनी
निर्माण करी निज गणा । चपलेवाणी

मंदिरी देव स्थापिला
निज धर्म- दीप उजळिला
मर्दुनी तिमिर पळविला

नरकाचे नंदनवन
दाविले जगालागुन
वैकुंठ दुजे निर्मुन

महाराष्ट्र उद्धरी, भारता
उज्ज्वल मुख केले
त्या शिवबाच्या संकीर्तनि हे
गीत पुष्प फुलले

★ ★

## १०० : निजलेल्या मुलास

भैरवी – त्रिवट

पहाट झाली अरुण उदेला
उभारिला ध्वज ऊठ मुला
बा ऊठ मुला

जगदीशाला जागविण्याला
प्रसन्न गगनी विहंगमाला
प्रभात-गीता गाइ मुला
बा ऊठ मुला

आळविण्याला अभिरामाला
ललना गाती मंगल लीला
अष्टभावदल फुलांत मुला
बा ऊठ मुला

करी समीरण हळु हळु विझण
उठवायाला नाथ निरंजन
संवाहित मृदु चरण मुला
बा ऊठ मुला

फुले उमलती, हसती, डुलती
परम पाउला गंध वाहिती
मधुर श्वसनी लीन मुला
बा ऊठ मुला

पर्णपताका वातावरणी
डुलविति तरुवर उत्सुकतेनी
सकल दिशा सानंद मुला
बा ऊठ मुला

अरुणावरणी अचल मेघगण
रंजित्र जणु ध्यानस्थ मुनीजन
तमारि यशचिंतनी मुला
बा ऊठ मुला

सृष्टी पसरी वाटेवरती
हरित तृणांकुरि मुक्तावलि ती
शुभागमनि भानुच्या मुला
बा ऊठ मुला

बघावयाला तेजोतरणी
सहस्र नयनी आतुर धरणी
हर्षित हो अणुरेणु मुला
बा ऊठ मुला

काल निशेचा संपायाचा
क्षण आलेला मांगल्याचा
अमोल घटिका हीच मुला
बा ऊठ मुला

आकाशीच्या ज्योति निमाल्या
अवनीवरि त्या बघ अवतरल्या
ओवाळित दिनराज मुला
बा ऊठ मुला

धीरा वीरा रविरायाला
हो सामोरा करि नमनाला
सुवर्ण-जीवनि न्हाइ मुला
बा ऊठ मुला

★ ★

# १०१ : कविता

चाल – लावणी

काय तुझ्या जीवनी
तुजवरी
        कविता ये कोठुनी

भुवनमनोमोहिनी
अशी रे
        कविता ये कोठुनी

        तुज बाधे रवि तापता
        शशिकिरणि तशी शीतता
        तिमिरात येइ अंधता

हेचि न का जीवनी
तुजवरी
        कविता ये कोठुनी

        नभि मेघनाद ऐकुनी
        हुडहुडी भरे त्वन्मनी
        झणि घेशि कर्ण झाकुनी

हेचि न का जीवनी
तुजवरी
        कविता ये कोठुनी

जाईस पदी तुडविसी
गंगेत धूलि निरखिसी
सिंहास वृथा निंदिसी

हेचि न का जीवनी
तुजवरी
कविता ये कोठुनी

रसरंगी मन बावळे
अद्‌भुतपण बघुनी पळे
हीनता सकळ आकळे

हेचि न का जीवनी
तुजवरी
कविता ये कोठुनी

नव नवल वसे ज्या स्थली
शुचि मनोज्ञता ज्या स्थली
रे ! उदात्तता ज्या स्थली

तिथेचि कविता गुणी
जनन घे
भुवनमनोमोहिनी

★ ★

# १०२ : मनोदर्शन

चाल – प्रिया ये निजांकी जाता

कुठे गे कन्हैया माझा कळेनाच काही
जाउ दे तया परि माते मनावीण ठेवी

हरिस्नेह कैसा नसे कल्पना
रुचे कल्पना ती सुखाच्या मना
सुखी कल्पना ती सदा संगती
दिसेना, स्मरेना मनाची गति
कुठे गे कन्हैया माझा कळेनाच काही
जाउ दे तया परि माते मनावीण ठेवी

हरिप्रेम–लाभा नसे भाविले
परी कालयोगे जिवा लाधले
कळेना कसे ते मना रंजवी
जगी एक तेची जिवा लोभवी
कुठे गे कन्हैया माझा कळेनाच काही
जाउ दे तया परि माते मनावीण ठेवी

हरिस्नेह गंगा सुधाजीवनी
चिदानंद सारा गमे जीवनी
हरिस्नेह खेळे मनोमंदिरी
तिथे अंतरीची घुमे बांसरी

कुठे गे कन्हैया माझा कळेनाच काही
जाउ दे तया परि माते मनावीण ठेवी

क्षणापूर्वि वेणु–स्वरूपांतरी
विनापाश मुक्ता रमे वैखरी
कळे तोचि जाई हरी सोडुनी
सवे माझिया तो मना घेउनी

कुठे गे कन्हैया माझा कळेनाच काही
जाउ दे तया परि माते मनावीण ठेवी

हरिस्नेह कैचा मनाचेविना
तयावीण कंठू कसे जीवना
विनाजीव कोणी पुसेना कुणा
तरी भेटवी गे मुकुंदा, मना

कुठे गे कन्हैया माझा कळेनाच काही
जाउ दे तया परि माते मनावीण ठेवी

* *

## १०३ : 'फूल फुले'

फूल फुले
बाग खुले

जन्मोत्सवि पुष्पाचे
दंग विभव यामिनिचे

लक्ष दीप गगनीचे
उजळीले

मातेच्या अंकावरि
सहचरि मृदु वातलहरि
दोलविती हळु हळु करि
रम्य दले

मधुर गुणी ते व्हाया
पाजि सुधा-किरण तया
भुवनमोद शशि-छाया
स्नेहबले

धरणी दे अतुलनीय
रूप, गध मोहनीय
फूल हृदय जणु तदीय
अवतरले

बाग अजवरी उदास
कुणि न विचारी तयास
सुमन-जननि परि जगास
लोभविले

★ ★

# १०४ : वेळवाची काठी

चाल – अभग

काठी वेळवाची । घेउनीया हाती
काढूनीया छाती । चालसी तू

त्याच अभिमाने । कुणासी बोलणे
जगासी पहाणे । डोळियांनी

लाठीकाठीबाज । तुजसी म्हणती
छातीचे तुटती । बंद तुझ्या

परि जाणसी का । आपुल्या मनाशी
किंवा विचारीसी । कधी कोणा

काय तुझे वय । काठी फेरण्याचे
हात तलवारीचे । करावे त्वा

परी तलवारी । घरातुनी जाती
काठी मात्र हाती । राही तुझ्या

★ ★

# १०५ : थांब रे

चाल – लावणी

जाउ नको तू इथुनि मुकुंदा
इथेचि बैस जरा
बोलु दे मजसी काहि जरा

बहुत दिवस जाहले सख्या रे
भेट न होय तुझी
आज ही गाठ पडे सहजी

चाल कुंजवनि बोलत बैसू
कथा साठलेल्या
मनापरि हृदयि कोरलेल्या

रिता होऊ दे घट हृदयीचा
तुडुंब जो भरला
पुढल्या कथा राहण्याला

ममावतेना गोष्ट एकही
सरता क्षण काही
वाटते दुभंग घट होई

कितिक तरी बिनमोली गोष्टी
ठायिच त्या विरती
कितिक वा जन्मताच मरती

तुला न कळती, मला नुमजती
जिणे वृथा त्यांचे
ऐसे होउ नये साचे

पुन्हा केधवा भेट तुझी रे !
सजणा होय मला
उकलिते अताच हृदयाला

लगबग ही का अशी माधवा !
एक तरी एक
राहु दे सगळ्या बहुतेक

माझ्या नयनांतली सावळी
निरखी निज मूर्ति
वदे मज तुझीच का रे ती

★ ★

## १०६ : आवडीचे गाणे

दिंडी

मोगऱ्याची फुलमाळ गुंफिताना
कुसुम घेई मंजूळ गोड ताना
अर्थ कसला गाण्यात मुळि न जाणे
परी तन्मनि बिंबले पूर्णतेने

जवळि खेळाची बाळकृष्णमूर्ति
कुसुम घाली ती माळ तिच्या कंठी
मूर्तिपुढती जोडुनी दोन्हि हात
तेच पहिले गुणगुणे रम्य गीत

काढि मूर्तीच्या गळ्यातील माला
तिला अपुल्या कंठात घालि बाला
बालकृष्णा मग ठेवि खेळण्यात
बसे झोल्यावरि तेच गीत गात

असो कसलेही काम धाम हाती
बसो हिंडो कोठेहि बागडो ती
ऐकता वा बोलता जेवताना
आवडीने ती गाइ त्याच गाना

"हिंद माझा हा देश मला प्यारा
प्रभो ! दुष्टांचा नको तिथे थारा"
ऐकिलेले हे गीत बालिकेने
सुखद झोपेतहि गाइ जाणिवेने

★ —★

# १०७ : उमेदीचा बाळ

चाल – अभंग

पाही आई जाता । देवाच्या दर्शना
लागे बाळराणा । पाठीमागे

आई तुझ्यासंगे । येतो पायी पायी
बसणार नाही । कडेवरी

हात जोडोनिया । मागेन देवासी
राजा व्हावयासी । देई बल

खंड्या होई राजा । हाती धरी सोटा
शक्तिवान मोठा । म्हणोनिया

रोडका म्हणोनी । चाकर करी तो
उभा मी राहतो । त्याच्यापुढे

चाकराचे दुःख । नाही मज माते !
वाईट वाटते । रोडक्याचे

कमावीन शक्ति । चांगली झटून
खंड्याला दावीन । मोठेपणा

देवाच्या दयेने । बलिष्ठ होवोनी
राजाच्या आसनी । बसेन मी

चोर, डाकेखोर । खंडचाला करीन
सोटा लगावीन । त्याच्या पाठी

ने ग मज आई । देवाच्या देउळी
पहा कैशी कळी । खुले माझी

* *

## १०८ : अच्युत

( कै. दे. भ. अच्युतराव कोल्हटकर )

चाल – भूपती खरे तें

धन विभव सुखावरि सुखे तिलांजलि सोडी
कामिनी सुताच्या मायापाशा तोडी

आयुष्य-जीवना स्वजनहितार्थी झिजवी
सर्वस्व सर्वथा स्व-देशचरणी वाही

लेखणी चंचला ज्योति । तळपली
वैखरी शारदामूर्ति । प्रगटली
ती अनल ज्वालास्फूर्ति । विलसली

हृत्कमल जयाचे अफाट गगना दिपवी
तो 'अच्युत' जगती खराच अ-च्युत राही

पारतंत्र्य-नरकामधुनि मुक्त होवोनी
उत्कर्ष-हिमाचलि शोभो भारतजननी

ही ज्वलित मनीषा वसे रोमरोमात
त्यापरीच उज्ज्वल कृती घडे दिनरात

दे स्व–देशसेवक–वेष । जीवना
'प्रभु एक आपुला देश । अन्य ना'
कथियेला हा सन्देश । निज जना

धैर्याचा मेरू परम संकटामाजी
तो 'अच्युत' जगती खराच अ-च्युत गाजी

★ ★

## १०९ : गुणी मैत्री

चाल – लावणी

हा सुगंध ये कोठुनी
आनंद सवे घेउनी

आनंद पथी भेटला
की भेटे हा त्याजला
युति कशी कुठे होउनी
हा सुगंध ये कोठुनी

की सुगंधास शोधिले
आनंदे अपुल्या बले
म्हणुनिच का मैत्री गुणी
हा सुगंध ये कोठुनी

आनंद खेळतो जिथे
की सुगंध राही तिथे
दोघेहि मधुर जीवनी
हा सुगंध ये कोठुनी

की सुगंध ज्या भूतळी
आनंद वसे त्या स्थळी
अभेद सुख संजीवनी
हा सुगंध ये कोठुनी

हा सुगंध मधुसंपदा
एकला दिसेना कदा
आनंद जवळि निशिदिनी
हा सुगंध ये कोठुनी

मन असो कसेही गुणी
हा सुगंध येता क्षणी
आनंद घालि मोहिनी
हा सुगंध ये कोठुनी

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 32906 वि: 3105 ...
क्रमांक 75452 नों. दि. ...

# ११० : मनुजाचे भूषण

धन्य धन्य असशी
मनुजा !
मतिला गुंगविसी

अजब चातुरी तुझ्या जीवनी
अंत न कवणासी
बघता बघता चकित करी तव
करणी जगतासी

लेशमात्र नच कलंक तेथे
गिरिवर उपजविसी
राजपथाला भयाण करूनी
स्मशान गौरविसी

निवडिताच कौटिल्य सरलता
भ्रमात फिरवीसी
स्वातंत्र्याची क्षणात प्रौढी
हवेत उडवीसी

स्वताच दोषाग्नी भडकवुनी
धनी दुज्या करिसी
फासावरि तो लटकत असता
हसित मने बघसी

शिरावरी ज्या हस्त ठेविसी
भस्म होय निमिषी
सांभाळी पण त्याच करा निज
येउ न दे शीर्षी

महाभाग तू सजीवतेचा
भूषण मनुजासी
तुझीच उपमा तुला साजले
धन्य धन्य अससी

★ ★

## १११ : अभियोग

तुझा बन्सिवाला
वाजवी बासरीला

इथेचि अजुनी
बसलिस सजुनी
काय म्हणू याला

तव कथनापरि
वाजवि बासरि
ओतुनि हृदयाला

तुझ्या मनीचे
जे आवडिचे
त्याच गाइ बोला

येशिल आता
म्हणुनी गीता
आळवीत बसला

वाट बघावी
किती तुझी ही
स्वर कंपित झाला

हार गुंफुनी
करिच घेउनी
बघसि गडे त्याला

कुण्या चिंतनी
इथे बैसुनी
विचार तरि कसला

वंचकतेची
छबी मनाची
मुखि न करी लीला

तू निज नादी
तो प्रति नादी
ताल चुके सगळा

मानसगंगा
मधुर अभंगा
तरंग का चळला

अपुला म्हणसी
मग का ऐशी
रीत सुचे तुजला

ऊठ ऊठ गे
पाहू दे गे
स्नेह–माधुरीला

★ ★

## ११२ : हिन्द–माता

(अहिल्याबाई होळकर.)

चाल – कुठे गे कन्हैया

नमो हिन्ददेवी माता अहिल्या गुणाची
करी काल सेवा भावे जिच्या पाउलाची
विनाधार जीवा निज प्रेम छाया
तृषार्तास देई सुधातोय प्याया
रणी वीरभद्रा करी लीन पाया
खरी धन्य ती धन्य हो जन्मुनीया
नमो हिन्ददेवी माता अहिल्या गुणाची
करी काल सेवा भावे जिच्या पाउलाची

रवीचंद्रतारे जिची घेत कांति
बहू भूषणाने तनू भूषवीती
जियेची अशी ही चिरंजीव कीर्ति
स्वयंतेज दीप्ती सदा उज्ज्वला ती
नमो हिन्ददेवी माता अहिल्या गुणाची
करी काल सेवा भावे जिच्या पाउलाची

कुण्याही दिशेला द्विजांच्या मुखाने
जिचे येइ ऐकावया गोड गाणे
असे भारती या जिचे चित्र बाणे
तिला कोण वंदी न सन्मानसाने
नमो हिन्ददेवी माता अहिल्या गुणाची
करी काल सेवा भावे जिच्या पाउलाची

★ ★

## ११३ : अमर नजर

चाल – लावणी

हळुच नजर टाकुनी जगावरि ढगात लपलासी
मोहना ! ढगात लपलासी
मोहना ! काय तुझ्या मानसी

ललित विलासी प्रणय मधुरशी नजर लोपवीसी
मोहना ! नजर लोपवीसी
मोहना ! काय तुझ्या मानसी

नजरेची मोहिनी झोकुनी क्षणात आवरिसी
मोहना ! क्षणात आवरिसी
मोहना ! काय तुझ्या मानसी

नजर तू आपुली जो न उघडिसी जरा
तोच ती लावुनी घेशी गुणनिर्भरा !
हासरी धरा ही होय मुकी सुंदरा !

हृत्कलिकेसी कोमल निमिषी धुळीत मिळवीसी
मोहना ! धुळीत मिळवीसी
मोहना ! काय तुझ्या मानसी

तूचि लपविसी की लपवाया लावी नजर कुणी
मोहना ! लावी नजर कुणी
मोहना ! काहि न ध्यानी मनी

जलधारा वर्षाव होउनी भिजवी ही धरणी
मोहना ! भिजवी ही धरणी
मोहना ! काहि न ध्यानी मनी

आनंदाचे की दु:खाचे अश्रु तुझ्या नयनी
मोहना ! अश्रु तुझ्या नयनी
मोहना ! काहि न ध्यानी मनी

आनंद दर्शवी कलिका ज्या हासती
जल गढूळ बोले दु:खित हृदयस्थिति
ही अशी भिन्नता अश्रु तुझे दाविती

संभ्रमात बहु खोल बुडे मन चित्र तुझे बघुनी
मोहना ! चित्र तुझे बघुनी
मोहना ! काहि न ध्यानी मनी

नजर मोकळी तुझी जगाला प्रमोद सुखसरिता
मोहना ! प्रमोदसुखसरिता
मोहना ! दिव्य सुधा जीविता

आर्त, खिन्न हृत्कमल फुलवि तव नजरेची मृदुता
मोहना ! नजरेची मृदुता
मोहना ! दिव्य सुधा जीविता

चंचल जीवनि नजर उपजवी उज्ज्वल सार्थकता
मोहना ! उज्ज्वल सार्थकता
मोहना ! दिव्य सुधा जीविता

ही नजर वैभवी तुझी जगन्मोहिनी
तू स्वता उदारा ! शक्य न घे लपवुनी
द्वेषांध कुणी तिज टाकि मेघ–बंधनी

नजर अमर परि करुनि बंध दुरि प्रगटवि बघ शुचिता
मोहना ! प्रगटवि बघ शुचिता
मोहना ! दिव्य सुधा जीविता

★

# ११४ : निर्झराचे तीरावर

चाल – अभंग

निर्झराचे तीरी । पाखरांची दाटी
घेती गाठी भेटी । एकमेक

चहू दिशा जणू । गात गात येती
निर्झराचे तटी । एके ठायी

नाना स्वरांमधी । पाखरांचे गाणे
मंत्रघोष बाणे । एकतेचा

कुणा न निंदिती । कुणा न छळिती
स्वप्नी न जाणती । हेवादावा

आपण जगती । निर्मळ मनाचे
तसे जगताचे । समजती

कुणी जल पीती । कुणी जलि न्हाती
कुणी क्रीडताती । स्वच्छंदाने

आनंदनिर्भरे । आपुल्या वैभवी
आपुल्याच ठायी । रंगलेले

पाखरांची लीला । वरुनि रवी ही
तुष्ट चित्त होई । बघोनिया

इतुक्यात तेथे । हळुच ये कोणी
जाळ्यास फेकोनी । गुंतवी त्या

कोठले वैभव । सुख ते कोठले
सारे पालटले । क्षणामाजी

क्षणी परी दुज्या । पाखरे गगनी
आळयास घेवोनी । विहरती

कैसे हे घडले । कोणास ठाऊक
मतीचे खंदक । जाणतील

* *

## ११५ : चमत्कार

चाल – आनंदकंद ऐसा

ऐशा चमत्कृतीला । थारा जगात कुठला
कर दावि विश्वमाला
छेदी दुज्या कराला
ऐशा चमत्कृतीला । थारा जगात कुठला
चैतन्य मालवीती
जडतेस पालवीती
ऐशा चमत्कृतीला । थारा जगात कुठला
पद टाकिताच पुढती
गतिला विरोधितातो
ऐशा चमत्कृतीला । थारा जगात कुठला

रणगीत नावडीचे
रतिगान आवडीचे
ऐशा चमत्कृतीला । थारा जगात कुठला

वनराज तुच्छ गणिती
खर, सूकरा नमीती
ऐशा चमत्कृतीला । थारा जगात कुठला

धिक्कार कस्तुरीचा
स्वीकार मृत्तिकेचा
ऐशा चमत्कृतीला । थारा जगात कुठला

पदि ताडिती फुलाला
शिरि घेति कागदीला[१]
ऐशा चमत्कृतीला । थारा जगात कुठला

पंकात हर्ष मानी
गंगेस भी बघोनी
ऐशा चमत्कृतीला । थारा जगात कुठला

विद्वेष भास्कराचा
प्रेमा मनीं तमाचा
ऐशा चमत्कृतीला । थारा जगात कुठला

रतिरंगि चित्त रंगे
रणरंगि चित्त भंगे
ऐशा चमत्कृतीला । थारा जगात कुठला

---

१ कागदीला = कागदी फुलाला

प्रत्येक सूर न्यारा
एका न एक प्यारा
ऐशा चमत्कृतीला । थारा जगात कुठला

स्वातंत्र्य शत्रु वाटे
परदास्य लोभ दाटे
ऐशा चमत्कृतीला । थारा जगात कुठला

थारा जगात कुठला
ऐशा चमत्कृतीला
जरि आढळे कुणाला । स्थल धन्य ते जगाला

* *

## ११६ : अग्रणी

चाल – काय तुझ्या जीवनी

अनुभवि जे निशिदिनी
तयाला
कवण कथी या जनी

कवण कथी या जनी
कथाया
निसर्ग हा अग्रणी

फल अपक्व मुखि चाखिता
कोठली तिथे मधुरता

अनुभवि हे निशिदिनी
कथाया
निसर्ग हा अग्रणी

झाकुनी नयन चालता
चुकतेच वाट सर्वथा
अनुभवि हे निशिदिनी
कथाया
निसर्ग हा अग्रणी

गगनात सदा विहरता
नाकळेच व्यवहारता
अनुभवि हे निशिदिनी
कथाया
निसर्ग हा अग्रणी

काचेच्या सदनी जिणे
जपुनीच भले राहणे
अनुभवि हे निशिदिनी
कथाया
निसर्ग हा अग्रणी

मोरपिसे सुंदर किती
त्यालाच छान शोभती
अनुभवि हे निशिदिनी
कथाया
निसर्ग हा अग्रणी

* *

# ११७ : निशिगंध

बागेसरी – झंपा

निशिगंध फुलला
आमोद डुलला
सौभाग्य--दोली
  झुलवी निशेला

वायूतरंगी
रजनी शुभांगी
शृंगार नादी
  घे रम्य झोला

नभि कंज नयना
क्षिति चंद्रवदना
निशिगंध दावी
  लीलावतीला

'खल यामिनी' ही
वाणी वदे जी
तत्प्रेम–भजनी
  लावी तियेला

तेजोनिधीही
स्मृतिशून्य होई

गाती निशेच्या
अणुरेणु लीला
निशिगंध सुमना
जी देइ जनना
करि धन्य लोकी
त्या यामिनीला

* *

## ११८ : अंधार

अंधार व्यापिलेला
दीप जवळि तरि नाहि उजळिला
मग दोष हा कुणाला

काही दिसे न डोळा
भ्रम सर्वथा जिवाला
दीप जवळि तरि नाहि उजळिला
मग दोष हा कुणाला

चापल्यनाश झाला
जडता तनू–मनाला
दीप जवळि तरि नाही उजळिला
मग दोष हा कुणाला

जग पारखे जगाला
मन विस्मरे मनाला
दीप जवळि तरि नाहि उजळिला
मग दोष हा कुणाला

चैतन्य ना रुपाला
नच रूप चेतनाला
दीप जवळि तरि नाहि उजळिला
मग दोष हा कुणाला

अनुभाव त्या घडीला
मृत ना जिवंत असला
दीप जवळि तरि नाहि उजळिला
मग दोष हा कुणाला

वरदान हे तमाला
छळणे असे जिवाला
दीप जवळि तरि नाहि उजळिला
मग दोष हा कुणाला

बरि जीव मूढतेला
टळते न हे तयाला
दीप जवळि तरि नाहि उजळिला
मग दोष हा कुणाला

* *

# ११९ : ललिता

(घट रिताच – प्याला भरिला)

चाल – ये धावत कृष्णाबाई

ही कोण कुणाची बाला । ये पाण्याला
मंद मंद टाकि पदाला
गंगेच्या तीरी येई । मंजुळ हृदयी
तैशीच उभी ती राही
अलि विलोल टकमक पाही । दृष्टि स्थिरवी
विसरूनि मानसा जाई

मुखि एकामागुनि एक
करि क्षणोक्षणी अभिषेक
अंतरिचे भाव-विवेक

हृत्तरंग तन्मानसिचे
खेळति साचे । खेळ मजेचे
की तरंग जललहरींचे

ती निसर्ग घडि संध्येची । मधुरित वीचि
खेळती रम्य सृष्टीची
बदलुनी ओज घडिघडिला । तरलति लीला
कर्षिती मधुर हृदयाला
क्षणु मूक चित्रपट सृष्टि । गगनावरती
परिवर्तित होई जगती

तो सौंदर्याची शोभा
तो मनोज्ञ अंतर्गाभा
ती कविची दिव्य प्रतिभा
लोचने स्वतः बघण्याला
अनुभविण्याला । संध्याकमला
की घेइ मूर्त रूपाला

कमरेचा घट काढोनी । करि घेवोनी
त्याकडेच देखे रमणी
हळुहळू तया करि फिरवी । गगनी उडवी
वत्सलता अपुली दावी
तितुक्यांतचि ओठावरली । मधुर मराळी
स्मित-कलिका अस्फुट फुलली

आनंद वाटला कैचा
घट केवळ तो मातीचा
ना तसाच रूप गुणाचा
तुडवितो सदा जो पायी
तो कटि येई । बैसे डोई
की नवल गमे हे हृदयी

जल चंचल शांत जहाले । दर्पणि सजले
प्रतिबिंब नभाचे धरिले
मीनांचे तारे होती । निश्चल असती
उज्ज्वल स्वरूपा घेती
नीलिमा नीलमय होई । संशय येई
जल गगन कोणचे राही

# ११९ : ललिता

(घट रिताच – प्याला भरिला)

चाल – ये धावत कृष्णाबाई

ही कोण कुणाची बाला । ये पाण्याला
मंद मंद टाकि पदाला
गंगेच्या तीरी येई । मंजुळ हृदयी
तैशीच उभी ती राही
अलि विलोल टकमक पाही । दृष्टि स्थिरवी
विसरूनि मानसा जाई

मुखि एकामागुनि एक
करि क्षणोक्षणी अभिषेक
अंतरिचे भाव-विवेक
हृत्तरंग तन्मानसिचे
खेळति साचे । खेळ मजेचे
की तरंग जललहरींचे

ती निसर्ग घडि संध्येची । मधुरित वीचि
खेळती रम्य सृष्टीची
बदलुनी ओज घडिघडिला । तरलति लीला
कंपिती मधुर हृदयाला
जणु मूक चित्रपट सृष्टि । गगनावरती
परिवर्तित होई जगती

ती सौंदर्याची शोभा
तो मनोज्ञ अंतर्गाभा
ती कविची दिव्य प्रतिभा
लोचने स्वत: बघण्याला
अनुभविण्याला । संध्याकमला
की घेइ मूर्त रूपाला

कमरेचा घट काढोनी । करि घेवोनी
त्याकडेच देखे रमणी
हळुहळू तया करि फिरवी । गगनी उडवी
वत्सलता अपुली दावी
तितुक्यांतचि ओठावरली । मधुर मराळी
स्मित-कलिका अस्फुट फुलली

आनंद वाटला कैचा
घट केवळ तो मातीचा
ना तसाच रूप गुणाचा
तुडवितो सदा जो पायी
तो कटि येई । बैसे डोई
की नवल गमे हे हृदयी

जल चंचल शांत जहाले । दर्पणि सजले
प्रतिबिंब नभाचे धरिले
मीनांचे तारे होती । निश्चल असती
उज्ज्वल स्वरूपा घेती
नीलिमा नीलमय होई । संशय येई
जल गगन कोणचे राही

त्यामधिच रंग सृष्टीचा
मिसळला राग संध्येचा
तो दृश्यभाव हृदयाचा-
अवलोकुनि मनि बावरली
तनु थरथरली । विचलित झाली
अनुरंजित बाला गाली

जलपृष्ठावरि नेलेला । घट पाण्याला
ती तसाच उचली त्याला
घट रिताच अपुल्या ठायी । तरि शिरि घेई
जलपूर्ण जाणुनी हृदयी
द्रुतगती निघे गृहि जाया । जणु भेटाया
सागरास गंगा जाया

पाऊल टाकि दारांत
तो तृषित पुढे व्रजनाथ
नाचला हरिख नयनांत
कृष्णाच्या करिचा प्याला
जलि भरण्याला । स्वकरी धरिला
घट रिताच, -प्याला भरिला

★ ★

# १२० : दिन–रजनी

दिंडी

खेळ खेळुनि मनसोक्त रम्यतेचे
चोज पुरवी स्वच्छन्द मानसाचे
श्रांत रजनी विश्रमा घेइ जेव्हां
दिनाला ती जागवी हळुच तेव्हां

विभव अपुले आपुल्यासवे नेई
आत्मसिंहासन सुखे तया देई
तया मार्गी आपुला नको त्रास
म्हणुनि रजनी एकांति करि निवास

राग बारी येताच दिन निशेचा
कोष उघडी उत्फुल्ल जीवनाचा
कणकणी तो चैतन्य ओतुनीया
नव स्फूर्ती उपजवी त्रया ठाया

अनुभवी दे गतकाल वर्तमानी
भविष्याच्या स्वप्नांत गुंगवोनी
जगद् रीती जगतास दाखवोनी
निशेला दे अधिराज्य कर धरोनी

जरी एकच साम्राज्य उभयतांचे
जरी करणी, उपभोग भिन्नतेचे

तरी गंगेसम दिव्य मने दोन्ही
एक राज्यासनि राजती म्हणोनी

★ ★

## १२१ : काल-वसा

न धरि भरवसा । हा
उचित काल सामोर येउनी
होइल अपुलासा
हा । न धरि भरवसा

दिन येई निघुनी जाई
काल परी ठायिच राही
बोलसि मग हा काल कसा

द्वेष न त्या उगिच कुणाचा
स्नेह तसा नाहि कशाचा
दीपापरि तद् हृदय–वसा

अचलपणे किति बाहियले
तुजसि दिसे जीवित सरले
स्थली त्याच तो काल पिसा

★ ★

वसा=नियम

# १२२ : वसंत

काफी – झंपा

मृत जीवनी
कुठली कला
वदती कला
ती मृत्कला

अनमोलता
गंगाजला
रवि शोषिता
कुठली कला

शृंगारिली
कितिही शिला
नच चित्कला
कुठली कला

परशासनी
नरशार्दुला
अजरूप ये
कुठली कला

दृढ बंधनी
धर्मा, कुला

जिव पारखा
कुठली कला

मृत जीवनी
मधु एकला
की तोडणे
पदि श्रृंखला

★ ★

# १२३ : विहार

चाल – लावणी

ह्या मनोज्ञ नीलांबरी
करि विहार वागीश्वरी
चंद्र सुधा संजीवनी
धरणीवरि अभिसिंचुनी
बघतसे मौज सुंदरी
विश्वाची कविता गुणी
चांदण्या तीत गुंफुनी
रसिकास दावि माधुरी
उतरुनी हळुच जीवनी
कुमुदिनीसवे खेळुनी
हो विलीन रूपांतरी

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32906 वि: 3/01
क्रमांक 958 नों. दि:


# १२४ : आज पहा

गुंग कशाला दिनी कालच्या
दिन आजचा पहा रे !

मदांधतेने बाहुबलाचे
भुवनवंद्य ते देव स्वर्गिचे
गुलाम करिसी निज द्वारिंचे
तुवा दशमुखा ! दिनी कालचे
दिन आजचा पहा रे !

जडमूर्ती पाषाण भूवरी
अवमानुनि त्या जगत धि:करी
तरंगती ते जली फुलांपरि
पाहि मदांधा ! जरा क्षणभरी
दिन आजचा पहा रे !

* *

# १२५ : गीतग्रहण

चाल – फुले वेलीची

केविलवाणे । गासी का मधुपा ! गाणे·

वैभव तुझिया रे गाण्याचे
भान ऐकता हरावयाचे
मुग्ध मनाला हसवायाचे
मग का ऐसे । गाणे तव टाकि उसासे

अफाट भवती मधुजलसागर
शुष्क रहावा परंतु नरवर
जलासाठि तळमळे तदंतर
तसे या समयी । तव गानी दिसुनी येई

संजीवन जे तुझ्या गायना
तेचि तुला रडविते या क्षणा
नवल खरोखर जगा–जीवना
उलट ही रीति । आजचि का तुझिया गीती

गुलाब जाई जुई मालती
रम्योद्यानी विकसित होती
सुगंध–कमला मोही जगती
परी तव गीत । जणु स्मशानिचे संगीत

भाग्यसमयि या अशा मिलिंदा !
पारावार न तुझिया मोदा
हेवा वाटे परगुणवृंदा
तुझे परि गाणे । शोकान्वित भेसुरवाणे

कुणिच काय रे सुमनवल्लरी
तुजशि न बोले स्नेहवैखरी
बघता तुज ती मुग्धता वरी
म्हणुनि का गासी । अनुकंपा उपजविण्यासी

तुला देखिता मुक्या होति का
गीत-श्रवणी कोमेजति का
नको स्मरण तव मनि भाविति का
शोध हा घेई । आक्रंदुनि काहि न होई

★ ★

## १२६ : जमीन अस्मान

अस्मान राहि कोठे
धरणी तशीच कोठे
पथ एक जीवनाचा

जनकापरी अमीर
शुक वा असो फकीर
पथ एक जीवनाचा

तम चंड भानु हारि
लघु दीपही निवारि
पथ एक जीवनाचा

हृदया गुलाब मोही
बकुळीहि तोषदायी
पथ एक जीवनाचा

संध्येस स्नेहकांति
उदयास तेजदीप्ति
पथ एक जीवनाचा

खेळे न लोभ जेथे
नच सान थोर तेथे
पथ एक जीवनाचा

★ ★

## १२७ : रोहिणीचंद्र

श्लोक

तू माझा म्हणसी परंतु करणी ऐशी तुझी राजसा
वाटे की मजला उगीच तुजसी वाहीयले मानसा
बोलाया मनसोक्त बोल मनिचे मी येइ भेटावया
तो तू मात्र हसोनिया हसविसी ना बोलता लीलया

माला गुंफन सोडुनी लगबगा निःश्वास हा कोंडुनी
हासाया नच ठाकले इथवरी वाणी मुकी ठेवुनी
तूझ्या हास्य-तरंगि बोल विरले चित्तातले गोडसे
हासावेच अता अपेक्षित असे तू थांबवीसी हसे
मालेचे नच गुंफणे बघ तसे ना बोलणे, हासणे
इच्छा, हेतु लयास जाइ अवघा राही अता प्रेक्षणे
पाहावा मुखचंद्र हा तरि तुझा त्या रोहिणीचेपरी
हे ऐसे करमेघ झाकिति तुझे दृष्टीस माझ्या प

* *

## १२८ : विमानी जाऊ

चाल – उद्या बघ जाते

विमानी जाऊ । गगनीची शोभा पाहू
इतुके तारे कसे लटकती
कसे तयाना मेघ झाकिती
पळवी कैसे पवन त्याप्रती
विमानी जाऊ । गगनीची शोभा पाहू
लहान मोठ्या जरी चांदण्या
कलह तयामधि कसा होइना
घालविती त्या कसे जीवना
विमानी जाऊ । गगनीची शोभा पाहू

मेघामाजी वीज लपोनी
अवसर मिळता उदर फोडुनी
दावि लकाकी कशी गर्जुनी
विमानी जाऊ । गगनीची शोभा पाहू

वाऱ्यासंगे वेड्यावाणी
मुळि न भागता अवघ्या गगनी
बागडती ढग कसे निशिदिनी
विमानी जाऊ । गगनीची शोभा पाहू

कसे ढगामधि जल खेळतसे
चपलाग्नीही तेथे निवसे
एकजीव त्या कोण करितसे ?
विमानी जाऊ । गगनीची शोभा पाहू

सान थोर शशि–रूप होतसे
देइ कुणी की स्वता घेतसे
ग्रास तयाचा कोण करि, कसे
विमानी जाऊ । गगनीची शोभा पाहू

गोलाकारी रविशशि नुसते
कांतिमान् परी रूप शोभते
स्वयंसिद्ध की कुणी वितरि ते
विमानी जाऊ । गगनीची शोभा पाहू

सप्तरंगि नभि इन्द्रधनू ते
कसे जन्मते, कसे राजते
कोण मिसळवी भिन्न रंग ते ?
विमानी जाऊ । गगनीची शोभा पाहू

निश्चल म्हणती ध्रुवताऱ्याला
स्थिति ही कैसी रुचे त्याजला
निष्क्रियतेचा की तो पुतळा !
विमानी जाऊ । गगनीची शोभा पाहू

सुखे नवग्रह पंचांगातुनि
जाती येती परक्या सदनी
चाल कशी ही त्यांच्यामधुनी ?
विमानी जाऊ । गगनीची शोभा पाहू

प्रकाश–छाया वसती केवी
एकच किंवा विलग दोन्हिही
स्थिती कोणती सदैव राही ?
विमानी जाऊ । गगनीची शोभा पाहू

फुगा बोलती आकाशाला
प्रलयानिल तो वाहि सदाला
तरिही अजुनी नाही फुटला
विमानी जाऊ । गगनीची शोभा पाहू

देवाजीचे कोडे भुवनी
पाहुन घ्यावे तया जीवनी
जरी सुटेना कुणास अजुनी
विमानी जाऊ । गगनीची शोभा पाहू

* *

# १२९ : संजीवनी

चाल – अभंग

आम्ही नाही हो ! कोणाचे
आम्ही आमुच्या देशाचे

धन्य आमुचा हा जन्म
आम्ही भारत–संतान

चैतन्याची संजीवनी
जागी होई झोपेतुनी

गुलामीचा हा अंधार
झाला जाणा हद्दपार

नाशी एक कचबाळ
बलवंत दैत्यकुल

कच किती भारती या
आज दिसती डोळिया

कर्मवीर होती सारे
पळे विपत्तीचे वारे

दधीचिचा आत्मत्याग
आज भारताचा भोग

त्याचे वज्र होवोनिया
निवारीत परछाया

वज्र तीक्ष्ण व्हाया जो तो
त्यागयज्ञी उडी घेतो

त्यागभोगयज्ञज्वाला
उजळीत भारताला

करा करा उत्सवाला
जन्म मिळे उल्हासाला

गुढ्या तोरणे उभारा
वाजे दुंदुभी नगारा

विजयाची गुणखनी
अभिषिक्त महाराणी–

'आनंदा'ची बोले वाणी–
भारताची संजीवनी

★ ★

# १३० : जीवनसंगीत

चाल – लिहू कविता कोणती

प्रेम तारी । स्नेह वारी
लोभ हारी जीवना

गुलाब हृदयी प्रेम उपजवी
इतर सारे विसरवी

मर्त्य जगाचे चरणातलिचे
भान मुळिही राहिना
प्रेम रंगता स्नेह जन्मतो
पुष्प–कीर्ती वानि तो
परी तयाभवतिच्या कंटका
स्नेह दावी लोचना
धाव घेइ मन सुमन-मीलनी
स्नेह चित्ती बहरता
स्पर्शिताच त्या कंटक-छळना
अनुभवी ये त्या क्षणा

★ ★

## १३१ : काजवा

चाल – होय संतार तरु

घोर अंधार जरि अवनिवरि मातला
काजवा हीन तरि दिसतसे विलसला
काल तमनर्तनी
घोर घन गर्जनी
शांत मन ठेवुनी
प्रगटवी निज बला

जीव साना किती
काय त्याची कृति
पूर्व-पश्चिम मिति
अनुभवी ये तुला

शांति, धृति सोडुनी
वीरवर गहन तमि
होति निष्प्रभ मनी
नियम नियमातला

तिमिर-भीती कशी
मुळि न का त्याजसी
काय तन्मानसी
थोर त्याहुनि कला

भानु-अनुशासनी
जीवना झोपवुनि
जीवज्योती गुणी
दावि तिमिरा खला

जीवकण चिमुकला
राहि जरि एकला
श्रमुनि तरि व्याकुला-
उजळि तो भूतला

सुखद दिनि लोपतो
संकटी चमकतो
धन्य खद्योत तो
धन्य करि जननिला

* *

# १३२ : सुकलेले फूल

कृतघ्न समजू नको मला
तुजसि कसा विसरेन फुला!
जननीपासुनि
दूर होउनी
वेचुनि रे! निज जीवाला
तोषविसी मम हृदयाला

रुचिर तुझे मधु रूप अता
नसे नसू दे नच चिंता
परंतु घडिभर
माझे अंतर
मोही जी तव रूपसुधा
अमर काल तो धन्य सता!

तुझ्या सुगंधे तुज त्यजिले
कालकराने तुज वरिले
परि मन्मानस
परिमलि मधुरस
काही क्षण तरि गुंगविले
दृश्य जगाला विसरविले

तुझ्या वैभवी मनिषेने
जीवन पोहे स्नेहगुणे

दीन समयि या
सखया ! तुझिया
अवगणुनी उन्मत्तपणे
काय सोडु तुज अभिमाने

तुझी संगती अल्प घडे
अक्षयरूपी हृदयि दडे
सुखस्मृती ती
येता पुढती
अजुनि तिथे मम चित्त जडे
बोल, कसा मग विसरु पडे

* *

## १३३ : माझा वसंत

चाल – आनंदकंद ऐसा

माझा वसंत गेला । रुसुनी वसंत गेला
गेला निघोनि गेला
घेवोनि वैभवाला
ही रुक्षता जगाला । माझा वसंत गेला

कुणि बोलिले न त्याला
अपमान हो न कसला
नकळे रुसे कशाला । माझा वसंत गेला

सुमने सुकोनि जाती
सु-फले कुजोनि गळती
नच अंकुरी तजेला । माझा वसंत गेला

लतिका, तरू मलूल
हरपे मनोज्ञ झूल
उपयोग इंधनाला । माझा वसंत गेला

सरितातडागवसती
जलबिंदुवीण नुसती
नच लोचनीहि उरला । माझा वसंत गेला

हिरवा न रंग गवसे
हत पांडुताच विलसे
नच ठाव रक्ततेला । माझा वसंत गेला

अवकाशि धूळ सारी
ये अंधता विषारी
विभ्रांत मानसाला । माझा वसंत गेला

चंडाग्नि भानु वर्षे
संतप्त भूमि भासे
नच चैन जीवनाला । माझा वसंत गेला

जणु वात अग्निदीप्ति
सर्वांग पोळिताती
ज्योत्स्ना त्यजी गुणाला । माझा वसंत गेला

छाया विरूनि जाई
वचनात शांति राही
सर्वत्र गोंधळाला । माझा वसंत गेला

झोपेस काळ नेई
पुरती न जागृतीही
आंदोलने जिवाला । माझा वसंत गेला

कथु काय, बोलवेना
बघु काय, पाहवेना
मत्प्राण कंठि आला । माझा वसंत गेला

त्यावीण दुबळा मी
जणु राम नाहि रामी
धि:कारि विश्व मजला । माझा वसंत गेला

मी माय पाडसाची
आक्रंदते कधीची
कुणि भेटवा तयाला । माझा वसंत गेला

* *

## १३४ : सर्वात्मना

विश्वसुमन फुलले
आनंदभुवन हसले

सुगंध दरवळला
सर्वत्र तोचि झाला

अचल मानसाला
हलवोनि देइ झोला

जागृत रवि येई
संमोह नष्ट होई

भवति तेजगंगा
दावी तरंगरंगा

सोऽहम्-मति निवसे
सर्वात्मनाच विलसे

★ ★

## १३५ : जीवन

चाल – भूपती खरे ते',

बुडबुडा जलाचा नोहे जीवन भुवनी
विकु नको तयाला कवडि मोल घेवोनी

या जगद् रंगभूवरती जीवन-लीला
चंद्रार्क तोवरी उजळि सुप्त तेजाला

हा देह विनाशी राही । वाटले
तरि जीवन चिरशुभदायी । त्यातले
अचिरासी चिरता येई । त्यामुळे

जीवनी अतुल जी संजीवनिची शक्ति
प्रत्येक घडिस ती नवजीवन दे जगती

★ ★

# १३६ : दीप आणि पतंग

यमन – त्रिवट

दीपाभवती । पतंग फिरती
काय तयांच्या । नकळे चित्ती !

एकेकाप्रति । नजरेपुढती
भस्मसात् करी । दीपज्योति

तरि न सोडिती । दीपसंगति
अढळ श्रद्धा । दीपावरती !

दृष्टिस येवो । दीप कुठेही
त्याच्याजवळी । धावत येती

हर्षोन्मादे । वेडे होती
उड्या पटापट । त्यावरि घेती !

तमात वसति । का नच करिती ?
अकाल मरणा । का स्वीकरिती ?

तमी अमरता– । लाभ निश्चिती
का नच ठावे ? । खुळेच दिसती !

अजरअमरपण । तमासन्निधी
तरी असावी । दृढतम भक्ति

तमा उदारा । परि अवगणिती
दृष्टि न टाकिति । मुळि ओझरती

चिरंजीवता । मधुर त्यागिती
भीषण मृत्यु । कवटाळीती !

दीपस्नेहा । धन्य मानिती
क्षणसहवासी । मरुनी जाती !

पुनरपि जन्मति । पुनरपि ध्याती
तयाच दीपा । नवलच जगती !

* *

## १३७ : एक रीत

खपुष्प–लाभ न शक्य कधी
कशास वेचिसि तनमनधी

कुणास लाधे आजवरी
शोधि असा जगि एक तरी

दृष्टीपुढती
पुष्पे हसती
सुकुनी जाती

अगम्य, दुर्लभ प्रिय तुजसी
रम्य स्वतांचे अवगणिसी

* *

# १३८ : आईचे गाणे

चाल – अभंग

झोपाळी बैसुनी । झोके घेई आई
प्रेमे बाळा गाई । हसवाया

‘ तुझ्या आवडीचे । गाणे ऐक राया !
रडू नको वाया । उगा राही

प्रल्हाद लहान । सत्य रक्षे मना
अनृत ऐकेना । पित्याचेही

गाधीजाचा यज्ञ । रामाने रक्षिला
राक्षस मर्दिला । अल्पवयी

कंस आप्त तरी । खल अनिवार
कृष्ण करी ठार । बालपणी

साना शिवराय । महाराष्ट्रदेशी
जिंकोनी रिपूशी । राजा होई ’

ऐकोनी हे गीत । राजस हासला
वाजवोनी टाळ्या । ताल देई

बघुनी ही लीला । माय आनंदली
चुंबियेले गाली । हर्षभरे

★ ★

# १३९ : चित्रदर्शन

कशास बंधन रुचे तुला
विहंग तू तर जिवातला
नभात फिरणे
तरुवरि बसणे
जली खेळणे
तुझ्या मनीषेवरि सारे
तुजसि न काही नडणारे

गोड लकेरी गाण्याची
आनंदित तव हृदयाची
ती ऐकाया
प्रभातसमया
रवि ये उदया
म्हणुनिच लाधे जगतास
चैतन्याचा जगदीश

भक्षाया तुज मधुर फळे
तृषा शमे नव रुचिर जले
मनोहारिणी
मधुर भाषिणी
सुशील रमणी
विश्रांती तुज लाभाया
निशा अवतरे जगती या

नकळे का नच भूमिवरी
करिसी वसती तरूशिरी
त्रिकाळ–लीला
रंजविण्याला
तुझ्या मनाला
सुवर्ण–सदना अवगणिसी
तृण–मंदिर ते प्रिय तुजसी

इहजन्मी वा गतजन्मी
विहगा ! कृति तव ये कामी
घडो कशीही
ती तवकरवी
कुणा न ठावी
तरि परिणामी चित्र दिसे
मांगल्याचे हे ऐसे

* *

## १४० : व्रज–बासरी

चल वाजवी व्रज–बासरी
थांबलासि का असा हरि
गुंगलास तू कुण्या विचारी
तेचि असे जग तूहि तुझ्यापरि

सरल आपुल्या पथा धरी
चल वाजवी व्रज-बासरी

शंकित बघणे निष्फळ भुवनी
निंदितील वा वंदितील कुणि
कशास चिंता त्वदंतरी
चल वाजवी व्रज-बासरी

तेचि जग तरी छाया पालट
चित्रित होई तिथे मन:पट
पाहि जरा स्थिति गती खरी
चल बाजवी व्रज-बासरी

गंगाजल आवडे कुणाला
पंकप्रेमा ज्याला त्याला
त्याच कल्पनी निरंतरी
चल वाजवी व्रज-बासरी

सुंदर वदना बघता नयनी
गीत कसे ते घेति न ध्यानी
ओवाळिति मन मुखावरी
चल वाजवी व्रज-बासरी

चलिति होइ कुलशील तरुण मन
अशा गायनी गणिती भूषण
हीन रुची न क्षिती तरी
चल वाजवी व्रज-बासरी

गर्दभ-गीती डुलती भुलती
त्याच गायना जन गौरविती

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 32766 वि: 3105
क्रमांक 2552 नों. दि. 7/3/66



श्रवण झाकिती पिकस्वरी
चल वाजवी व्रज-बासरी

चैतन्याचा दाता भास्कर
तुच्छ लेखुनी झोपिति दिनभर
गोड मानिती विभावरी
चल वाजवी व्रज-बासरी

अशी तरळती रुची आजला
नाचवि भ्रम-किन्नरी जगाला
घडण मनाची विषापरी
चल वाजवी व्रज-बासरी

तुझ्या वेणुची गीतलकेरी
तीच एक जगि विश्वोद्धारी
घुमवि नाद झणि दिगंतरी
चल वाजवी व्रज-बासरी

★ ★

## १४१ : चांदीचा चेंडू

चाल – अभंग

आई ! चांदोबाला । सदा दाखवीसी .
परी नच देशी । एकदाही

आज तरी देई । चेंडू खेळण्याला
आवडे मजला । भारीच तो

छान त्याचे रूप । छानसा आकार
निळ्या पाण्यावर । तरंगतो

चांदीचा का चेंडू । किंवा अंगावरी
मुलामा रुपेरी । चढवीला

घडीभर आई ! त्याच्याशी खेळेन
पुन्हा दे ठेवून । त्याच्या ठायी

नाही फोडणार । चांगला ठेवीन
एकदा पाहीन । उडे कैसा

पहा आई ! चेंडू । ढगानी झाकिला
अंधार पडला । सर्वभर

माझिया बेताला । त्यानी ऐकियेले
त्याच्या भोती झाले । वाटे सर्व

दिसू नये कोणा । नेऊ नये कोणी
म्हणोनी झाकोनी । ठेविले का

चेंडू दिला नाही । आधीच मजसी
आता खेळायासी । घेऊ काय

★ ★

# १४२ : तो सह्याद्रि

वीर्यवर्धना, शौर्य भूषणा, तपःसिद्धिदाता
महाराष्ट्राच्या परम वैभवा ! अनंत गुणवंता !

पारतंत्र्यपंजरातुनी महाराष्ट्र करुनि मुक्त
श्रमपरिहारी निद्रा घेई गिरिवर निश्चित !

कणाकणातुनि चैतन्याचे झरे पाझरीती
त्याच जला प्राशुनी मावळा प्रगटे रणमूर्ति

परंतु गिरिराजया ! संप्रती तुझ्या सुप्तिकाली
तुझ्या नामसंकीर्तनि कसल्या लीला चवचाली !

चैतन्याचे झरे बुझवुनी चिन्ह लोपवीती
प्रणयपंकसर तिथे निर्मुनी पाट वाहवीती

शत्रुनाशनी, राष्ट्ररक्षणी 'गुंता' सोडविती
स्वैराचरणी त्याच ठायि तव मतिला गुंतविती

सिंहगर्जना दरिखोऱ्यातुनि प्रतिक्षणी घुमती
उच्छृङ्खल रति-कूजन तेथे हौसे नादविती

तरुणी आलिंगुनी नाथकटि खड्ग खोवि जेथे
आलिगाया सुखे छेदिती राष्ट्रकंठ तेथे

तुझ्या दर्शने झुलती वृत्ती घे स्थिर उज्ज्वलता !
स्थिरता लोपुनि नष्ट तरलता अजि येई बघता

निज राष्ट्राची उघडी काया श्रमुनि झाकियेली
परप्रकाशनि तिज वंचुनि करि नंगा नाच कलि

राष्ट्रसंस्कृती उद्धाराया आत्मार्पण करिती
राख तिची फासाया भाली नवी मने झटती

ऊठ गिरिवरा ! झोप पुरे ही, तनू भ्रष्ट झाली
निजात्म्यास वाचवी, लगबगा भ्रष्टतेस जाळी

★ ★

## १४३ : नरकेसरी

( दे. भ. बॅरिस्टर मोरोपंत अभ्यंकर यांचा स्वर्गवास )

वीर नरकेसरी झुंजता संगरी
झोप घेई सुखे काल-अंकावरी

जीव जगतातला
जीवनी रंगला
स्मरणपद पावला
हिंदजीवांतरी

आर्य भू माउली
निशिदिनी पूजिली
तिजविण न भाविली
वस्तु दुजि प्रिय जरी

पारतंत्र्यानली
माय भू साउली
सर्वथा पोळली
  जाणिले अंतरी

अग्निसंहारणी
झुंज घेई रणी
धैर्यमेरूमणी
  चूर्ण वज्रा करी

भोगि विपदा किती
विसरि ना स्थिति गति
निग्रही, भक्ति रति
  सूर्यकांती परी

मन तनू संपदा
हृदयिची शारदा
वाहिली तत्पदा
  एक रूपा धरी

चंड ती गर्जना
भिववि शत्रू मना
उज्ज्वला घोषणा
  कितुपटला हरी

वीर–मृत्यू न हा–
घात सर्वस्व हा
सुभगता की महा
  हाय ! हरपे तरी

दीप्त रवि मावळे
गाढ तम कोसळे
दीनपण विखुरले
मध्य देशांबरी

मुक्त सिंहासनी
हिंद शोभवि कुणी
तरिच गुणकीर्तनी
स्मृति तयाची खरी

★ ★

## १४४ : झोपडी आणि प्रासाद

झोपडी दरिद्री नको क्षुद्र तू मानू
तो गगनचुंबि प्रासाद नको तू वानू

झोपडीत वसुनी मुनिवर चाणक्याने
प्रासाद मिळविले धुळीस एकसरीने

सामर्थ्य, युक्ति मति झोपडीत जी राही
नच लेश तियेचा प्रासादी कसल्याही

झोपडीत तळपे सदैव रवि तेजाने
प्रासादी भीषण काळोखाचे ठाणे

संसार निर्भयी, आनंदी झोपडिचा
भयपूर्ण कुटिल संसार प्रासादाचा

उद्धार जगाचा झोपडीच करि एक
प्रासाद तयाला बुडवि खोल डोहात

★

## १४५ : चांदण्या आणि फुले

मावळलेला रवि बघुनी
धावत धावत ये रजनी

● ●

फुले उमलती बागेत
फुलति चांदण्या गगनात

फुले देखिती गगनाला
बघति चांदण्या धरणीला

पुष्पे वाऱ्याने डुलती
तसे चांदण्या चमचमती

हिरव्या वेलीवरी फुले
चांदण्यास आकाश निळे

फुले चांदण्या पाहोनी
आनंदित जग होइ मनी

मौज होय परि एक पहा
नवलाची ती गोष्ट महा

पहाट होता पूर्वेला
रजनी जाई सदनाला

भिउनि चांदण्या लपतात
फुले हसोनी डुलतात

* *

## १४६ : ध्रुवास

भैरवी – केहरवा

एकच ठायी ध्रुवा ! कशाला
कसा न येई वीट जिवाला

संध्येचे चल तरंग अभिनव
नव्या मधूचा अलि गुंजारव
गोड फलांचा विभिन्न आसव
का नच मोही तुझ्या मनाला

क्षणोक्षणी नव मौज लुटावी
नव नवतेची रुचि चाखावी
जन्माची सार्थकता व्हावी
का नच वाटे तुझ्या मतीला

घडिघडि घे जग नव रूपाला
विविध रसांच्या नवनव लीला

त्यातचि सारा जन रमलेला
का नच येई तव दृष्टीला

तिन्ही त्रिकाळी भिन्न भूषणे
जीवनास सजवुनी मिरविणे
कला कुशलता तिथे गुंफणे
जादु कशी ही गम्य न तुजला

लेश दिसेना मधुप–रसिकता
रोमरोमि तव भरे रुक्षता
जन्म ध्रुवा ! तव वृथा सर्वथा
डोळे भरुनी पाहि जगाला

एकच मार्गी जीवन रोधुनि
दुज्यास 'ध्रुव'–आदर्श होउनी
लाभ काय तुज स्वता जीवनी
अजुनी दावी सजीवतेला

तुझी अढळता खुळी आजला
मुळि न विचारी कुणी तियेला
आज मोल जगि तरंगतेला
खुळचा ध्रुवा ! तू तरि पुरा खुळा

* *

# १४७ : बटूस

( नागपूरच्या सायन्स कॉलेजचे अध्यापक रा. रा. बाबूराव मोघे यांचे चिरंजीव पुरुषोत्तम याच्या मौंजीनिमित्त )

श्लोक

नाना शास्त्रकलाविशारद जरी झालासि तू भूवरी
लोकी थोरपदावरी विलसुनी सन्मान्य होसी जरी
सारे प्राप्त सुखोपभोग तुज वा दारिद्र्य–पंकामधी
शीला सोडु नको तरी बटुवरा–कुर्यात् सदा मंगलम्

* *

# १४८ : संधिकाल

कुठे चालली रजनीराणी, काय सरे काल
म्हणुनिच दिव्य स्वरी गाइ का विहंग चंडोल

खलस्वामिनी कुटिल जालि निज गुंगवि चैतन्य
द्विज गायनि त्या दूर पळे तन्मानसमालिन्य

प्रसन्न मन आंदोलनि देखे जीवसृष्टि सारी
निजांश झणि कणकणी स्फुरुनिया जडता संहारी

विमुक्त चैतन्याचे चित्रा रंगवि विश्वदली
पूर्व दिशा–चैतन्यरमेची अपूर्व ती केलि
चैतन्याने रसरललेला असा संधिकाल
माध्यान्ही चैतन्यचंडता–तुलवेना तोल !

★ ★

## १४९ : बरसात

चाल – अभंग

सरीवर सरी
किती कोसळिती
धरणीवरती
मिति नाही

स्वर्गीच्या ह्या तारा
पृथिवीचे दारी
जणु वायुकरी
थडकती

अरुणाचे राज्य
स्वर्गधरेठायी
जाणीव ती देई
काय जगा

घडिघडी कधी
कोणता आदेश
नवलविशेष
साम्राज्याचे

नको तिथे होई
अखंड वर्षाव
बिंदूचा अभाव
हवे जेथे

सुखी साम्राज्याची
अगम्य ही रीत
मुळी नसे खंत
राजयाला

मुखी टवटवी
आढळे सुरम्य
तरी अंतर्याम
तप्ताग्नीचे

असा हा पाऊस
कितीही वर्षला
तरी तृषार्ताला
त्याचे काय

नृपा ! दुजा भाव
लोपुनी जाईल
तदा सुखवील
दर्शनही

★ ★

# १५० : माझे जीवन

ही शरद् पोर्णिमा तुला वाटते गोड
करि माझा परि हिरमोड । कान्हया !

ही जाइजुईची फुले तुला रिझवीती
परि मजला तापद होती । कान्हया !

हा मंद सुगंधित वायु तुला आल्हादी
परि मजशी तो अपवादी । कान्हया !

हे सुधाचंद्रिकाछत्र तुला संमोही
परि उदास मन्मन होई । कान्हया !

ही अखिल सृष्टिसंसार रम्य माधुरी
रे ! प्रमुदित माझ्या मनास आतावरी
हासवी डोलवी सन्मित्राचेपरी

पण लागताच हे तुझे चरण या ठायी
साराच उलट गुण येई । कान्हया !

या क्षणावरी मी एकलीच रे ! राही
किलि काळ सुखाचा जाई । कान्हया !

मद् हृदयमंदिरी तुझी मनोमय मूर्ति
कशि हासत खेळत होती । कान्हया !

ते स्मितमुखिचे मधु कुजबुजणे दोघांचे
प्रेक्षणे मुग्ध नयनांचे । कान्

निःश्वास नाचवी वसंत-जीवन-लीला
लावि अम्हा डोलायाला । कान्हया !

वाजीव भाविता बासरीस वाजवी
थांबीव बोलता हसत हसत थांबवी
या अशा निरामय मंजीवन-वैभवी

दोघेच अम्ही जणु निखिल विश्वसंसारी
अमुच्यात विश्व संचारी । कान्हया !

रे ! तुझा जोवरी नव्हता परिचय मजला
सहवास तोवरी रुचला । कान्हया !

हृत् कोषि जोवरी न तुझी उमटे छाया
तोवरी दर्शनी माया । कान्हया !

जोवरी कळेना काय तुझे जगि मोल
तोवरी चरण बिनमोल । कान्हया !

तू कोण जगाचा कळे पूर्णतम जेव्हा
ही आस दुरावे तेव्हा । कान्हया !

वद खुशाल मजला कृतघ्न अपुल्या मनी
जग हसो अशी ही कृति माझी देखुनी
कुणि करो बहिष्कृत दुःशब्दा बोलुनी

या दृश्य जीवनी मजसि लाभले माझे
सर्वस्व तेचि मज माझे । कान्हया

★ ★

# १५१ : ज्योति

चाल – कशास आलासी

विझवु नको ज्योति
पामरा !
विझवु नको ज्योति
या निबिड तमामधि स्वयंप्रकाशे असु दे लुकलुकती
घनदाट पसरला मेघवृंद अंबरी
चांदण्या निमाल्या सगळ्या त्याभीतरी
आजला तशातचि अवसेची शर्वरी
वर, खाली, वरती
पामरा !
वर, खाली, वरती
अनुभवी गडद अंधारच सारा, हीच एक तरती

बघुन तिमिर संचार
पामरा !
बघुनि तिमिर संचार
हे ठायि ठायिचे अधम निशाचर करिती स्वैराचार
लपवुनी मुखा जे दडती कोठे तरी
अवसर न सांपडे मिरवाया पळभरी
जे जिवंत असुनी जीवित मेल्यापरी

तेचि अता अनिवार
पामरा !
तेचि अता अनिवार
थैमान घालुनी असह्य दुर्दुम दाविति किति बडिवार
ज्योतिस विझवोनी
पामरा !
ज्योतिस विझवोनी
करु नको वृथा तू हसे आपुले भुते नाचवोनी
ही तिमिरपिशाच्चे असोत ताळयावरी
नागवे नाचणे राहो सीमांतरी
यासाठि अवतरे ज्योति विश्वमंदिरी
सजीव ती म्हणुनी
पामरा !
सजीव ती म्हणुनी
ही विशाल धरणी अपुल्या ठायी निश्चल, दृढ अजुनी
जगी भूतयोनी
पामरा !
जगी भूतयोनी
साम्राज्य तमाचे, टपुनी वसते, कधी होय म्हणुनी
मारिता फुंकरा मालविले ज्योतिला
साराच जाण रे अंधकार मातला
तू कुठे स्वता मग कळेल का हे तुला
संगति परिणामी
पामरा !
संगति परिणामी

बुजलाहि त्या सवे भूतरूप ये त्या वातावरणी

गाढ तिमिर कितिही
पामरा !
गाढ तिमिर कितिही

ही ज्योतिच जगती कधी कुणाचे पाउल नच चुकवी
आणिते रम्यता तिमिरासहि उज्ज्वल
करि निराश जीवन आशामय मंगल
आयुष्यनिधीचे चित्र दावि निर्मल

ज्योति सतत राही
पामरा !
ज्योति सतत राही

म्हणुनीच दुमदुमे थोर मनुजता तुझी जगावरि ही

विफल यत्न होती
पामरा !
विफल यत्न होती

ही ज्योति अजवरी कुणी विझविली, आणि जरा चित्ती
किति अजिक्य मानव तिथे हात टेकिती
किति निर्दय दानव शरण्य तिज बोलिती
दर्शनीच थरथर भये भुते कांपिती

पाड तुझा जगती
पामरा !
पाड तुझा जगती–

तू अहंमन्यसा गर्जसी तरी मशक तिच्यापुढती

आवरि फुंकर ती
पामरा !
आवरि फुंकर ती
विझणार न तुज ती कुण्या प्रयत्ने कधिही कल्पांती
कोठुनीहि उसने जीवन तिजसि न मिळे
नच कुण्या दयेने तज्जीवन पोषिले
ती स्वयंजीवने अवनीतलि पाजळे
अखंड ही ज्योति
पामरा !
अखंड ही ज्योति
तू पामर केवळ कोठुनि तुजला कळेल ही रीति

हट्ट न हा बरवा
पामरा !
हट्ट न हा बरवा
हट्टांत हवी सुष्टता तरिच रे ! शोभवि तो जीवा
हा हट्ट तुझा तरि अमंगले सजविला
मग कसा मनोरथ जाइल तव सिद्धिला
क्षण थांब, तुझ्या तो करिल अंध दृष्टिला
मिणमिणती ज्योति
पामरा !
मिणमिणती ज्योति
निज बालरूप टाकुनी विराजे तरुण सूर्यदीप्ति

★ ★

# १५२ : भाऊबीज

दिंडी

शत्रु संहारुनि सुवर्णा लुटावे
सुवर्णे त्या भगिनीस भूषवावे
बिजेचा हा क्रम सतत पूर्वजांचा
ग्रंथि वाची सत्पुत्र भारताचा

गृही असलेल्या सुवर्णा विकावे
उदर मध्यान्ही कसेही भरावे
दिनक्रम हा संप्रती आज त्याचा
बिजेचा तो सण जाहला स्मृतीचा

सुवर्णाचा निधि सकल लुप्त झाला।
गुंजभरही नच कुठे दिसे डोळा
दृष्टि टाकी चौफेर भारतात
तोहि भासे कोरडा ठणठणीत

कालच्या त्या सुखकल्पनी मनाला
रंगवीता क्षण विसरुनी स्वताला
तोच भगिनीचे पत्र करी येई
दृष्टिपुढती अंधार सर्व होई

स्थिती ऐशी देखुनी त्रस्त झाला
झुगारुनि दे शेवटी निराशेला

सदन सोडी बोलुनी–'होय गाजी
तरिच भगिनीची भेट अता माझी'

★ ★

# १५३ : दिवाळीचे गाणे

भारतदेशी कुठे दिवाळी
दिसे चालली भीषण होळी

त्या होळीच्या प्रचंड ज्वाला
भडकुनि भिडती आकाशाला

असा कोपरा नसे एकही
त्या आचेने जीव न दाही

शंखनाद सर्वत्र कोंदला
ठाव कोठला मधु गीताला

लत्ताप्रहरे विझवुनि होळी
होइल तेथे मराल–केलि

दिवाळिचे संगीत मधुर ते
येइल तेव्हा ऐकायाते

★ ★

# १५४ : संशोधक

आज हवे जे जगताला
तेच न लाभे मुळि त्याला

● ●

नवीन तारा नभि गवसे
तेज रवीहुनि अधिक वसे
अजि दृष्टिस परि नच दिसते
शत वरुषानी दिपविल ते
विज्ञानाची
या शोधाची
शास्त्रज्ञांची
महती गाई जग सारे
जिकडे तिकडे हे वारे

उदार होउनि जिवावरी
गेला उत्तर ध्रुवावरी
मध्यबिंदु शोधुनी तिथे
रोवी अपुले निशाण ते
त्या जयनादे
अंबर कोंदे
नितांत मोदे—

साहस, संकट जग वाणी
अपुरी वाटे तैं वाणी

क्रूर श्वापदे निबिड वन
जिथे न जाई रवि–किरण
तिथे प्रवासी प्रवेशुनी
तडाग देखे नयनानी
छाया छबिने
कल्पकतेने
घे धैर्याने
म्हणुनी त्या नरवीराते
डोईवरि जग नाचविते

पाच सहस्त्रे वरुषांची
रास सापडे वीटांची
जो तो धावे निरखाया
संस्कृति अपुली स्थापाया
त्या इतिहासी
त्या चित्रांशी
गुंग मानसी
जगभर दवंडी वार्तेची
कसरत चाले तर्काची

उदर रिते हे अन्नाने
भरेल कवण्या मार्गाने
नष्ट होउनी परतंत्र
लाधे कैसे निज तंत्र

ग्रंथ संग्रहालय, ठा...
अनुक्रम 3290 ... वि: ...
9451 ... नों दि ...

दुर्बलावरी
कुरघोडी करि
सबल भूवरी
टळेल कैसे निश्चित हे
तेच न शोधिति शोधक हे

● ●

ज्ञात्याचे बल, मति विवशी
वाया जाई आज अशी

★ ★

## १५५ : विज्ञान

कोण रंगवि ह्या इन्द्रधनुष्याला
कसे गगनी शोभे, न तुला त्याला
येइ अवचित हे कसे, कोठुनीया
परत कैसे जातसे कुण्या ठाया

सूर्य-किरणी राहती सात रंग
विलग न दिसे कसलाहि एक रंग
परी सातहि ते स्पष्ट आढळीती
दावि विज्ञानी स्वीय रम्य रीति

एक बाजुस दिनमणी पूर्ण कांति
अवतिभवती सामोर मेघपंक्ति

मेघसिंचन होताच काल काही
नभी चित्रांकित इन्द्रधनू होई

सान थोरा आवडी पहायाची
तेधवा तरि ती मौज कौतुकाची
एकमेका दाविता पाहताच
लुप्त होई हळुहळू चित्र साच

खरे हेची विज्ञान मधुरतेचे
शास्त्र नतरी आजचे संहराचे
त्यात मिळवुनि भांडार कुबेराचे
[१] पारितोषिक दे पुढति शांततेचे

* *

## १५६ : निशास्वामिनीस

निशास्वामिनी !

तव सुगंध विकसुनी
दरवळोनि कणकणी
खुलवि यामिनी

रजनीचा जणु विलास
भासवि हा जीवनास
गे विलासिनी

---

[१] नोबल प्राइज.

जाइल ही मधुरता
येइ तिथे चारुता
　　चित्तमोहिनी

येता त्या परिसरी
पद थबके झडकरी
　　भान हरपुनी

कसलेही मन असो
वृत्ति कशी मनि वसो
　　जाइ गुंगुनी

गतघडीस विसरवी
प्रिय भविष्य नुपजवी
　　अचल दोलनी

विहरतो कुठे तदा
काय मन:संपदा
　　ये न कल्पनी

　　निशास्वामिनी !

★ ★

# १५७ : नच मनिषा तरि-

नच मनिषा तरि लावु नको
सुमनतरूला स्पर्शु नको
परंतु कोणी आवडिने त्या-
लावियले तरि तोडु नको

नच मनिषा तरि पाहु नको
वास फुलांचा घेउ नको
परंतु कोणी उत्कंठेने-
हुंगियले तरि हासु नको

नच मनिषा तरि फेकु नको
मधुर फलांना भक्षु नको
परंतु कोणी संतोषाने-
भक्षियले तरि रोषु नको

नच मनिषा तरि लक्षु नको
गिरिशिखरावरि चढू नको
परंतु कोणी धृत हृदयाने-
त्यावरि चढता द्वेषु नको

नच मनिषा तरि चालु नको
पाउल अपुले उचलु नको
परंतु कोणी पुढती जाता-
इर्षेने पद ओढु नको

नच मनिषा तरि हालु नको
गादीवरुनी उठू नको
परंतु कोणी भक्तीसाठी–
प्राण वेचिता निंदु नको

★ ★

# १५८ : रिता रांजण

चाल – सबसे राम भजन

ही हीन दीन भूमाता
काही खंत वाटु द्या चित्ता

आज जगाचा धनी वैश्य तो तसा सुवर्णाचा
सुवर्ण सिंहासनी बैसुनी खेळ खेळतो अकलेचा

ज्या राष्ट्रामधि सुवर्ण नांदे तेचि सकल श्रेष्ठ
घडवोनी शृंखला तयाची आवळि जगताचा कंठ

रुचेल त्या बोलावरि नाचवि निर्धन जगताला
खंत मुळी ना त्या नाचामधि मुकले सर्वस्वाला

भारत म्हणवी सुवर्ण–भूमी, कथा सुवर्णाच्या
परी आजला कथा भारती भीषण दारिद्र्याच्या

सुवर्ण गेले धुवुनी, रांजण रिते, भंगलेले
गुलाम होऊनि सुवर्ण-भारत 'दरिद्र भारत' पद वरिले

परक्याचे हितबोल गोड तरि ती परकी वाणी
विसंबता तिजवरी अंधपणि अहित खचित परिणामी

दुर्गति–पंकी आधिच भारत भवति निशा घोर
कृतिच स्वताची उषा दाखवी उत्कर्षाची थोर

काय सर्वथा पंगु जहाला वैश्य भारताचा
ही लाचारी म्हणुनि तया ये विषय जगा हसण्याचा

शूर वीर तरि वैश्या हाती वैभव कीर्ती देशाची
रित्या रांजणा भरूनि वाहु द्या, शपथ तुम्हा मातेची

★ ★

## १५९ : मुलाचे प्रश्न

### (१)

चाल – अभंग

सूर्याचा प्रकाश
चंद्रास लाभतो
परी सूर्याला तो
कोण देई

सागरा मिळतो
प्रवाह नदीचा
परी सागराचा
जाई कोठे

पाने, फुले फळे
वाऱ्याने हालती
कोण वाऱ्याप्रति
हालवितो

देव्हारीचा देव
बैसे एके ठायी
वावरतो केवी
जगभर

कितीका पुशीले
सांगेना कोणीही
विचारितो आई
तुज आता

★ ★

## १६० : मुलाचे प्रश्न

## (२)

चाल – अभंग

पडे रणांगणी
समर्थ रावण
भित्रा बिभीषण
राज्य भोगी

सुष्ट पांडवाना
घडे वनवास
दुष्ट कौरवास
सुखनिधी

थोर शिवाजीला
बोलती लुटारू
लुटारूचे तारू
मिरवे का

एक निष्ठे होई
देशाचा कैवारी
दुजा द्रोह करी
तयाचा का

कितीका पुशीले
सांगेना कोणीही
विचारित्तो आई
तुज आता

* *

# १६१ : वसंताची गोडी

चाल – तरुण कुलिन

वसंत सृष्टीचा । अवतरे । वसंत सृष्टीचा
मधु सुगंध भुवनी, निनाद विहरे गगनि गायनाचा
अणुरेणु निसर्गी वसंत–वैभवि नटे
अंतरंग अवघे वसंतमय चोखटे
सगळीच वसंती रुची, लक्ष्य पालटे
वेष वसंताचा । चराचरि । वेष वसंताचा
सौंदर्य मधुरता खेळ खेळती वसंत–रागाचा

प्रमोद किति अनिला । होतसे । प्रमोद किति अनिला
संचार करी बेहोष होउनी डुलवि विश्वकमला
फुलवुनी फुला चौफेर गंध उधळुनी
कणकणी उपजवी प्रसन्नता जीवनी
दुर्मुखता अवघी शिशिराची नाशुनी
दिनकर, चंद्रकला । मनोरम । दिनकर, चंद्रकला
लेवुनी भूषवी करी उज्ज्वला वसंत–कांतीला

असाच हा येई । अयनि प्रति । असाच हा येई
हे असेच गीतक उचंबळोनी तयास कवि गाई
जे चित्र एकदा घालि मना मोहिनी
ते पुन्हा दुज्याने नच टाकी मोहुनी
हा अखिल जगाला अनुभव रात्रंदिनी

वसंत-गोडी ही । एक जगि । वसंत-गोडी ही
जी अवीट हृदया, तीच माधुरी पुन:पुन्हा देई

* *

## १६२ : शिपाई

प्रकाशित राही
असाच दीपा !
प्रकाशित राही
अजुनि न सरली घोर निशा ही
अतावरी अंधार निवारणि
वेसी अपुले जीवित जाळुनि
उज्ज्वलतेचा धन्य शिपाई
प्रकाशित राही
शत्रु तुझा तम वेढुनि तुजला
टपुनी बैसे भक्षायाला
तरि नच होसी विचलित हृदयी
प्रकाशित राही
कालपवन तुज मालविण्याते
झटे वेचुनी सर्वस्वाते
निश्चल तरि चिर ज्योति तुझी ही
प्रकाशित राही

थांब जरा उजळेल अता दिन
सुखे संपवी मग निज जीवन
जन्मुनि सार्थक तुझेचि होई
प्रकाशित राही

दिनी दिनासह कितिक तळपती
दिन मावळता कुणि न जागती
तूचि निशी जागता विदेही
प्रकाशित राही

* *

## १६३ : घोडा आणि स्वार

( तान्ह्या पोळ्याच्या दिवशी लाकडी घोडेस्वार पाहून एक लहान मुलगा आपल्या आईस विचारतो- )

घोडयावरि स्वार । असुनीही
घोडा हाकित नाही

स्वार तरी कसला । नुमताच
बसुनी राहि उगाच

कशास हा बैसे । ऐटीने
सजुनी पोषाखाने

लगाम तो धरुनी । टक लावी
सामोरचि का पाही

घोड्या वरुनी का । पडण्याचे
वाटे भय मनि त्याचे

● ●

घोड्यावरि दादा । बसुनि कसा
पळवी वाऱ्यासरिसा
भय नच मुळि वाटे । जोरानी
चाबुक त्याला हाणी
ठाण्यावरि घोडा । दिनराती
कितितरि करितो मस्ती
दादाविण दुसऱ्या । कोणाही
जवळी येउ न देई
ठेक्यावरि नाचे । गोड किती
दोन पाय करि वरती

● ●

परंतु हा घोडा । थोडेही
मान पाय नच हलवी
कान न टवकारी । फुरफुरणे
तसेच ना खिंकाळणे
खांबापरि अपुला । निज ठायी
स्वस्थ उभा तो राही
पायाला दोरी । बांधुनिया
लागे त्या पळवाया

मग घोडा, स्वार । दोघेही
धावति कैसे आई !

★ ★

## १६४ : माझा घोडा

आला आला जवळी आला
सारेजण व्हा तुम्ही दूर
उडेल नातरि तुम्हावरुनि तो
आकाशामधि चौखूर

कालच अणिली त्याच्यासाठी
बाजारातुनि ही काठी
लगाम हिरवा त्यास लाविला
खोगिर लाल नवा पाठी

ठाण्यावरुनी अताच त्याला
काढुनि झालो मी स्वार
स्वारि कराया शत्रुवरी हा
निघे घेउनी तलवार

बहूत मस्ती करितो म्हणुनी
हाति घेतला चाबुक हा
अडतो, बुजतो, धावत सुटतो
मार दिला त्या किती पहा

हात दुखाया लागे माझा
घोडा ऐसा हा नामी
म्हणून म्हणतो दूर क्षणी व्हा
जखमी नातरि व्हाल तुम्ही

★ ★

## १६५ : शारदे ! तुझी कला

शारदे ! तुझी कला । विश्वकमल चित्कला

रवि दिनी विराजतो
यामिनीत लोपतो
परि तुझ्या कलांगणी । तो सदैव तळपतो

तरुण जीव जीवनी
जीर्ण हो क्षणोक्षणी
तो तुझ्या कलागृही । नित्य तरुण मधु खनी

ज्या विचारिना कुणी
हेळनाच प्राक्तनी
ते कलासनी तुझ्या । वंद्य, अमर गुणमणी

जे जगात गाजले
मिरविती कुतूहले
ते तुझ्या कलेविना । नामशेष जाहले

जी अपार मंगला
जी अनंत निस्तुला
ती जगात या कुणी-। शारदे ! तुझी कला

★ ★

## १६६ : महाराष्ट्रा ! तुझी सत्य कथा

श्रीशिवबाचा, श्रीतिलकाचा ऐस कुणाचाही
स्वातंत्र्यास्तव प्राण वेचिले, सत्यकथा बघ ही

सगे सोयरे आप्त पिता ही स्वातंत्र्यापुढती
लोटुनि दुरि शिव फडकवि झेंडा रायगडावरती

परवशतेच्या भीषण जीवनि कंठुनिया काळ
स्वातंत्र्याची ज्योत पेटवी परी तिलक बाळ

परवशतेच्या तिटकाऱ्याचा वन्ही भडकविला
त्या योगामधि दुर्धर साही हालअपेष्टेला

जात पाहिना, गोत पाहिना, तू-मी विसरोनी
स्वातंत्र्याच्या रणसंग्रामी सकल बंधु मानी

"भारतिच्या कवण्याहि जातिला लाभो स्वातंत्र्य
दास तयाचा होउनि राहिन," हाच एक मंत्र

स्वातंत्र्यास्तव झटणारे जे स्नेही तेच बरे
स्वातंत्र्याते विरोध करिती तेची शत्रु खरे

अंत्यज राहो, ख्रिश्चन राहो, मुस्लिम जरि असला
स्वातंत्र्याची ज्योति देखुनी कवटाळी त्याला

जात कोठली, धर्म कोठला, संस्कृति ती कुठली
सर्वचि एका परवशतेच्या उखळामधि दडली

धर्म, संस्कृति, जाति, थोरता कुठे गुलामास
जगतातलि गाळीव हीनता तया कपाळास

सुज्ञाचे कर्तव्य कोणते अशा निरयपंकी
हया कशाला कुणी ज्योतिषी कथायास हे की

एक दिलाने, एक बलाने, एक प्रयत्नाने
हतदैवाचे करंटपण हे दूर घालवीणे

श्रीतिलकाचे, श्रीशिवबाचे पूज्य महाराष्ट्रा !
सहस्त्र नयने आजि पहा तू तुझ्या महाराष्ट्रा

गादीवरुनी स्वतंत्रतेच्या करी वल्गनेला
एकनिष्ठ जो पाइक त्याचे ओढी चरणाला

'लढनेकू तो मेरा भाई खानेकू हम् तो'
ऐन समयि ही वृत्ति आपुली प्रगट मात्र करितो

एक बलाचा, एक मतीचा भंग, भेद करूनी
पिशाच्चापरी उड्या मारितो शौर्या बडबडुनी

स्वता होइना, दुजे साहिना ऐसा हीनमति
आज तुझा महाराष्ट्र भासतो हिन्दभूमिवरती

स्वातंत्र्यास्तव मर्दपणाने झुंजात्रे ज्याशी
विसरुनि ते करि प्रेमभराने संमीलन त्याशी

स्वातंत्र्यास्तव अरिशी लढता प्राण वेचि अपुला
माळावरि बैसुनी हासुनी उपहासे त्याला

स्व-कर्मिरत जो दोषहि घडती तयाच्याचि करवी
गुण अवगणुनी दोष पिंजणे सुज्ञ रीति नच ही

गुणदोषान्वित मानव-जीवित मर्त्य जीवनात
कशास कथणे सृष्टिनियम हा ठावे सकलास

घडविल्याविना नच केव्हाही घडे राष्ट्र-मूर्ति
प्राणाहुति जो देइ तपस्ये तोचि निर्मितो ती

काकाची भूमिका अहर्निश अहंपणे घेई
अहंपणे सुजनता लेखितो तुच्छ सर्वदाही

स्वताहुनी त्या मुळी दिसेना हिंदभक्त कोणी
निष्क्रिय राही परी सर्वथा स्वता सुखस्थानी

मर्त्यलोकिची जीवन-ज्योति विझता तिलकाची
मर्दपणा गाजवी कोणता, विचार तू त्यासी

बुद्धिकुशलता, बलप्रबलता वेचुनि एक मने
सदैव स्वजनांशीच भांडणे हेचि एक जाणे

राष्ट्रमूर्तिचा, परंपरेचा, राष्ट्राचा घात
ईर्षेने इच्छिणे, शोधणे किती अधःपात !

त्यातचि अवघे शौर्य धैर्य ते, तीच राष्ट्रभक्ति
वेळि अवेळी डंका बडवी, तिळमात्र न खंति

पूर्वकाळ लोपला, लोपली पूर्व साधनेही
नव्या घडीची नवी साधने तेजे लखलखती

हिंदभूमिची अटक कटक अजि सीमा नच राही
जपान, इस्तंबूल, विलायत येथवरी जाई

तेथवरी शह बसेल जेव्हा समस्त हिंदाचा
होइल तेव्हा तो जगताचा विषय वंदनाच।

एकाकी महाराष्ट्र कधी ना स्वतंत्र व्हायाचे
भारत–भाग्योदयी गुंफिले भाग्यसूत्र त्याचे

गत कीर्तीचे केवळ गाणे गाउनिया कोठे
निज स्थिती आजची पालटे नकळे त्या वाटे

त्या शिवबाचा, त्या तिलकाचा, तुझिया नामाचा
अभिमाने 'जय' घोष अखंडित करितो नित्याचा

मान तुझा की विटंबना ही अगा महाराष्ट्रा !
पूस आपुली शपथ घालुनी नव्या महाराष्ट्रा

★ ★

## १६७ : बाळकृष्ण

चाल – अभंग

पारिजातकाचे । झाड आंगणात
बाळ ये धावत । फुलांसाठी

छोटीशी टोपली । चिमुकल्या हाती
फिरे झाडाभोती । दुडुदुडु

फूल गळलेले । दिसेना एकही
झाडाकडे पाही । आर्ततेने

टाचा उचलोनी । हात उंच करी
दूर किती तरी । फुले वाटे

बाळ पृथ्वीवरी । फुले आकाशात
कैसा त्याचा हात । लागे तया

फुले पानोपानी । रिकामी टोपली
दृष्टी वर, खाली । सारखी ती

इतुक्यात कोणी । झाड हालविले
बाळ आनंदले । खूब हासे

डोईवरी फुले । टोपलीत फुले
हातीपायी फुले । सर्वभर

फुलांची जमीन । बाळहि फुलांचा
एकरूपतेचा । सोहळा तो

मोठचा मोठियाने । आवाज काढोनी
सोडी दणाणूनी । घर सारे

उडवि टोपली । वरती गगनी
टाळ्या वाजवोनी । नाचू लागे

थइ थइ थइ । पाहुनी तो नाच
गमे तदा सांच । बाळकृष्ण

★ ★

# १६८ : विपंख

श्रमशी का वाया
कशास शिणविसि काया

अफाट ह्या आकाश–मंदिरी
तुच्छ दृष्टि टाकीत भूवरी
विहार करणे स्वैर मनापरि–
विसरि अता राया !

वरचे हे आकाश दूर बरि
तुझ्या धरेच्या गिरिशिखरावरि
पदस्पर्शही तुझा यदुपरि–
विसरि अता राया !

इतुकेच न रे ! तुझियापुढती
ऐश्वर्ये निज तरुवर डुलती
सुखद तयांची तुजसि संगती–
विसरि अता राया !

शैलशिखरि, गगनांगणि, तरुवरि
स्वच्छन्दे विहरणे कुठवरी
पंख तुझे बलवंत तोवरी–
विसरि अता राया !

स्व–जनघात, कौटिल्य निरंतर
दृढतर ऐशा पक्षबलावर

योजुनि घेशी महति आजवर–
विसरि अता राया !

पंख विहंगा ! गळुनी पडती
जाइ त्यासवे तुझीहि शक्ति
मात्र कल्पना तुला सोबती–
रिझवि अता हृदया

★ ★

## १६९ : मुक्तगीत

चाल – तेथेच उभी की आले

मंगल प्रभाती उठुनी
गासी तू मंजुळ गाणी । द्विजवरा

त्या गीतनादलहरींनी
चैतन्य भरे रसरसुनी । द्विजवरा

कोणता अर्थ त्या गानी
नाकळे कुणाला अजुनी । द्विजवरा

ते गीत
गूढ संगीत
भाव इंगीत
कोणती जाती । कोणती जाती
नुमजे तरि हर्षित जगती । द्विजवरा

आजचे हिंदचे गीत
जणु मूर्त काव्य संगीत । द्विजवरा
किति गोड शब्द रसभरित
हृद्भाव शब्द शब्दात । द्विजवरा
कल्पना अगाध उदात्त
भव्यार्थ अल्प बोलात । द्विजवरा
कळवळुन
घोळघोळून
गाइ रंगून
मधुर कंठाने । मधुर कंठाने
परिणाम उलट परि जाणे । द्विजवरा
जरि अर्थहीन तव गाणे
करि जागृत सारी भुवने । द्विजवरा
सार्थशा हिंदच्या गाने
झोपतात सारी भुवने । द्विजवरा
हो प्रसन्न जग तव गाने
दुर्मुखी हिंदच्या गाने । द्विजवरा
का असे
नसे जग पिसे
एक गमतसे
मुक्त तव गीत । मुक्त तव गीत
परतंत्र हिंदचे गीत । द्विजवरा

★ ★

अनुक्रम 3२७६ दि: ०३।०१
क्रमांक २५५१२ नों दि ७।२५६६

# १७० : तुला काय वाटते

तुज हसू नये वाटते
        बहू दिवस जाहले भेटुनी
        म्हणोनि तुज या क्षणी
कन्हैया ! हसू नये वाटते

आगमन तुझे लोपले
दिन किती तया जाहले
        हसे न बरवे असे
मनाची लाज मना वाटते

हासावे तरि कासया
कुणि कुणास रे ! लोकि या
        एकचि मारे मणी
ओविले जीवसूत्रि वाटते

जरि बळेचि हसता तुला
कोपशील तू निर्मला !
        हवेत मनिषा उडे
मीहि मग वाऱ्यावरि वाटते

रमवावे तव मानसा
पथ हाचि खरा उचितसा
        सदैव चंचल इथे
स्थिरावे चरण तुझे वाटते

‘उल्हास इथे जो वसे
तो कुठे न अपणा  दिसे’
        असेच तुजला पिसे
जडावे मनोमयी वाटते

पण उपाय नच सापडे
नावरेच मन बापुडे
        कथी, ‘हसुनि घे अता
पुढति हा न ये समय वाटते’

का वाव असावा उगा
हसण्याते म्हणुनी जगा
        कळे न मजला कसे
कन्हैया ! खुळी तरी वाटते

हा हार तुझ्या रे ! गळा
जो फुलांविणे आगळा
        कुणीहि बघता क्षणी
हसेल न काय तुला वाटते

        कन्हैया ! काय तुला वाटते

* *

# १७१ : मामा आणि भाचा

रांजण भरला पाण्याने
देखियले हे चंद्राने
हळूच उतरे हौसेने
पोहु लागला मौजेने
नभ हे मोठे
खेळायाते
न पुरे ज्याते
इवल्याशा ह्या रांजणि तो
कैसा आनंदे रमतो

बाळ धरुनि कर ओढोनी
आणी सकला त्या स्थानी
हसणाऱ्या त्या चंद्रास
दाखवि, बोलुनि मग त्यास
'जैसा गगनी
तैसा रांजणि
पहा लोचनी
कैसा अणिला हा राणा
गगनीचा गोजिरवाणा'–

'आकाशातिल चंद्र जरी
मजसाठी ह्या येइ घरी

माया ममता मजवरती
असे तयाची बहु मोठी
सदा सांगते
आई माते
खरे असे ते
चांदूमामा तो माझा
लोभाचा मी त्या भाचा'

* *

## १७२ : गा रे

गा रे! गाणे
तार रवाने
मूक दिसे रे! तव वाणी
काय बोलिले तिज कोणी

येइ बोलता
बोले चलता—
वाऱ्यावरि तो बोल पळे
गाणे श्रवणी तव खेळे

कुठे न बघता
गाणे गाता
निमग्नतेने गा गाणी
रुचे सुचे जी तुज वाणी

श्रवण करो कुणि
न करो भुवनी
कशास तुजला ती चिंता
तुझिया ठायी उज्ज्वलता

मानस ज्याचे
उदात्ततेचे
वृथा, अन्यथा तद्वाणी
स्वप्नी न कधी ये चुकुनी

तुझीच गाणी
अमृत वाणी
चिरंतनाची त्या जोडी
सुधा तयातुनि घे गोडी

ऐक पाखरा !
ध्यान दे जरा
तुझेच सगळया जगतीत
विमुक्त मानस-संगीत

जरि नच गाया
इच्छिसि राया !
दिधली ज्याने तुज वाणी
त्यासाठी तरि गा गाणी

★ ★

# १७३ : 'कट्यार मानेवरी'

कट्यार मानेवरी
तुझ्या ही
कट्यार मानेवरी

कट्यार मानेवरी
चरणि ही
स्वतंत्रता-सुंदरी

आवरी आपुली नखे
करि विलास तिजशी सुखे
परि ध्यान ठेवि अंतरी
निरंतर
कट्यार मानेवरी

देखुनी रूपमोहिनी
रे ! जाउ नको हुरळुनी
हुरळलासि तू क्षण जरी
गय न करि
कट्यार मानेवरी

चुंबाया तिजलागुनी
इच्छिसि तरि घे वाकुनी
हो मान जराशी वरी
रंगवी
कट्यार मानेवरी

विसरि अता नभि पाहणे
भूतलिच दृष्टि खिळविणे
हा भाव त्यागिता शिरि-
नाच करि
कटयार मानेवरी

ये तुझी तपस्या फला
जाणुनी जीव हर्षला
बेभान हो न पळभरी
तुझ्या ही
कटयार मानेवरी

गज, शार्दुल, सिंहा भवी
नच चतुर जसा खेळवी
स्थिति तशी घडिस या पुरी
भारता !
कटयार मानेवरी

ही स्वतंत्रता-सुंदरी
मायेची छाया-तरी
मृगजला न् जलमाधुरी
जाण रे !
कटयार मानेवरी

ती कटयार ये तव करी
तइ फलित तपस्या खरी
परतंत्र हिंद तोवरी

जोवरी
कटचार मानेवरी

* *

# १७४ : धनुर्धरीस

( महाभारतातील जयद्रथवधाची कथा सर्वप्रसिद्ध आहे. त्यातल्या अगदी अखेरच्या प्रसंगावरील हे गीत आहे. )

अस्तमान झाला
भानु हा । जाइ पश्चिमेला
आवरि तो अपुला
लाविला । बाण धनुष्याला
अग्निकाष्ठ घेई
प्रतिज्ञा । विफल तुझी होई

● ●

बोलावा बोल
होइना । कदापि जो फोल.
सोडावा बाण
कदापि न । जो ये परतून
पाउल टाकावे
पुढति जे । मागुति नच यावे

● ●

वृथा वीर होसी
धनुष्या । स्कंधी मिरवीसी
मिथ्या वच वदसी
शक्ति नच । सार्थ करायासी
व्यर्थ टाकियेले
पुढति पद । मागुति ते आले

● ●

पुंड माजणार
अवनितलि । साधु लोपणार
बोल शुष्क सारे
सर्वथा गवताचे भारे
क्लीब नाचणार
भरदिनी । वीर्य झोपणार

● ●

तोचि वीर जगती
दिगंती । दुमदुमवी कीर्ति
तोचि खरा बोल
डोलवी । अखिल भूमिगोल
तोचि बाण सुटला
जयाने । लक्ष्य-भेद केला

● ●

थांब, नको घाई
धनुर्धर। म्हणविसि तू देही
बाण लावि धनुला
घालि मग। प्रदक्षिणा अनला
शुचिर्भूत हृदयी
होउनी। बघे दिशा दाही

● ●

मुदित मने पाही
जयद्रथ। काल तुझा नयनी
अर्ध बिंब रविचे
फेकि कर। तुजवरि विजयाचे
बाण तुझ्या धनुला
धन्य करि। विजया! निज बोला

★ ★

# १७५ : टोपी आणि मोटार

दिंडी

घरी, दारी, लेखनी, बोलण्यात
दिसे एकचि तो नाद गर्जनेत

'नका होऊ बेमान स्व-देशाशी
झीज सोसुनि वापरा माल देशी'

वस्तु घेणे परकीय सान थोर
नसे याहुनि अपराध अन्य घोर
अशी होती अजवरी रीत सारी
म्हणुनि दिसतो निज देश हा भिकारी

याच योगे भांडार रिते होई
बुद्धि, वैभव, सामर्थ्य लया जाई
दुजे होती बलवंत विभवशाली
गुलामी ये भारता मात्र भाली

वस्तु देशी आपुली नसो छान
तरी 'अपुली' ती म्हणुनि मूल्यवान
'मुळि न अपणाविण थोर कुणि जगात'
हीच बाणावी वृत्ति अंतरात

'भारताचे धन भारतीच राहो
एक पैही बाहेर कधि न जावो
तरिच होइल उत्कर्ष भारताचा'
अशी ज्या त्या मुखि सतत एक वाचा

आज जरिच्या टोपीस आणियेले
पाच रुपये परदेशि पाठवीले
मला याची वाटते लाज भारी
गोष्ट आई! परि एक मी विचारी

काल अणिली बघ पाच हजारांची
नवी कोरी मोटार 'मारिसा'ची
काय पैसा हा भारतीच राही
कधीपासुनि मोटार देशि होई

*       *

## १७६ : मुलाची तक्रार

थोर माणसे
वदती कैसे
अम्हा मुलाना फुलांपरी
कळते ना हे मला तरी

फूल उमलते
पूर्ण विकसते
तेवढेचि ते जगावरी
जगत पाहते निरंतरी

मूल जन्मते
वर्धित होते
दिनी दिनी–छे क्षणोक्षणी
येई जगता विलोकनी

फूल निराळे
मूल निराळे

साम्य मुळी उभयात नसे
खुळेपणा ह्या जगी वसे

* *

## १७७ : नवतरंग

चाल – प्रणयतरंगासवे

शैलशिखरि जाउनी
बघसि काय निरखुनी
दुर्बिणी
घेउनी
बघसि काय निरखुनी

जगत जातसे कुठे
ध्वनि–विवाद का उठे
लोचनी
देखुनी
नवतरंग–मोहिनी
बघसि काय निरखुनी

घडिघडी तरंगती
नवतरंग रंगती
हर्षवी
कोपवी

मति दुभंग होउनी
बघसि काय निरखुनी
एक सान अणुहुनी
एक थोर गिरिहुनी
गुंगवी
दोलवी
रंग रूप नव खनी
बघसि काय निरखुनी

अणु तरंग नभि डुले
गिरि तरंग स्थलि खुले
जग कसे
जगि वसे
सरलता रमे भ्रमी
बघसि काय निरखुनी

नवतरंग–माधुरी
हीनताहि त्यापरी
आकळे
यामुळे
काय वाटते मनी
बघसि काय निरखुनी

जगत विचल आजचे
विचल चित्त मूळचे
अन्यथा
सर्वथा

भास उघड लोकनी
बघसि काय निरखुनी

अचल चित्त हो स्वता
शुभद ठेवि आर्तता
मग सुखे
जगि बघे
नवतरंग निरखुनी
शैलशिखरि जाउनी

★ ★

## १७८ : कवि कोकिळास

चाल – मृत जीवनी

करि मोकळा
अपुला गळा
मधुमास ये
कवि कोकिळा !

गति पंजरी
निरयापरी
सरली तुझी
अवनीवरी

गा चारुता
गा रूपता
गा हर्षुनी
मधु-दिव्यता

जाई कुठे
गाई कुठे
परतंत्रता
तुज ना कुठे

नरकेसरी
वनिचा हरि
तुज नाचवी
अपुल्या शिरी

शुभदा उषा
उजळी दिशा
सुचवी पळे
कुटिला निशा

फुलती फुले
हसती मुले
बहु तोषिती
रमणी कुले

सुखनिर्भरे
अणुही भरे
गंधानिले
विपदा नुरे

अवहेलना–
छे, या जना
अजि आवडी
तव पूजना

करि गायना
वदवी स्वना
नव भारती
नव चेतना

त्यागासनी
ही राजता
जगि शोभवी
प्रिय भारता

ही स्वीयता–
–मधु–रम्यता
विश्वांतरी
घुमवी अता

★ ★

# १७९ : आता कुणास मोही

हरि वेणु वाजवी ही । आता कुणास मोही
कुंजवनीच्या मनोज्ञ लीला
कालिंदीच्या तरंगमाला
मधुयामिनिच्या गुणरूपाला
अपुल्याच ध्यानि लावी । आता कुणास मोही

स्फूर्ती केवळ चैतन्याची
जननी मानसचन्द्रसुधंची
प्रेममूर्ति जी या जगताची
ती राधिका विमोही । आता कुणास मोही

मुका जीव निज त्यजी मूकपण
विमुग्ध होई हंसरे जीवन
विधी संभ्रमी ते अवलोकुन
ऐसा विलास दावी । आता कुणास मोही

व्रजधामी तारका क्रीडती
व्रजांग-सुमने नभी विलसती
विस्मित होई विरोधता ती
मनिषेस ठाव नाही । आता कुणास मोही

शिशिरामाजी वसंत साजे
विशाल सागर घटी विराजे

जगन्नाथ व्रज-जीवनि रंजे
बघ वेणु-रम्यता ही । आता कुणास मोही
अगाधतेला नमवी चरणी
अगम्यतेसहि घालि गवसणी
चलाचलावरि वेणु-मोहिनी
वेणूच सर्व काही । आता कुणास मोही

* *

# १८० : मुलांची फसवणूक

वसंत हा आला । सांगती । वसंत हा आला
पण कुठे दिसेना जरी पाहतो दिवसभरी त्याला
कुणि श्याम पाखरे 'कुहू कुहू' बोलती
तरुवरची गळती पिवळी पाने अति
मोगरे फुलुनिया सुगंध फैलाविती
हे सारे बघतो । नेहमी । हे सारे बघतो
पण जया कौतुके 'वसंत' म्हणती कसा दिसेना तो

काही तरि कथिती । मनाचे । काही तरि कथिती
ही थोर माणसे अम्हा मुलाना सदाच फसवीती
शिशु तांबुस पाने तरुवरली दाविती
ती पहाट, थंडी हर्षे वाखाणिती
त्या शीतल पवनी स्तुतिसुमने उधळिती

उघडयावरि बसुनी । रात्रिचे । उघडयावरि बसुनी
त्या वसंत-गौरवि खेळ खेळती, पुरेनाच रजनी

म्हणू नये खोटे । मुलानी । म्हणू नये खोटे
किति झटति अहर्निश परोपरीने, खरेच जणु वाटे
मधु पेय पाजिती सवे आपुल्या अम्हा
गोरण्या सजवुनी त्यात भुलविती अम्हा
नव वसनि नटवुनी विस्मृति पाडिति अम्हा
अता न फसणार । मुले अम्हि । अता न फसणार
हा वसंत म्हणजे शुद्ध कल्पना तुम्हा सांगणार

* *

## १८१ : पिंपळाचे पान

चाल – अभंग

पान पिंपळाचे
मऊ मऊ छान
रेशमाचा वाण
तयालागी

भर उन्हामधी
कसे चकाकते
मना मोदवीते
बघताच

थोड्या झुळकीने
हालते डोलते
जणु आंदोली ते
झोके घेई

पाणी शिंपताना
जरी थेंब राही
नीलमणी होई
तयावरी

राघूच्या रंगाचे-
नव्हे, ते पाचूचे
वैभव तरूचे
चिरंतन

प्रस्तर घडवी
नवनीतापरी
अजब चातुरी
चातुर्याची

★ ★

# १८२ : शिपायाचे चित्र

चाल – बंधात सदा प्यारा

ते चित्र तुझे दावी
बघु दे तुझा शिपाई

किती वेळ तरि देखियले
चित्र तुझे मन नच धाले
वाटे पहावेच हृदयी

एकदाच दाखवि आता
डिकवितोच ते मच्चित्ता
मग मी मनीचेच पाही

निळा कोट खाकी चड्डी
भव्य टोप शिरि लोखंडी
बुरुजावरति उभा राही

समर–छंदरस सर्वांगी
तेच तेज वदनी गुंगी
समराविण न दिसे काही

शिरि विमान अरिचे बघुनी
बंदुकीस झणि उडवोनी
करि तो छिन्न तया केवी

शांत तन्मुख-कांति
स्मित-विहार अभिनव दीप्ति
निजल्या हृतमनास उठवी

रक्षणार्थ निज धामाचे
मोल देइ जो प्राणाचे
त्याते दाखवीच भाई !

* *

## १८३ : भाऊबीजेची देणगी

दिंडी

विमल, मंदा आंदोलि बैसुनीया
दिवाळीचें लागती गीत गाया
गायनी ये जै शब्द 'भाउबीज'
मुलीना तै वाटली फार मौज

येइ धावत इतुक्यात बाळ सान
घेति उचलुनि त्या जवळि बैसवून
कौतुकाने त्या वदति, 'उद्या बीज
काय देशिल आम्हास सांग आज'

बाल बोले, 'आता न सांगणार
परी ओवाळणि खचित घालणार

वस्तु अणिली मी छान तुम्हांसाठी
तिला बघुनी वाटेल मौज मोठी'

भाउबीजेची गोड सांज आली
बसे चौरंगी बाळ, हास्य गाली
सदनि सारा आनंद त्या क्षणाला
विमल, मंदा ओवाळिती तयाला

एक हाती घेतल्या स्वर्णमाला
दुज्या हाताने काढि चाबुकाला
पुसे दोघींना 'हवे काय भावे
मला वाटे परि चाबुकास द्यावे'

'कधी मजला खेळात घेत नाही
हळुच येता बोलता सर्वदाही
आइजवळी चुगलीस सांगुनीया
तिचा मजसी बसविता मार वाया'

'मीच अपुल्या घालितो कंठि माला
तुम्हा देतो पाठीत चाबुकाला
हीच बरवी बहु देणगी तुम्हाते
मूर्ख पोरी शाहण्या व्हावयाते'

बोलुनी हे हासला बाळ सान
विमलमंदांची होति मुखे म्लान
नयनि चमकति जो अश्रुबिंदुमाला
तोच कंठी शोभल्या स्वर्णमाला

★ ★

# १८४ : नरकेसरीच्या पुतळ्यास पाहून

(कै. नरकेसरी बॅ. अभ्यंकर यांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ अभ्यंकर सेवामंडळातर्फे लोकनायक बापूजी अणे यांच्या हस्ते नागपूरला ता. २ जानेवारी १९३९ रोजी झाला त्या प्रसंगी म्हटलेले गीत. )

हा उभा अचेतन वीर केसरी चैतन्या द्याया

स्वतंत्रतेची उज्ज्वल ज्योति
हृदयी ज्याचे नित्य जागती
तो असा जन्मुनी धन्य होतसे चैतन्या द्याया

पारतंत्र्य जरि राही नियती
रोमरोमि तरि निर्भय वृत्ति
तो असा जगा बेगुमान बघतो चैतन्या द्याया

परवशतेची मनोमलिनता
झडुनी लाभो तया ओजता
नव विपद्-खड्ग झेलण्या उभा हा चैतन्या द्याया

परवशतेला पदी तुडविले
स्वातंत्र्यामधि मन रंगविले
हो तसाच भारत म्हणुनि उभा हा चैतन्या द्याया

मृत वाटे तरि अमर जहाला
स्व-जनभक्तिने कंठी धरिला
नरवीर केसरी फणीन्द्रपुरि हा चैतन्या द्याया

★ ★

# १८५ : अखंड पथिक

कुणावाचुनी नच अडते
अपुला पथ जग आक्रमिते
कुणासाठि नच अडुनि बसे
पुढेंचि निज पद टाकितसे
'या जगताला
उद्धरिण्याला
मीच एकला'
अहंभाव हा वृथा असे
वाऱ्यावरती जशी पिसे

क्रूर कृतींनी क्षणोक्षणी
त्राहि भगवन् करि अवनी
असा कुणी उन्मत्त जरी
शेखी मिरवी निरंतरी
ढुंकूनीही
तया न पाही
दखल न घेई
भिणे दूर मग जग त्याला
पुढचा क्रमिते पथ अपुला

भलेपणे वा बुरेपणे
येइ सवे त्या घे प्रेमे

कुणी न येता स्थिर राही
तया म्हणेना 'तू येई'
मधुनि परतला
किंवा थकला
तसाच गळला
क्षण थांबेना त्यास्तव की
पुढेच पाउल जग टाकी

रथी अतिरथी जगि झाले
उदार त्यागी अवतरले
जगद् वंद्य वा निंद्य खुळे
कालोदरि ते साठविले
परी कालचे
तसे उद्याचे
जसे आजचे
जग हे सारे अवनिवर
सुभग, अखंडित, प्रगतिपर

वल्कल जाई कुठे तरी
सूत्र-वसन ये तनूवरी
निबिड काननी, गिरिशिखरी
वसती सुंदरशा नगरी
काल हयावरि
आज अंबरी
उद्या कशावरि-
आरूढ नकळे जग होई
दृष्टिस येई किमिया ही

राजेश्वर थरथरति भये
जनता-ईश्वर पूजनि ये
बोल एकमुखि जाइ लया
येइ पाचमुखि त्या ठाया
सजीवतेची
रीत उद्याची
येइल कैची
उद्याच जाणे ते सगळे
तर्क आजचे हत, दुबळे

पुढेच जाणे जग जाणे
हेचि तयाचे एक जिणे
त्यात आपदा कसल्याही
सुख वा लाभो कसलेही
कुणा न मानी
अंत:करणी
समान राहुनि
अखंड निज पथ चालतसे
कुणासाठि नच अडुनि बसे

* *

# १८६ : वसंताचे नृत्य

श्लोक

स्वातंत्र्य मंगल जिथे वसते निवांत
संसार–मानस जिथे सरल प्रशांत
ज्या गेहि रांगुनि शिशू उधळीत हास्य
तेथे सदैव विलसे मधुमास–लास्य

* *

# १८७ : गुढी पाडवा

–शके १८६१–

चाल – वीरशिरोमणि सकल

संवत्सराच्या मंगल दिनि नव प्रतिसदनी भारती
उभारुनि गुढ्या गृहा सजविती

जे जे तइ अनुकूल जयाला, दिन करिती साजिरा
प्रति मुखी भाव एक हासरा

दिवस कालचा जाई कैसा, जाय उद्याचा कसा
क्षिति न ही मुळी शिवे मानसा

श्रीमंत, दरिद्री कुणी असो मानव
त्या दिना शोभविति अपुल्यापरि अभिनव
अवमानित करिति न अजाणताही लव

पावित्र्याचा मांगल्याचा करिती गुणगौरव
दिनभरी गाती तद्वैभव

होय कशी निर्माण भारती शुभदिनता ही अशी
कळेना काहिच की मानसी

रामकृष्ण हे काल आधिचे नंतर शक अवतरे
अवनितलि गंधासम विस्तरे

क्षणात विरतो सुमनगंध तो सदैव हे देखितो
चिरं परि सु–दिन–गंध भासतो

कुणि राम–दिनाला सद्भावे भाविती
कुणि कृष्ण–दिनपदी भक्तिरती अर्पिती
कुणि शुद्ध मनाने निसर्गास पूजिती

पण हे सारे भिन्न भक्तजन नव दिन सत्कारिती
सु–मने महोत्सवी रंगती

सकल भिन्नता, मनोमलिनता पार कुठे लोपुनी
एकमुखि हिंद दिसे लोचनी

लाभालाभ न यात कुणाचा, मांगल्यच केवळ
अनुभवी जनगंगा निर्मळ

निर्मलतेची उज्ज्वलता ही कणकण भरुनी उरे
–उरे ती गगनमंडळी भरे

पण आज दुग्धि त्या पडे मिठाचा खडा
दृढ हिंद एकमुख तया पाडिती तडा
सुज्ञताच उचली पैजेचा हा विडा

सुभग सुमंगल असा एक दिन न रुचे ज्या अंतरी
धन्य ती खनी असो भूवरी !

आधिच परवशि समस्त भारत सर्वांगे ग्रासिले
जीवन चंडानलि पोळिले

पारतंत्र्य हे नष्ट कराया जो तो झटतो स्वता
शमेना अनलदाह सर्वथा

त्या दुःखामधि एकच दिन हा आनंदे हर्षवी
तोही भल्या भल्या कोपवी

बोलतो उभारा ध्वजा तिरंगी कुणी
भगव्याचा धरि कुणि हट्ट तार ताणुनी
'पथ एक हाच की स्वराज्य-संपादिनी'

अहंपणे नाशिती सरलता वृथा अशा वल्गनी
अमोलिक राष्ट्र-दृष्टि विसरुनी

स्वातंत्र्याचा मुकुट कैधवा झळके भारत-शिरी ?-
आज तरि शब्दच ओठावरी

लाभ होय जरि ईशकृपेने स्वातंत्र्याचा तया
प्रयत्ना दिगंतयश मिळुनिया

तदुपरि हिंद-स्वातंत्र्याचा फडके ध्वज कोणता
निश्चये येइल का सांगता

किति भिन्न भिन्न ते ध्वज तळपति अंबरी
'माझाच थोर' ही बोले प्रति वैखरी
स्थिति अशी घडिस या प्रगट भारतांतरी

कोलाहलि या सु-दिन अजर हा नियति-लाभ जो भला
विनविती, मळवु नका त्याजला

★ ★

## १८७ : पराक्रमी महाराष्ट्र

कुण्या मुहूर्ती जन्म घेतला या महाराष्ट्राने
जन्मापासुनि सदैव तळपे विक्रम तेजाने

मध्यान्हीचा समय तयाचा दिपवी जगताला
सहज नंतरी विश्रांतिस्तव घे विश्रांतीला

'थकला, दमला, जीर्ण जहाला महाराष्ट्र–बाणा'
हर्षोन्मादे जगत तेधवा बोले ह्या वचना

बोल असे उन्मत्त जगाचे असता आरोही
उघडुनि डोळे महाराष्ट्राने अणिले अवरोही

विश्रमि लागे पाठ भूमिला, शतपट बलशाली
अशी कुंडली ग्रहमालेची महाराष्ट्र–भाली

महत्कार्य–साधनी विक्रमे प्राणाहुति द्यावी
या गोष्टीचा तया पडेना विसर केधवाहि

उज्ज्वलता–रक्षणी तळपणे, हेचि कळे ज्याला
विश्रम घेता येति दूषणे परवा नच त्याला
परंपरा ही अखंड चाले आजवरी ज्याची
पराक्रमी महाराष्ट्र उज्ज्वला म्हणुनि कीर्ति त्याची
असा थोर महाराष्ट्र विक्रमी, वंदन त्या भावे
तसे विनवितो हिन्दासह आणि स्वतंत्र तळपावे

★ ★

## १८९ : दिव्य चैतन्य

कसे राहते
दिव्य चैतन्य ते
कसे राहते
पारतंत्र्य–बंधनी–जीवनी
नवल वाटते

कसे ऐकते
दिव्य चैतन्य ते
कसे ऐकते
निमुटपणे अवमानित वचना
नवल वाटते

कसे झेलते
दिव्य चैतन्य ते

कसे झेलते
कुणाचाहि कटु बोल मस्तकी
नवल वाटते

कसे वाकते
दिव्य चैतन्य ते
कसे वाकते
कुटिल पदावरि नष्ट खलाचे
नवल वाटते

कसे साहते
दिव्य चैतन्य ते
कसे साहते
पदाघात हरघडी दुजाचे
नवल वाटते

कसे क्रंदते
दिव्य चैतन्य ते
कसे क्रंदते
ठायिच अपुल्या केविलवाणे
नवल वाटते

नव्हे वाटते
दिव्य चैतन्य ते
नव्हे वाटते
खरे दिव्य चैतन्य विक्रमे
जगत जिंकिते

जगा जिंकिते
दिव्य चैतन्य ते
जगा जिंकिते
नतरि त्याच चैतन्य स्वरूपी
लीन पावते

★ ★

## १९० : गुलाब

गुलाब फुलला
गंध विखुरला
उपवनिचा आमोद बहरला

निसर्ग डुलला
अनिल हरिखला
संजीवन ये सौंदर्याला

नवी थोरवी
नवी टवटवी
बघावे तिथे मधुर जान्हवी

कुणी दिसेना
उदासवाणा
इतस्तता चेतना चेतना

जुने शांतले
नवे प्रकटले
गुणरूपाचे निधान सगळे

नव जगताची
चैतन्याची
एक एक पाकळी फुलाची

जन्मता फुला !
विकास तुजला
स्वयंपणे तव जीवन-लीला

धन्य असति बा
जगी गुलाबा
बंध जगत करि मात्र अचंबा

★ ★

## १९१ : राया ! ऐक

श्लोक

आनंदाचा दिवस नसता मानु आनंद कैसा
क्रोधाचा हा हृदयि भडके अग्नि मार्तंड जैसा
दुष्टाव्याने हरण करिसी माझिया मोदराशी
लज्जा वाटे तुजसि न कशी बोलण्या ह्या वचासी

केले त्वां का विजयि तुझिया मन्मना तोष व्हाया
या त्या मार्गे मजसि अदये पीडिले मात्र राया !
गेले ते ते मिळविन पुन्हा वेचुनी जीव जेव्हा
ऐके, माते समुचित नृपा ! होय आनंद तेव्हा

* *

# १९२ : दिवाळी आणि लढाई

दिंडी

ही लढाई किति काळ चालण्याची
अजुनि संपेना चीन–जपानाची
तोच उद्भवला समर युरोपात
डोंब आगीचा भडकला जगात

एकमेकांचे कंठ छेदुनीया
देति कसला सुखलाभ ह्या लढाया
सौख्य, शांती, संतोष लया जाती
अम्हा बाळांचा मोद लुबाडीती

दिवाळीचा दिन आज हा उदेला
सान थोरा आनंद द्यावयाला
मुखी कवण्या उल्हास परि दिसेना
हंसे उसने क्षणभरहि ते टिकेना

पै न गाठी, बाजारभाव भारी
फटाकेही बहु महागती सारी
कुणी राहो, आनंद कसा होई
तया कारण खल नष्ट ही लढाई

चला पूजू—प्रार्थुया लक्ष्मीला
तीच वारिल ह्या दुष्ट संकटाला
तिच्यासाठिच उद्भाव हा लढ्यांचा
हेचि सांगे इतिहास या जगाचा

* *

## १९३ : दुष्काळ आणि दिवाळी

चाल – उद्या बघ जाते

या दुष्काळी। ही कशास येइ दिवाळी

दुष्काळाने लोक पीडिले
वर्षोवर्षी, त्रस्त जहाले
सर्वतोपरी हताश, शिणले

अशा ह्या काळी। ही कशास येइ दिवाळी

पाउस वेळेवरति पडेना
शेतांमध्ये धान्य पिकेना
पैसा तर मुळि दृष्टि दिसेना

अशा ह्या काळी। ही कशास येई दिवाळी

अर्धपोटी वा उपास दीना
पिण्यास पाणी पुरे मिळेना
धड ना लज्जा वस्त्र झाकण्या
अशा ह्या काळी । ही कशास येइ दिवाळी

भिकारवाडा घडीघडीला
प्रतिदाराशी वाढु लागला
भारतिचे हे चित्र आजला
अशा ह्या काळी । ही कशास येइ दिवाळी

प्रेमानंदी असे दिवाळी
भारत-पोटी परंतु होळी
निशिदिन चिंता मनास जाळी
अशा ह्या काळी । ही कशास येइ दिवाळी

सुबत्तेतली खरी दिवाळी
हर्षानंदा फुटते उकळी
लहानथोरा सुखदा वल्ली
मग अवकाळी । ही कशास येइ दिवाळी

* *

# १५४ : शिपाई रणावरुनि आला

( नागपूरच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमीच्या ( शके १८६१ ) परेडीवरून एक पाच वर्षांचा छोटा सैनिक परत आलेला पाहून हे गीत निर्माण झाले. )

शिपाई रणावरुनि आला

सुवासिनींनो ! उठा उठा ह्मणि-
ओवाळा त्याला
शिपाई रणावरुनि आला

दिन आज तो उदेला
मांगल्य ये फळाला
ज्या दिवसाची वाट बघतसा-
करुनि तपस्येला
शिपाई रणावरुनि आला

जयनाद धुंद झाला
करि मूक दुंदुभीला
विजयश्रीची माळ गळा ही-
उजळि ललाटाला
शिपाई रणावरुनि आला

टिपकती रक्तबिंदु
उफळला हर्षसिंधु

खल शत्रूच्या शस्त्राघातें-
अलंकार त्याला
शिपाई रणावरुनि आला

लागेल दृष्टि बाळा
लावाच तीट भाळा
स्वातंत्र्याचा मुकुट घालुनी-
भूषवि जननीला
शिपाई रणावरुनि आला

* *

## १९५ : अमर शुक

( राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक आणि सरसंघ-चालक-डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांचा मृत्यु.)

तरुण भारता ! शोक पुरे हा, कशास हळहळसी
चुकल्या चुकल्या परी वाटते म्हणुनि काय रडसी

प्राण तुझा रे ! दृश्यरूपि जो 'केशव' अवतरला
अवतरुनी तो तुझी ओळखी करुनी दे तुजला

सफल घडे कर्तव्य तयाचे, दृश्य रूप टाकी
हृदयामधि तव विलीन होई, तुजला अवलोकी

उदरंभरणा हात न हलवी, एक राष्ट्र-भक्ति
शुक-जीवन-व्रत अखंड पाळी, घे जीवन-मुक्ति

स्वतंत्र भारत कुण्या उपाये होइल जगि केवी
ह्याच चिंतनी तरुण भारता ! तुझी ज्योत फुलवी

तरुण भारता म्हणुनि उभविली तुझी संघशक्ति
प्राणाहुति द्यावया निर्भये स्वतंत्रतेसाठी

शौर्य धैर्य वीर्याचे केवळ निधान तारुण्य
तेचि उद्धरिल अंति भारता निवारुनी दैन्य

या विश्वासे रोम रोम तव जागृत रे ! केला
तरुण भारता ! निशिदिन अपुल्या सिंचुनि रुधिराला

ऊठ ऊठ घे, पूस आसवे, राष्ट्र-ध्वज अपुला
केशव-नामा स्मरुनी गर्जे 'हर हर हर' बोला

* *

# १९६ : अभिवादन

(ता. १८ ऑगस्ट १९४० रविवार रोजी वर्धा येथे भरलेल्या महाविदर्भ परिषदेच्या निमित्ताने लिहून झालेले गीत–)

हमीर – त्रिवट

वंदन जनतेशा
निखिल निरंजन मनोविनोदन
पावन हृषिकेशा

तुझ्या एक गुणि इच्छिता क्षणी
विमुक्त होसी तोडुनि पाशा

तू न कुणाचा, तू सकलांचा
तूचि धनी, सेवक, अभिलाषा

माधव–लीला–करणी अतुला
फुलवि चिरंतन तव हृत्कोशा

उजळि ही निशा उजळती उषा
महन्मंगला ! पुरवि सदाशा

* *

## १९७ : तेजोनिधि

रवितेज सहन होइना
शनिमंगळ ह्या ग्रहगोलाना
करि त्रस्त हरघडी मना

" रजनी–काली किती तळपतो
परि न तयाने कुणी तोषतो
नयनीहि कुणी पाहिना

" अणु परमाणु सृष्टि चराचर
रविच्या भजनी मात्र निरंतर
न स्मरण आमुचे कुणा

" चंडाग्नीने दु:सह होई
भूजल तैसे शोषुनि घेई
तरि माइ जगत तद्गुणा

" ग्रहणी कज्जल मुखी फासले
घन तिमिराने तया ग्रासिले
जग आर्त तया दर्शना

" रविमुकुटाला दूर झुगारुनि
बळे विराजू तद् सिंहासनि
जगि तरिच महति आपणा "

शनि मंगळ हा विचार करिती
त्या गवसेना अजुनी युक्ति
नच चैन जिवा त्याविना

क्रमितो परि रवि अखंड निज पथ
करि तेजोमय विश्व, मनोरथ
जगि काय, कसे लक्षिना

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3276 वि: 84102
क्रमांक 7552 नों. दि. 2025

# १९८ : कर्मयोगी लोकनायक

( नागपूर येथे रविवार ता. ८ सप्टेंबर १९४० रोजी झालेल्या लोकनायक अणे हीरकोत्सवाच्या अखिल भारतीय मध्यवर्ति समारंभाच्या प्रसंगी सुरुवातीस म्हटलेले गीत–

चाल – पोवाडा

हा विदर्भभूचा लाल
धर्म–दिक्पाल
राजतेचा
ध्रुव तारा तळपे निश्चत हृदयाचा

आजला हिन्द–मंदिरी
देव कितितरी
शोभिवंत
हा एकच तेथे सदा जागती ज्योत

रणशूर, वीर, नाविक
पाउलागणिक
दृष्टि येती
समयज्ञ वृत्तिचा हाचि एक भारती

नेणतो दिव्य वल्गना
भव्य कल्पना
वाळुवरची
परी प्रज्ञा विलसे स्वयंसार्थतेची

स्वातंत्र्य–समरि घे उडी
तरि न हरघडी
फोडि टाहो
प्रति श्वास दाखवी स्वातंत्र्याचा भावो

आजच्या महाराष्ट्राला
हाचि एकला
सर्वपरिनी
आदर्श जीवनी, अभिमाने प्रेक्षणी

मन, शरीर, पंचप्राण
करी अर्पण
राष्ट्र–चरणी
जणु दधीचि ऋषि ये भारति अवतरुनी

चैतन्य निर्मि भोवती
तसे संगती
जाइ तेथे
जडतेस सजिव करि निज दर्शनमात्रे

हिन्दचा सकल पुरुषार्थ
व्हावया सार्थ
झटे सतत
त्याविणे दुजी ना आस जीवनात

हा कर्मयोगि माधव
राष्ट्र–वैभव
दिव्य लेणे
ते सदैव लाभो, प्रभो ! हेचि मागणे

★ ★

# १९९ : चंदुलालचे अजब धाडस

दिंडी

स्नान करुनी अभ्यंग उष:काली
सुबक लावी केशरी गंध भाली
नवा सुंदर पोषाख घालुनिया
करी वंदन साष्टांग रामराया

नवे धोतर त्याचिया आवडीचे
कोट सदरा जाकीट रेशमाचे
शिरी टोपी-ऐटीत भरजरीची
अशी शोभे ती मूर्ति बालकाची

दावि घरभर पोषाख ज्यास त्यास
बोल वदनीचे-लाडका विलास
अल्प काले ऐकु ये हांक बाळा
पळे धावत द्रुतगती फराळाला

एक बसण्याला, दुजा टेकण्याला
तिज्या पाटावरि ठेवि ताटलीला
घालि रांगोळी ताइ कुशलतेने
बाळ पाही ते हसत कौतुकाने

जांब[1] गडवा चांदिचा पाणियाचा
पाच उदबत्त्या गोड सुवासाच्या

फराळाचे चांदिच्या ताटलीत
बाळ पाटावरि हर्ष मूर्तिमंत

दूध घेउनि सामोर उभी माता
तिच्या बाजूला असति पिता, भ्राता
दोन भगिनी दो बाजुसी तयाचे
चित्र लोभस देखिती दिवाळीचे

जिगर छोटा इतुक्यात चंदुलाल[२]
हळुच येउनि मांडिशी लावि गाल
कान उभवी, शेपूट हालवोनी
मित्र–वदना टक बघे लोचनांनी

आदरीना परि बाळ चंदुलाला ×
म्हणुनि त्याचा बहु राग ये तयाला
पवनगतिने तइं पळवि ताटलीते
प्रेक्षकांच्या नच पार विस्मयाते

---

(१) जांव–पाणी पिण्याचा प्याला.
(२) चंदुलाल– कुत्र्याचे नांव.

× हा इमानी मुका जीव प्रस्तुत गीत लिहिल्यानंतर अडीच महिन्यानी निधन पावला. वय सुमारे पाच महिने. त्याच्यावर आमच्या घरातील लहान मोठ्या मंडळीचा सारखाच लोभ होता. चंदू सर्वांचा आवडता होता.

# २०० : दिवाळीचा सण–मुलांचा आनंद

चाल – अभंग

दिवाळीचा सण । मुलाबाळा हर्ष
घेती परामर्ष । नाना रीति

थोर माणसांची । आटापीट चाले
परी मुले बाळे । आनंदात्त

भीषण लढाई । विक्राळ दुष्काळ
आनंदात खळ । नाही मुला

दे गा देवा ! आम्हा । आनंद मुलांचा
जप हा थोरांचा । म्हणुनीच

ऐसे परि कधी । मी न म्हणणार
म्हणो वेडापीर । कोणी मला

आनंद मुलाना । द्यावया झटेन
त्यांतच मानीन । आनंद मी

मुलांच्या आनंदे । आनंदला थोर
मग तोही पोर । झालाच की

★ ★

## २०१ : कुर्यात् सदा मंगलम्

( माझा भाचा ( बहिणीचा मुलगा ) चि. मोतीबाबा ऊर्फ निव्या नवघरे याचा विवाह ता. १ मार्च १९४१ रोजी झाला. त्या निमित्ताने हा श्लोक निर्माण झाला. )

श्लोक

कालाचे अजि शांतरूप लपले, तो उग्र रूपा धरी
चौखंडी अणुरेणु–जीवनि दिसे क्रांती अगम्या खरी
ऐशा कालि विवाह हा घडुनि ये त्या काल–साक्षीवरी
होवो तो शुभदा जगा, वधुवरा–कुर्यात् सदा मंगलम्

★ ★

## २०२ : काळोख

चहूकडे अंधार
सारा चहूकडे अंधार

चंद्र दडाला, उडुगण लपला, नभी मेघपरिवार
स्नेह संपले, दीप विझाले, सरे दृष्टि–संसार
सारा चहूकडे अंधार

सुटे समीरण जणू प्रभंजन–अनिर्बंध संचार
वट कोसळती, महाल उडती, कसलि न त्या दरकार
सारा चहूकडे अंधार

जगत भंगले, हृदय विसरले, मनाचाच व्यापार
दिशा बदलल्या, धुंद जहाल्या, स्वताचाच बडिवार
सारा चहूकडे अंधार

कितीक सरला, कितीक उरला निबिड निशेचा भार
नसे कल्पना, कुणा कळेना, सकल खुला बाजार
सारा चहूकडे अंधार

दृष्टि आंधळी, वृत्ति बावळी, समय असा अनिवार
तम–संहारणि, कुणि न येइ रणि, मात्र बोलसंभार
सारा चहूकडे अंधार

हे दृढतेचे बंध तमाचे सहज काय तुटणार
निधडी छाती, जीवावरती हवी तिलांजलि–धार
सारा चहूकडे अंधार

एक जिवा ! चंडोल जागता छेडि गीत–झंकार–
'प्राणपणानी तमास पिउनी सहर्ष दे हुंकार–
सारा चहूकडे अंधार

'थोडी उरली रजनी काळी झणीच ती पळणार
अता उषेचा चैतन्याचा खेळ विश्व बघणार
सारे चिन्मंगल होणार'

★ ★

# २०३ : आमुचा दादा--

चाल – तस्करा हाती

आमुचा दादा । वैमानिक होई
नभामधि उंच उंच जाई

खालुनी कैसे । विमान ते दिसते
पाखरापरी जणू गमते

विमानामधुनी । अम्हास तो बघतो
अम्हा परि मुळि नच तो दिसतो

काढिला फोटो । फणीन्द्रनगरीचा[१]
तेथुनी हुबेहूब साचा

भव्य न्यायसदन[२] । तुरुंग अजनीचा
फुटाळा तलाव पाण्याचा

अनाथछात्रगृह[३] । किल्ला बर्डीचा
सक्करदरा[४] रघूजींचा

महाराज बाग । महाराष्ट्र भुवन[५]
पारडी[६] रम्य जुने स्थान

(१) नागपूर शहराचा. (२) नवीन हायकोर्ट. (३) अनाथ विद्यार्थी गृह. (४) श्रीमंत राजेबहादूर रघूजीराव भोंसले याचे वसतिस्थान. (५) महाराष्ट्र वर्तमान पत्राची कचेरी. (६) नागपूरनजिक भोंसले सरकारची पारडीची बारदद्वारी हे पाहण्यासारखे ऐतिहासिक ठिकाण आहे.

आगगाडी ही । स्टेशनात येती
फलाटी लोक कुणी नसती

पेठ इतवारी । महाल राजाचा
जागता पुतळा टिळकांचा

वाकडे दिसती । गिरिण्यांचे भोंगे
तयाची मौज अम्हा सांगे

मिसरदेशांत[७] । कालच तो गेला
शत्रुशी रणी झुंजण्याला

होउनी विजयी । येइल परतोनी
तयावरि उधळु तदा नाणी

● ●

मीहि होइन रे! मोठा सेनानी
पराक्रमि डुलविन ही अवनी

* *

## २०४ : परत ये वीर–

चाल – तस्करा हाती

परत ये वीर । रणाहुनी सदनी
नष्ट रिपु धुळीस मिळवोनी

---

(७) इजिप्तदेशांत.

शिपाई साधा । संगरास जाई
कोठले मोल तदा राही

विक्रमे आता । किती थोर होई
जगाची दृष्टि, मना दिपवी

दुंदुभी वाजे । जगभर शौर्याची
चामरे डुलति थोरवीची

कुटिलशा काली । जीवन–गुण लुप्त
तळपतो समयि गुणादित्य[१]

कालचा फौजी । सेनाधिप आज
शोभवी पराक्रमी तेज

भूषण जगताचे । तसे जीवनाचे
ओज नव परवश कालाचे

शूर ऐसेच । पारतंत्र्य जगती
हाणुनी, स्वतंत्रता देती

★ ★

(१) गुणाचा सूर्य

# २०५ : पत्रक

दिंडी

लिहू कविता कोणती दिवाळीची-
चाल थांवे इतुक्यात कल्पनेची
विविधरीती अजवरी गायिली ती
अता कैशा उडतील चंद्रज्योति

पत्र-दूते खंजीर मागणीचा
छातिवरती रोखिला नेहमीचा
मजहि वाटे नव काव्य पाठवावे
मनासम ते परि जुळुनि कसे यावे

बालकापरि कल्पना अडुनि बैसे
शब्द लिहिला खोडिला घडे ऐसे
किती कागद नाशिले गणति नाही
परी एकहि ना ओळ लिहुनि होई

हट्ट संपेना मुळी कल्पनेचा
हेतु अधिकचि चेतला मानसीचा
तीक्ष्णधारी खंजीर चमक दावी
त्रिताली या कविताच लुप्त होई

दिवाळीचा दिन सुभग हा उदेला
घरी दारी आनंद भरुनि गेला

तरि न गवसे ती अजुनि दिव्य बाला
शोध कुणि घ्या वाचुनी पत्रकाला

★ ★

## २०६ : गायकीस–

( शालापत्रकाच्या जानेवारी १९४२ च्या खास रानडे अंकाच्या मुखपृष्ठावरील न्यायमूर्ति रानडे यांच्या चित्रालगतचे गायकी (गुराखी)चे रेखाचित्र पाहून–)

चाल – सुटला पितृदिशेचा

बसुनी तरुच्या शाखेवरी
पावा वाजविसी सुस्वरी
आलाप रंगती, निनादिती अंबरी
आमोद बहरला सुखनिर्भर भूवरी

दिसते दृष्टि तुझी हासरी
वदनी झळके शुचि माधुरी
खेळती कोणते गोड खेळ अंतरी
ते तरंग खुलवी मात्र तुझी बासरी

फुलती तरुवरि सुंदर फुले
गंगा निजजल वैभवि डुले
पाण्यावरि जाती सवत्स धेनूकुले
त्यांकडे न देखिसि–लक्ष्य कुठे वेधिले

तरु हा सरितातीरी उभा
सुमने उधळिति मधु सौरभा
रंजवी जान्हवी कलरवि मानस–नभा
हे चित्र जरा बघ ! – किती गोडवी प्रभा

कितिही दृश्ये ही साजिरी
मोहिति रम्य जगाला जरी
सुखदु:ख तयाचे तुज न, वाटते, तरी
स्वानंद छेडि तव गो-पाला ! वैखरी

★ ★

# २०७ : चराचराची माता-चैतन्य

चाल – भूपती खरे ते

रवि चंद्र तारका मुला फुलावरि कविता
लिहु नका बोलती कुणीहि उठता बसता
चैतन्य जीवनी स्फुरुनि रोमरोमात
पोचेल हृदयिची देशभक्ति गगनात
देशार्पण जीवित करावया लावील
ही असली कविता हवी आज बिनमोल
शिशुहास्यी नच चैतन्य । राहि का
सुमगंध विना चैतन्य । मिरवि का
चैतन्य।विण रवि चंद्र । असति का

ती रम्या संध्या काय हीन चैतन्य
प्रगटवी उषा का चैतन्याचे दैन्य

प्रत्येक कणकणी चैतन्याची वसती
त्याविना न कोणी वस्तुजात या जगती
चल असो नसो ती चैतन्याची प्रतिमा
प्रकटवी अलौकिक ऐन समयि निज सुषमा
चैतन्या वीणे कुणी न जन्मा येई
चैतन्य सर्वथा चराचराची आई
प्रस्तर नच करि घायाळ । नातरी
नच रज्जु आवळी फास । नातरी
नच काष्ठ अग्नि ओपील । नातरी
नवरसी कोंडिला अखिल सृष्टि-संसार
स्व-स्थिती निरखुनी योजक करित विहार

* *

## २०८ : समर जगतातला—

चाल – होय संसार तरु

समर जगतातला वदति जो मातला
सकल सृष्टीसवे भुवनि तो प्रगटला
होय निर्माण जग
आजवरि काळ बघ

कोणता क्षण उमग
    की न तो गाजला
    समर जगतातला०

गिरि, कुहरि, काननी
सघनशा जनगणी,
भव्य नभि, जीवनी
    विविधपरि रंगला
    समर जगतातला०

अमित हानी घडे
जगत विपदी बुडे
थोर मानस रडे
    बघुनि कोलाहला
    समर जगतातला०

जगहितार्थी म्हणुन
यत्न-कष्टें करुन
बंध घालिति सुजन
    तरि न तो लोपला
    समर जगतातला०

सृष्टि-कारण तिथे
कांहितरि उपजते
दिव्यपण, वाटते
    उगिच नच त्याजला
    समर जगतातला०

प्रखर चैतन्य ते
ठेवि नित जागते
नव जगा जनन दे
तो स्वता एकला
समर जगतातला०

★ ★

## २०९ : अखिल भारतास

( जुने कागदपत्र पहात असता त्यात आकस्मिकपणे एकोणीस वर्षा-पूर्वी लिहिलेल्या प्रस्तुत गीताचा चिटोरा मिळाला. या गीताच्या खाली असलेले ठिकाण, तारीख व सही पहाता ते, कै. वा. देशबंधु चित्तरंजन दास यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर-वऱ्हाड प्रांताची संयुक्त परिषद बुलढाण्यास ता. ७ व ८ मे १९२३ रोजी झाली त्या परि-षदेच्या प्रारंभी म्हणण्याकरिता म्हणून बुलढाण्यासच लिहिण्यात आले. पण वेळेपर्यंत गीत पूर्ण न झाल्याने मला जुनेच गीत म्हणावे लागले. त्या गीतामधील अपुरे कडवे गोकुळअष्टमीस (ता. २ सप्टेंबर १९४२ ) पुरे करून ते संपूर्ण गीत खाली दिले आहे.

आनंद-गीताच्या दुसऱ्या भागामधील 'तो दिन' हे गीत आणि प्रस्तुत गीत या दोन गीतांमध्ये वाचकास हुबेहूब बरेवसे साम्य दिसून येईल. बहुधा या गीतावरूनच 'तो दिन' हे गीत निर्माण झाले असावे. कारण या गीताच्या चिटोऱ्यावर जी तारीख आहे त्यानंतरची तारीख 'तो दिन' या गीताखाली आहे. परंतु दोन्ही गीतांच्या मूळ कल्पनांच्या बैठकीत स्वाभाविकच फरक असल्याने रसिकास द्विरुक्ति वाटणार नाही ही खात्री आहे. )

झंपा

खचित उगवेल तो एक दिन भूवरी
ठेवि आशाबला भारता ! अंतरी

खड्ग म्यानांतले
चमकुनी हे तुझे
जगत नमवील रे ! चरणावरी
खचित उगवेल तो एक दिन भूवरी

सूर्य ग्रहमंडळी
प्राण देहांतरी
तूचि तू होसि पै जगि त्यापरी
खचित उगवेल तो एक दिन भूवरी

बोलशिल जे वचन
धरिल शिरि ते भुवन
जेवि घन वारिकण भू स्वीकरी
खचित उगवेल तो एक दिन भूवरी

विश्व–सिंहासनी
राजशिल त्या दिनी
अचर चर तव भजनि दासापरी
खचित उगवेल तो एक दिन भूवरी

तूझाच जयनाद
नांदेल गगनात
श्रवणी न मुळि येइ दुजि वैखरी
खचित उगवेल तो एक दिन भूवरी

बीज चंद्रापरी
असिस अजि महिवरी
जाण तइ शोभशिल पुनिवेपरी
खचित उगवेल तो एक दिन भूवरी

स्वस्थ बैसू नको
माळ ओढू नको
गगनि पाहू नको कृति आचरी
खचित उगवेल तो एक दिन भूवरी

जागता झोपता
हरघडी वर्तता
दृष्टि दे सर्वथा तरि त्यावरी
खचित उगवेल तो एक दिन भूवरी

बुलढाणा–७-५-२३, सोमवार.

* *

# २१० : आमुची स्वतंत्रता

चाल – प्रणयतरंगासवे

हसत हसत ये उषे !
पळत पळत जा निशे !
मुख शशांक लोपवी
बाल भानु तोषवी

चांदणी–
चांदणी
घे स्वरूप हिमगुणी

कटु निनाद तो अडे
विहग–छंद चहुकडे
विपद वात लोपती
सुखद गंध मिरविती
चारुता
भव्यता
धन्य आजि सुभगता

तो उदात्त हिमनिधी
तो उदार जलनिधी
स्नेहसलिल जान्हवी
देति टवटवी नवी
उमलल्या
'नव कळ्या
रुचिर मधुर हासल्या

तेथ बन्सिधर रमे
हृदय–गीत–रव घुमे
ओज तेज कडकडे
– बेगुमानता रडे –
ही कथा
सर्वथा

भुवनवंद्य दिव्यता –
आमुची 'स्वतंत्रता'

★ ★

## २११ : बाल-गीत

चाल – अभंग

अंगणात खेळे । माझा बाळराणा
दिसे गोजिरवाणा । बाळचंद्र

दुडु दुडु चाले । वाजति पैंजण
कर्णी रुणझुण । नाद सदा

मा-मा-ता-ता-दा-दा बोबडे बोलतो
भान हरवीतो । जन्मीचे या

रडे न ठाऊके । हांसणेच जाणे
सोनियाचे जिणे । केले माझे

उदास घराला । जन्मोनी बाळाने
आनंदाचे लेणे । चढवीले

★ ★

# २१२ : मुलाचे प्रश्न

चाल – अभंग

मोल देऊनिया । रडाया सांगती
परि रडताती । मोलास्तव

घरात दिसती । पर्वत अन्नाचे
पोट उपासाचे । दुःख भोगी !

जीवन जगाया । रण माजवीती
जीवन हरिती । दुबळ्यांचे !

अग्नि दोघामध्ये । जाईना चुकोनी
स्नेहाच्या बंधनी । तेचि आज !

कितीकां पुशीले । सांगेना कोणीही
विचारितो आई ! तुज आता

★ ★

# २१३ : अजब जीव

भैरवी – केहरवा

मधाच आलो । –परी विसरलो
    कशास आलो । कसा परतलो
        काहि कळेना, सर्व विसरलो

प्रिय जीवांच्या, प्रिय सुहृदांच्या
गाठी भेटी सद्भावांच्या
होउनि चुकती सर्वपरींच्या
        परि उमजेना कसा परतलो

नव्हती कसली मनि अभिलाषा
सुखे स्वीकरी कर्मन्यासा
अंतरिची अंतरीच भाषा
        निघुनी गेलो – परी परतलो

कैलासाला वंदन केले
ध्रुवताऱ्याचे दर्शन झाले
एकांतीचे पद अनुभविले–
    –सर्व विसरलो, परतुनि आलो
        पुन्हा परतलो । कसा परतलो
            काहि कळेना, कशास आलो

★ ★

अनुक्रम 32906 ... वि: ...
क्रमांक 9542 ...

# २१४ : घातकी

चाल – मज गमे ऐसा

उचित हे चन्द्रा ! तुज नसे । जीवनी या

जीवन तव हे ज्याच्यावरती
वाढवि जगती जो तव महती
विश्वांतरि तव ठसवी मूर्ति
कृतघ्नपण हे दाविसि कैसे

कुंभ सुधेचा तुझ्या ठायि रे
त्यामधुनी चंद्रिका पाझरे
सुखानंद उल्हास जगि भरे
तयास कारण कोण गमतसे

तेजाचे जो निधान तुझिया
त्यासचि सजसी तू भक्षाया
हर ! हर ! विहित न हे शशिराया !
तदीय ऋण का फेडिसि ऐसे

वाटे म्हणुनिच कलंक–लांछन
क्षयी जहाले लोभस जीवन
दुर्वचने तुज ताडी त्रिभुवन
जीवित–फल का हेचि अपैसे

★ ★

## २१५ : भुका चिलु

चिलू भुका तू खा पोळी
भुंकु नको रे या वेळी
मनी भिऊनी जाईल
पोळी उंदिर पळवील

* *

## २१६ : अरुणोदय

( उमरावतीच्या ' उदय ' पत्राच्या पंचवीस वर्षांच्या ज्युबिलीनिमित्त )

अरुणोदय जाहला
विदर्भी । विदारुनी रात्रिला
घोरतमा रात्रिला
विदारुनि । अरुणोदय जाहला

त्या निशाचरे निंदिती
होवो न उदय इच्छिती
तनमनास बहु झिजविती
परि ठेवुनि शिरि पाउला
विदर्भी । अरुणोदय जाहला

नव विहंगकुल कूजिती
नव फुले गंध उधळिती
नव पवन, कळ्या नाचती
आमोद सर्व कोंदला
विदर्भी । अरुणोदय जाहला

चैतन्य सुप्त जागवी
अभिनव ज्योति उजळवी
वाणीस मुक्या बोलवी
नवरूपरंग बहरला
विदर्भी । अरुणोदय जाहला

'बालार्क-तेज उसळिले
निज जीवन त्या अर्पिले
जननास जनन दीधले'
धन्यतेस पावला
विदर्भी । अरुणोदय जाहला

मे १९४४

* *

## २१७ : मायेचा पूत

दिंडी

ठायि ठायी तळपती दीप नाना
ठाव तिमिराचा कुठे आढळेना

आक्रमाया पथ बिकट हीनदीना
सुलभ करि तो यामिनी–कालराणा

सूर्य दडला एकाकि काल–पाशी
हाच चिंता–जप सदा चित्तकोशी
संभ्रमी या सारेच गोंधळून
स्थलिच राहति पर्वतापरि खिळून

सूर्य कालाचे उदर विदारोनी
पूर्वतेजे प्रकटला माळरानी
हर्ष इतुका जाहला दर्शनाने–
गगन कोंदे जयकार–गर्जनेने

त्याच मार्गी जन–सूर्य चरण टाकी
सभय निर्भय जग अखिल त्या विलोकी
पुढति सरता काहिसा निश्चयाने
तोच भरल्या दशदिशा क्रंदनाने

निज स्थानिच कल्लोळ माजवीला
वदे जो तो 'अजि हिन्द ठार झाला'
खुळचाना ह्या जा, पुसा या घडीते
दाखवावे कुणि 'खरा हिन्द कोठे?

प्रेम, पत्ते, पाळणे सोडुनीया
सकल झटती सांकडे निवाराया
परी मायेचा पूत कुस्तिगीर
न ये मैदानी दुजा धीर वीर

'कपि जयाचा नाचवी तोच त्याला'
'बघे' केवळ पांडित्य–विलासाला

पारतंत्र्याची आंच जया जाची
मुक्त व्हाया निज जीव तोचि वेंची

★ ★

## २१८ : गर्जू सदा 'जय' भारता !

'जय भारता' 'जय भारता'
गर्जू तदा । मम भारता !

● ●

रण संपले । जग जागले
अजुनी तुला । परतंत्रता
कुणि दीधले । मुखि टाकिले
अशि या घडी । तव दीनता
तुजला तुझे । अजि पारखे
तुडवी कुणी । म्हणुनी हता !

● ●

लपली कुठे । दडली कुठे
रोमातली । तव आढ्यता
जरि तेज तू । जरि शक्ति तू
तरि दाखवी । निज वीरता

कर हालवी । पद चालवी
हरि पाठिशी । तुझिया स्वता

● ●

जन–जागृति । किति संप्रति
तुज वाटु दे । बहु धन्यता
बल पोशिले । मन वर्धिले
पुढल्या क्षणी । तव थोरता
क्षण हा भला । तुज लाभला
मिरवी झणी । नव रक्तता

● ●

'जय भारता' 'जय भारता'
अपुरे नभा । करु भारता !
जग रंजवी । जग दीपवी
जनि रंगवी । निज मुक्तता
उधळू मने । फुलवू मने
गर्जू सदा 'जय' भारता !

★ ★

# २१९ : पुरुषोत्तम

जोवरि नाही आपण अपुले
स्वतंत्रपण ते तोवरि कसले
स्वात्रंत्र्याचे धुके पसरले
त्यांतच रंगे मानस दुबळे
    प्रेम–भाव हरपला–
    ठायि त्या द्वेष हा पुढती सरसावला

द्वेष सुटे मोकाट भारती
लोभ, मोह त्या येति संगती
स्वातंत्र्याची देति आहुती
चितेवरी त्या विडी ओढिती
    हर्षति बहु अंतरी–
    हिन्द हा देखुनी गुलाम मूर्ती खरी

स्वातंत्र्यास्तव जे जे झटले
हृत्कमली स्वातंत्र्य पूजिले
पुरुषोत्तम ते सुळी लटकले
द्वेषी मन परि मुळि नशांतले
घालि नाच नंगा–
घडिस या वाहवी तप्त रुधिरगंगा

एक मनाचे एक वचाचे
अनुभवि तै स्वातंत्र्य हिन्दचे
उज्ज्वलतेचे उदात्ततेचे
धी-श्री-शक्ति-स्थल लीलेचे
तो दिन दुरि नाही—
निश्चये भारता! द्वेष सुळी देई

★ ★

ता. १५ ऑगस्ट १९४७

*भारत स्वतंत्र*

झाल्यावर

# २२० : आनंदाचे भरतवाक्य

भैरवी – त्रिवट

भरतवाक्य आता । गाउ खरे देवा !

मुक्तपणे तव यश गाना
धन्यता गमे मना
क्षण हा धन्य नवा
भरतवाक्य आता । गाउ खरे देवा !

मुक्त जीवनी ये भरुनी
शुभद भाव आननी
धन्य होय जिव्हा
भरतवाक्य आता । गाउ खरे देवा !

पारतंत्र्य मायेमधुनी
मुक्त भरतमेदिनी
नमन तुला देवा !
भरतवाक्य आता । गाउ खरे देवा !

★ ★

# २२१ : आनंद चिरायु होवो !

( पुण्याच्या आनंद मासिकाच्या ५०० व्या अंकाकरिता )

चिरंजीव हो आनंदा ! मागणे प्रभूला

तुझी बाग फुलली जेव्हा अम्हा बालकांस
किति मोद होई तेव्हा तींत विहरण्यास
वाट बघत आनंदाची–तोचि एक ध्यास
अजुनि तुझ्या दर्शनि होतो बाल या क्षणाला
चिरंजीव हो आनंदा ! मागणे प्रभूला

तुझ्या रम्य फुलबागेची मौज किती वाटे
तो सुगंध सेवित असता स्नेह उरी दाटे
तिथे प्रथम 'आनंदा'चे गीतपुष्प[१] थाटे
पुढति कदा होइ न तैसा हर्ष तन्मनाला
चिरंजीव हो आनंदा ! मागणे प्रभूला

जनक तुझा बालमनाचा सखा 'वासुदेव'[२]
बालरंजनास्तव झटला तनुमने सदैव
ते स्वरूप कालोचित रे आजही तथैव

---

१. कविता लिहू लागल्यावर माझी 'शारदादेवी'ही कविता (आनंद–गीत, भाग पहिला) प्रथमतः आनंद मासिकांत (वर्ष ५ वे, अंक ५७ वा ता.–१५ एप्रिल १९११) प्रसिद्ध झाली. त्यानंतर दुसरीकडे येऊ लागल्या.

२. कैलासवासी वासुदेवरावजी आपटे. आनंदाचे संस्थापक आणि आद्य संपादक.

सान थोर घालिति तुझिया कंठि सुमनमाला
चिरंजीव हो आनंदा ! मागणे प्रभूला

जनन तुझे बा आनंदा पारतंत्र्यि होई
तुझी युवावस्था तैशी बंधनांत जाई
तरी बालरंजनि वृत्ती अचल नित्य राही
अगा ! आज स्वातंत्र्याचा तिलक तुझ्या भाला
चिरंजीव हो आनंदा ! मागणे प्रभूला

★ ★

## २२२ : हा भक्तियोग साचा, जयकार भारताचा

चाल – हा हिन्द देश माझा

स्वातंत्र्य–देवतेचा–। जयकार भारताचा

दिन आजि हा उदेला
स्वातंत्र्य–पूजनाला
हिन्द स्वतंत्रतेचा । जयकार भारताचा

हर्षे मनोज्ञ गाती
खगवृन्द हिन्द–गीति
स्वातंत्र्य संपदेचा । जयकार भारताचा

क्षितिजी निशाण फडके
रविचक्र रम्य चमके
तू धन्य भारता ! गा । जयकार भारताचा

यश, कीर्ति वाढवाया
रिपु नाश शीघ्र व्हाया
कर हालवी सदाचा । जयकार भारताचा

घे ध्यास एक चित्ती
रमवी तिथेचि वृत्ति
'हो नाथ या जगाचा' । जयकार भारताचा

हिन्द स्वतंत्र लोकी
चिरकाल रे ! विलोकी
हो, कृष्ण अर्जुनाचा । जयकार भारताचा

हे कर्मयोग देणे
हे ज्ञानयोग लेणे
हा भक्तियोग साचा । जयकार भारताचा

* *

# २२३ : कलगी–तुरे

किति सायासे पुण्याईने स्वतंत्रता लाभली
हिन्दला ईशकृपासाउली

रणयज्ञी या कितिक जिवांची आत्माहुति पहुडली
　　　　　　-कशाला गणति अता ती भली
हरदिन हरघडि नव रक्ताने हिन्दभूमि रंगली
　　　　　　-वाच्यता नको अता ती मुळी
　　　ही हीनदीनता होउनि दुरि कष्मल
　　　तळपावे तन्मुख तेजाने उज्जवल
　　　आनंद-सागरी बुडो हिन्दभूतल
यास्तव सारे सर्वस्वाचे तेजोबल सांडुनी
　　　　　　हिन्द हा स्वतंत्र होई जनी

परसत्तेचे निशाण-तेथे हिंद-ध्वज फडकला
　　　　　　छायि त्या सकल हिंद ठाकला
उजाडता दिन नभि दुमदुमली हिंद-हिंद-गर्जना
　　　　　　न ठावे अन्य बोल त्याविना
दो शतकांवरि सतत पारखे-सुदिन आजि उगवला
　　　　　　हिन्द निज सिंहासनि राजला
　　　जी नष्ट भिन्नता हिंदात्म्याला छळी
　　　जी श्वास मोकळा क्षण न घेउ दे मुळी
　　　तिज यमुना-तीरी तिलांजली दीधली
जसा वेणु-रवि निखिल मनीचा भेदभाव लोपला
　　　　　　तसा जगि हिन्द एक प्रकटला

वाटतसे विस्मये हाच का हिन्द कोठडींतला
　　　　　　की हा दुजाच कुणि जन्मला
दिसतो अजि हा भीमशक्तिचा म्लानमुखी दुर्बल
　　　　　　दर्शनी जगत् सर्व संकुल

अरुण-कांति मुखि, अचल पवित्रा, ताठ पाठिचा कणा
विसरवी जमा अहं–वल्गना
अपुलेच स्वताचे लेणे हा लेवुनी
अन्यथा कुणाची मिजास नच राखुनी
खल कुटिल खेळ जगि हिंमतीने उधळुनी
म्हणवी त्राता दलित जगाचा, मेरु धैर्य जीवनी
निशिदिनी अनुभवि ये कारणी

साच दृष्टिने सकल सत्य परि स्वतंत्रता गवसता
दुभंगे हिन्दएकरूपता
म्हणवि हिन्दचा पाइक जो तो सुमंत व्हाया धजे
वधेना बीज कोणते रुजे
एक सुराचे अनेक होती, विविध रंग रंगती
प्रतिस्थलि कलगितुरे साजती
म्हणविती सुज्ञ हे हिन्दभक्त भूवरी
का असा नाच करि तन्मानस वैखरी
की स्वभाव प्रकटे ऐनसमयि यापरी
हिन्द–स्वातंत्र्याची परि ही विटंबना देखुनी
शत्रुचे जगत हासते मनी

अचिंत येती हिन्दाभवती अनेकविध आपदा
पुढति त्या टाकु न देती पदा
अन्न मिळेना पोटा पुरते, काया वसनाविना
सुचेना उपाय निश्चित कुणा
सदैव म्हणतो परसत्तेने नागविले त्याजला
नागवी हिन्दच अजि हिन्दला

उत्कर्षि हिन्दचे ह्मटणे राही दुरी
शुभचिंतन नुसते न घडे कधि पळभरी
ठेवितो उलट त्या मानेवरती सुरी
सज्जन ह्मटती जीवे भावे, विरोधितो सत्वरी
मुखी जयघोष हिन्दचा परी !

★ ★

## २२४ : वन्दु धन्य गांधीला

धन्य हिन्द जाहला
धन्य पुत्र जन्मला
जन्मला
नांदला
धन्यतेस पावला

सकळ जगत सारखे
गणि कुणा न वावुगे
थोरता
सानता
ठाउके न त्याजला

शिशु प्रमोद शिशुगणी
ग्रामणीत ग्रामणी
विलसला
बहरला
आत्मभाव विसरला

निर्भयी निजांतरी
शांत सागरापरी
गिरि जरी
ये शिरी
अचल राहि स्वस्थला

मन विशाल निर्मल
कृति मनोज्ञ उज्ज्वल
पेरिले
चाखिले
भुवनि गंध विखुरला

मृत, सजीव असुनिया
पाजुनी सुधा तया
तळपवी
चमकवी
स्तिमित लोक जाहला

मायभूमि परवशी
तळमळे दिनी निशी
कष्टला
झुंजला
तोडि बंध अंतिला

सत्य शांति-पूजनी
दंग सतत जीवनी

वदु किती
गुणतति
' वन्दु धन्य गांधिला

★ ★

# २२५ : श्रीपूजन

हासली मधुर उषा मगल
फाकली विभा तिची उज्ज्वल
रविदीप लाविला हळुच कुणी नंतर
उत्फुल्ल जहाले विश्वाचे अंतर

डुलली नयनरम्य पालवी
फुलली गोड फुले नवनवी
आलापिति सुंदर सृष्टिरमेचे कवि
विलसली चराचरि लालस नव टवटवी

पण हा कुठे समीरण रुळे
होई सांज तरी नाकळे—
ह्या मुग्ध कमलिनीभवति पहा घुटमुळे
प्रति दला फुलवि तो मृदुस्पर्शनी बळे

पद्मजा पद्मासनि शोभली
द्राही मधु गंधे घुमविली

वरखालि उजळिल्या असंख्य दीपावली
निज भावभक्तिने विश्वेशे पूजिली

* *

## २२६ : भारत-स्वातंत्र्याचा - वाढदिवस -

चाल – लावणी

स्वतंत्रता मंगल
भारता !
करो तुझे मंगल
प्रभू तुझा मंगल
भारता !
करो तुझे मंगल

तव कुशल सतत चिंतणे
तुजसाठि जीव वेचणे
जगि तूचि एक जाणणे
हे वैभव अजि दुर्मिळ
भारता !
प्रभू तुझा मंगल

झोपली एकता सती
विषमतेस ये जागृति

कोणती कळेना स्थिति
माजला सकल गोंधळ
भारता !
प्रभू तुझा मंगळ

दिनरात गगन-वल्गना
विखुरती अमळ कल्पना
झाकिती बळे लोचना
शुचि अनिल होइ चंचळ
भारता !
प्रभू तुझा मंगल

परवशिच भारता गणी
निरयि त्या क्रीडती कुणी
स्व-जन-कंठि असि फिरवुनी
पी रुधिर, रंजवी दिल
भारता !
प्रभू तुझा मंगल

तव सुखांत सुख पाहणे
तव विपदि दुःख साहणे
जाणते जागते जिणे
दुमदुमो कीर्ति-परिमल
भारता !
प्रभू तुझा मंगल

हा वाढदिवस उज्ज्वल
दुरि खचित करिल कश्मल

यश दिगंतरी चढविल
ही स्वतंत्रता मंगल
भारता !
प्रभू तुझा मंगल

★ ★

# २२७ : बालसन्मित्र

चाल – होय संसार तरु

बालसन्मित्र हा
येइ बघ अंगणी
उठवि तुज बालका !
ऊठ रे, ऊठ म्हणि

लोळसी भूवरति
प्रियतमा ! अजुनि किति
सप्तरंगी जगति
साजली कणकणी

इंदु मंदावला
अरुण सरसावला
रम्य हा सोहळा
पाहि डोळा भरुनि

अनुक्रम 32908 दि: 31०५
क्रमांक १५५2 नों. दि. 3/2/५८

घेइ हनुमानसम
आकाशि उड्डाण
रविबिंब करि आण
खेळण्या अंगणी

चेंडु हा पृथिविचा
फेकि सूर्यास्थली
दावि पुरुषार्थ लव
जन्मुनी जीवनी

हिन्दचे तेज नव
तुजमिषे घे उदय
दुमदुमवि दिव्य रव
जगभरी या क्षणी

★ ★

# २२८ : 'मी नाहि जा'–

चाल – तुझ्या गळा

'तुझी फुले
माझी फुले
गुंफू वेण्यांचे गजरे'
'मी नाहि जा'–'करू बरे
देवाजीचे हार तुरे'

'तुजसाठी
मजसाठी
विणु या बिंदी जरीकाठी'
'मी नाहि जा'–'तू गोमटी
सुरेख दिसशिल गे मोठी'

'मुलींतली
तू सानुली
फुलांतली जणु चाफेकळी'
'मी नाहि जा'–'वा: हसली
अमुची बाळी छान भली'

'हळु गोडशी
बोले मशी
थय थय नाचू नको अशी'
'मी नाहि जा'–'तुझी खुशी
फेकु नको परि फुले अशी'

'रुसू नको
फुगू नको
फुलास मजला देउ नको'
'मी नाहि जा'–'रडू नको
पायदळी फुले तुडवु नको'

★ ★

# २२९ : श्रीरघुराज वंदन

श्रीमंत राजे बहादूर रघोजीराव साहेब भोंसले यांच्या हीरक महोत्सवानिमित्त. समारंभ ता. २७ मे १९५१ रोजी झाला.

खड्या चालीवर

जगि धन्य भोंसले-कुल
करी उज्ज्वल
वीरतेला
जरिपटका कटकेवरती फडकाविला

निज महाराष्ट्र-वारुला
पाजिले जला
जान्हवीचे
हृदयास कापवी पूर्वभारताचे

हा विदर्भ-पहारेकरी
वंग-सागरी
ठाण मांडी
समशेर तळपवी ठोकुनिया मांडी

हा वंश दीप आजला
दैवे लाभला
फणिपुराला
× श्रीराम शतायु, सुखी ठेवु, त्याजला

---

× नागपूरकर भोसल्यांचे कुलदैवत

त्या विभवकालिची मूस
धीर गंभीर
मूर्तिमंत
ही विराजिली या स्थली भाग्यवंत

हा उदार मनिचा किती
नाहि त्या मिति
थोर हृदया
करि वंदन भावे कवि हा रघुराजया

★ ★

## २३० : सत्कर्म ऐसे करी

होई भारत बा स्वतंत्र जगती-त्याचा पुनर्जन्म हा
त्याते उच्च पदी सुखे बसविणे कर्तव्य आजी महा
मार्गी कंटक तीक्ष्ण जे स्थलि जली विध्वंसि त्या सत्वरी
बोलो 'धन्य सुपत्र' लोक तुजला सत्कर्म ऐसे करी

★ ★

## २३१ : तिळगूळ

घे हा तिळगूळ
हातिची
फेकि सुधे, धूळ

राग तुझा सोड
हासुनी
बोल गोड गोड

★ ★

## २३२ : भारत-प्रशस्ति

भूषण जगताचे
स्वातंत्र्य भारताचे
हीन दीन जनता
वेड त्याचे

दुबळयांचा त्राता
पंकीय क्लेशहर्ता
अहर्निशी तिमिरी
दिव्य सविता

तुडवी जग पायी
अजवरी ठायि ठायी
तेचि तया चरणी
लीन होई

हृदयि प्रेम, शांति
प्रतिकार खड्ग हाती
मूस अभयतेची
परंज्योति

अशोक चक्राचा
संचार भारताचा
जलि स्थली व्योमी
मानतेचा

गौरिशंकराचे–
कुंतली भारताचे–
पुष्प खोवियेले
हर्ष नाचे

सरल मधुर वाणी
भारती सगुणखानी
जगा भास होई
चक्रपाणी

फुलांतला गंध
जीविचा सौख्यकंद
स्वतंत्र अमुचा हा
भरतखंड

★ ★

# २३३: तुझी पुष्पमाला–

(ता. १४ सप्टेंबर १९५३ रोजी संध्याकाळी पावसाची भरदार सर नुकतीच येऊन गेल्यानंतर प्रस्तुत गीत गुणगुणत नागपूर जेलरस्त्याने जात असता पश्चिमेकडे सहज दृष्टि गेली. तोच अगदी विलक्षण तेजस्वी पण भीषण लाल अंगार सूर्यबिंब ढगांतून क्षितिजाखाली जात असल्याचे दृष्टीस आले. त्यासरशी गुणगुणणे एकदम बंद पडले आणि त्याबरोबर कविताही लगेच संपली ! त्याला अनुलक्षून शेवटच्या दोन ओळी आहेत.)

चाल – कर्नाटकी

तुझी पुष्पमाला हवी कासया ही
बरा कंठ माझा असा शून्य देही
तुझी माळ तूते, मला कंठ माझा
अशा मीलनाचे पुरे सोंग आता

स्मरे बोल माझे तुझ्या चित्तकोशी
तुझ्या चिंतनी मी रमे आत्मतेशी
तुझ्या आवडीचे पथी मोकळा तू
नसे कोणताही मला स्नेह–किंतु

नको गुंतु येथे, करी सार्थ जीवा
तुझ्या कर्मयोगी सुखाचा विसावा–
–रवी रक्तबिंबे गृही पश्चिमेचे
वचा संपवू रे ! अता मुग्ध वाचे

★ ★

## २३४ : कुणी दोन जीव

कुणी दोन जीव प्रवाही वहाती
पुढे कालयोगे पडे गांठ भेटी

● ●

गृही एक लोळे सदा प्रेमरंगी
दुजा झोप घेई रणी भू-उसंगी

गुलाबास सिंची जला एक भावे
दुजा मात्र जाणे ध्वजा गीत गावे

स्वताचे स्वताला मनी एक चिंती
दुजा मुक्ति पाही जगत्-प्रेमशांति

दुजा भाव एका दिसे ठायि ठायी
समानत्व देखे दुजा त्याच ठायी

अशी प्रत्ययी ये स्थिती दो मनांची
परी एकमेकी रती रम्यतेची

★ ★

# २३५ : मधुर कंठ लाभला–

मधुर कंठ लाभला
गीत गाइ कोकिला
        हरिख पवन दरवळे
        स्नेहबंध मोकळे

नव सुगंध विखुरले
अंतरंग डोलले
        भुवनि गगनि रम्यता
        रम्यतेत भव्यता

तरुलतेत चारुता
चारुतेत मधुरता
        विराजिती फळे फुले
        तरल नयन लोभले

स्थिरचरी प्रसन्नता
मुळि कुठे न हीनता
        कणकणांत चेतना
        दीनता दिसेच ना

विविधतेत एकता
एकतेत दिव्यता
        बल विशाल साधुता
        शांतिब्रम्ह–थोरता

स्वतंत्र भारती पदा
ही वसंत–संपदा

★ ★

## २३६ : नंदकुमार

( चि. नंदकुमार श्रीधर टेकाडे – वय ३ वर्षे )

– माझा नातू –

हासत नन्दकुमार
एक एक पाउलास टाकित
विमान बंदुक दो करि परजित
मुखा भवतिच्या शांत निहाळित
जवळी येइ कुमार

हासत नन्दकुमार
नयनि भाव गंभीर झळाळत
तेज:कण चहुकडेस फेकित
मनिच्या आंदोलनी तरंगत
जवळी येइ कुमार

हासत नन्दकुमार
नव भारतिचा बंदुकधारी
की वैमानिक गगनविहारी

भविष्य जाणे एक मुरारी
जवळी येइ कुमार

* *

## २३७ : छोटा तात्या म्हणतो—

लहान चेंडू हा अमुचा
चेंडू मोठा तो तुमचा

आपण सारे खेळू या
नको रिकामे या समया

मने उल्हसित होतील
करी कृती शुभ घडतील

उगीच कोणी बसू नका
बसूनि नुसते होति चुका

सु-मने श्रमुनी काहि करा
जेणे लक्ष्मी येइ घरा

* *

## २३८ : श्रीगणेशायनम:

( १९५५ साली प्रसिद्ध झालेल्या नवीन सरकारी पाठ्य-पुस्तकांत 'प्रवेशिका–बालभारती' मध्ये 'ग' या मूळाक्षराची ओळख लहान मुलाना करून देण्यासाठी आजवर चालत आलेल्या श्रीगणपतीच्या चित्राऐवजी गाढवाचे चित्र व गवत वगैरे शब्द दिले आहेत. यावर बरीच टीकाही झाली. ती वाचल्यावर–)

चाल – अभंग

आम्हा सानपणी । गुरूजी सांगती
वंदूनीया आधी । गणपति

नंतर निष्ठने । करावा अभ्यास
मतीचा विकास । अनुभवी

तेणे मनुजाची । बुद्धि तीव्र होई
थोरपण येई । जगामाजी

सर्व भारताची । मंगल देवता
चरणारविंदा । नम्र होई

पण आज तेथे । गवत उगवे
नाचती गाढवे । स्वैरपणे

गणपति बाप्पा ! तयांना झटून
करी दूर कोण । तुज ठावे !

★ ★

# २३९ : तुजविणा

मज नको अता रे काही । तुजविणा
भोगिले भोग सगळेही । तुजविणा
अजि नुरे आस कसलीही । तुजविणा
कल्पना मनीच्या खुणा
नसे चेतना
कुण्या ठायी
रसहीन दिशा रे दाही । तुजविना

★ ★

# २४० : मुलाचे सांगणे

चाल – अभंग

आज शाळेमध्ये
गुरुजी सांगती । हिंदावरि प्रीति
करा आधी

मग आईबाप
शेजारी पाजारी । प्रीति करा भारी
धन्य व्हा या

हिन्दाच्या उत्कर्षी
झटा रात्रंदिन । तन मन धन
वेचोनिया

हिंदाचे संकट
स्वताचेच जाणा । निवाराया प्राणा-
-पण लावा

हिन्द होता थोर
आपणही थोर । जगाबरोबर
उभे राहू

★ ★

## २४१ : अर्पण

मज नको तुझी ती माया । गोजिरी
मज नको तुझी ती काया । साजिरी
मज नको तुझी ती छाया-। माधुरी
संतोषे त्वा जे दिले
करी जे भले
जीवना या
वाहतो तुझ्या ते पाया ! -श्रीहरि !

श्रीकृष्णार्पणमस्तु-

★ ★

# परिशिष्ट

## अनुक्रमणिका

१. नमो श्रीभगवति

२. खरा साधु

३. धन्य जनन

४. करुण कविता

५. 'आहे तुझे मी जनी'

६. इच्छा असेल तर–

७. तोच चिरंतन

८. संशयनिवृत्ति

९. प्राण्या! –

१०. बन्दिवान तरवार

# १ : नमो श्रीभगवति

( माझे पूज्य मातुल कै. वा. तात्याजी गडकरी यांच्या येथील श्री भगवतीच्या नवरात्रांत स्नेहीमंडळी भोजनास बसली असता त्या प्रसंगी लगेच तयार होऊन पंक्तीमध्ये म्हटलेला– )

श्लोक

शोभा ही रमणीय पाहुनि किती संतोष होई मना
प्रेमाचे पुतळेच की बसविले पाटावरी भोजना
वाढो ऐक्य असे समस्त हृदयी शुक्लेन्दुवत् सर्वदा
अंबेच्या सुकृपे घडीत विलया जातील त्या आपदा

ता. १९ सप्टेंबर १९११

* *

# २ : खरा साधु

( थॉमस पेन या प्रसिद्ध अमेरिकन गृहस्थाच्या इंग्रजी चरित्रामधील एका कवितेचे हे रूपांतर होय. प्रस्तुत गीत, माझ्या एका मित्राच्या आग्रहावरून आणि त्यानेच मूळ इंग्रजी कवितेच्या सांगितलेल्या भावार्थावरून लिहिले आहे.)

चाल – वीर शिरोमणि

मोठे मोठे तर्कज्ञानी मग्न विवादी जरी
राहु दे तसेच त्याना तरी

शूर वीर निग्रही चमूचे सेनानी-पद तुला
अर्पितो प्रेमे अम्हि निर्मला !

चतुर भाषणापुढती तुझिया प्रमाद सारे क्षणी
लयाला जाती जगतातुनी

सत्य; ज्ञानाबिना न जाणे गोष्ट दुजी अंतरी
केवढे उदात्त मन तव तरी

उत्साहाने अग्निपूर्णसा आत्मा तव संवगड्या
खरोखर घेइल स्वर्गी उड्या

रे थोर महात्म्या ! खचित अम्हा वाटते
येईल कोठुनी मरण तुझ्या कीर्तिते

तुझ्यासारिखे साधु असति, ते दुष्ट राजनीतिला
झुगारुनि रक्षिति निज कीर्तिला

★ ★

# ३ : धन्य जनन

श्लोक

तिन्हीही ऋणा फेडुनी सन्मनाने
खरा धन्य केला जगी जन्म ज्याने
कुण्या सार्थ शब्दे अशा गीत गावे
नमस्कार माझा तया[१] भक्ति भावे

ता. २६ आगस्ट १९२०

★ ★

# ४ : करुण-कविता

श्लोक

अब्धींतूनी विहग वदने बिंदु जे चार नेई
त्यांच्यायोगे उणिव तिळही त्याजला काय येई
शोकाब्धी हा सकल पसरे त्यांत हे अश्रु काही
दु:खावेगे सहज गळता थोर थोडाच होई

★ ★

१. माझे मातुल कै. ती. स्व. तात्याजी गडकरी, नागपूर.

# ५ : ‘आहे तुझे मी जनी’

श्लोक

‘व्हावे सौख्य मदीय’ हेतु धरुनी धावे तयामागुनी
आंदोलीत लता तशा तरुकुला अत्युच्च ओलांडुनी
अद्री दुर्गम नीलवर्ण विलसे ऐशा दऱ्यातील त्या
क्षेत्री शाद्वलदेशिही पळत ते मी पाठिशी त्याचिया

धो धो वाहि अशा झऱ्यावरुनिया, उत्तुंग शैलावरी
पक्षीराज रमे, सुखार्थहि तिथे आरोहणा मी करी
केले मी उदधीवरी भ्रमण ते, ज्या त्या स्थली भूवरी
सौख्याने नितनित्यशाच मजला टाळीयले त्यापरी

ये ग्लानी विमनस्क मी श्रमितसा मार्गास दे सोडुनी
विश्रांतीस्तव मी बसे विजनशा तीरावरी जाउनी
याची अन्नच एक, येउनि दुजा याञ्चा धनाची करी
अस्थी मात्र, करी तयास दिधले सोने तशी भाकरी

प्रार्थी एक ‘दया’ करी म्हणुनिया, ‘शांती’ दुजा दुर्बल
प्रत्येका करि साह्य मी समयि त्या जैसे असे मद्बल
तो ये मन्निकटी मनोज्ञ सुख ते दिव्याकृती घेउनी
मत्कर्णात हळूच तें कुजबुजे–‘आहे तुझे मी जनी’

‘सामर्थ्य–सोपान’

★ ★

# ६ : इच्छा असेल तर–

दिंडी

खरे अविनाशी सौख्य शोधिता का
खरा चिरकालिक मोद इच्छिता का
जयापासुनि कधि दुःख होत नाही
स्वर्ग होते हे जगत नित्य ज्याही

प्रेम–शांती–जीवनहि लाधण्याला
काय उत्कंठा लागली तुम्हाला
तरी त्यागा वासना दुष्ट आधी
तेवि अपुली लोपवा स्वार्थबुद्धि

क्लेश दुःखान्वित तेवि विपत्तीही
अशा मार्गे जातसा काय तुम्ही
त्रास तुमच्या देत जो श्रांत पाया
काय म्हणुनी क्रमितसा दुष्पथा या

जिथे नाही लव ठाव अश्रु शोका
असे विश्रांति–स्थान धुंडिता का
स्वार्थपूरित हृदयास तरी त्यागा
दिव्य निरुपम मग शांति–सौख्य भोगा

'सामर्थ्य–सोपान'

★ ★

# ७ : तोच चिरंतन

अंजनीगीत

दैवाचे ते किंकर कापत
अपणा वेष्ठुनि असता तिष्ठत
दुर्वच, पीडा तशा अनंत
लेखुनिया तुच्छ

द्वेषाच्या या झंझावाती
ढळू न देई लव जो शांति
शिवू न शकते अशा सतांप्रति
दुःखद शस्त्र कुणी

स्वीय गुप्त शक्तिच्या बळे तो
धीर तसाची शांत रहातो
अंतरि किंचित् चलित न होतो
की स्वस्थल न त्यजी

दुःखाच्या त्या भीषण समयी
प्रशांत मन, दृढ यद्वपु राही
तुच्छ गणी जो मृत्युविपत्तिहि
काल नम्र त्याला

अस्फुट चपला तदीय भवती
क्रोधाच्या त्या चमकत असती

मेघ-गर्जना नरकाची ती
भयद नित्य चाले

परी त्याकडे लक्ष न देतो
स्थलकालाच्या अतीत जातो
म्हणुनि न त्याला अपाय होतो
या गोष्टीकडुनी

अमर प्रेमे देवा आश्रय
तया कोणते राहिल मग भय
सत्य कवचही मिळता अक्षय
हिताहित न जाणे

ज्ञान अनंतत्वाचे होता
क्षणिक छाया येता जाता
अस्थिर कधिही न करी चित्ता
शांत सदा राही

श्लोक

दैवी प्रभावयुत जो असतो जगांत
अज्ञानरात्रिमधि जो वसतो प्रशांत
त्याते विदेहि समजा, अथवा कशास
प्रत्यक्ष मूर्तिमत सत्य चिरंतनास

'सामर्थ्य-सोपान'

★ ★

३२७७८ ४०७ ७५५२ ७/२/६२

# ८ : संशय निवृत्ति

दिंडी

सत्य-जीवन–देव याविषयि चित्ती
घेउनी मी संदेह, एक मूर्ति
वक्र, तममय देखिली; तिने माते
एक अद्भुत तइ गूज कथियले ते

होय ज्यांची जगतांत अंध दृष्टि
तयापासुनि राहते लपुनि सृष्टि
ईश्वरासच समजते ईशरूप
परा न कळे जरि यत्न हो अमूप

धरुनि दुःखदशा तममया पथाला
गूढत्यागा मी व्यर्थ यत्न केला
प्रीतिशांतीचा मार्ग दिसे जेव्हा
राहिले नच मज लपुनि काहि तेव्हा

होउनी मम अंधत्व दूर सर्व
प्राप्त होई मज अहा ! ज्ञानपर्व
दिव्य दृष्टी लाभली मजसि तूर्ण
तये देखियले ईशरूप पूर्ण

'सामर्थ्य–सोपान'

★ ★

# ९ : प्राण्या

श्लोक आणि आर्या

प्राण्या ! इच्छा धरिसि जरि तू बोधण्या सत्य लोका
त्वा ते शंका-मरुपद परी सांग उल्लंघिले का
दु:खाग्नीने प्रथम मनुजा ! चित्ति का शुद्ध होशी
चित्तांतूनी त्यजिसि सदये का मतांच्या भुतांशी

आधी तुझेच इतुके आहे का शुद्ध चित्त की जेथे
अपुला वास कराया मुळि ही दुष्कल्पना न कधि येते

प्रेमा बोधू जगति सकला काय इच्छा त्वदीय
आशा-भग्न स्थितितुनि तरी पार गेलास काय
दु:खाने का निशिभर कधी क्रंदनालागि केले
विश्वामाजी व्यसन अनय द्वेष का देखियेले

बघुनी द्वेष परस्पर लोकी अन्याय तेवि दुर्वृत्त
कळवळते का कधितरि सांग गड्या ! दु:खमुक्त तव चित्त

प्राण्या ! इच्छा तव मनि जर्या बोधण्या शांततेला
का तू मोठा कलह-उदधी पोहुनी पार गेला
या आयुष्यी बसुनि मनुजा ! शांततेच्या तटाकी
लाभे का ती तुजसि सुटका क्षुब्धतेपासुनी की

खळबळ तळमळ सारी निघुनी जाउनि अता तुझ्या हृदयी
शांती, सत्य, प्रेमा याविण उरले नसेच का काही

'सामर्थ्य-सोपान'

★ ★

# १० : बन्दिवान तरवार

डिसेंबर १९१८ च्या दिल्लीच्या राष्ट्रीय सभेच्या अधिशनास गेलो असता यमुना नदीच्या तीरावरील दिल्लींतील मोंगलांच्या किल्ल्यामध्ये छोटयाशा ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयांत दृष्टीस पडलेल्या कपाटांतल्या समशेरीस पाहून–)

चाल – सबसे राम

हे भारतीय समशेरी ! किति तरी दुर्दैवी गे ! तू
कोण कुणाची कुठे पहुडली विचार हा तुज का
भ्रमिष्टापरी स्थिती दिसे तव म्हणुनी ये शंका

हिंदसुतांच्या करी निरन्तर लकलकणारी तू चपला
मेघ-कपाटी दडून बसलिस काय म्हणू याला

शूर, मर्द, नरवीर पूर्विचे काल-मुखी दडले
म्हणुनि काय संन्यास असा हा तुज घेणे रुचले

संन्यासी तर दीनोद्धारी स्वतंत्र जगि असतो
कलिकाळाचे भय न धरी मग कुठे भूप मानव तो

खुळेपणे पण काय तुला मी विचारणा करि ही
नच घनजाली, संन्यासी नच बंदिवान तू पुरती

परवशतेतुनि मुक्त कराया तुझा जगी अवतार
काय उलट घडि ! स्वता तूचि त्या पारतंत्रि बेजार

रक्त बिन्दु ते जिथे दिसावे धूळ तिथे सारी
तेज, कान्ति, चापल्य सर्वही कधीच होती दूरी

रुण्डमाळ अर्पणी धरेला सहज जिची ख्याति
निवारिण्या कीटका न बळ ते सुखे शरीरी रमती

ओझरते जरि दर्शन घडले सिंह धेनु होती
धेनुच सिंहा काय दैवगति लीलेने नाचविती

नाम ऐकता कम्प सुटुनि वा धैर्य गळुनि जावे
करमणुकीचे तूचि तयांचे प्रीतिपात्र अजि व्हावे

कृष्ण अर्जुना, तू हिंदांना छायेपरि तैशी
परी सम्प्रती तया घडेना दर्शन वर्षोवर्षी

प्रतिप्रभाती तुला वन्दणे राष्ट्रधर्म हाची
लेखणीस त्या दैवी येई पाळी परि भजण्याची

शक्तिविण मति, मतिविण शक्ती वृथाचि जरी असती
तरि लेखणिहुनि समशेरीची महती मोठी जगती

प्रेमे ज्यासी हस्तान्दोलन थोरपणे करिसी
त्यांच करा तव धरुनि बन्धनी तेच ठेविती तुजसी

अखिल जगाच्या समशेरीनी निज तेजे जगि चमकावे
तुवा मात्र या कारागारी स्वस्थ रडत बैसावे

या दु:खे वा षण्ढ जहाले हिन्दपुत्र म्हणुनी
रडुनी रडुनी लोचन सुकती जाय मुखीचे पाणी

भारतभूभगिनीते कथिसी कर्मचरित की अपुले
हृदय तिचे ते काय परिसुनी यमुनारूपें द्रवले

तुवा रडावे तिजजवळी वा तिने तुझ्यापाशी—
परंतु सुभगे ! धीर न सोडी, कालचक्र पाठीशी

हर्ष केधवा शोक केधवा सार जीवनाचे
मुक्त होउनी पुन्हा छेदिशिल कंठनाल शत्रूचे

★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३२७६ वि: ४।०५
क्रमांक ७५५२ नों. दि. ७।२।५२

समाप्त

REFBK-0011975
REFBK-0011975
११८८५